Chapter-4

# प्रकरण - 4

# वर्गीकरण

## अ) वर्गीकरणाचे स्वरूप व वैशिष्ट्ये :

मराठी भाषा व साहित्य या संदर्भात 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आढळणाऱ्या उल्लेखात साधारणतः बडोद्याचा (गायकवाडांचा) नामनिर्देश असतोच. अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या जडणघडणीत बडोदे संस्थान अग्रेसर होते. 20 व्या शतकातील प्रारंभीची काही वर्षे वाङ्मयीन प्रगतीची द्योतक म्हणून गणली जातात.

श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या कारकीर्दीच्या लौकिकाचे कारण सांगताना श्री. ग. रं. दंडवते म्हणतात, "श्रीमंत सयाजीरावांच्या राज्यकारभाराचा इतिहास जसा बडोदे राज्याच्या दुसऱ्या अनेक सुधारणांचा इतिहास समजला जातो, तसाच तो मराठी साहित्याभिवृद्धीसंबंधाने समजला जाणे अवश्य आहे. महाराजांच्या सुधारणाप्रियतेमुळे बडोदे राज्यास जसा इतर अनेक सुधारणांचा लाभ झाला, त्याप्रमाणेच त्यांच्या विद्याव्यासंगामुळे व त्यांच्या मातृभाषाप्रेमामुळे बडोदे राज्यात मराठी साहित्याभिवृद्धीसही फार मोठी मदत झाली आहे."[1] श्रीमंत सयाजीराव स्वतः विद्यासंपन्न होते, इतकेच नव्हे तर आपली सर्व प्रजा विद्यासंपन्न व्हावी अशी त्यांची कळकळीची इच्छा असे. सर्व महाराष्ट्रातील व गुजरातेतील जनतेस विद्यासंपन्न करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांवर मराठीत व गुजरातीत ग्रंथ प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली. ह्याप्रमाणे ते स्वतः विद्यासंपन्न असून विद्याव्यासंगी होते. आपल्या उतारवयातहि ते अविश्रांत विद्यार्जन करित. विद्वान लोकांच्या ओळखी करून घेऊन त्यांस द्रव्यसाहाय्य करीत, ग्रंथसंपादनास प्रोत्साहन देऊन, आणि अनेक रीतीने प्रजेस साक्षर करण्याची खटपट ते करीत.

मराठी वाङ्मयाचे एक महत्वाचे पीठ असा बडोदेनगरीचा गौरव योग्य ठरावा अशा कितीतरी घटना मराठी वाङ्मयाच्या इतिहासात ठळकपणे दाखविता येतात. या सर्वांची चर्चा प्रकरण दोनमध्ये केलेली असून येथे फक्त त्याचा उल्लेख केलेला आहे. ग्रंथप्रसार चळवळ, ग्रंथनिर्मिती, साहित्य संमेलन, कोश वाङ्मयनिर्मिती इ. अनेक अंगांनी वाङ्मयवृद्धीस त्यांनी चालना दिली.

''भारतात ग्रंथालयाच्या चळवळीचा पाया बडोदे राज्यानेच घातला. ग्रंथालयांवरून राष्ट्र, भाषा, संस्कृती व वाङ्मय यांचे मूल्यमापन करता येते. प्रजाजनांना सुसंस्कृत व सुविद्य करण्याकरिता शहरापासून खेड्यांपर्यंत ही चळवळ बडोदे संस्थानात सरकारी पातळीवरून राबविण्यात आली. मोफत वाचनालये, प्रांत ग्रंथालये, यांसारख्या योजनांच्या द्वारे आणि संमेलने भरवून प्रदर्शनांच्या माध्यमातून ग्रंथांचे महत्त्व लोकांना पटविण्यात येऊ लागले. इ.स. 1910 पासून या कार्याला प्रारंभ झाला. आणि यातूनच 70% जनतेला लाभ मिळाला. परंतु या आधी इ.स. 1877 मध्ये बडोदे शहरात 'श्री जयसिंहराव वाचनालयाची' स्थापना झालेली आढळते.

ग्रंथालयांनी प्रजाजनांची ज्ञानलालसा वाढविली, बहुजन समाज सुशिक्षित व सुसंस्कृत केला, वाचनाची आवड निर्माण झाली, शिक्षणसंस्थाची भरभराट झाली. हा सारा इतिहास समाजाच्या प्रगतीचा द्योतक असून लक्षवेधी आहे. या ऐतिहासिक घटनेची 'मराठी ग्रंथालयांच्या इतिहासाने' विस्तृत नोंद घेऊन ती जगाच्या इतिहासात कशी महत्त्वपूर्ण आहे हे आकडेवारी देऊन सिद्ध केले आहे. (पूजा प्रकाशन, नागपूर, संपादक - ल.ना. पडोळे , पृ. 29, एप्रिल 1951)

उपरोक्त ग्रंथात डॉ. एस. आर. रंगनाथन् (अध्यक्ष, भारतीय ग्रंथालय संघ व प्राध्यापक, ग्रंथालय शास्त्र, विश्वविद्यालय, दिल्ली, दि. 31 मार्च, 1951 ) यांनी आपल्या "Post war Reconstruction of Libraries in India" या पुस्तिकेत दिलेल्या तुलनात्मक आकडेवारीच्या माहितीवरून बडोदे संस्थानतील ग्रंथालय चळवळीचे अनन्यसाधारणत्त्व कसे स्वयंसिद्ध आहे ते सहज लक्षात येते.

**एकूण ग्रंथसंख्या :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | इंग्लंड | - 28,00,00,00 | 2. | अमेरीका | - 68,00,00,00 |
| 3. | बडोदे | - 1,90,00,00 | 4. | मद्रास | - 1,00,00,00 |

**ग्रंथालयांच्या फायदा मिळणाऱ्या जनतेची शेकडेवारी :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | इंग्लंड | शेकडा | 99%, | 600 ग्रंथालयांच्या द्वारे |
| 2. | अमेरीका | शेकडा | 73%, | 7000 ग्रंथालयांच्या द्वारे |
| 3. | बडोदे | शेकडा | 83%, | 1347 ग्रंथालयांच्या द्वारे |

उपरोक्त आकडेवारी मोठी बोलकी असून भारतातील बडोद्याचे या क्षेत्रातील महत्त्व निदर्शित करणारी आहे.''[2]

बडोद्यातील साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुनही साहित्यासंबंधीच्या अनेक बाजूंची, प्रश्नांची चर्चा झालेली दिसते. श्री सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने 1909 सालचे 'साहित्य संमेलन' बडोद्यास भरले होते आणि परिषदेच्या कार्यात श्रीमंतांनी लक्ष घालावयाचे ठरविले होते. तशी बडोद्यात तीन साहित्य संमेलने भरली. 1909 साली ले. क. कान्हेबा रणछोडदास कीर्तिकरांच्या अध्यक्षतेखाली, 1921 साली साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकरांच्या अध्यक्षतेखाली आणि 1934 साली रा. नारायण गोविंद चापेकरांच्या अध्यक्षतेखाली. 1878-1934 या छप्पन वर्षांच्या कालावधीत भरलेल्या वीस संमेलनातील तीन संमेलने बडोद्यात भरतात ही घटनाच मोठी बोलकी आहे. मराठी सारस्वतात बडोद्याचे अनेक तेजस्वी उल्लेख आहेत. त्यातील साहित्यसम्राटांनी 1921च्या आपल्या अध्यक्षीय भाषणात केलेला उल्लेख त्यांच्याच शब्दांत उद्धृत करणे योग्य ठरेल. ते म्हणतात,

''पुण्याबाहेर बडोदे एकच असे शहर आहे की जेथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाची पुनरूक्ती झाली. पुण्यास दरवर्षी उन्हाळ्यात बहुतेक सर्व महाराष्ट्रातून विद्वान लोक येतच असतात. यामुळे तेथे संमेलन भरविणे ही गोष्ट विशेष महत्त्वाची नाही. पण बडोद्यासारख्या एका बाजूस पडणाऱ्या व महाराष्ट्रात समाविष्ट नसलेल्या

शहरात दुसरे वेळी संमेलन भरणे ही गोष्ट येथील महाराष्ट्राभिमान्यांच्या उत्कृष्ट स्फूर्तीवाचून घडणे शक्य नाही.''[3]

1909 च्या बडोद्यातील साहित्य संमेलनाने काय साधले ? या प्रश्नाचे उत्तर महत्त्वाचे आहे. यापूर्वी या संमेलनास 'मराठी ग्रंथकारांचे संमेलन' असे नाव होते. ते बदलून बडोद्यासच 'मराठी साहित्य संमेलन' असे व्यापक नामाभिधान देण्यात आले.

श्रीमंत सयाजीरावांनी या प्रसंगी केलेल्या भाषणातून म्हटल्याप्रमाणे ''भाषा ही उदात्त विचार व उत्कृष्ट कल्पना यांचा प्रसार करण्याचे साधन आहे. आजच्या संमेलनासारखे समारंभ वरचेवर झाले पाहिजेत आणि भाषेच्याद्वारे देशाची उन्नती करण्याचे काम झाले पाहिजे. भाषेचा केवळ स्थानिक दृष्ट्या किंवा प्रांतिक दृष्ट्या मी विचार करीत नाही.[4] भाषा आणि राष्ट्रीयता या संबंधीचा त्यांचा विचार खोलवरचा असून, त्यांच्या राष्ट्रसंकल्पनेत अंतर्भूत झालेल्या बहुजनसमाज संकल्पनेतून तो मननीय ठरतो.

इ.स. 1909 च्या मराठी साहित्य संमेलनानंतर श्रीमंतांची विद्याभिरूची व ज्ञानप्रसाराची ओढ अभिव्यक्त करणारी एक घटना उल्लेखनीय असून, ती अधोरेखित करणे आवश्यक आहे.

''सन 1909 साली हे आपले संमेलन बडोद्यास भरले होते आणि लगेच गुजराथी संमेलन झाले. (April 1912) तेव्हा या दोन्ही भाषांतील ग्रंथप्रसारासाठी दोन लाख रूपयांची रक्कम मी निराळी (अनामत) काढून ठेविली. आणि तिच्या व्याजातून आजपावेतो सुमारे 75 ग्रंथ गुजराथीत व मराठीत मिळून तयार झाले आहेत''[5]

ग्रंथप्रकाशनासाठी दोन लाखांचा जो निधी काढला आहे, त्याच्या व्याजातून 'श्रीसयाजी साहित्यमाला' विविध विषयांवरील पुस्तके सिद्ध करवून प्रसिद्ध करते. हे कार्य आजही अविरतपणे चालू आहे. यातील काही ग्रंथ जागतिक कीर्तीचे आहेत. आपण जाहीर केलेल्या योजना परिणामासकट प्रजेसमोर ठेवणे ही पद्धति (Follow up) बडोदे राज्यात अनुसरली जात होती, याचा हा बोलका पुरावाच होय. ही साहित्यमाला आता शतक महोत्सवासमीप आली आहे. मराठी साहित्येतिहासातील हे 'सयाजी युग' अविस्मरणीय ठरावे असेच आहे.

ह्या संबंधी भाटे कृत 'History of Modern Marathi Literature (1800-1938)' मध्ये आपल्याला उल्लेख सापडतो.

"In April 1912, His Highness the Maharaja saheb announced at the fourth session of the Gujarati Sahitya Parishad held in Baroda that he would set apart a sum of rupees two lakhs, the interest of which would be used to help the publishing of original works and translations in Vernaculars. Government Promissory notes of this Face Value were accordingly bought in September 1912 and deposited with the state Accountant General who pays the interest amounting to about Rs 6000 a year to the Department of Education. The object of this fund called the "Etaddesiya sahitya parishad fund" was to enable the people in the village, towns and cities to gain access to the best thoughts of the most civilized nations in the world. In the words of His Highness the Maharaja saheb it would be thus stated :-

"I would bring to the poor man or woman, the ordinary man of the bazaar to the common people every where, the wealth of literature now only known to the educated" [6]

श्री सयाजी साहित्यमालेतून निर्माण होणाऱ्या साहित्याकडे बघितल्यास निश्चितच एक आयोजनबद्ध, बुद्धिपूर्वक योजना आपण बघू शकतो. या आयोजनबद्धतेमुळेच व ग्रंथनिर्मितीमागील हेतू, उद्देशामुळे त्यामधील ग्रंथांचे वर्गीकरण करता येते. श्री सयाजी साहित्यमालेच्या पहिल्याच पुस्तकाच्या शीर्षस्थानी इतिहासगुच्छ असा उल्लेख करण्यात आलेला आहे. याचाच अर्थ असा की, पुस्तकांच्या निर्मितीसंदर्भात वर्गीकरणाची कल्पना प्रथमपासूनच योजिली असावी. या योजनेनुसार होणाऱ्या वर्गीकरण अथवा विभागीकरणास काटेकोरपणे आपणास बांधून घेण्याची आवश्यकता नाही. कारण साहित्याचे विभाग बहुतांशी परस्परावलंबी आणि एकमेकांशी संलग्न असतात. या योजनेस विशाल दृष्टीने बघितल्यास त्याचे खालीलप्रमाणे वर्गीकरण होऊ शकते.

1. प्राचीन साहित्य तसेच इतिहासाचे अन्वेषण, संशोधन व प्रकाशन
2. विज्ञानविषयक साहित्याचे गुजराती आणि मराठीत अवतरण
3. पश्चिमात्य साहित्याच्या जीवनचरित्र..... उपयोगी विभागातून भाषांतर
4. पारिभाषिक शब्दांचा तुलनात्मक अभ्यास आणि त्याचे गुजराती, मराठीत रूपांतर
5. शाळोपयोगी पुस्तकमालेची रचना
6. स्वतंत्रपुस्तक रचना

तथापि श्री सयाजी साहित्यमाला सुरू झाली तेव्हापासूनच 1. इतिहास 2. शिक्षण 3. चरित्र 4. विज्ञान 5. वार्ता 6. धर्म 7. प्रकीर्ण असे सात गुच्छ उर्फ वर्ग या ग्रंथांचे केलेले आहेत.

पुस्तक मालेचा अभ्यास करताना/वर्गीकरण करताना वरीलप्रमाणे त्यांच्याच वर्गीकरण पद्धतीस अनुसरून ग्रंथांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सदर मालेतून प्रसिद्ध होणाऱ्या काही ग्रंथांचा केवळ 'पुष्प' म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अभ्यासात हेच वर्गीकरण यथामूल मान्य स्वरूपात स्वीकारलेले असून त्यानुसार त्याचा विचार केलेला आहे. ह्या ग्रंथमालेची विशिष्टताच अशी आहे की त्यात ज्ञान-विज्ञानाशी संबंधित अनेक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. आणि केवळ भाषांतरित ग्रंथ एवढेच त्याचे स्वरूप न ठेवता आपल्याकडिल देशपरिस्थितीशी अनुरूप असे बदल पण त्यात करण्यात आले होते. उदा. तिकडच्या पौराणिक व इतर कथांबद्दल आपल्या इकडच्या कथा घेतल्या आहेत. घरच्या घरी शिक्षण देताना मुलांना खेळांची नावे घेताना लपालपी, गणेशतोबा, गोट्या-फुगड्या, सागर-गोटे अशी रुपे सांगताना मराठीकरणाचा विचार केलेला आहे. ह्या मालेत विज्ञानावरील अनेक पुस्तकेही प्रकाशित करण्यात आलेली आहेत. या पुस्तकांतून त्या त्या भाषेतील संकल्पनानिर्देशक शब्दांना तसेच विशिष्ट पारिभाषिक शब्दांना एतद्देशीय भाषेतील शब्दांचा पर्याय देण्याचा प्रयत्न केलेला असून शुद्ध देशीभाषेद्वारे वैज्ञानिक विषयांचे ज्ञान देण्यासाठी लोकभाषा या ज्ञानभाषा झाल्याच पाहिजेत याचा कृतिदर्शक विचार गंभीरपणे केलेला आहे.

ह्या पुस्तकांपैकी काही पुस्तके शिष्ट ग्रंथांची भाषांतरे आहेत. तरी त्यात स्वतंत्र पुस्तके नाहीत असे

नाही. अशा पुस्तकांची संख्या सुद्धा लक्षणीय आहे. ह्या ग्रंथमालेत केवळ मराठीच नव्हे तर गुजराती, हिंदी तसेच उर्दूभाषेत लिहिलेले ग्रंथही आहे.

## आ) इतिहास गुच्छ :

'इतिहास' या शब्दाची व्युत्पत्ती पाहिल्यास इति+ह+आस या शब्दसमुच्चयाचा मूळ अर्थ 'असे झाले' असा आहे. म्हणजे तो पूर्णपणे भूतकालाधिष्ठित असल्याचे दिसते. पण हे तेवढे खरे नाही. कारण इतिहास हा भूतकालाधिष्ठित असला तरी त्याचा अन्वयार्थ ज्ञानवंतांच्या स्वकालीन ज्ञानाच्या, विचारांच्या जाणिवांच्या वा सांस्कृतिक गरजांच्या संदर्भात लावला जातो. वर्तमानाप्रमाणे परिणामदृष्टया भविष्याकालाशीही इतिहासाचा संबंध पोहचतोच.

इतिहासाची एकंदर व्याप्ती लक्षात घेतल्यास मानवाप्रमाणे निसर्गघटित वस्तूंनाही इतिहास असल्याचे जाणवते. निसर्गघटितांचा इतिहास लिहिलाही जातो. तथापि, इतिहास कल्पनेत सामान्यत: मानवी जीवनातील उपक्रमांचा, तदनुषंगिक घडामोडींचा अंतर्भाव होतो. या घडामोडीत अंशत: का होईना भूगोलाचाही वाटा असतो.

''मानवी उपक्रमांचा, प्रयत्नांचा घटितांचा, यशापयशांचा, कार्यकारणभावांचा सामग्र्याने मांडलेला एक सुसंबद्ध, क्रमबद्ध असा भूतकालाधिष्ठित पट म्हणजे 'इतिहास' असे स्थूलपणे म्हणता येईल.'' [7]

इतिहास हा एक कथनप्रकार आहे. त्याचे स्वरूप निवेदनप्रधान असते. गतकालीन घटनांचे ज्ञान लिखित दस्तऐवजांवरून होते, त्याचप्रमाणे मौखिक परंपरांनी चालत आलेले असते. तसेच बांधकामे, नाणी, यांसारखे काही भौतिक पुरावे उपलब्ध होतात. या सगळ्यांचा अर्थ लावण्याचे काम इतिहासलेखनात केले जाते.

इतिहासाचे लेखन अनेक प्रकारे करता येते. म्हणूनच इतिहासलेखकावर स्वत:ची अशी विशिष्टभूमिका निवडण्याची जवाबदारी पडते. इतिहासकथनात विश्लेषण असते आणि स्पष्टीकरणही असते. विश्लेषण आणि स्पष्टीकरण या दोन्हीत इतिहासकाराची भूमिका ही निर्णायक घटक असते. इतिहासलेखनाची साधने आणि इतिहासलेखकाची दृष्टी या दोन गोष्टी कोणत्याही इतिहासकथनात महत्त्वाच्या असतात. अभिप्रेत इतिहास कोणत्या दिशेने लिहायचा, कोणत्या घटितांच्या अनुषंगाने लिहावयाचा हे इतिहासकाराने वस्तुत या साठीच

आधी निश्चित करावयास हवे. त्याने नियोजित दिशेने स्वीकारणीय वाटतील अशाच घटना निवडल्या पाहिजेत. घटनांचे त्या-त्या संदर्भात गौण-प्रधानत्त्व ठरविले पाहिजे. त्या घटना शक्य त्या पुराव्याने सिद्ध झालेल्या आहेत किंवा नाहीत, हे त्याने नीटपणे पाहिले पाहिजे. ''इतिहास लेखकाने आपली भूमिका न्यायाधीश प्रमाणे सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढे येईल तसतसा आपला निष्कर्ष बदलत जावा, त्यात पूर्वग्रह बिलकूल असू नये.'' ज्या युगाचा (Epoch) तो इतिहास असेल, त्या युगाची प्रकृती, प्रेरणा, प्रवृत्ती इतिहासकाराला अवगत झाली पाहिजे. त्यातील आकार विशेषांचा त्याला शोध झाला पाहिजे.

"History is nothing but the re-enactment of past thought in the historian's mind" हे कॉलिंगवूडचे म्हणणे ('The Idea of History') खरे असेल, पण भूतकालाची ही पुनर्निर्मिती कशासाठी ? कोणासाठी ? किती प्रमाणात ? इ. प्रश्नांचा विचार इतिहासलेखकाने करावयास हवा. त्याला ऐतिहासिक जाणिवेचा नेमकेपणाने वेध घेता आला पाहिजे. स्वीकृत भूतकाळाचे भूतकाळपण (Pastness of the Past), सारतत्त्व कशात आहे, त्याचा मर्मबंध कोणता, हे त्या त्या काळाच्या उपलब्ध ज्ञानसंदर्भात त्याच्या लक्षात आले पाहिजे. [8]

इतिहासकथन हा खरे तर भूतकालीन घटनांचा वर्तमानकालीन ज्ञानाच्या संदर्भात घेतला जाणारा एक शोध असतो. आणि ही शोधयात्रा कधी संपत नसते. नव्यानव्या ज्ञानकिरणांमुळे इतिहासकालीन घटितांना नवनवे अन्वयार्थ प्राप्त होत असतात. त्यांना उजाळा मिळत असतो. यासाठी इतिहासाचे लेखन पुन:पुन्हा नवप्राप्त ज्ञानाच्या प्रकाशात न्याहाळावे लागते. मानवी ज्ञानाची एकंदर अपूर्णता लक्षात घेता इतिहासाचे सारे घटक आकलनाच्या कक्षेत कधी काळी पूर्णतया येतील अशी शक्यता नाहीच. इतिहासलेखकांच्या आवडीनिवडीचे, पूर्वग्रहांचे एक सावटही कमी अधिक प्रमाणात इतिहासलेखकावर पडलेले असते. त्याचाही सत्यशोधनावर परिणाम होतो. इतिहासाचे लेखन एका व्यक्तिने करण्यापेक्षा व्यक्तिगटाने करावे, अशी सूचना यासाठीच पुष्कळदा पुढे येते. पण त्यानेही इतिहासलेखनाचे कार्य पूर्णतया यशस्वी होईलच असे नाही. इतिहासलेखन ही एक कलाही आहे. आणि शास्त्रही आहे. इतिहासोपयोगी उपलब्ध ज्ञानाचे सर्जनशील उपयोजन करण्याच्या दृष्टीने ती कला ठरते. तर वस्तुनिष्ठता व कार्यकारणभाव युक्तता यांची जपणूक इतिहासकाराकडून अपेक्षित असते. आणि या दृष्टिने इतिहास हे 'शास्त्र' ठरते.

इतिहासलेखनात प्राधान्य कशाला असावे ? प्रतिभावंतांच्या प्रतिभाबळाला की कमी अधिक प्रमाणात प्रतिभावंतांची जडण घडण करणाऱ्या त्याच्या भोवतीच्या परिस्थितीला, पर्यावरणाला ? हा प्रश्न इतिहास लेखनाच्या संदर्भात नेहमीच उपस्थित होतो. इतिहास म्हणजे थोर पुरुषांची चरित्रे. (History is a biography of great man) असा एक समज दीर्घकाळ रूढ होता आणि आहेही. यामुळे इतिहासलेखनात पूर्वी थोर पुरुषांच्या चरित्राला महत्त्व असे. इतिहासलेखन व चरित्रलेखन या दोन गोष्टी भिन्न आहेत, याचे भान अलीकडेच येऊ लागले आहे. पूर्वी या थोर पुरूषवर्णनात विशेषत्त्वाने जी गणना होई ती राज्यकर्त्यांची किंवा राजकीय पुढाऱ्यांची त्यामुळे इतिहासात राजकारणाला प्राधान्य दिले जाते. "History is past politics and politics is present history" असाही एक वाकप्रचार या संदर्भात रूढ आहे. त्याचा परिणाम विशेषत्वाने असल्यामुळेच साहित्येतिहासाचे खंडही सामान्यत: राजवटीशी संबंधित असतात (यादवकाल, शिवकाल इ.) किंवा त्यांची आखणी ग्रंथकाराच्या कर्तृत्त्वावर केली जाते (उदा. ज्ञानेश्वर पर्व, रामदास तुकाराम काल).

कोणताही इतिहास घेतला तरी त्याच्या घडणीत थोर पुरुषांच्या कर्तृत्वाचा मोठा वाटा असतो. युगपुरूष इतिहासातील घडामोडीचे नेते व नियंते असतात. त्यांच्या कर्तृत्त्वामुळेच इतिहासाला अर्थ प्राप्त होतो.

इतिहासलेखनाच्या संदर्भात ह्या विषयीचा विचार 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पनाकोश' यात दिसून येतो. इतिहासलेखनाच्या संदर्भात काही दृष्टिकोण प्रचलित आहेत. रोमॅंटिसिझमचा इतिहासलेखनावर बराच प्रभाव पडला. त्यातून प्रत्येक कालखंड, त्या कालखंडातील विशिष्ट लोकसमाज, स्थानिक परंपरा, स्थानविशिष्ट लोककला, आणि प्रादेशिक भाषा यांचा विचार इतिहासलेखनात महत्त्वाचा मानला गेला. एखादा प्राचीन कालखंडाचे आकलन करून घ्यायचे असेल तर त्या कालखंडातील कलाविष्कारांचा अभ्यास केला पाहिजे असे रोमॅंटिसिस्ट इतिहासकारांचे प्रतिपादन होते. त्यानंतर भाववादी (पॉझिटिव्हिस्ट) दृष्टिकोनाचा प्रभाव इतिहासलेखनावर झाला. सत्यघटनांचा शास्त्रीय पद्धतीने संग्रह करणे आणि गतकालाची खरी खुरी वास्तव प्रतिमा उभी करणे ही या इतिहासकारांपुढची लक्ष्ये होत. यानंतर प्रत्ययवादी दृष्टिकोणानुसार

गतकाल नष्टझालेला असल्यामुळे त्याची जशीच्या तशी पुनर्रचना करता येणे शक्य नाही; मात्र नष्ट झालेल्या युगातील लोकांच्या चिंतन प्रवृत्तीच्या स्वरूपाचा पुनरूद्धार करणे शक्य आहे आणि तेवढेच इतिहासकाराचे कार्य आहे.

इतिहास विषय अशा मानव जातीच्या विकासाच्या संदर्भातील काही दृष्टिकोणांचा इतिहासलेखनावर प्रभाव पडला.[9]

1) **संस्कृत वाङ्मयाचा इतिहास** (1915) **:-** ले. सीताराम वासुदेव पेंडसे यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतील इतिहास गुच्छात प्रसिद्ध झालेले पुष्प 1 ले आहे. याच पुस्तकापासून 'श्री सयाजी साहित्यमाले'चा आरंभ झाला आहे. साधारणपणे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात संस्कृत वाङ्मयाचा युरोपियनांस शोध लागला.

हा ग्रंथ "Macdonell's History of Sanskrit Literature" नामक इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर आहे.

संस्कृत वाङ्मय म्हणजे आपल्या सर्व देशी भाषांची व वाङ्मयाची जननी या दृष्टीने संस्कृत वाङ्मय महत्त्वाचे आहे यात शंकाच नाही. परंतु आपले पवित्र धर्मग्रंथ, शास्त्रग्रंथ, पुराणे इ. सर्व प्राचीन ज्ञानभांडार ह्या भाषेत असल्यामुळे आणि आपले धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि बौद्धिक जीवन, आपली दिनचर्या, आपला परस्पर व्यवहार इ. गोष्टींची सर्व उभारणी त्याच्यावरच झालेली असल्यामुळे, किंबहुना आपल्या हिंदुत्वाचा तो आत्माच असल्यामुळे त्याचे महत्त्व त्याहूनही अधिक आहे. म्हणून अशा ह्या संस्कृत वाङ्मयाचा संगतवर साद्यंत वृत्तांत माहीत असणे आवश्यक आहे. आपल्या मराठी भाषेत असा इतिहास लिहिलेला आढळत नाही आणि त्या दिशेने फारसे प्रयत्नही झालेले नाहीत. ह्यासाठी या विषयावर स्वतंत्र ग्रंथ होईपर्यंत निदान परदेशीय विद्वानांनी ह्या व असल्या अनेक विषयांवर जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांची थोडी बहुत कल्पना आपल्या लोकांस व्हावी व त्यांनी ऐतिहासिक दृष्टीने संस्कृत वाङ्मयाचा विचार करावा ह्या हेतूने प्रस्तुत ग्रंथ तयार केला आहे असे लेखकानेच म्हटले आहे.

सदर ग्रंथात 16 भागांमध्ये संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासग्रंथाचे (सरळ, सुबोध, सरस आणि मार्मिक) भाषांतर केलेले आढळते.

प्रस्तावनेतच संस्कृत अध्ययनाचे प्रचारक, संस्कृत अध्ययनाची प्रगती, संस्कृत वाङ्मयाचे महत्त्व, वाङ्मयाचे दोन मुख्य कालावधी, इतिहासाचा अभाव, वेदकाल निर्णय, कालनिर्णयक पुरावा, लेखनकलेचा उगम, 'ब्राह्मी लिपी', हस्तलेख व लेखनसामग्री, वैदिकभाषा व संस्कृत भाषा, संस्कृतचा व्यवहारात उपयोग, पाली व प्राकृत व संस्कृत भाषांवर परिणाम इत्यादी मुद्दांचे थोडक्यात विवेचन येते. त्यानंतर अनुक्रमे - वेदकाल, ऋग्वेद, ऋग्वेदाची कविता, ऋग्वेदांतील तत्त्व विचार, तत्कालीन समाज स्थिती, ऋग्वेदानंतरचे वेद, ब्राह्मणग्रंथ सूत्रे, पुराण, काव्य, नाटक, अद्भूत कथा आणि कल्पित गोष्टी, तत्त्वज्ञान यांचा परामर्श घेतला आहे. ग्रंथाच्या शेवटी पाश्चात्य संस्कृती व हिंदू संस्कृती यांच्या परस्परांवर झालेल्या प्रभावाचे थोडक्यात दिग्दर्शन केले आहे.

वेदकाळापासून ते काव्यकालापर्यंतच्या संस्कृत वाङ्मयाचे ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीने प्रस्तुत ग्रंथांत विवेचन आहे.

इंग्रजी न जाणणाऱ्या वाचकास हा ग्रंथ केवळ अपूर्व वाटण्याचा संभव आहे. प्रस्तुत भाषांतर सरळ, सुबोध, सरस आणि मार्मिक आहे. भाषा विषयाला साजेशी प्रौढ असून तिचा ओघ गंभीर, शांत, प्रसन्न, अस्खलित आहे. प्रस्तुत भाषांतराने मराठी वाङ्मयामध्ये चांगली भर पडली आहे. संस्कृत भाषेतील निरनिराळ्या अवस्थांनुसार वाङ्मयेतिहासाचे लेखन या दृष्टिने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. परिशिष्टांमध्ये शास्त्रकलाविषयक वाङ्मयाची सूचीही दिलेली आहे.

2) **मराठी रियासत** (1920) :- मध्यविभाग, छत्रपति शाहू - पेशवे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव (सन् 1707-1740)- रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे पुस्तक इतिहासगुच्छात पुष्प 65 वें म्हणून प्रसिद्ध आहे.

श्री शिवछत्रपतीच्या उदयापासून शाहूच्या आगमनापर्यंत मराठी रियासतीचा पूर्वविभाग, शाहू छत्रपतीपासून मराठेशाहीत फार मोठे रुपांतर होऊन तिजवर पेशवाईचा छाप बसला. ह्या पेशवाईचा

परमोच्च बिंदु माधवरावाचे अखेरिस येतो. तेथपर्यंतच्या भागास मराठी रियासतीचा मध्यविभाग असे नाव दिले आहे. माधवराव पेशव्याचे मृत्यूनंतर राज्यास उतरती कळा लागून शेवटी मराठेशाहीचा अंत झाला, त्या काळास उत्तरविभाग हे नाव देता येईल. असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे.

सदर पुस्तकाच्या जाहिरातीमध्ये स्वतंत्र पुस्तक असल्याचा उल्लेख आहे. प्रस्तावनेत लेखकाने मराठी रियासतीचे शिवकाल, पेशवेकाल व मराठी रियासतीचा अंतिम काल असे पूर्वविभाग, मध्यविभाग व उत्तरविभाग कल्पिले असल्याचा उल्लेख आहे. मध्यविभाग हा 4 उपविभागांचा असून त्यात पेशवाईचा कालखंड येतो. सदर पुस्तकाच्या पृष्ठ 9 वर शुद्धीपत्रक असून पृ. 10 वर संक्षिप्त रूपांचा संकेत निर्देश दिला आहे. या आधारांमुळेच विविध ठिकाणच्या वाङ्मयाचा अभ्यासकांना परामर्श घेता येईल अशी आशा व्यक्त केली आहे.

प्रस्तुत पुस्तकात एकूण 14 प्रकरणे दिली असून त्यांना शीर्षके दिली आहेत. 1. छत्रपति शाहू, बाळाजी विश्वनाथाचा उदय, 2. बाळाजीची पेशवाईवर नेमणूक, 3. मोगल रियासतीवर मराठ्यांची चढाई, 4. राज्यकारभार, 5. बाळाजी विश्वनाथाची अखेर, 6. बाजीराव व मोगल दरबार प्रास्ताविक, 7. बाजीरावाचा निजामावर शह, 8. दोघा राजबंधूंचा समेट व सेनापति दाभाड्यांचे पारिपत्य, 10. जंजिऱ्यांची मोहीम आंगरे व पेशवे, 11. वसईचा अपूर्व संग्राम, 12. माळवा बुंदेलखंड काबीज, 13. बाजीरावाची दिल्लीवर चढाई, 14. बाजीरावाची योग्यता तसेच शेवटच्या परिशिष्टात वंशावली दिल्या आहेत.

प्रत्येक प्रकरणामध्ये आलेल्या तपशीलाची माहिती प्रकरणाच्या सुरुवातीला दिली आहे. उदा. प्रकरण सातवे - बाजीरावाचा निजामावर शह (सन्. 1720-28) अशा शीर्षकाखाली 1. बाजीरावाच्या हालचाली व त्यांचे रहस्य, 2. साखरखेड्याची लढाई, निजामाची स्थापना, 3. बाजीरावाची परिस्थिती व अडचणी, 4. बाजीराव प्रतिनिधींचा वाद, चढावाची मसलत, 5. कर्नाटक स्वारी, (सप्टेंबर-जून,1725-26), 6. निजामाची चढाई व शाहूची तारांबळ, (सं.1724-27), 7. पालखेडास निजामाचा पाडाव, (सप्टें.- फेब्रु 1727-28)... इ.

पुस्तकाच्या प्रत्येक पानावर विशिष्ट विधानाच्या आधारासाठी घेतलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांचा उल्लेख क्रमांक घालून केलेला आहे.

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्ये पहिल्या दोन पेशव्यांच्या माहितीमध्ये नंतर झालेल्या संशोधनामुळे फार फरक पडल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे ही केवळ दुसरी आवृत्ती नसून त्यात वेगळे संशोधन आहे हे सांगितले आहे.

या इतिहासलेखनामुळे राष्ट्रेतिहासाचे कार्य पूर्ण होईल ही अशा व्यक्त केली आहे. तसेच नकाशाचे महत्त्व सांगितले आहे.

''एकंदरीत विद्यार्थी, शिक्षक व सामान्य स्त्री पुरूष वाचक यांस स्वराष्ट्राच्या गतकालीन कर्तृत्त्वाची ही भरपूर माहिती एकत्र वाचून, पुढील राष्ट्रोद्योगास लागणारा आत्मप्रत्यय त्यांचे ठिकाणी उत्पन्न होईल'', अशी आशा लेखकाने व्यक्त केली आहे.

3) **मराठी रियासत :-** मध्यविभाग 2 (1921)(सं.1740-1761)- छत्रपति शाहू, पेशवा बाळाजी बाजीराव : हे रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे पुस्तक इतिहासगुच्छात (साहसष्टावे) - 66 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

सदर पुस्तकाच्या उपशीर्षकामध्ये ''हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास'' असे नाव दिले आहे व त्या खाली ''छत्रपति शाहू , पेशवा बाळाजी बाजीराव'' अशी नामे दिली आहेत.

पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये लेखकाने या ग्रंथाची रचना करताना आजपर्यंतच्या प्राप्त कागदपत्रांची व ऐतिहासिक पुराव्यांची मदत घेऊन लिहिल्याचे सांगितले आहे. पेशवे आणि छत्रपती शाहू यांच्या कारकीर्दीमधील सत्य समजावे म्हणून उपलब्ध कागदपत्रांचे संदर्भ दिले आहेत. त्यामध्ये पेशव्यांबरोबर निजाम, फ्रेंच, म्हैसूरकर इ. पक्षांचे उपलब्ध तपशील वाचकांपुढे यावे हा हेतू आहे.

मराठी रियासतीचा हा दुसरा भाग असल्यामुळे 15व्या प्रकरणापासून 25व्या प्रकरणापर्यंत तसेच वंशावळीचे एक प्रकरण आलेले आहे.

15. नवीन पेशव्याचा उपक्रम, 16. नानासाहेबाच्या उत्तरेकडील स्वाऱ्या, 17. कर्नाटकातील स्वाऱ्या, 18. शाहू छत्रपतीची अखेर, 19. शाहू छत्रपतीची योग्यता, 20. छ. राजाराम, ताराबाई, व पेशवा 21. दमाजी गायकवाड व पेशवा, 22. निजामशाहीचा अपकर्ष, 23. पेशव्याची कर्नाटकातील करामत, 24. आंगरे, इंग्रज व पश्चिम किनारा, 25. नागपुरकर भोसले, बंगाल व पेशवा.

शुद्धिपत्र अनुक्रमणिकेनंतर दिले आहे. अनुक्रमणिकेमध्ये प्रकरणांना शीर्षके देऊन त्यातील आशयाचा तपशील दिला आहे. उदा. प्र. 17. मध्ये कर्नाटकांतील स्वाऱ्या या शीर्षकाखाली 1. कर्नाटकचा पूर्ववृत्तांत, 2. कर्नाटकाची दुसरी स्वारी व चंदासाहेबाची कैद, 3. कर्नाटकची तिसरी स्वारी बाबूजी नायकाची खटपट (1746 डिसेंबर-में 1747) वगैरे.

प्रस्तुत भागामध्ये शाहूची अखेर आणि नानासाहेब पेशवे याचा पराक्रम हा भाग प्रामुख्याने आहे. पृष्ठसंख्या वाढल्यामुळे पानीपतचा भाग दुसऱ्या विभागामध्ये समाविष्ट केला आहे.

शाहू छत्रपतीचा मृत्यू हा प्रसंग मराठेशाहीच्या कराभारात अनेक कारणांनी क्रान्तिकारक असल्यामुळे तत्संबंधी व पेशव्यांच्या एकंदर राज्यधोरणासंबंधी नानाप्रकारचे विपर्यास प्रचलित आहेत, त्यातील ऐतिहासिक सत्य व खरे मर्म स्पष्टपणे कळावे म्हणून, त्या प्रसंगाचे पूर्वोत्तर भाग व त्याचे उपलब्ध कागदपत्र महत्वाचे वाटल्याने मुद्दाम विस्ताराने घेतले आहेत.

सदर पुस्तकात नानसाहेब पेशव्याच्या गुणदोषांचे उल्लेख ठिकठिकाणी आले आहेत, ते केवळ त्या त्या प्रसंगापुरते समजावे असे लेखकाने सांगितले आहे.

आपल्या आत्मचरित्रात गो.स. सरदेसाई यांनी म्हटले आहे की, "इतिहासलेखकाने आपली भूमिका न्यायाधीशाप्रमाणे सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढे येईल तसतसा आपला निष्कर्ष बदलत जावा, त्यात पूर्वग्रह बिलकूल असू नये. इतिहासलेखकावर ही मोठी जवाबदारी आहे." [10] अशी न्यायाधीशाप्रमाणे आपली भूमिका रियासतीचे लेखन करिताना लेखकाने ठेवली आहे, हे प्रत्ययास येते.

प्रस्तुत पुस्तका संबंधी किंकेड यांनी आपला अभिप्राय श्री. सरदेसाई यांचेकडे पाठविले होता (dt. 4-6-1921) त्यांनी म्हटले आहे की, "I read and reread your most charming and delightful Riyasat Pt. II. This if i may say so, is the most valuable contribution to Maratha History of Modern Times. The easiness and clearness of the style compare favourably with voltaires' siecle de Louis XIV." [11]

किंकेड ह्या गृहस्थांनी 'History of the Maratha People'हा ग्रंथ सं. 1918-1925 च्या दरम्यान तीन भागांनी प्रसिद्ध केला. आपल्या 1921च्या पत्रात त्यांनी सरदेसायांना लिहिले आहे. "I look forward with equal anticipation to your life of Balaji Bajirao. That work must be an immense labour. I never have read a book with combined such clearness with such learning. Vol II of my History of the Maratha people will be going to press in a month or two. I am afraid I have had to change a good deal of the draft in the light of your Riyasat. I shall fully acknowledge my debt to you." [12]

4) **मराठी रियासत :-** मध्यविभाग 3 (1922), पानिपत प्रकरण, (स.1750-1761)- ले. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे पुस्तक इतिहास गुच्छात 68वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत मध्यविभाग 3 ला उपशीर्षक म्हणून "हिंदुस्तानचा अर्वाचीन इतिहास" असे नाव दिले आहे. यात प्रकरण 26 ते प्रकरण 32 अशी फक्त सात प्रकरणे आहेत. (प्रकरण 26. उत्तरेकडील कारभाराचे बीज, 27. मराठ्यांचा बादशाहीत शिरकाव, 28. अब्दालीचा पाठलाग, 29. अब्दालीकडून शिंदेहोळकरांचा पाडाव, 30. पानीपतचा घनघोर संग्राम, 31. नानासाहेब पेशव्याची योग्यता, 32. शाहूकालीन प्रसिद्ध घराणी असे आहेत.) प्रत्येक प्रकरणामध्ये आलेल्या तपशीलांची माहिती प्रकरणाच्या सुरुवातीला दिली आहे. उदा. प्रकरण सव्विसावे-उत्तरेकडील कारभाराचे बीज, 1. प्रास्ताविक, 2. बादशाही अहवाल, 3. रोहिल्यांचा पाडाव, 4. दिल्लीतील भानगडी, 5. बादशाह-वजिरांचे युद्ध व मराठ्यांची हेळसांड.

ग्रंथाच्या विशेष कालखंडाबद्दल प्रस्तावनेत लेखकाने सांगितल्याप्रमाणे नानासाहेब पेशवे याच्या कारभारापर्यंतची माहिती दिली आहे. विषयपूर्ततेसाठी मराठेशाहीतील कित्येक प्रसिद्ध ऐतिहासिक घराण्यांचे वृत्तांत व उपलब्ध झाल्या तितक्या वंशावळीही ह्या भागात दिल्या आहेत. इतिहासाची साधने सतत नव्याने उपलब्ध होत असल्यामुळे या संशोधनात भर पडेल अशी ग्वाही लेखकाने प्रस्तावनेत दिली आहे.

पानिपतच्या संग्रामाचे वर्णन ''महाराष्ट्राच्या समुच्चित कर्तृत्त्वाचा कळस''असे केले आहे. त्यामध्ये मराठे उत्तरेकडे कसे पोचले व कर्तृत्व कसे गाजवले याची माहिती देऊन दिल्ली - बादशाह, जाठ, रोहिले, बुंदेले, शीख, रजपूत इ. चे हेतू व त्यांचे वर्तन यांचा विचार समजावून दिला आहे. मराठ्यांचा बादशाहीत शिरकाव, अब्दालीचा पाठलाग, शिंदेहोळकरांचा पाडाव, पानीपतचा घनघोर संग्राम अशी चार प्रमुख प्रकरणे प्रत्यक्ष युद्ध व त्याचे परिणाम यावर असून नानासाहेब पेशवे यांची योग्यता सांगणारे एक प्रकरण वेगळे लिहिले आहे. याशिवाय औरंगजेबचे अनुगामी व जोधपुर आणि पेशवे यांच्या वंशाची माहिती दिली आहे.

पानिपतचा संग्राम भूगोलिक परिस्थितीवरून यथास्थित कळण्यासाठी एक नकाशा देऊन त्यात सदाशिवरावाचा मार्ग व शक्य तितकी स्थळे दाखविली आहेत.

किंकेड यांनी आपल्या 5 जुलै 1921च्या पत्रात सरदेसायांना लिहिले आहे, "I was very anxious to see your third volume before I published my second which ends at 1750. The old historical Marathi letters are to a foreigner very difficult. But your arrangement is so lucid and admirable that they become quite clear. Would it be too much to ask you to let me see the 100 pages of the third peshwa which you say are already in print. I shall make ample acknowledgement in my preface. Indeed I shall do that any way as i have derived a great deal of help from your second volume. I am trying to put the Maratha case fairly before the English Public and to destroy the

venomous atmosphere created by Grant Duff and his school " [13]

किंकेडने केलेल्या या भाष्यामुळे रियासतकारांचे मराठ्यांच्या इतिहासलेखनाचे महत्त्व जसे जाणवते तसेच ग्रँटडफ सारख्या इंग्रजांचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनही लक्षात येतो. म. रि. च्या मध्यभागातील तीन खंडातून गो. स. सरदेसाईनी लिहिलेला मराठ्यांचा इतिहास हा राजकीय चरित्रे केंद्रवर्ती ठेवून लिहिलेला आहे. तिसऱ्या भागात राजकीय चरित्राइतकेच मराठ्यांच्या इतिहासातील निर्णायक अशा पानिपत युद्धाच्या घटनेलाही प्रामुख्य दिलेले दिसते. नवनवीन संशोधनानुसार इतिहासलेखनात बदल होत असतो हे लेखकाने नमूद केल्याने इतिहासलेखकाच्या शास्त्रीय दृष्टिकोनाचे प्रत्यंतर त्यांनी दिलेले दिसते.

5) **पार्लमेंटचा इतिहास, घटना व पद्धती :-** (इ.स.1924), अनुवाद - रा. रा. दाजी नागेश आपटे यांचे पुस्तक इतिहास गुच्छात 83वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. सदर पुस्तक सर कोर्टने इल्बर्टकृत 'पार्लमेंट' या ग्रंथाचे रुपांतर आहे.

'पार्लमेंट' या शब्दाचा मूळ अर्थ 'संभाषण' असा होता. हा शब्द लॅटिन भाषेत उपयोजिला जात असे. इसवीसनाच्या तेराव्या शतकात, तत्कालीन धार्मिक मठातील सांप्रदायिक भिक्षूंच्या सायंकाळी भोजनोत्तर होणाऱ्या गप्पाष्टकांना निंदव्यंजक अर्थाने तो लाविला जात असे. यानंतर काही काळाने या अर्थात बदल होऊन महत्त्वाच्या प्रसंगी होणाऱ्या मसलतीच्या वगैरे संभाषणास हा शब्द लाविला जाई. सन् 1245 साली फ्रान्स देशाचा राजा नववा लुई व पोप चवथा इनोसंट यांची झालेली भेट याच शब्दाने वर्णिली आहे. इंग्लंडचा राजा तिसरा हेन्री याने एका प्रसंगी प्रजावर्गाच्या काही तक्रारी ऐकून घेण्यासाठी त्यांच्यातील काही थोर लोकांची एक सभा बोलवली होती, तिचा उल्लेख एका तत्कालीन लेखकाने पार्लमेंट याच नावाने केला आहे. याच अर्थाने हा शब्द पुढे इंग्लंड देशात रुढ झाला व पूर्वोक्त हेन्री राजानंतरच्या पहिल्या एडवर्ड राजाच्या कारकीर्दीत नियमाने ज्या राष्ट्रीयसभा बोलविण्यात येत असत त्यांना लागू केला गेला. पुढे या शब्दाला ''सभासदांचा समूह'' किंवा ''सभासदसंघ'' असे अर्थप्राप्त झाले. सायमन द मॉंटफर्ट याला पार्लमेंटचा जनक म्हटले आहे.

प्रस्तावनेमध्येच अनुवादकर्त्याने आपली भूमिका मांडली आहे. ब्रिटीश पार्लमेंट बरोबर फ्रान्स,

जर्मनी आणि अमेरिका या सारख्या सुधारलेल्या देशांच्या राज्यतंत्राशी तुलना करून ग्रंथ लिहिला आहे अशी भाषांतरकर्त्यांने नोंद केली आहे. पार्लमेंट या विषयावरील मराठीतील हा पहिलाच ग्रंथ आहे. भारतात आता ( 1924 मध्ये) ब्रिटीश पार्लमेंटचा आदर्श धरल्याने भारतीयांना हा ग्रंथ महत्त्वाचा वाटेल आशी आशा व्यक्त केली आहे. सयाजी महाराजांच्या ''ज्ञानवृद्धीसाठी चालू आसणाऱ्या अविरत उत्तेजनाचे फल'' असे या ग्रंथाबद्दलचे मत भाषांतरकाराने दिले आहे.

सदर ग्रंथरचना 10 प्रकरणामध्ये आसून पार्लमेंटची उत्पत्ति आणि वाढ, कॉमन्स सभेची घटना, कायदे करण्याची पद्धति, जमाबंदी व राज्यकारभार, सभेचे अधिवेशन व कार्यपद्धति, सभेची कार्यव्यवस्था, सभासद व मतदारसंघ, सभेचे दफ्तर, छापखाना व लौकिक संबंध, हाऊस ऑफ लॉर्डस व तुलनात्मक विविचन इतक्या प्रकरणात मुख्य विषयांचे सुंदर विवेचन केले आहे.

सदर ग्रंथ अत्यंत उपयुक्त असून राजकीय अनुशासनाचा अभ्यास करणाऱ्यांना व इतिहासवेत्त्यांना तिच्या रचनेची, घटनेची व वृद्धीची संगतवार हकीकत अत्यंत मनोरंजक व बोधप्रद वाटल्यावाचून रहाणार नाही.

या ग्रंथाला आधारभूत असलेल्या ग्रंथांची यादी प्रस्तावनेनंतर दिलेली आहे.

6) **मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया** (1922):- कर्नल कमांडंट नानासाहेब गणपतराव शिंदे यांचे पुस्तक इतिहासगुच्छात पुष्प 90वें म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर पुस्तक लिहिण्यास लेखकास दोन गोष्टींनी प्रेरणा दिलेली दिसते. पैकी एक राजवाड्यांचे अवतरण 'ग्रंथकाराचे दोन शब्द' मध्ये दिलेले आहे.

''मराठ्यांच्या लष्करी इतिहास तर अगदीच लंगडा आहे. ह्या कामी काही लष्करी बुद्धीच्या मराठ्यांनी मेहनत केली पाहिजे. युद्धांच्या कथांचे तपशील ऐकून जातिवंत अशा बालयोद्धयांचे बाहू स्फुरण पावतात, परंतु चाळीस वर्षांच्या मेहनतीनेही ह्या कथा सजविण्याचे सामर्थ्य संशोधकांना आलेले नाही''- राजवाडे., तसेच कर्नल म्यालेसनच्या 'Decisive Battles of India' या नावाच्या पुस्तकावरून सदर पुस्तक लिहिण्याची कल्पना आली.

''ज्या मराठ्यांनी, रामेश्वरापासून अटकेपर्यंत भगवा झेंडा नाचविला, ज्यांनी गिलचे, रोहिले, पठाण, शीख, रजपूत, रांगडे, फिरंगी, इंग्रज इत्यादि शूर लोकांच्या फौजा शेकडो वेळा लढाईत गाठून मारून तूडवून घूळीस मिळविल्या, दूरदूरच्या प्रांतातील मानी व प्रतापी राजांची सिंहासने ज्यांच्या विजय-दुंदुभीच्या नादाने, दर वर्षांस हादरू लागत, ज्यांनी महाप्रतापी मोगल बादशहास आपल्या हातातील बाहूले बनविले, ज्यांनी सर्व हिंदुस्थानात साम्रज्य स्थापन केले, त्या आपल्या शूर पूर्वजांनी काय काय पराक्रम केले, त्यांची माहिती होण्यासाठीच हे पुस्तक लिहिण्यात आले आहे.''

सदर पुस्तकाच्या सुरवातीसच आधारभूत अशा एकंदर 29 पुस्तकांची सूची दिलेली असून त्यातील 6 पुस्तके इंग्रजीत आहेत व त्यांची नावे, लेखकासह दिली आहेत.

पुस्तकात एकंदर 10 प्रकरणे असून 1. मराठ्यांची लष्करी व्यवस्था, सरंजामी पद्धत, गनिमीकावा आणि कवाइती कंपू, 2. सिंहगडचा छापा. 3. बुंदेलखंडावर स्वारी, 4. वसईचा प्रसिद्ध वेढा, 5. पानपतचा घनघोर संग्राम, 6. तळेगावची लढाई, 7. खर्ड्याची स्वारी, 8. असाईची लढाई, 9. लासवारीची लढाई, 10. डीग व भरतपूरचे प्रसिद्ध वेढे इः विषय त्यात अंतर्भूत आहेत.

ह्या ग्रंथात मराठ्यांच्या मुख्य मुख्य लढायांचे सविस्तर वर्णन केले आहे. हे पुस्तक आनंदपर्यवसायी नाही. यात मराठ्यांचा उच्छेदच अखेर सांगितला आहे. तरी प्रथमच्या लढायात त्यांचा उत्कर्षही वर्णन केलेला आहे. शेवटच्या लढायात मराठ्यांचा उच्छेद का झाला, याची कारणे नीट शोधून त्यांविषयी मनन केले पाहिजे, असे वाटाण्यास लावणारा हा ग्रंथ आहे. 9 चित्रे व 5 नकाशे सुद्धा ग्रंथात दिले आहेत.

प्रस्तुत ग्रंथ हा इतिहासलेखनातील घटना केंद्रवर्ती ठेवून लिहिलेल्या मराठ्याच्या लष्करी इतिहासलेखनाचा प्रयत्न या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे म्हणता येईल.

7) **अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे :-** लेखक व प्रकाशक - विनायक सदाशिव वाकसकर, (इ.स.1925) यांचे हे स्वतंत्र पुस्तक असून ते इतिहास गुच्छात पुष्प 98 वे म्हणून प्रसिद्ध आहे.

सकृत दर्शनी अगदी क्षुल्लक दिसणाऱ्या व्यक्तींनीही इतिहासात एकाद वेळीच का होईना पण अमूल्य कामगिरी केलेली असते. अशा अनेक व्यक्ती मराठ्यांच्या इतिहासात पदोपदी आढळतात. त्यांची मिळतील तेवढी चरित्रे मिळवून ती वाचकांस सादर करण्याच्या हेतुमुळेच सदर पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

देवी अहल्याबाई सारख्या व्यक्ती जगतप्रसिद्ध असूनही त्यांची अवश्य ती माहिती बहूजनसमाजास नसते. असे प्रत्ययास आल्यामुळे तशी एक दोन चरित्रे मुद्दामच यात घातली आहेत.

एकंदर 14 व्यक्तींची चरित्रे सदर पुस्तकात दिली आहेत. त्यामध्ये 1. रामचंद्रबाबा सुखटणकर, 2. रामदासपंत, 3. चंगिसखान, 4. अहल्याबाई, 5. खंडो बल्लाळ, 6. नानक, 7. अहंमदशहा अबदाली, 8. रामशास्त्री, 9. भास्करराम, 10. मुजफरखान गारदी, 11. तुळाजी आंगरे, 12. रंगो बापूजी, 13. इभराहिमखान गारदी, 14. सखाराम हरि यांचा समावेश आहे. तसेच होळकर व रंगो बापूजी यांची वंशावळीही दिली आहे.

हे पुस्तक विद्यार्थी वर्गासाठी मुद्दाम लिहिले असल्यामुळे काही ठिकाणी जुना पत्रव्यवहार जशाचा तसा उद्धृत करू नये असा आरंभी संकल्प केला होता. पण अस्सल पत्रांतील भाषेहून सुंदर व पुरणामकारक भाषा लेखकाला लिहिता न आल्याने काही ठिकाणी अस्सल पत्रांतीलच उतारे घेतले आहेत. उदा. मराठ्यांच्या इतिहासामध्ये पानिपत प्रकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याने सर्वत्र परिचित असे आहे. या युद्धामध्ये मराठ्यांच्या तर्फे मुख्य सेनापति सदाशिवराव भाऊ असून मुसलमानांच्या बाजूने कंदाहारचा बादशाह अंहमदशहा हा होता. या अहमदशहाच्या चरित्राचे वर्णन करताना रघुनाथरावाचे एक सुंदर पत्र दिले आहे.

''आजी (ता. 16-2-1757) इंदुरास आलो. होळकराची भेट झाली. पुढे दर मजल दिल्लीस जात असे. अबदाली दिल्लीस आला, यास्तव चहूकडून राजे व जमीनदार व रांगडे लोकांच्या नजरा फिरल्या. सांप्रत एखादा मनसुबा करून मुलूख अथवा रूपये मिळवावयाची सोय दिसत नाही. अबदालीचे पारिपत्य होईल तेव्हांच वरकड दबतील.........''(खंड 1-52)

सदर पुस्तक म्हणजे रा. रा. गो. स. सरदेसाई यांच्या रियासतीचे छोटेशे बालक आहे.

भाषाविशेष- 'खाडा' या सारख्या गुजरातमध्ये मराठी भाषिकांच्या मध्ये रूढ असलेला शब्द या सारखी उदा. दिसतात.

उदा. मीरमन्नूचा सेनापति कौशमल हा हत्तीवर बसून युद्धाच्या धामधुमीत असताना एकदम हत्तीचा पाय एका खाड्यात गेला. (Pa 56)

मराठ्यांच्या इतिहासातील अज्ञात ऐतिहासिक व्यक्तींच्या संबंधाने आजपर्यंत राहिलेली हकीकत येथे देण्यात आली आहे. ती उपयुकत अशी असून इतिहासलेखनाच्या एका वेगळ्याच पैलूकडे हे पुस्तक आपले लक्ष वेधते. प्रस्तुत पुस्तकात महत्वाच्या व्यक्तींबरोबर सामान्य व्यक्तींची चरित्रेही देण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. सामान्य व्यक्तीही इतिहासाच्या दुव्यातील महत्त्वाचा भाग असतात हे इब्राहिम गारदी भास्करराम, रंगो बापूजी या सारख्यांच्या चरित्रातून दिसून येते.

8) **हिंदुस्तानच्या इतिहासातील गोष्टी (इ.स. 1928) :** भाषंतरकर्ता महादेव मुकुंद जोशी यांचे पुस्तक इतिहासगुच्छामध्ये 123 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

''टेल्स फ्रॉम दि स्टोरी ऑफ इंडिया'' ह्या नावाचे पुस्तक विशाखापट्टण येथील ए.व्ही.एन्. ह्या कॉलेजचे प्रिन्सिपाल पी. टी. श्रीनिवास आयंगार ह्यांनी लिहिले होते. सदर पुस्तक हे ह्या इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर आहे. प्राचीन इतिहासाची माहिती मोठ्या शोधक बुद्धीने ह्या पुस्तकात दिली आहे. मराठी भाषेत असल्या पुस्तकाची अत्यंत गरज आहे असे दिसून आल्यावर विद्याधिकारी, बडोदे राज्य यांनी या पुस्तकाचे भाषांतर करावे अशी सूचना केल्यावरून सदर पुस्तक तयार केले आहे.

आर्य लोकांनी पंजाबात पंच नद्यांच्या नंदोआबात आपली वस्ती केली तेथपासून इ.स. 999 पर्यंत चा इतिहास त्रोटक स्वरूपात ह्या पुस्तकात दिला आहे. भारतात वर्णिलेले देश कोठे आहेत ह्याचा बोध या ग्रंथावरून उत्तमरीतीने होतो. आर्य लोकांची धर्माची रूपांतरे, हिंदु धर्मातील जाती कशा उत्पन्न झाल्या, परकी लोक हिंदुधर्मात कसे मिसळले, आर्य राजांच्या राज्याचा विस्तार कसा झाला,

त्यांची नगरे, व्यापार, वसाहती इ. माहिती येथे दिली आहे. प्राचीन लोकांचे पेहराव व आचारविचार कसे होते, त्यांची राहणी कशी होती, त्यांची लढाईची शस्त्रास्त्रे कोणत्या प्रकारची होती ह्याचे वर्णन या ग्रंथात आढळते. आपले आधूनिक देव व त्यांचे उत्सव, बौद्ध व जैन ह्या धर्माचा पाडाव कसा झाला यांचे वर्णन ह्यात आलेले आहे. मराठे लोकांच्या शौर्याचे, गुणांचे व आचारविचारांचे वर्णन चिनी प्रवाशाने या ग्रंथात केलेले आहे ते वाचण्यासारखे आहे.

आर्यलोकात रूढ असलेले मिश्र विवाह, रामायणात, वर्णिलेले वानर हे कोण होते ह्याचे वर्णन अवश्य वाचण्यासारखे आहे. आर्यलोकांची शिल्पकला उच्च दर्जाला जाण्यास कारणीभूत असणारे लोक, ग्रीक लोकांपासून आर्य कारागिरांना किती मदत झाली ह्या गोष्टींवर चांगला प्रकाशझोत टाकला आहे. शक्यतोवर मूळ अर्थ न सोडता मराठीला साजेल असे भाषांतर करण्यात आलेले आहे. व तेही साध्या, सोप्या, सरळ भाषेत वेदातील ऋचा, जुने ताम्रपट व शिलालेख, शिल्पशास्त्रातील गोष्टींची वर्णने ह्यामुळे मूळ ग्रंथ कित्येक ठिकाणी दुर्बोध झाला आहे.

असा हा ग्रंथ एकंदरीत 20 भागामध्ये (प्रकरणांमध्ये) दिलेला आहे.

आपली संस्कृती घडविण्यात असलेल्या राजकीय, वांशिक, सामाजिक परिमाणांचा विचार या लहानश्या ग्रंथात तपशीलाने केलेला असून धर्म,कला या संस्कृतीतील महत्त्वाच्या घटकांचा इतिहासही अल्प प्रमाणात मांडण्याचा प्रयत्न येथे दिसून येतो.

9) **चीन देशातील सुधारणा(इ.स.1928) :-**भाषांतरकर्ता- राजाराम नारायण पाटकर यांचे पुस्तक इतिहासगुच्छात 128वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक हे एफ.ए.गाईल्स यांच्या 'सिव्हिलायझेशन इन चायना' या पुस्तकाचे रूपांतर आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये प्रचंड लोकसंख्येचा व प्रचंड विस्ताराच्या चीन देशाचे ऐक्य टिकवण्यास साधनीभूत होणाऱ्या बाबींमध्ये कन्फ्यूशियसची धर्मतत्त्वे, एकभाषा व एक लिपी यांचा समावेश केला आहे. भारतामध्ये अनेक मते व धर्मभावना, जातिभेद यांमुळे ऐक्य नसल्याचा निर्वाळा दिला आहे. या ग्रंथामध्ये प्राचीन काळापासून चीनमध्ये कायदेकानून, वाङ्मयसुधारणा, शिक्षण,

आचारविचार इ. मधील सुधारणा कशी झाली याचा विचार केला आहे. एकंदरीत 12 प्रकरणांमध्ये विषयाची विभागणी करुन स्त्रिया व मुले, यांच्या बाबतीतील धोरणे, करमणूक, तत्त्वज्ञान इ. विषयाचा समावेश केला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये चीन देशाचा भौगौलिक विस्तार, क्षेत्रफळाचा विचार करताना चीन या व्यापक संज्ञेमध्ये मांगोलिया, मंच्चूरीया, पूर्व तुर्कस्थान, तिबेट व 18 परगणे (चीनचा प्रमुख भाग)यांचा समावेश केला आहे. खुद्द चीन हा 18 परगण्याचा भाग आहे हे नमूद केले आहे. चिनी लिपी जरी एक असली तरी शब्दांच्या उच्चारांमुळे फरक पडतो आणि भाषा बदलते. तसेच पैकिंग या राजधनीच्या शहरातील 'मांदेरीन' ही भाषा प्रमुख भाषा असल्याची नोंद केली आहे.

चीन देशामध्ये प्राचीन ग्रंथही उपलब्ध असल्यामुळे त्यांची सुधारणा 3000 वर्षांपासूनची आहे असा पुरावा मिळतो. एकछत्री बादशहाची पद्धती नष्ट होऊन मांडलिक संस्थानांची (मोकासीची) पद्धती सुरु झाली. ह्या काळात युद्धाची वेळ वगळता सर्वत्र सुधारलेल्या स्थितीचे वातावरण असे हे सांगताना त्या वेळच्या घरांतील उत्तम बैठका, रेशमी वस्त्रे, मद्यपानाचे समारंभ यांचे दाखले दिले आहेत. प्राचीन चिनी शास्त्रामधील वैद्यकीय शास्त्राची प्रगती दाखवताना त्यांनी वर्षाच्या चार ऋतूंप्रमाणे रोगांचे वर्गीकरण करून वनस्पतीजन्य, प्राणीजन्य उपायांची योजना केल्याचा दाखला मिळतो असे सांगितले आहे.

'हान' या वंशातील राजांचे श्रेष्ठत्त्व म्हणजे त्यांनी शिक्षण व ग्रंथलेखनास उत्तेजन दिले. प्राचीन ग्रंथाचा पुर्नविचार करून कन्फ्यूशियसच्या तत्त्वांचा अभ्यास करवून घेतला. चीनची भिंत तार्तार लोकांपासून वाचण्यासाठी बांधून काढली. शाई, कागद, उंटाच्या केसांचा ब्रश यांचे शोध लावून व चित्र यांना उत्तेजन दिले. मृतांबरोबर गुलामांस पुरण्याची पद्धत बंद केली. चीनमध्ये कन्फ्यूशियन, तौ,बौद्ध असे तीन धर्म प्रचलित आहेत ही माहिती मिळते. पण 'कन्फ्यूशियन'हा धर्म नसून तो आचरणावर आधारलेला नीतिग्रंथ आहे असे सांगितले आहे. लौसा या 2000 वर्षांपूर्वीच्या तत्त्ववेत्याने जे विचार लिहिले त्यांना 'तौ' म्हणजे मार्ग, रस्ता ही संज्ञा मिळाली. पुढे तौ धर्मामध्ये

बौद्धतत्त्वे मिसळली. संग, चिंग, मिंग इ. घराण्यांची माहिती व युद्धकालीन कर्तृत्त्व पुढे सांगितली आहेत.

चिनी लोकांमध्ये कृतज्ञता हा गुण असतो. असे सांगितले आहे. पुढे 1908,1917 सालच्या राजकीय सुधारणा, राष्ट्रीयमंडळ रचना यांनी माहिती दिली आहे.

प्रस्तावनेत लेखकाने मांडलेला विचार हा काहिसा तुलनात्मक असून त्यावर 17व्या शतकातील प्रचलित मूल्य दृष्टीचा प्रभाव दिसून येतो.

10) **जर्मन साम्राज्याची पुन:स्थापना :-**(इ.स.1928) अनुवादकार- रा. रा. वि. ग. आपटे, ह्यांचे हे पुस्तक इतिहासगुच्छात 137 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

कर्नल जी. बी. मॅलेंसन यांच्या 'Refounding of the German Empire' नावाच्या इंग्रजी ग्रंथावरून केलेला हा मराठी अनुवाद आहे. अनुवाद करताना 'बडोदे सरकारने' भर घालण्याच्या सूचनेचा उल्लेख महत्वपूर्ण आहे. जर्मनीच्या 1826 पर्यंतच्या इतिहासाची व दोन महायुद्धाच्या माहितीची भर रा. रा. सबनीस (इतिहासाचे प्रोफेसर) यांनी घातली आहे.

सदर पुस्तकात एकंदर 19 प्रकरणे आहेत. त्यात शार्लमेनचे राज्य, ऑस्ट्रिआ पुन्हा डोके वर काढतो, प्रशिआ 1852 ते 1857, प्रिन्स विल्यम आपल्या भावाचा राज्य कारभार पहातो, पहिला विल्यम यांची कारकीर्द स्क्लेस्विंग होलस्टीन ऑस्ट्रो प्रशिअन स्वारी व तिचे परिणाम, ऑस्ट्रियाचे परराष्ट्रीय धोरण, सन 1866 सालचे युद्ध, सन 1866 सालचे युद्ध, बोहेमियावरील स्वारी, कोनिग्रॅटझची लढाई, कस्टोझाची लढाई, तिसरा नेपोलियन व बिझमार्क, फ्रॅंको जर्मन युद्ध, कोलोंबे व्हाऊन व्हाईल-ग्रॅव्हेलाट, सेडन, युद्धाचे अखेरचे स्वरूप, आरंभलेल्या कामाची सिद्धि, हल्लीच्या युद्धाची ठोकळ कारणे, महायुद्ध व व्हार्सायिचा तह इ. आहेत.

'निव्यळ मराठी वाचकांनाहि कोठे अडखळल्यासारखे वाटू नये' हा भाषांतरकाराचा दृष्टिकोन आहे. मात्र त्यासाठी परिभाषा योजण्याचे प्रयत्न फारसे दिसत नाही.

11) **राज्यनीतिशास्त्राची मूलतत्त्वे :-(इ.स.** 1930) -हे रा. रा. भास्कर त्रिंबक काळे यांचे पुस्तक इतिहासगुच्छात 176 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

इ.स. 1930 च्या आसपास आपल्या देशात राजकीय सुधारणा घडवून आणण्याकडे जनतेची दृष्टी लागून राहिली असते वेळी राज्यकर्तेही जनतेच्या आकांक्षांना वळण लावीत होते. तेव्हा अशा परिस्थितीत राजकीय संस्था, त्यांची घटना, मतदार संघ, राजकीय पक्ष, त्यांचे कार्य या व यांसारख्या अनेक विषयांचे बहुजनसमाजाला जरूर तेवढे ज्ञान करून देणे व मतदानाच्या अधिकाराबरोबर तो वापरण्याला लागणारे ज्ञान करून देणे या उद्देशाने प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र ही सर्व माहिती ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यापूर्वी यातील बराचसा भाग मनोरंजन व महाराष्ट्र साहित्य यातून प्रसिद्ध करण्यात आला होता.

प्रस्तुत पुस्तक मुख्यतः Leacock, Gettel, व Sidguick या तीन पुस्तकांच्या आधारे लिहिले आहे. विषय सुलभ व्हावा म्हणून प्रसंगविशेषी हिंदुस्थानच्या इतिहासातील प्रसंगांची उदाहरणे दिली आहेत. परंतु उदाहरणांचा बराचसा भाग इंग्लंड, अमेरिका व युरोप या देशातील इतिहासातूनच घ्यावा लागला आहे.

या ग्रंथात राज्यनीतिशास्त्राची मूलतत्त्वे ग्रथित केलेली आहेत. राज्यशासन हे एक सामाजिक शास्त्र असल्याने त्याचा नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, न्यायतत्त्वशास्त्र व इतर समाजशास्त्रांशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. सुरुवातीला राज्यनीतिला राज्यनीतिशास्त्राची अगदी थोडक्यात व्याख्या व पर्यायी शब्द दिले आहेत. एकंदर 19 प्रकरणांमध्ये अत्यंत प्राचीन कालापासून आजतागायत मनुष्यप्राण्याची सामाजिक उत्क्रांति कसकशी होत गेली, साध्या शासनपद्धतीचे पर्यवसान प्रस्तुतच्या गुंतागुंतीच्या पद्धतीत कसे झाले व अगदी रानटी स्थितीतून प्रचलित सुधारलेली शासनपद्धती कशी निर्माण झाली याचा राज्यनीतिशास्त्रातच ऐतिहासिक दृष्टीने विचार करणे अपरिहार्य असल्याचे सांगितले आहे. राज्यनीतिशास्त्राचे चार पोटभेद व त्यांचे विवेचन देखील केले आहे.

विशेष म्हणजे राज्य म्हणजे काय, राज्यघटना व राज्य घटनेचे मूळ, राज्याची उत्पत्ती, व्यक्ति स्वातंत्र्य,

कायदा, कायदेमंडळ, आंतरराष्ट्रीय संबंध, अधिकार विभागणी, मतदार संघ, कार्यकारी सत्ता, न्याय, राज्यपद्धती, वसाहतीतील शासनपद्धती, स्थानिक कारभार, राजकीय पक्ष, सरकारचे कार्यक्षेत्र या विषयांची सर्वसामान्य माणसाला समजेल अशा सोप्या भाषेत माहिती दिलेली आहे.

बदलत्या काळानुरूप अशा विषयांचे ज्ञान मराठी भाषेतून लोकांसमोर यावे या दृष्टिकोनातून या पुस्तकाचे भाषांतर केल्याचे लक्षात येते.

## इ) शिक्षण गुच्छ :

शिक्षण म्हणजे मनुष्यमात्राच्या प्रगतीची व सुखाची गुरुकिल्ली आहे. या विचाराने सयाजी महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेले काम अत्यंत मौलिक स्वरुपाचे आहे. सयाजी महाराजांनी वेळोवेळी केलेल्या शिक्षण विषयक विचारातून शिक्षणाविषयी त्यांनी किती सूक्ष्म आणि अनेकांगी विचार केला होता ते लक्षात येते. ते म्हणतात ''शिक्षणाने मानसिक उन्नति तर होतेच, पण त्याशिवाय आपले खरे हित कशात आहे हेहि शिक्षणाने कळते. शिक्षणाशिवाय कोणतीही भरीव प्रगति होणे शक्य नाही व चिरस्थायि प्रगति टिकविणेही शक्य नाही. नुसते लिहिता वाचता येणे, पुस्तकांची माहिती होणे व चांगलासा वाद घालता येणे म्हणजे काही खरे शिक्षण नव्हे, शाळेत किंवा इतरत्र प्राप्त झालेली उदात्त व उच्च तत्त्वे आचरणात आणण्याचा प्रयत्न सुशिक्षित म्हणविणाऱ्याने केला पाहिजे.'' [14]

''समाजव्यवस्थेचा पाया शिक्षण आहे. शिक्षण म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून स्थूल मानाने स्वतःचा वैयक्तिक शक्तींचा प्रत्यक्ष अनुभव घेणे याचेच नाव शिक्षण होय.'' [15]

''शिक्षण हाच सर्व सुधारणांचा मूळ पाया असून आजच्या परिस्थितीतून मुक्त होण्याचा आपला एकमेव मार्गहि तोच आहे.''(Pa. 22) [16]

''शिक्षण शब्दाचा अर्थ फक्त ज्ञानप्राप्ति एवढाच नाही. शिक्षण म्हणजे विनयाधान किंवा शीलनिर्मिती करणे होय. शिष्टाचार संपन्नता आणून देणेहि होय. आणि शहाणपणाची वाढ करणेहि होय. ज्ञानदान करणे किंवा आयुष्यातील पुढील प्रवासाची शिदोरी बांधून देणे हे शिक्षणाचे फक्त एक अंग झाले, या खेरीज त्याला वरची तीन अंगेही आहेत''(273) [17]

''आपल्या सर्व शक्तींचा विकास करणारे व एरव्ही आपल्याला बंद असलेले जे देशोदेशींच्या ज्ञानाचे भांडार ते सर्वथैव खुले करणारे, एकमेव साधन माझ्या मते शिक्षण हेच असल्याने, मी शिक्षणाला पराकाष्ठेचे महत्व देतो. शिक्षणप्रसार आपण सर्वत्र केला पाहिजे. कोणत्याहि लोकसमाजाची खरीखुरी व टिकाऊ प्रगति करावयाची असेल तर जातिभेद किंवा पंथभेद पार विसरून जाऊन, त्या समाजाच्या सर्व घटनांना एकजात सुशिक्षित करून सोडले पाहिजे'' 18

या विचाराने शिक्षण प्रसाराच्या कार्याला अग्रक्रम देताना, श्रीमंत महाराज गायकवाडांनी राष्ट्रहिताची जी व्यापक संकल्पना मांडली आहे, ती राष्ट्र या संबोधनाने जो वर्ग नजरेसमोर गृहीत धरला आहे व त्यात जो बदल त्यांना अभिप्रेत आहे, त्यावरून लक्षात येणे महत्त्वाचे आहे. ''विद्या ही एकाच व्यक्तीला किंवा वर्गाला फार काय तर एकाच समाजालाहि मिळून फायदा नाही. ती सार्वत्रिक असली पाहिजे, तरच आपले पाऊल पुढे पडणार आहे हे लक्षात ठेवा. सर्व राष्ट्राचा उत्कर्ष पाहिजे आहे, तो एका समाजाने साधणार नाही. लहानापासून सर्व विद्या शिकलेले होतील असे करण्यास तुम्ही झटले पाहिजे, तरच राष्ट्र पुढे जाईल.... जन्माने कोणी मोठे नाही, हे तुमच्या मनात वागले पाहिजे. खेड्यांपाड्यांतूनही हे विद्याप्रसारचे काम अव्याहत व सुयंत्र चालले पाहिजे. आपल्या देशात महारपोरांपासून तो अगदी वरच्या पायरी पर्यंतच्या सर्व लोकांना कार्यकारणभाव समजू लागेल तर आपला उर्जितकाळ जवळ आहे असे म्हणण्यास हरकत नाही.'' 19

या सर्वावरून शिक्षण आणि ज्ञान, शिक्षण आणि भारतीय समाज, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक घटकांचा शिक्षणाशी असलेला संबंध, शिक्षण आणि समाजातील स्त्रियांचे स्थान व त्यांचे प्रश्न यांच्याशी असलेला संबंध, बालशिक्षण, शिक्षण आणि व्यवसाय, शिक्षण आणि शारीरिक व्यंग, शिक्षणातील प्रतवारी, शिक्षण आणि त्याचा प्रसार, शिक्षण आणि त्याचे माध्यम, प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण, शिक्षणाचा राष्ट्रबांधणीशी असलेला संबंध यातून शिक्षणविषयक विचारांचा त्यांचा विशाल आवाका व सूक्ष्म क्रांतदर्शी दृष्टी यांचे दर्शन होते.

विद्याप्रसाराच्या बाबतीत महाराजांनी आपल्या राज्यात पुष्कळ प्रयत्न केले होते. जीवनातील शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळले होते. म्हणूनच आपल्या प्रजेलाही सुशिक्षित बनविण्याचा त्यांनी निश्चय

केला व त्याप्रमाणे योजना अमलात आणल्या. राज्यकारभार हाती घेतल्यावर पहिली गोष्ट महाराजांच्या लक्षात आली ती ही की, दारिद्रय व रोगराई या सर्वांचे मूळ अज्ञान आहे, आणि शिक्षणप्रसार हाच त्यावर उपाय आहे. गाव तेथे शाळा झालीच पाहिजे,समाजाच्या सर्व थरात शिक्षण पोहोचले पाहिजे. प्रत्येक खेड्यात शाळा स्थापन होऊन लोकांच्या उंबरठ्यापर्यंत शिक्षण नेले की, राष्ट्राचे अनेक प्रश्न सुटु लागतील. आपल्या संस्थानामध्ये त्यांनी सक्तीचे शिक्षण सुरू केले. इ.स. 1906-07 या साली श्रीमंतांनी सर्व राज्यात प्राथमिक शिक्षण तिसऱ्या इयत्तेपर्यंत सक्तीचे व मोफत केले. त्या प्रसंगी श्रीमंत आपल्या भाषणात म्हणतात, ''ह्या कार्याचा मोबदला मला पूर्णपणे मिळण्यासाठी प्रजेने मदत केली पाहिजे. ती मदत अशी की, दरेक आईबाबांनी मुलांना फरज पाडल्याप्रमाणे फक्त तिसऱ्या इयत्तेपर्यंत न शिकविता निदान पाचव्या इयत्तेपर्यंत त्यांच्या अभ्यास करवावा. जर याप्रमाणे होईल तर माझ्या मेहनतीचे फळ मिळेल. नाही तर ती व्यर्थ जाण्याचा संभव आहे. तरी माझ्या हयातीत तसेच पश्चात हे महान कार्य सुधारून घेण्याचे प्रजेचेच स्वाधीन आहे.'' [20]

ह्याप्रमाणे काही वर्षांच्या कालावधीत बडोदे राज्यात 3500 गावांपैकी 2500 गावामध्ये शाळा सुरू झाल्या. सर्व समाजातील अडीच तीन लाख मुले त्यात शिक्षण घेत होती.

महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी सक्तिचे मोफत शिक्षण आपल्या राज्यात मोठ्या जिद्दीने चालू ठेवले. त्यासंबंधी भारत सरकारचे शिक्षणविषयक सल्लागार जे. पी. नाईक एकदा म्हणाले होते, ''सरकारने सक्तिचे मोफत शिक्षण योजना यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.'' [21]

शिक्षणखाते हे महाराजांचे सर्वात आवडते खाते. शिक्षणविषयक अनेक सुधारणा त्यांनी घडवून आणल्या. त्यामुळेच बडोदे संस्थानाबाहेरही त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करणात येतो.

भारतीय समाज एकसंघ होण्यासाठी सर्व समाजामध्ये शिक्षणप्रसार वेगाने झाला पाहिजे असे महाराजांना वाटत असे. हरिजन मुलामुलींना ही संधी मिळावी म्हणून त्यांनी स्वतंत्र शेकडो शाळा सुरु

केल्या. मुसलमानांच्या मुलांसाठी उर्दू शाळा काढल्या. मुलींच्या उर्दू शाळा पडदा पद्धतीमुळे स्वतंत्र काढल्या. सनातनी लोकांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. स्त्री शिक्षणाविषयी महाराजांचे विचार सुद्धा कसे प्रगतीशील होते हे त्यांच्याच पुढील उद्‌गारावरूनही कळेल, इ.स. 1885 सालच्या ऑगस्ट 20 च्या आपल्या एका हुकुमात महाराज म्हणतात,

"Touching on the moral education of youths, I would particularly emphasize the importance of the education of girls. It is the unremitting watchfulness and conciliatory supervision of intelligent and educated mothers which form powerful factors in giving right tone to infant minds, and which are the best agents for the eradication of crooked ways. Woman regulate the social life of a people, and in this sense men and women rise or fall together. The first thing that strikes a careful observer is the barrenness of our homes, that pure delight, which intelligent companionship and freedom of social intercourse alone can secure, is almost unknown in the domestic circle. To fit the girls for the higher fanctions in social life, I would give my best attenion to the opening of girls Schools." [22]

प्रजेचे कल्याण शिक्षणाशिवाय व विशेषत: स्त्री शिक्षणाशिवाय होणे नाही, हे त्यांना नि:संदिग्ध पटले. त्याच्या अनुरोधाने एकनिष्ठेने त्यांनी प्रयत्न सुरु केले.

जंगली मुलखात दूरवर रहाणाऱ्या कालीपरज या आदिवासी जमातीच्या मुलांसाठी सोनगढ, व्यारा, इ. ठिकाणी आश्रमशाळा सुरु केल्या. आदिवासी मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा काढल्या. ज्या काळात ब्रिटिश सरकारने भारतात आदिवासी जमात ही जन्मजात गुन्हेगार आहे असे समजून त्यांच्या जीवन विकासाची दारे कायमची बंद करून टाकली त्याच काळात सयाजीरावांनी आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचे तळमळीने प्रयत्न केले. धानका नावाच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या रानटी लोकांच्या मुलांकरिता आश्रमशाळा महाराजांनी सुरु केली तेव्हा त्यांचे मानकरी आनंद पवार यांनी महाराजांना सांगितले, " ही मुले शिकून

शहाणी झाल्यावर आपले हक्क मागू लागले म्हणजे जड जाईल, त्यापेक्षा त्यांना शिक्षण न देणे अधिक चांगले ". त्यावर महाराज म्हणाले, "प्रजेला राजाने शिक्षण न देणे म्हणजे एक पवित्र कर्तव्यास चुकणे होय, आणि प्रजेने हक्क मागू नये म्हणून तिला अशिक्षित ठेवणे ही तर भयंकर चूक आहे. प्रजा सुशिक्षित होवून राज्यकारभारात भाग घेऊ लागली तर मला आनंदच आहे ." [23]

आश्रमशाळांना जोडून शेती, विणकाम, व शिवणकलेसारखे इतर जीवनोपयोगी उद्योग शिकण्याची सोय केली. पूर्वी हरिजन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा होत्या त्या हळू हळू रद्द करून इतर शाळेत हरिजन मुलांमुलींची सोय करून त्यांनी अस्पृश्यतेची भावना कमी केली. हरिजन (अंत्यज) विद्यार्थ्यांकरिता त्यांनी शाळातून शिष्यवृत्त्या चालू केल्या. ह्या संबंधीच्या हुकूमात त्यांनी म्हटले आहे की "शिक्षणात मागासलेल्या जातीच्या लोकातील मुलास शिक्षणाचा लाभ व्हावा असे प्रयत्न होत असावे. राज्यातील शाळातून अनेक प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात येते. त्या वृत्त्यांपैकी काही वृत्त्या अंत्यज विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवाव्या." [24]

अल्पवयीन बिघडलेल्या मुलांना सुधारगृहात ठेवून त्यांना शिक्षण देवून समाजात मानाने जगता येईल अशी व्यवस्था केली. मूक, अंध, व बहिरे अशा निराधारांसाठी बडोदे व मेहसाणा येथे आश्रमशाळा सुरु केल्या व त्यांच्या जीवनात कायापालट घडवून आणला. अशा प्रकारची शाळा भारतात त्यावेळी इतरत्र कुठेही नव्हती. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण व्हावी व शिबिर जीवनाचा परिचय व्हावा म्हणून 1909 साली बालवीर संघटना प्रथम महाराजांच्या प्रयत्नाने बडोद्यातच स्थापन झाली.

ग्रामीण भागातील परिस्थिती लक्षात घेऊन असे हुकूम काढले की, "शक्यतोवर प्राथमिक शाळेतील शिक्षक त्या गावचे रहिवासी असावेत व त्यांची इतर गावी बदली करू नये, म्हणजे त्यांना आपल्या गावातील विद्यार्थ्यांविषयी आस्था उत्पन्न होऊन ते अधिक कार्यक्षम होतील. प्राथमिक शाळेतील शिक्षणाचा कल त्या खेड्यात चालू असलेल्या धंद्यांचे ज्ञान विद्यार्थ्यांना करून देण्याकडे अधिक असावा. त्या गावातील पंचायतींनी ह्या शाळांवर देखरेख ठेवून त्यातील उणीवा खात्याच्या नजरेस आणून द्याव्या. लहानमुलांना फार वेळ शाळेत डांबून व ठेवता त्यांना वस्तूपाठाच्या आधारे शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा " [25]

सक्तीच्या शिक्षणासंबंधाने झालेल्या हुजुर हुकुमांमध्ये विद्याधिकारी यांनी खालील बाबतीवर चांगले लक्ष्य ठेविले पाहिजे यासंबंधी सूचना होत्या -

1) ''जे शिक्षण हल्ली देण्यात येत आहे, त्याचा मुले चांगले रीतीने फायदा घेतात हे पहात जाऊन शिक्षणाची (Quantity & Quality) चांगली उपयुक्त आहे त्याकडे नजर ठेविली पाहिजे व ह्या सर्व शिक्षणाने मुलांचे विचार व आचार सुधरतात या कडेस समंजस रीतीने लक्ष दिले पाहिजे व मुले केवळ घोकंपट्टीनेच (Cramming) पास होत नाहीत याकडेसही लक्ष दिले पाहिजे. कारण समजूत वाढण्याऐवजी केवळ घोकंपट्टीनेच पास होणे हे उचित नाही.

2) हल्ली, शिक्षणाचे मानाने मुलांच्या ज्या समजुती वाढल्या पाहिजेत, तशा वाढत नाहीत असे आम्हास थोड्या बहुत शाळांच्या परिक्षेवरून वाटते ! ईस्ट मनुष्ये व नागरिक (Citizen) होण्याकरिता हल्लीच्या क्रमिक पुस्तकांमध्ये काय काय फेरफार केले पाहिजेत ह्याचा निर्णयास्तव विद्याधिकारी यांनी एक कमेटी नेमावी. त्याचे अध्यक्षत्व विद्याधिकारी यांनी घेऊन त्या प्रश्नाचा निकाल केला पाहिजे व काही कारणे असल्यास ते काय केले पाहिजे हे स्पष्ट रीतीने नमूद करावे. आमचा विचार असा आहे की काही धडे किंवा पुस्तक नवीन करण्याचे असल्यास येथील जरूर ती माहिती घेऊन, युरोप किंवा अमेरिकेकडून त्या विषया संबंधाने लेख द्यावेत. त्यांचा योग्य रीतीने तरजुमा करून उपयोगात आणावा म्हणजे ताज्या ज्ञानाचा फायदा लोकांस समजेल असे वाटते. ह्या सर्व बाबतींचा विचार करतेवेळी इंग्रजी राज्यातील सुधारणेचा फायदा हंमेष घेण्यास तत्पर राहिले पाहिजे व आपण निरर्थक मेहेनत व खर्च करीत नाही हे विसरता कामा नये.'' 26

महाराजांनी दुय्यम शाळांची संख्या इतक्या वेगाने वाढविली की, विद्येचे आगर असलेल्या पुणे शहरात हायस्कूलमध्ये जाणाऱ्या मुलींच्या संख्येपेक्षा बडोद्यातील हायस्कूलमध्ये जाणाऱ्या मुलींचे प्रमाण दुप्पट झाले. दुय्यम शाळांची संख्या वाढल्यावर राज्यात महाविद्यालयांची संख्या आपोआप वाढली. पर्यायाने 'बडोदा कॉलेजचे' रुपांतर 'महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटीत' कालांतराने झाले. मुलींसाठी स्वतंत्र कॉलेज बडोद्यात सुरु करुन ते पुणे येथील महर्षि कर्वे यांच्या एस.एन.डी.टी. या संस्थेला जोडण्यात आले. प्राथमिक शाळांकरिता शिक्षिका तयार करण्यासाठी फिमेल ट्रेनिंग कॉलेज सुरु करण्यात आले.

बडोद्यात कलाभवन स्थापन केल्याने महाराजांची किर्ती हिंदुस्थानभर पसरली. कलाभवनची स्थापन 1890 साली झाली. या संस्थेत प्रथम रंगशाळा सुरु करण्यात आली व नंतर क्रमाक्रमाने चित्रशाळा, शिल्पशाळा, यंत्र विभाग व विणकामाचा वर्ग हे उघडण्यात आले. त्यावेळी या शाळेत येणारे विद्यार्थी इंग्रजीचे ज्ञान असलेले नसत. यामुळे त्यांना शिकविण्यासाठी देशीभाषेतील शास्त्रीय पाठ्यपुस्तकांची जरुर पडली म्हणून प्रि. गज्जर यांच्या देखरेखीखाली सयाजी ज्ञानमंजुषा व लघुज्ञानमंजुषा या नावाच्या देशीभाषेतील शास्त्रीय विषयाच्या दोन पुस्तकमाला तयार करविण्यात आल्या. विशिष्ट कलांचे शिक्षण घेण्यासाठी काही हुशार विद्यार्थी परदेशी पाठविण्यात आले व ते शिकून परत आल्यावर त्यांच्या ज्ञानाचा लाभ कलाभवनच्या विद्यार्थ्यांना मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. कलाभवनचे रुपांतर 'फॅकल्टी ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नोलॉजी' नावाच्या संस्थेत झाले व आता तेथे डिग्री कोर्सचे शिक्षण दिले जाते. अशा प्रकारच्या तांत्रिक शिक्षणाची सोय त्या काळी भारतात इतरत्र कुठेही नव्हती. या विविध शिक्षणा बरोबरच बडोदे येथे भारतीय संगीत पाठशाळा स्थापन करुन तिच्यात गायन-वादन सारख्या कला शिकविल्या जाऊ लागल्या. त्या संगीतशाळेचे रुपांत नंतर 'फॅकल्टी ऑफ म्युझिक, डान्स अँड ड्रामा' मध्ये करण्यात आले असून ती संस्था 'सयाजी विद्यापीठाला' जोडण्यात आली.

निरनिराळ्या विद्यांचा व कलांचा अभ्यास करण्यासाठी परदेशात जाणे आवश्यक आहे हे महाराजांनी आपल्या एका व्याख्यानात सांगितले, ते म्हणाले, ''हिंदुस्थानात शास्त्रीय शिक्षणाची फार उपेक्षा झालेली आहे म्हणून आपण आपल्या देशातील विद्यार्थ्यांना शास्त्र व कला शिकण्यासाठी परदेशात पाठविले पाहिजे व तेथील पद्धति शिकून येण्याची संधी त्यांना दिली पाहिजे. विशेषतः औद्योगिक शिक्षणाच्या बाबतीत ही गोष्ट फार आवश्यक आहे. देशाचा उत्कर्ष होण्याकरिता समाज नुसता साक्षर होऊन चालत नाही तर त्याच्या ज्ञानात भर पडत गेली पाहिजे. ज्ञान पाश्चात्य असो अगर पौर्वात्य असो ते सर्व जगाच्या मालकीचे आहे. ज्ञानावर सर्वांचा हक्क सारखा आहे. अर्थात ज्ञान जर सर्वांना प्राप्त करुन घ्यावयाचे असेल तर ते देशी भाषेत आणले पाहिजे.'' [27]

आपले शिक्षण विषयक धोरण आपल्या राज्यातील शिक्षण प्रमुखाला महाराज पत्र लिहून कळवितात. ते लिहितात, "Education is the basis of all reforms and is the only way of salvation

from our present condition. I am more inclined as far as possible to foster the spread of vernacular education than spend more money on middle of higher education as the former benefits the masses. The highest and the noblest object of the education is not the acquisition of knowledge itself but the former of Character."[28]

सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणा सामान्य लोकांमध्ये रुजाव्यात म्हणून लोकशिक्षणाची आवश्यकता असते. त्यासाठी वाचनालयांचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात महाराजांनी आपल्या राज्यात केला. बडोदा राज्याचे खरे वैभव वाचनालयांच्या अपूर्वाईचे वर्णन व्हॉईसरॉय लॉर्ड विलिंग्टन यांनी पुढील शब्दात केले आहे,

"Your Picture Gallary and your Central Library with its remarkable system of travelling rural libraries, are famous for beyond the boundaries of Baroda, and I was glad to learn that this great Scheme of Educational Study to even the most remote village is progressing extremely mely well."[29]

बडोदा कॉलेजची स्थापना होऊन पन्नास वर्षे झाली त्यानिमित्ताने जो सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला त्या प्रसंगीचे महाराजांचे भाषण अत्यंत महत्वपूर्ण आहे. शिक्षण, शिक्षणाचे हेतू, लोकशाही आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध याविषयी महाराजांनी किती खोलवर आणि दूरवर विचार केला होता याचे दर्शन या भाषणावरुन होते. त्यावेळी विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, "हे कॉलेज माझ्या सबंध संस्थानचा दिपस्तंभ आहे असे मी मानतो. माझ्यासमोर बसलेल्या आजी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनात सतत कृतज्ञता बाळगावी असाच या कॉलेजचा लौकिक आहे. भावी काळ हा विज्ञानाचा काळ राहणार आहे, पण विज्ञानाच्या मागे धावताना ज्ञान आणि विज्ञान या साऱ्याच गोष्टी माणसासाठी आहेत याचेही सतत भान आपण ठेवले पाहिजे. ज्ञानाचा उपयोग आपण कशारीतिने करतो यावरच आपल्या ज्ञानाचे महत्व अवलंबून आहे. ज्ञान विज्ञानातील ज्या उदात्त आणि थोर परंपरांचा वारसा आपल्याकडे आलेला आहे तो वारसा कुणाही एका वंशाची वा देशाची मक्तेदारी नाही. हा वारसा केवळ स्वतःच्या व्यक्तिगत संकुचित स्वार्थासाठी

वापरावयाचा नाही तर तो अधिकाधिक विकसित करुन आपल्या गरीब, श्रीमंत सर्वच बांधवांच्या कल्याणासाठी त्याचा आपण वापर करावा यासाठी आहे. या गोष्टींची जाणीव हाच खरा लोकशाहीचा अर्थ होय. खरी लोकशाही म्हणजे काय हे जगाला दाखवून देण्याची जवाबदारी प्रामुख्याने तुमच्यासारख्या शिकलेल्या युवकांची आहे. आपण ज्या समाजात रहातो तो समाज अधिक चांगला, अधिक समर्थ आणि अधिक मुक्त करण्याची जिद्द प्रत्येक स्त्री-पुरुष आणि मुलांमध्ये निर्माण होईल तेव्हाच खरीखरी लोकशाही अस्तित्त्वात येईल. आज जगभर लोकशाहीचा उदोउदो करण्याची जणू स्पर्धा सुरु आहे. हा उदोउदो खरोखरच अंतःकरणापासून किती आहे या विषयी मला मात्र शंका वाटते. कला, ज्ञान, विज्ञान या सर्व गोष्टींचा केन्द्रबिंदू माणूस आहे आणि प्रत्येक माणसाने या सर्व गोष्टींचा उपयोग केवळ स्वतःसाठी न करता सर्व समाजासाठी केला पाहिजे हा विचार आपल्या सर्व शिक्षणविषयक प्रयत्नांचे सूत्र असले पाहिजे आणि त्यातच सर्वांचे कल्याण आहे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते.'' [30]

महाराजांनी इंग्लड, अमेरिका व फ्रान्समधील अनेक शैक्षणिक संस्थांना देखील देणग्या देऊन उपकृत केले होते. अशारितीने त्यांचा शिक्षणप्रसाराचा व्याप किती अफाट होता याची कल्पना येते. शिक्षणप्रसाराचा त्यांनी ध्यास घेतला होता.

'श्री सयाजी साहित्यमाले'तून प्रसिद्ध झालेल्या शिक्षणगुच्छातून पाच पुस्तके मराठीत प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकीचे रा. रा. वासुदेव गोविंद आपटे यांचे 1 'बालोद्यान पद्धतीचे गृहशिक्षण' हे शिक्षणगुच्छात 10वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. हे पुस्तक इंग्रजी "Kindergarten Teaching at Home" याचा मराठी अनुवाद आहे.

लहान मुलांच्या शिक्षणासंबंधाने बालोद्यान पद्धतीची श्रेष्ठता जगातल्या अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, रशिया..... सारख्या बहुतेक ठळक राष्ट्रांनी कबूल केली आहे. तीन ते सात वर्षे वयाच्या मुलांना या राष्ट्रांतून बहुधा याच पद्धतीने शिक्षण देण्यात येते.

बालोद्यान पद्धतीने लहान मुलांना शिकविण्यास शिक्षकाला शिकविण्याच्या कामाची खरी हौस लागते. मुलांच्या मानसशास्त्राशी उत्तम परिचय लागतो. मुलांमध्ये मिसळून त्यांच्या पोटात शिरुन, किंबहुना

त्यांच्यापैकीच एक होऊन मुलांचे प्रेम संपादावे लागते. शास्त्रीय तत्त्वे व्यवहारात आणण्याचे चातुर्य, व्यवहारज्ञान आणि युक्तिबाजपणा अंगी असावी लागतात.

मुलांचे शिक्षण ही राष्ट्रकार्याची एक महत्त्वाची बाब आहे व तिच्याकडे प्रथम लक्ष देणे हे मुलांचे पालक व समाजाचे घटक या नात्याने आपले कर्तव्य आहे असे प्रत्येकास वाटले पाहिजे. घरच्या घरी मुलांना योग्य प्रकारे मनोरंजक पद्धतीने शिक्षण कसे देता येईल हे पालकांना कळावे यासाठी प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती झाली आहे. मूळ इंग्रजी पुस्तक, इंग्रजी समाजासाठी लिहिले असल्यामुळे भारतीयांना ते जसेच्या तसे लागू पडणारे नव्हते. तसेच त्याचे शब्दशः भाषांतरही विशेष फायदेकारक नसल्याने तत्त्वविवेचनाचा सगळा व उदाहरणांपैकी आपल्या समाजाला जुळण्यासारखा जो भाग होता तेवढा घेऊन बाकीचा भाग आपल्या स्थितीशी व रीतरिवाजाशी जुळण्यासारखा करुन घेतला आहे. उदा. तिकडच्या पौराणिक व इतर कथांबद्दल आपल्या इकडच्या कथा घेतल्या आहेत. काही भाग उदा - गायनाचे पाठ अगदीच नवा घातला आहे. तिकडच्या हवामानाच्या धोरणाने बसविलेले अभ्यासपत्रक बदलून इकडच्या हवामानाशी व ऋतुमानाशी जुळवून घेतले आहे. प्रस्तुत पुस्तकात पालकांना मार्गदर्शन व सूचना दिल्या आहेत. तसेच बालोद्यानपद्धती व हल्लीच्या शालेय शिक्षण पद्धतीतील फरकही सोप्या भाषेत सांगितला आहे. बालोद्यान पद्धतीत मुले आनंदात असतात. कामाचा सगळा बोजा शिक्षकावर पडतो. मुलाची वृत्ति, मनाचा कल, स्वभाव, त्याच्या सवयी, बुद्धि व ग्रहणशक्ति इ. सर्व गोष्टींचा विचार करुन कोणता विषय कशारीतिने शिकविला म्हणजे तो मुलाला सहज समजेल याचे योग्य ते दिग्दर्शन सदर पुस्तकात केले आहे. शिक्षकाला कोणत्या गोष्टींचे विशेष ज्ञान असायला हवे तेही सांगितले आहे. उदा. या पद्धतीच्या शिक्षकाला लेखन, वाचन, इतिहास, भूगोल वगैरे विषयांचे फारसे ज्ञान लागत नाही. कारण शिकणारी मुले अगदीच लहान व शिकण्याचा प्रारंभ करणारी असतात. परंतु गायन, चित्रकला, हातकाम, सृष्टिविज्ञान, बगीचाचे काम, विणकाम, शिवणकाम वगैरे अनेक विषयांची व्यावहारिक माहिती व प्रत्यक्ष हाताने काम करण्याची सवय लागते. त्याचबरोबर कोणत्या साधनाचा केव्हा, कसा व किती उपयोग करावा हे मात्र शिक्षकाने आपल्या समोरील विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ती लक्षात घेऊन ठरवावे हेही सूचित केले आहे.

सदर पुस्तकात एकंदर सात प्रकरणे असून पाठ कसा द्यावा, शिक्षणाचे साधन, या दृष्टीने खेळाचा विचार, वाचन व लेखन कसे शिकवावे, गणित, हातकाम कसे शिकवावे ते सांगून एका आठवड्याचे अभ्यासाचे पत्रकही तयार करुन दाखविले आहे.

ग्रंथाच्या अखेरीस परिशिष्टामध्ये मराठी भाषेतील काही शिक्षणविषयक पुस्तके, लेख यांची ग्रंथकर्त्यांच्या व लेखकाच्या नावानिशी यादी दिली आहे. तसेच या पद्धतीने आपल्या मुलांना स्वतः घरी शिकवू शकणाऱ्या सुशिक्षित आईबापांच्या माहितीसाठी काही ठळक इंग्रजी पुस्तकांची नावे दिली आहेत.

पुस्तकाची भाषा अतिशय सोपी, साधी व सुबोध आहे. घरच्या घरी मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यासाठी सदर पुस्तक उपयुक्त आहे.

2) **'मुक्या मुलांचे गृहशिक्षण' किंवा मुक्या मुलांच्या आईबापांनी अवश्य जाणण्याजोग्या गोष्टी** (इ.स. 1927) हे पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर यांचे अनुवादित पुस्तक शिक्षण गुच्छात 119 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

मूकशिक्षण आपल्या देशात नवीन आहे. युरोप, अमेरिका वगैरे खंडातून ते रुढ झाले आहे. त्याविषयी एक ओळहि आपल्या देशातील भाषातून कोठे सापडणार ! मराठीत हे पहिलेच पुस्तक आहे.

मूक शिक्षणाविषयी मराठी, गुजराती वगैरे भाषांमधून काही ग्रंथ तयार करवावेत, अशी सूचना मूकांध किंवा व्यंग लोकांच्या शिक्षणासंबंधी विचार करण्यासाठी बडोदे सरकारने एक कमिटी नेमली होती व तिने केलेल्या सूचनेवरुन सदर पुस्तक तयार करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत पुस्तक हे "What the Mother of a Deaf Child ought to know" ह्या अमेरिकेतील 'राईट ओरल स्कूल, न्यूयॉर्क,' याच्या पुस्तकाचे अनुवादित रुप आहे.

''चांगल्या मुलांना शाळेत जाण्यापूर्वी आई-बापांकडून व विशेष करुन आईकडून पुष्कळ शिक्षण मिळते. तसे मुक्या मुलांच्या बाबतीत होत नाही. त्यामुळे मुकी मुले शाळेत दाखल होतील त्यावेळी त्यांना काहीच येत नसते. असे होऊ नये म्हणून हे पुस्तक तयार केले आहे.''

मुले जन्मापासून बहिरी होतात. त्यांना शब्द मुळीच ऐकू येत नाही. अनुकरण करता आले नाही, म्हणजे त्यांना बोलता येत नाही. अशा मुलांस मुके म्हणतात. त्यांचा दुसराही एक वर्ग आहे. मुले बोलू लागतात, चारदोन वर्षांनी त्यांना काही रोग होतो. त्यामुळे त्यांची श्रवणशक्ति नष्ट होते व ती बहिरी होतात. ती बहिरी झाली म्हणजे त्यांचे भाषाज्ञान होण्याचे स्वाभाविक साधन नाहीसे होते. पूर्वीचे बोलावयास आलेले, ते सर्व विसरुन जातात व शेवटी मुकी होतात. या उभय प्रकारच्या मुलांना काही झालेले नसते, म्हणूनच त्यांना बोलता येऊ शकते. मुकेपणा बहिरेपणामुळे येतो. मुकेपणा काही निराळा दोष नाही. यावरुन बहिरेपणा हा दोष खरा. बोलता आले नाही ते बहिरेपणामुळेच.

या पुस्तकात अशा बहिऱ्या मुलांच्या आयांना उपदेश केला आहे. अर्भकावस्थेत आईने अशा मुलास शक्य तेवढे शिक्षण दिले, म्हणजे शाळेत त्याची अधिक प्रगति होईल यात काही शंका नाही. अशा प्रकाराने शिक्षकास आईबापांचे मोठे साह्य होईल व त्यामुळे मुलाचेच कल्याण होईल.

अनुक्रमणिकेत एकंदर 27 भाग असून अनुवादकाची दृष्टी सतत जाणवते. त्यामुळेच खेळाची नावे घेताना लपालपी, गणेशतोबा, गोट्या-फुगड्या, सागर-गोटे, कोंबडा अशी रुपे सांगताना मराठीकरणाचा विचार केलेला आहे. उदा. : "तांब्या कुठे आहे ?", "माझे धोतर वाळले काय" अशा तऱ्हेने पुस्तकाचे परकीयपण जाऊन ते सुबोध बनले आहे.

विषय नवीन असल्याने पारिभाषिक शब्द तयार करावे लागले आहेत व अशा शब्दांची एक यादी सोबत जोडली आहे.

उदा - Visual Training दृष्टि शिक्षण,

Muscular Sense भार संवेदना, हलके भारी वजन स्नायूंच्या योगाने समजते अशी शक्ती

Oral environment वाचिक परिस्थिती

"भारतात बहिऱ्यामुक्यांच्या शाळा प्रथम कोठे चालू केल्या असतील तर त्या बडोद्याच्या संस्थानात" असा ऐतिहासिक उल्लेख सदर पुस्तकात सापडतो.

पुस्तकाची एकंदरित भाषा सुबोध आहे.

3) **बालक त्याची प्रकृति आणि संवर्धन :-** कै. वासुदेव गोविंद आपटे (इ.स. 1931) यांचे पुस्तक शिक्षण गुच्छात 190 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक इंग्रजीतल्या The 'Temple Cyclopaedic Primers' नावाच्या पुस्तकमालेपैकी "The Child : His nature and narture" या पुस्तकाचे रुपांतर आहे. रुपांतर म्हणण्याचे कारण हे की या पुस्तकाचा बहुतांश मुलाची शारीरिक वाढ व मानसिक विकास कसा होत असतो व त्या वाढीच्या व विकासाच्या नियमांस अनुसरुन मुलाचे संगोपन व संवर्धन कसे केले पाहिजे, याबद्दलच्या शास्त्रीय सोपपत्तिक विवेचनाने व्यापिला आहे, व ते नियम जितके पाश्चात्यांना तितकेच भारतीयांनाही लागू असल्यामुळे या विवेचनापुरत्या भागात काही ढवळाढवळ न करता इंग्रजी भाषेत व्यक्त केलेले विचार मराठीत अनुवादरुपाने दिलेले आहेत. तर पुस्तकाचा काही भाग (उदा. प्रकरण 3 व 4 यात) मूळ इंग्रजी ग्रंथकर्त्याने पाश्चात्य रीतरिवाजास अनुसरून बालसंगोपनासंबंधाने काही व्यावहारिक सूचना केल्या आहेत. हा भाग मूळ इंग्रजी लेखकाचा उद्देश व धोरण कायम ठेवून तदनुसार आपल्या गृहस्थितीला साजतील अशा सूचना करणे आवश्यक होते. अशी प्रकरणे स्वतंत्रपणे लिहिली आहेत. उदा. 3 बालकाची परिस्थिती - (मुलांसाठी जागा, पाळणा, निद्रागीते, दाई, मुलांचे संरक्षण, शाळा संबंधांचे आरोग्य) 4 अर्भकाची जोपासना - (त्वचा, स्नान, कपडे, हवा, खाणे, व्यायाम, दूध तोडणे...) त्यामुळे एक तऱ्हेचे संयोगात्मक मिश्र स्वरुप या पुस्तकाला आले आहे.

बालसंगोपनावर व बालशिक्षणावर आजपर्यंत मराठीत लहान-मोठी बरीच पुस्तके लिहिली गेली आहेत. त्या पुस्तकांपेक्षा या पुस्तकाचे स्वरुप वेगळे आहे. आजपर्यंत झालेल्या पुस्तकांपेक्षा या पुस्तकाचे स्वरुप वेगळे आहे. आजपर्यंत झालेल्या पुस्तकांतून या विषयासंबंधाने पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या शोधांचे फलित तेवढे दिलेले आढळते, पण मुलांचे संगोपन व संवर्धन अमुक नव्या पद्धतीने का करावयाचे, व जुन्या पद्धति कोठे चुकत आहेत, या विषयीचे शास्त्रीय विवेचन फार थोडे असे. प्रस्तुत पुस्तकाचा बहुतेक भाग शास्त्रीय उपपत्तीच्या विवेचनानेच व्यापिला आहे. वरील विषयांवरील पाश्चात्य शास्त्रज्ञांचे विचार संकलित स्वरुपाने

मराठी वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये बालकाची प्रकृति आणि संवर्धन, मुलाविषयीचे शोधपूर्वक ज्ञान, बालकाची परिस्थिती, अर्भकाची जोपासना, बालकाची वाढ, ज्ञानेंद्रिये, स्नायु, मनोभावना, बुद्धि, इच्छाशक्ति, सवय याविषयी माहिती दिली आहे. व शेवटी फ्रोबेलने बालसंगोपन व बालशिक्षण विषयक एका नव्या कल्पनेचा पद्धतशीर रीतीने विस्तार करुन तिचा व्यवहारात उपयोग कसा करुन घेता येईल याचा विचार बालोद्यानपद्धतीत केला आहे.

प्रस्तुत पुस्तकाचा बहुतेक भाग शास्त्रीय उपपत्तीच्या विवेचनानेच व्यापिला आहे, आणि हे विवेचनही इतक्या संकलित आणि संक्षिप्त पद्धतीने केलेले आहे की ग्रंथकाराचा आशय काय ते पूर्णपणे समजून घेण्यासाठी वाचकाला प्रत्येक वाक्याच्या शेवटी थांबून विचार केल्याशिवाय पुढचे वाक्य वाचता येत नाही. इतकी दुर्बोधता या पुस्तकात आली आहे.

तसेच श्री सयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध झालेल्या 41 मराठी ग्रंथांची सूची, श्री सयाजी बालज्ञान मालेतील 6 ग्रंथांची सूची ही दिली आहे. परिशिष्टामध्ये कोष्टक दिले आहे. श्री ग्रंथसंपादक व ग्रंथ प्रकाशक मंडळीच्या स्थापनेचे उद्देश, ग्रंथप्रकाशनाचे विभाग, त्यातील साह्यकर्ते व सभासद-ग्रंथपरिक्षक मंडळ यांची सूचीही प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केली आहे.

4) **पाश्चात्य तत्त्वज्ञान-पुष्प 1ले, ग्रीक आद्यतत्त्वज्ञ थेल्स व त्याचे शिष्य, पुष्प 2रे-सॉक्रेटिस**

कै. दत्तात्रेय गोविंद केतकर (इ.स.1931) हा ग्रंथ शिक्षणगुच्छात 192वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांसाठी अत्यंत महत्वाचा आहे. ग्रंथाच्या आरंभीच प्रकाशकाचे दोन शब्द असून त्यात 'श्री सयाजी साहित्यमालेद्वारा प्रकाशीत व्हावयाच्या ग्रंथांसाठी एक ग्रंथपरिक्षक मंडळ नेमण्यात आल्याचा उल्लेख आहे. परंतु ह्या ग्रंथपरीक्षक मंडळीत कोणकोणते विद्वान होते याचा उल्लेख नाही.

तत्त्वज्ञान हा विषय विशेष प्रौढ असून त्यात मानवी जीवाचे श्रेष्ठतम कर्तव्य दर्शविले आहे. प्रस्तुत ग्रंथातील विषयांचे दोन भाग पाडले असून, त्यास पुष्प पहिले व पुष्प दुसरे असे म्हटले आहे. पहिल्या

भागात - ग्रीक आद्यतत्त्वज्ञ थेल्स व त्याचे शिष्य - अॅनॅकझिमँडर व अॅनॅकझिमीनस आणि पायथॅगोरस, हिरॅक्लीटस झेनोफेसन, पारमिनाइड्स, ल्युसीपस, डिमॉक्रीटस, अशा तेरा तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानांचे सांगोपांग विवेचन आहे. आणि दुसऱ्या भागात प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस यांच्या तत्त्वज्ञानाचा उहापोह त्यांच्या संपूर्ण चारित्र्यासह केला आहे. यात एकूण सात प्रकरणे आहेत व सॉक्रेटिसच्या संवादपद्धतीने सत्यज्ञान देण्याच्या पद्धतीची या प्रकरणातील चर्चा, महत्वाची असून, पाश्चात्य तत्वज्ञानावर संशोधन करणाऱ्यास प्रस्तुत ग्रंथ अत्यंत मौलिक ठरेल.

ऐतिहासिक पद्धतीने प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्यांच्या मतांचा आढावा सुलभ रीतीने व चांगल्या परिभाषेत दिला असून सॉक्रेटिसच्या तत्वविचारांचे विशेष विवेचन केले आहे. प्रस्तुत ग्रंथांची अर्पणपत्रिका 'महात्मा मोहनदास करमचंद गांधी' यांना असण्यातही औचित्य आहे.

**बक्षिबहाद्दर जीवबादादा केरकर यांचे संक्षिप्त चरित्र** : ले. - केशव मंगेश रांगणेकर यांचे पुस्तक (इ.स. 1931) शिक्षणगुच्छात पुष्प 194 वे म्हणून प्रसिद्ध झाले आहे. ( ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळीच्या नवीन योजनेपैकी श्रीसयाजी साहित्य मालेतील पुष्प 3 रे म्हणून प्रसिद्ध आहे. )

प्रस्तुत चरित्र हे रा. रा. नरहर व्यंकाजी राजाध्यक्षकृत ''शिंदेशाहीचा खरा इतिहास अथवा जिवाजी बल्लाळ उर्फ जिवबादादा केरकर यांचे चरित्र'' या 300+250 पृ इतक्या साडेपाचशे पानांच्या ग्रंथाचे सारांशरूप आहे.

प्रस्तुत चरित्र लिहिताना सुरूवातीलाच लेखकाने आपला उद्देश सांगितला आहे.

''साधारणपणे लहान मुलांचा स्वभाव अनुकरणप्रिय असतो. त्यामुळे ज्या काही बऱ्या वाईट गोष्टी त्यांच्या पहाण्यात, ऐकण्यात, अगर वाचण्यात येतात, त्यांचे ती आपापल्या बुद्धीप्रमाणे अनुकरण करतात. व अशा तऱ्हेनेच त्यांचा स्वभाव पुढे बरा किंवा वाईट होतो. एका कवीने म्हटलेच आहे की,

बाळपणी बाळांची कोमल तरूतुल्य बुद्धी वांकेल ॥
घेईल ज्या गुणाला तो पण मति वेष्टुनीहि फांकेल ॥

या साठीच शहाणी मनुष्ये मुलांस लहानपणी योग्य शिक्षण देण्याचा प्रयत्न करितात.

मुलांस सुशिक्षण देण्याचे जे काही प्रकार आहेत त्यातच त्यास उपदेशपर गोष्टी सांगण्याचा एक मुख्य प्रकार आहे. काही तरी कल्पित गोष्टींपेक्षा इतिहासप्रसिद्ध लोकांच्या चरित्रांचा अशा कामी फार उपयोग होतो. कारण ती कोणासही सन्मार्ग दर्शकच असतात. मग मुलास किती उपदेशपर होतील हे सांगावयास नकोच. या साठीच एका थोर पुरुषाचे चरित्र दिले आहे. त्यावरून पुष्कळ धडे शिकण्याजोगे आहेत.'' [31]

प्राथमिक अगर माध्यमिक शाळेतील मुलांस साधारणपणे मोठे ग्रंथ वाचण्याची गोडी नसते. यासाठी अगदी सारांशरूप असे हे पुस्तक तयार केले आहे. चरित्रनायक साधारण स्थितीतून उच्च दर्जास कसा चढला, हे बालवाचकांच्या नजरेस आणून देऊन त्यापासून त्यांनी योग्य तो बोध घ्यावा हाच चरित्राचा उद्देश आहे.

या पुस्तकाचे एका दृष्टीने महत्व म्हणजे महादजी शिंदें व जिवबादादा केरकर या उभयतांनी आपल्या सैन्यास पोर्तुगीजांप्रमाणे कवायतीचे शिक्षण देण्याची केलेली सोय (पृ 17,18 ), मराठी राज्यकर्त्यांनी परकीय शत्रुकडून अथवा राज्यकर्त्यांकडून काहीच नवे (तंत्रसुधारणा,यंत्रे,छपाई) घेतले नसल्याचा वारंवार उल्लेख करण्यात येतो त्या दृष्टीने हा संदर्भ महत्त्वाचा आहे.

प्रस्तुत ग्रंथात बालवाचक नजरेसमोर ठेवल्याने भाषा अत्यंत साधी, सोपी, सुबोध अशा स्वरूपाची आहे. 'श्री सयाजी बालज्ञानमाले'मधून हे पुस्तक प्रकाशित व्हावे असा उद्देश असावा. परंतु तो 'श्री सयाजी साहित्यमाले'तून प्रसिद्ध झाला.

पुस्तकाच्या आरंभीच श्री सयाजी साहित्यमालेच्या 41 पुस्तकांची व श्री सयाजी बालज्ञानमालेच्या 7 पुस्तकांची सूची आहे.

### ई) चरित्र गुच्छ

अव्वल इंग्रजीमध्ये इंग्रजांच्या किंवा त्यांच्या वाङ्मयाच्या परिचयामुळे ज्या वाङ्मयप्रकारांचा मराठीमध्ये पुनः नव्याने अवतार झाला त्यात चरित्रे आणि इतिहास हे दोन प्रकार आहेत. इंग्रजी साहित्याच्या

परिशीलनाने चरित्र लेखनाला मराठीत विशेष भर आला. ही गोष्ट जरी खरी असली, तरी इंग्रजपूर्व साहित्यातहि महानुभावपंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांच्या लीळा चरित्रापासून तो पेशवाईतले सुप्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणीस यांच्या स्पष्टोक्तिपूर्ण आत्मचरित्रापर्यंत अनेक चरित्र-आत्मचरित्राचे प्रयत्न या ना त्या मार्गाने झालेले आपणास दिसून येतात. आधुनिक इतिहासकारांच्या मताने बखरींचे मूल्य काहीही असले वा नसले तरी त्यांचा समावेश इतिहास वाङ्मयातच कोठेतरी करावा लागतो आणि महिपतीची संतचरित्रे किंवा भक्तविजय आधुनिक चरित्रदृष्टीने कितीही सदोष असले, तरी त्यांना काव्य म्हणण्यापेक्षा चरित्रे म्हणणेच अधिक योग्य होईल. महिपतिने लिहिलेली महाराष्ट्रातील संतांची चरित्रे संतांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाच्या आधारे लिहिली आहेत. त्यातून अद्भुततेचे प्रमाण अधिक असले तरी चरित्रनायकाविषयीच्या यथायोग्य आदराला त्यामुळे धक्का बसत नाही. महिपतिची आणि इतर प्राचीन चरित्रकारांची चरित्रनायकांकडे पाहण्याची दृष्टी केवळ आदराची आणि विभूतिपूजेची होती. प्राचीन चरित्रकारांचा संतचरित्रे लिहिण्याचा दुसरा उद्देश स्वतः तरुन जाऊन इतरांना तारण्याचा, आणि 1680 च्या सुमारास होऊन गेलेल्या उद्धवचिद्घनाने म्हटल्याप्रमाणे आत्मशुद्धी आणि पावनता मिळविण्याचाच होता. शाहीर कविंनी मात्र जे थोर पुरुषांच्या चरित्रवर पोवाडे रचले त्यांच्या मुळाशी पुरुषार्थाचा गौरव करण्याची आणि राष्ट्राला स्फूर्ती देऊन कार्यप्रवृत्त करण्याची लौकिक दृष्टी दिसून येते.

विभूतीपूजेच्या आणि श्रद्धेच्या दृष्टीकोनातून थोर पुरूषांची चरित्रे लिहिण्याची प्रथा इंग्रजी अंमलाच्या सुरूवातीसही दिसून येत होती. इंग्रजी वाङ्मयातील चरित्र ग्रंथांचा अभ्यास करून पश्चिमात्य देशातील थोर पुरूषांच्या चरित्राचे कमी अधिक अनुवाद इंग्रजी राजवटीच्या आरंभीच्या काळात निर्माण झाले. त्या मानाने श्रेष्ठ पुरुषांची त्रुटित चरित्रे लिहून बालबोधकर्ते वि. कों. ओक यांनी त्या प्रकारात मोठीच कामगिरी केली.

चरित्रनायकाला देवाच्या आणि संतांच्या कोटीतून मानवाच्या पातळीत आणण्याचे क्रांतिकारक कार्य चिपळूणकर आणि त्यांच्या मागून उदयास आलेल्या लेखकांनी घडवून आणले. या दृष्टीने काशीबाई कानिटकरांनी लिहिलेले 'आनंदीबाई जोशी यांचे' चरित्र किंवा श्री. ल. कृ. चिपळूणकरांनी आपल्या बंधूंचे

- विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र अनेक लेखकांस मार्गदर्शक झाले. निबंधमालेत डॉ. जॉन्सनचे चरित्र लिहिताना चिपळूणकरांनी जी समंजस पण रसिक गुणग्राहकाची भूमिका स्वीकारली तशीच भूमिका वरील लेखकांच्या ठिकाणी दिसून आली.

चरित्र लेखनाच्या स्वरुपाविषयी प्रसंगोपात मराठी वाङ्मयात स्फुट स्वरुपाची टीका प्रसिद्ध झालेली आहे. उदा. लो. टिळकांनी 'थोर पुरूषांची चरित्रे' हा निबंध केसरीत (26 May 1896) लिहून थोर पुरुषांच्या हातून जी असाधारणकृत्ये घडून येतात त्यांच्या मुळाशी ईश्वरी साहाय्याचा भाग असतो असे म्हटल्याने सामान्य लोकांना कार्यनिवृत्त होण्याची शिकवण दिली जाते असे होत नाही, असे म्हटले आहे. ते लिहितात, ''मोठ्या बुद्धीचा किंवा धैर्याचा पुरुष निपजण व त्यास मनुष्याच्या प्रयत्नाधीन नसलेल्या गोष्टीची अनुकूलता मिळणे ही ईश्वरी कृपेचे लक्षण असून पुरूष भगवद्‌गीतेतील सिद्धान्ताप्रमाणे ईश्वरी अवतार नाहीत असे म्हणणे कठीण आहे, असे जे आम्ही प्रथमतः लिहिले होते ते वस्तुस्थितीस व इतिहासास धरून लिहिले होते. ईश्वरीकृपेची अथवा साहाय्याची कोणत्याही राष्ट्राचा अभ्युदय होण्यास जरूर आहे या वाक्याचा अर्थ एवढाच आहे की, मनुष्याच्या प्रयत्नांहून त्यास इतर गोष्टींची आवश्यकता लागते. शिवाजीस थोर पुरूष म्हणा, परंतु ईश्वरी अवतार म्हणू नका हे म्हणणे शुद्ध वेडेपणाचे आहे. कोणासही ईश्वरी अवतार म्हटल्याने त्याच्या गुणांचे ज्यास साधेल त्याने अनुकरण करण्यास कोणतीही कधीच अडचण येत नाही.''[32] विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चारित्राच्या प्रस्तावनेत चरित्रनायकाचे गुण-दोष उघड करावेत असा विचार ल. कृ. चिपळूणकरांनी प्रकट केला आहे.

प्रो. अ. म. जोशी यांनी चरित्र या वाङ्मयाची जी सखोल चर्चा केली त्यात या वाङ्मयप्रकाराचे काही नियम त्यांनी उघड केले आहेत.

1. ''चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व ज्या स्वभाविक घटनांनी प्रकट होईल त्याचा कलादृष्ट्या आविष्कार करणे. 2. चरित्र नायकाची निवड करणे. 3. त्यातल्या त्यात अंतर्मुख-वृत्तीची व्यक्ति चरित्र नायक होण्यास अधिक उपयोगी ठरते हे लक्षात ठेवणे. 4. चरित्रनायकाच्या स्वभाववर्णनात त्याच्या गुणदोषांचा समावेश करणे. 5. सहानुभूती बरोबर आवश्यक तेवढे ताटस्थ्य ठेवून चरित्र नायकाचे जीवनरहस्य उकलणे'' [33] इ.

लक्षणांचा विचार त्यांनी केला आहे.

चरित्रवाङ्मयाचा विस्तृत आढावा, द. न. गोखले यांनी आपल्या 'एका चरित्राचे चरित्र' या ग्रंथात घेतला आहे.

चरित्र साधार लिहावे, वास्तव घटनांच्या आधारावर त्याची उभारणी करावी, त्यासाठी शक्य ती ती सामग्री कष्टपूर्वक गोळा करावी. साधन सामग्रीकडे अधिक चिकित्सकपणे बघावे, सत्यामधल्या सुसंगतीबरोबर असंगतीकडे नि विसंगतीकडेही स्वागतशील दृष्टीने बघावे, चरित्रनायकाला त्याच्या गुणांसह दोषांबरोबरही स्वीकारावे, वास्तव बहुधा संमिश्र नि जटील असणार अशी प्रासंगिक भूमिका घ्यावी.

चरित्रात फक्त वास्तव सत्याला किंवा प्रत्यक्ष घटितालाच स्थान असावे, कल्पिताला त्यात मुळीच वाव नसावा.

चरित्र ही इतिहासाचीच शाखा असल्याने त्यात ऐतिहासिक सत्यालाच प्राधान्य मिळावे.

चरित्रकाराने चरित्रनायकाचा भाट किंवा स्तुतिपाठक बनू नये, त्याला आपादमस्तक, अंर्तःबाह्य नीट न्याहाळावा, पण त्याच्या प्रत्येक कृतीत त्याची म्हणून काय दृष्टी होती, तो स्वतःशीच का होईना स्वतःचे समर्थन कसे करीत होता, हे सहानुभूतिपूर्वक समजून घ्यावे.

साहित्यशास्त्रज्ञ असे सांगतात की चरित्रलेखनामागे जिज्ञासातृप्ती नि कलात्मक निर्मिती या दोन मूलभूत मानवी प्रेरणांखेरीज स्मृतिरक्षण, गुणगौरव नि नीति-बोध या इतर तीन मूलभूत प्रेरणाही असू शकतात. चरित्रकार हा एकीकडे वस्तुसत्य संशोधक इतिहासकार असला तरी दुसरीकडे नवनिर्माणक कलाकारही असतो, आणि आपल्या निर्मितीबाबत कलावंताच्या ज्या मर्यादा असतात त्या मर्यादा चरित्रकारालाही क्वचित दुर्बळ बनवतात.

चरित्र मूलतः इतिहास असल्यामुळे, चरित्रकाराला वास्तव असण्या घडण्याचा शोध घेणे प्राप्त होते. ह्या शोधात मग त्याला असण्या घडण्याचा संग्रह करावा लागतो. त्यातील सत्यासत्य पारखून घ्यावे लागते. निकालसंबंध कार्य-कारण भाव वगेरेंनी त्याची संगती लावावी लागते. पण चरित्र मूलतः इतिहास असले तरी अद्यापि ते केवळ इतिहासच राहिले आहे का ? जगाच्या वाङ्मयात उत्कृष्ठ म्हणून जी चरित्रे गाजली

आहेत ती इतिहास तर आहेतच, पण शिवाय कलाकृती किंवा साहित्यकृतीही आहेत. चरित्राने आपले इतिहासस्वरूप टिकवून साहित्याचे स्वरुप धारण केल्याचा फार काळ लोटला आहे. साहजिकच, केवळ इतिहासकाराप्रमाणे असण्या घडण्याचा शोध करून चरित्रकाराचे भागत नाही. त्याला साहित्यिकाप्रमाणे, कलाकाराप्रमाणे त्या असण्या घडण्याकडे पुन्हा बघावे लागते. किंबहुना त्याचा एक डोळा इतिहासकाराचा असला तर दुसरा डोळा कलाकाराचा असतो.

''चरित्रात मानवी जीवनाचे जे दर्शन घडते ते मुख्यतः एकाच व्यक्तीच्या जीवनामधून घडते. हे व्यक्तीजीवन सर्वसाधारणपणे तीन अंगांनी बनलेले आढळते. पैकी पहिले अंग म्हणजे त्या व्यक्तीचे व्यक्तीत्व, दुसरे अंग म्हणजे त्या व्यक्तीचा जीवनक्रम आणि तिसरे अंग म्हणजे व्यक्तीत्त्व नि जीवनक्रम यांना संदर्भ देणारी परिस्थिती ही तीन अंगे एकमेकांत गुंतलेली तर आहेच. पण त्या तिन्हींचे एकत्रीकरण झाले तरच त्याला चरित्र म्हणावे असाही संकेत आहे.'' [34]

1. चरित्रनायकाचा ईश्वरी अवतार कल्पून विभूतीपूजेच्या दृष्टीने त्याचे भाविक पद्धतिने चरित्र लिहिणे.
2. आपल्या विशिष्ट संप्रदायाला किंवा राजकीय व सामाजिक मताला उपयोगी पडणारे साधन म्हणून एखाद्या लोकप्रसिद्ध व्यक्तीचे निमित्त करुन मतप्रचाराच्या दृष्टीने चरित्र लिहिणे व
3. सामान्य लोकांपेक्षा ज्यांच्या ठिकाणी अनुकरण करणे अशक्य प्रायः नसते अशा व्यक्तीच्या स्वभावाशी समरस होऊन आदरमिश्रित मित्रभावाच्या दृष्टीने तिचे खेळीमेळीने चरित्र लिहिणे, असे चरित्रांचे तीन वर्ग पडतात. यापैकी आधुनिक चरित्रांचा समावेश तिसऱ्या वर्गात करता येईल. वरकरणी क्षुल्लक दिसणाऱ्या साधनांच्या गुंतागुंतीतून चरित्रनायकाच्या स्वभावावर मार्मिक प्रकाश पाडून त्याचे व्यक्तीमत्त्व सहृदयतेने उभे करणे हेच आजच्या चरित्रलेखकांचे ध्येय ठरते. सत्यान्वेषण व सहानुभूती यांचा सुंदर मेळ त्यांच्या लेखनपद्धतीत दिसून येतो.

''थोर पुरूषांविषयी आकर्षण वाटणे हा मनुष्याचा स्वभावधर्मच आहे आणि जसा जुन्या काळी होता तसाच तो पुढेही कायम राहणारच. परंतु थोर पुरुषांची कृत्ये उदात्त असली तरी आकलनीय असतात

आणि ती अदभूतरम्य वाटली तरी अविश्वसनीय नसतात, म्हणूनच या दुहेरी गुणांमुळे थोर पुरुषांच्या चरित्रलेखनाला कलात्मक वाङ्मयात उच्च प्रकारचे स्थान मिळते.'' अशा आशयाची टीका ॲन्ड्रयु मॉरस याने केली आहे. (Aspects of Biography pa. 183, Ed.1929)

आपल्या देशी भाषेच्या साहित्याच्या अभिवृद्धिसाठी श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड नेहमी तत्पर असत. बहुजन समाजात ज्ञानाची अभिवृद्धी व्हावी या हेतूने त्यांनी अनेक प्रयत्न केले होते. श्रीसयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाकडे त्यांचे नेहमी लक्ष्य असे. वेळोवेळी ह्यासंबंधी ते आपले विचार, सूचना देत असत. गुजराती साहित्य परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी त्यांनी म्हटले आहे,

''आजच्या तरुणांना अत्यंत स्फूर्तिदायक असे कोणते वाङ्मय असेल तर ते थोर महात्म्यांची चरित्रे होय व हे आजच्या तरुणांचे वैशिष्ट्य लक्षात ठेवून तुम्ही आपला वाङ्मयसंस्कार थाटत चला.'' [35] 'थोर महात्मे' या शब्दाचा अर्थ त्यांच्या दृष्टीने 'अलौकिक पुरूष' असा संकुचित नाही. ज्या ज्या स्त्रीपुरुषांनी आपल्या कुटुंबाचे, शेजाऱ्यांचे, जातीचे किंवा राष्ट्राचे कल्याण होईल, असाच आपला जीवनक्रम ठेवला त्या सर्व स्त्रीपुरुषांची चरित्रे ही त्यांच्या मते स्फूर्तिप्रद असतात. जगातल्या अत्यंत सामान्य मनुष्याचे चरित्र सुद्धा आकर्षक असू शकते. ज्या दर्जाचा वाचक त्याच दर्जाचा चरित्रनायक असावा असे महाराजांचे मत होते.

श्री सयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध होणाऱ्या चरित्र गुच्छातील एकंदर संख्या बरीच आहे. त्यात चंद्रगुप्त मौर्य, नरसिंह महेता, अकबर, नेपोलियन बोनपार्ट, शेक्सपीयर, समुद्रगुप्त...... विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची चरित्रे आहेत.

श्री सयाजी साहित्यमालेतील मराठीत प्रसिद्ध झालेल्या चरित्रगुच्छामध्ये 'महाराजा शिवाजी', 'मीराबाई', तसेच पंडित जगन्नाथराय यांचे चरित्र आणि संगीत गंगालहरी ही आहेत.

पैकी सीताराम वासुदेव पेंडसे कृत [1] 'महाराजा शिवाजी' हे पुस्तक चरित्रगुच्छात 41वे पुष्प म्हणून (1919) प्रसिद्ध आहे. सदर पुस्तक हे बालज्ञानमालेसाठी लिहिले होते, पण त्याचा आकार वाढल्याने सयाजी साहित्यमालेतून ते प्रसिद्ध केले आहे हे ग्रंथकर्त्याने नमूद केले आहे.

शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे - मराठी माणसास पूजास्थान झालेले दैवत होय. स्वतः टिळकांनी 1895 साली शिवाजी उत्सवास जोराने चालना दिली होती. अर्थात शिवाजी महाराज ही विभूतीच अशी होती की, तिचे गुणगान करण्यास वरील उत्सवासारखे काही विशेष कारण किंवा निमित्त लागते असे नाही. तथापि या स्वराज्योन्मुख काळात उसळून आलेल्या देशाभिमानाच्या भावनेबरोबरच मराठी राज्याच्या या संस्थापकाचे विशेष उत्कटत्वाने स्मरण होणे स्वाभाविक होते. त्यानुसार ह्या काळात काही लहान मोठी चरित्रे प्रसिद्ध झाली. या सर्व शिवचरित्रामागे स्वजनगौरवाचीच भावना होती हे उघड आहे.

प्रस्तुत ग्रंथासाठी किंकेडच्या 'मराठ्यांचा इतिहास', जदुनाथ सरकार यांच्या 'शिवाजी व तत्कालीन स्थिती', रॅलिसन यांच्या 'शिवाजी' व श्री. भाटे यांच्या 'सज्जनगड व रामदास' या ग्रंथांचा आधार घेतल्याची माहिती प्रस्तावनेतच दिली आहे.

प्रस्तुत चरित्रात चरित्रकाराने ऐतिहासिक सत्यालाच प्राधान्य दिले आहे. मिळालेल्या साधनसामग्रीकडे चिकित्सकपणे पाहूनच हे चरित्र लिहिले आहे.

चरित्रकाराने प्रत्येक प्रकरणास 'भाग' असे नाव दिले आहे. अशा 12 भागांमध्ये शिवाजीच्या वेळची परिस्थिती, शिवाजीचा वंश, जन्म, बालपण, शिवाजीचे शिक्षण, स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभ, शत्रूंचा पाडाव, मोगलांशी सामना, राज्याभिषेक, शेवटचे युद्ध व चारित्र्य ई भागांमध्ये विषयाची मांडणी केली आहे.

शिवाजीचे आडनाव भोसावत या त्यांच्या उदेपूरजवळील जहागिरीच्या नावाच्या नावावरून त्यांनी धारण केले आहे, असे सांगितले आहे.

शिवाजीच्या राज्याच्या ऱ्हासाच्या कारणांमध्ये शिवाजीचे अल्पायुष्य हे मुख्य कारण मानले आहे. त्यामुळे त्यांना आपल्या राज्याची मजबुती करता आली नाही. व संभाजी व्यसनी असल्याने पेशव्यांपर्यंत नेताच लाभला नाही असे म्हटले आहे.

शिवाजी महाराजांचे केवळ गुणवर्णन एवढाच प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश नाही तर चिकित्सकपणे शिवाजी महाराजांच्या कारकीर्दिचे अवलोकन पुस्तकात केले आहे.

उदा. राज्यातील सर्वांशी समान व प्रेमळ वर्तन, न्यायीपणा, सर्वधर्माचे संरक्षण करून त्याची अभिवृद्धी करण्याची प्रवृत्ती, शेतकरी वर्गाच्या उन्नतीची कळकळ, वाखाणण्यासारखी योजना व रचनाशक्ति, दूरदृष्टी,

इत्यादि महाराजांच्या अंगी राज्यापदाला योग्य असे गुण वसत होते, आणि विजयश्रीचा महाराजांवर नेहमी वरदहस्त होता. तत्कालीन उपलब्ध युद्धसामग्रीला व शस्त्रास्त्रांना, देशाच्या नैसर्गिक रचनेला व लोकांच्या स्वभावाला संपूर्णपणे अनुरूप अशी जी अत्यंत यशस्वी युद्धपद्धति शोधून काढिली ती वरूनच महाराजांच्या ठायी किती अचाट बुद्धीसामर्थ्य होते, ते स्पष्ट दिसून येते. महाराजांच्या पश्चात् त्यांच्या इतका महापुरुष निर्माण झाला असता तर मराठा साम्राज्य चिरस्थायी होऊ शकते.

''सामान्य जनांस व विशेषतः विद्यार्थी वर्गास उपयुक्त व्हावे'' हा ह्या पुस्तकाचा किंबहुना 'श्री सयाजी साहित्यमाले'चा प्रमुख हेतु असल्याने तदनुसार सरळ वृत्तान्त देण्याचा प्रयत्न केला आहे व तो साधला आहे.

प्रस्तुत चरित्र हे 'बालज्ञानमाले'साठी लिहिले असल्या कारणाने पुस्तकाची भाषा ही अत्यंत साधी आणि सुबोध आहे. उदा. ''भेटीच्या दिवशी सकाळी शिवाजीने रोजच्या क्रमाप्रमाणे स्नान करुन न्याहारी केली आणि दुपारी नेहमीप्रमाणे वामकुक्षी केली. संध्याकाळपूर्वी त्याने भवानीच्या मंदिरात जाऊन तिची प्रार्थना केली.'' (Pa. 45)

'चरित्रगुच्छा'त रा. रा. दाजी नागेश आपटे यांचे [2] 'मीराबाई' 74वे पुष्प म्हणून प्रसिद्ध झाले आहे. रा. रा. भानुसुखराम निर्गुणराम महेता यांच्या गुजराती पुस्तकाचे मराठी भाषांतर करुन हा ग्रंथ तयार करण्यात आला आहे.

प्रस्तावनेत भाषांतरकाराने श्री सयाजी साहित्यमालेचा हेतू सांगितला आहे. ''सुलभ लोकशिक्षण हा श्री सयाजी साहित्यमालेचा मुख्य उद्देश आहे. निरनिराळ्या विषयांवर लहान मोठे ग्रंथ प्रसिद्ध करवून साक्षर जनतेचे ज्ञानक्षेत्र वाढवावे, याच हेतूने मालेतील ग्रंथ तयार करविण्यांत येतात. त्यांचा फायदा बालकांनाहि मिळणे अवश्य आहे व म्हणून मालेचा बालवाङ्मय हा एक भाग उद्दिष्ट आहे. साध्या सोप्या भाषेत, बालकांना समजेल व त्यांचे सुविचार वाढतील असे ज्ञान त्यांना देण्याचे इच्छेने हिंदुस्थानातील एकेका प्रांतातील साधु-संतांच्या चरित्रांचा परिचय तदितर प्रांतात करवून द्यावा अशी योजना केली आहे व त्यासाठी महाराष्ट्रीय रामदास, तुकाराम इत्यादिकांचा परिचय गुर्जर भाषेतून व मीराबाई, नरसिंह महेता वगैरे

गुर्जर संतांची ओळख मराठीतून करविण्यासाठी त्यांची चरित्रे तयार करविण्यात आली आहेत. त्याच पैकी हल्लीचे मीराबाईचे चरित्र आहे.'' (Pa.-1)

प्रस्तावनेवरुन चरित्रगुच्छांमागे प्रादेशिक एकात्मता साधली जावी हा हेतू स्पष्ट दिसतो आणि आबालवृद्धवाचकही त्यांच्या दृष्टीसमोर असावा हे लक्षात येते. या पुस्तकास अनुक्रमणिका दिलेली नाही. या संतस्त्रीच्या चरित्राबद्दल सांद्यत माहिती एके ठिकाणी उपलब्ध नाही. चरित्राची उभारणी करण्यासाठी भाषांतरकर्त्याने गुजराती लेखकांनी मासिकांतून, वृत्तपत्रातून व निबंधातून प्रसिद्ध केलेल्या माहितीचा उपयोग केला आहे.

प्रस्तुत चरित्रात मीराबाईचे बालपण, लग्न, मीराबाईवर राणाची प्रीति, त्रास, विषप्रयोग, भक्ति आणि भक्तिमार्ग, वृंदावन आणि मीराबाई, मीराबाई आणि अकबराशी भेट आणि मुक्ति इ. ची त्रोटक माहिती देऊन चरित्र लेखानाचा प्रयत्न केला आहे. कवि नर्मदाशंकर यांनी तिच्या कविताविषयी लिहिले आहे की, ''मीराबाईच्या कवितेत भक्तिभावाच्या आडपडद्यांतून प्रेमरस बाहेर पडत आहे. आणि मधून मधून वैराग्याचाहि भास होत आहे. तिच्या कविता सरस आहेत, पण त्यांतील तेज तीव्र नाही, रसहि गाढ नाही, म्हणून फार वेळ टिकत नाही. तरी पण काव्यरस सहज रीतीने वाहत आहे. त्यातील विचार साधे, पण तुटक आहेत. काही ठिकाणी 'पियरीयांने परदेस मूक्यां, सासरीयां रे वसाव्यां' आणखी 'चांदा सूरजनुं तेज तजीने आगीया संघाते प्रीत जोड मा रे' असे चुटके आहेत. तिची वाणी एकजात, कोमल, मधुर आणि सुंदर आहे. मीराबाई जशी राठोड रजपूत बापाची कन्या होती, तशीच ती भक्तीबद्दल दृढ होती आणि जशी राजवंशी लाडात वाढलेली मुलगी व सिसोदिया राजाची एक राणी होती, तशीच तिची कविता पण उघड आहे. 'मीरा कहे प्रभु गिरधर नागर' हा चरण गुजराती बायका कधीपण विसरणार नाहीत. गुजराथेत चांगले गाणे जाणण्याऱ्या बायका गरभे म्हणण्याच्या प्रसंगी मीराबाईची पदे फारच उत्कंठेने म्हणतात. गुजराथी भाषेत स्त्री कवयित्रीत मीराबाईच आद्य कवयित्री आहे.'' (Pa. 99-100)

मीराबाई संबंधाने एकट्या गुजरातेतच अभिमान बाळगतात असे नाही. सबंध हिन्दुस्थानात ठिकठिकाणी तिचे नाव ऐकू येते, तिची पदे वाचली जातात, भजने गातात आणि तिच्या अचल भक्तिबद्दल वाहवा होते.

पहिल्या प्रकरणात वंशावली वरून कालनिश्चितीचा प्रयत्न तसेच सर्व दन्तकथांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न व सत्यासत्यता पारखण्याचा प्रयत्न केलेला आहे. **उदा.** मीराबाईचे चितोड सोडण्यापूर्वी तुलसीदासला लिहिलेले पत्र, मीरेच्या भक्तीचे चिकित्सक बुद्धीने केलेले चिंतन, नरसिंह, दयाराम, सूरदास, चंद्रसखी वगैरे कवींच्या पदाशी कोणत्या रीतीने साम्य आहे याचाही विचार प्रस्तुत चरित्रात केला आहे. चरित्रग्रंथात अपेक्षित असलेली चिकित्सक दृष्टी बाळगण्याचा प्रयत्न सदर ग्रंथात केला आहे.

### 3) 'पंडीत जगन्नाथराय यांचे चरित्र आणि संगीत गंगालहरी' (सचित्र)

रा. रा. रामराव मार्तंड भांबुरकर यांचे हे पुस्तक चरित्रगुच्छात प्रसिद्ध झालेले 127वे पुष्प आहे. सुप्रसिद्ध कविश्रेष्ठ पंडित जगन्नाथराय यांचे नाव गंगालहरी व भामिनी विलास या दोन काव्यांच्या योगाने सर्वसाधारण लोकांस परिचितच आहे. गंगालहरीतील कित्येक भक्तिरसपूर्व पद्ये पुष्कळांच्या मुखोद्गत असतात व अनेक भाविक लोक सर्व गंगालहरीचे रोज पारायण केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नाहीत. तथापि केवळ संस्कृतात असलेला हा पंडितरायांचा काव्यरस प्राकृत जनांना अलभ्य राहत होता, आणि या साठीच तो मराठीत येणे आवश्यक होतेच. तेच कार्य रा. रामराव भांबुरकरांनी केले आहे.

प्रस्तुत चरित्राच्या आरंभीच 'सहविचारिणी सभा' चे सदस्य वा. वि. जोशी यांचा इंग्रजी पुरस्कार तसेच दाजी नागेश आपटे यांचा मराठीत आभिप्राय आहे. प्रस्तुत चरित्राला भालचंद्र चिं. लेले यांची प्रस्तावना लाभली आहे. आपल्या प्रस्तावनेत त्यांनी असे म्हटले आहे की, ''हे चरित्र लिहिताना रा. भांबुरकर यांनी एका नवीन पद्धतिचा अंगीकार केला आहे. नुसत्या ऐतिहासिक व साधार माहितीवरून लिहिलेले जगन्नाथ पंडितांचे चरित्र अगदीच त्रोटक व कदाचित थोडेसे नीरसहि झाले असते. व फक्त वाङ्मय संशोधक अशा काही विद्वान लोकांचेच लक्ष त्याकडे गेले असते. परंतु जगन्नाथ पंडितांचे चरित्र साधारण लोकांस समजावे व सामान्य लोकांकडून भक्तीने व प्रेमाने ते वाचले जावे, अशी रा. भांबुरकर यांची इच्छा असल्यामुळे, त्यांनी हे चरित्र नवलकथेच्या रुपाने लिहिले आहे या योगाने रसपरिपोषाला अवसर सापडून वाचकांच्या मनोरंजनास मदत होते. अर्थात या पद्धतीचा अवलंब केल्यामुळे चरित्रात काही गौण प्रसंग व पात्रे काल्पनिक योजावी लागली आहेत.''

चरित्राच्या आरंभी परिच्छेदसूची दिली आहे. त्यामध्ये प्रत्येक प्रकरणातील आशयाचा संक्षिप्त पण परिपूर्ण विचार केला आहे. त्याबरोबर पृष्ठांकही दिले आहेत. हृद्गतामध्ये लेखकाने चरित्रासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली आहे. त्यामध्ये जगन्नाथ पंडितांच्या घरी मूळगावी गोदावरी प्रांतामध्ये त्यांच्या वंशजांकडून जीर्णपोथी पाहून काही निष्कर्ष काढण्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. तसेच फारशी व संस्कृत ग्रंथांचे संदर्भ परीक्षून मेहनतीने तयार करून वाचकांपुढे मांडले आहे.

पंडित जगन्नाथराय यांनी 1. सुधालहरी 2. अमृतलहरी 3. करूणालहरी 4. लक्ष्मीलहरी आणि 5. पीयूषलहरी (गंगालहरी) अशा पाच लहरी निरनिराळ्या देवतांना उद्देशून केल्या आहेत. त्यांच्या पाचहि लहरी प्रसाद व माधुरी या दोन गुणांनी ओतप्रोत भरलेल्या आहेत. पीयूषलहरी चे पारायण करताना गंगा प्रकटल्याने त्या काव्याला गंगालहरी म्हटले गेले.

प्रस्तुत चरित्राचे लेखन करताना प्रथम मूळ संस्कृत श्लोक, त्याचेच खाली वामन पंडितांची समश्लोकी देऊन नंतर मराठी संगीत आणि शेवटी श्लोकाचा थोडक्यात भावार्थ, अशा क्रमाने या पुस्तकात रचना करण्यात आली आहे. हे रूपांतर अतिशय प्रसादयुक्त व सोप्या भाषेत वठले आहे व त्यात मूळातील पंडितांचा भक्तिरस यत्किंचितही कमी होऊ दिलेला नाही. शिवाय पद्ये निरनिराळ्या चालीवर व भिन्न-भिन्न रागात दिलेली असल्यामुळे लहान मुलांमुली पासून भाविक थोर स्त्रीपुरुषांपर्यंत सर्वांनी भक्तीने व प्रेमाने म्हणण्यालायक ही पद्ये झाली आहेत यात शंका नाही.

एकंदरीत रा. भांबुरकरांची कृति सुंदर वठली आहे त्यात शंका नाही. वा. वि. जोशी यांनी पण आपल्या पुरस्कारात म्हटले आहे, ''The manuscript submitted to me is of high literary merit and deserves ample remuneration and encouragement" (pa.6)

याशिवाय श्री सयाजी साहित्यमालेत बक्षिबहादूर जीवबादादा केरकर यांचे संक्षिप्त चरित्र, श्री नामदेव चरित्र तसेच भगवान बुद्ध चरित्र अशी चरित्रात्मक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत परंतु ती चरित्रगुच्छात प्रसिद्ध न होता शिक्षण तसेच इतर गुच्छात प्रसिद्ध झाली आहे. ग्रंथप्रकाशनाच्या काही अडचणींमुळे अशी व्यवस्था झाली. वर्गीकरण सदर साहित्यमालेस अनुरूप असेच केलेले आहे त्यामुळे प्रस्तुत पुस्तकांचा त्या गुच्छात विचार केला आहे.

### उ) विज्ञान गुच्छ :

युरोपियन लोकांशी भारतीयांचा संबंध आल्यानंतरच ग्रंथ कर्तृत्वाला विशेष चालना मिळाली. इंग्रजी अमल सुरू झाल्यानंतर इ.स. 1820 पासून मुंबई सरकारने शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. इंग्रज

सरकारच्या प्रथमावस्थेतील (1813-1833) शैक्षणिक धोरणात पौरस्त्य व पाश्चात्य विद्या यांची सरमिसळ आढळते. एका बाजूने जुन्याला खूष करण्याचा, तर दूसऱ्या बाजूने नव्याचा परिचय करून देण्याचा इरादा त्यात दिसतो. मात्र हे फार मर्यादित प्रमाणात करण्याचे धोरणही स्पष्ट आहे. पौरस्त्यांवर विद्यांचे संस्करण फार मोठ्या प्रमाणात होऊ नये, अशी या राज्यकर्त्यांच्यापैकी एका गटाची भूमिका होती. इंग्रजांच्या तडाख्यातून अमेरिका देश नुकताच स्वतंत्र झाला होता. भारत जर कायमचा, निदान दिर्घकाळ, इंग्रजांच्या ताब्यात राहवयास हवा असेल तर भारतीय व इंग्रज यांच्यामधील सांस्कृतिक अंतर कायम राखणे, आवश्यक आहे, पारस्त्य लोक पाश्चात्य विद्या व कला यात पारंगत झाल्यास हे अंतर नष्ट होईल व पर्यायाने स्वतःचे येथील राज्य धोक्यात येईल, अशी भीती राज्यकर्तां वर्गातील एका गटाला वाटत होती. हा धोका पत्करूनही नवे शिक्षण द्यावे, असे म्हणणारी एल्फिन्स्टनसारखी काही उदारमतवादी मंडळी होती, पण त्याची संख्या अल्प होती. पाश्चात्य शिक्षणाचा आवर्जून पुरस्कार करणाऱ्या लोकांनीही साऱ्या नव्या ज्ञानविज्ञानात भारतीयांना पारंगत करण्याची भूमिका कधी घेतली नव्हती, आणि पुढेही केव्हा राज्यकर्त्यांनी त्या दृष्टीने येथील जनतेला स्वयंपूर्ण होण्यास उत्तेजन दिलेले नाही. त्यामुळे नवविद्या संपादन करणाऱ्या व्यक्तींच्या नव्या क्षेत्रातील वाङ्मय (Literature), समाजशास्त्र (Social Sciences) वा तत्त्वज्ञान (Metephysics) यांच्याशी जेवढा परिचय झाला, तेवढा भौतिकशास्त्रांशी (Material Sciences) झाला नाही. या क्षेत्रातील एत्तदेशीयांचे एत्तद्विषयक ज्ञान, इच्छा असूनही सामान्य पातळी ओलांडून पुढे जाऊ शकले नाही. ज्या विज्ञान परिचयाचा भारतीय जीवनात प्रभाव पडला तो सामाजिक, धार्मिक क्षेत्रात बुद्धिनिष्ठ दृष्टिकोन निर्माण होऊन श्रद्धायुगाचा लोप होण्यापुरताच. पौरस्त्य व पाश्चात्य दोन्ही प्रकारच्या शिक्षणाला उत्तेजन देण्याच्या व पाश्चात्य विद्यांचे ज्ञान देशी भाषांतून प्रस्तृत करण्याच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या धोरणाला एल्फिन्स्टनने मुंबई प्रांतातील शैक्षणिक योजना आखली होती. स्थानिक परिस्थितीप्रमाणे या दोन प्रकारच्या शिक्षणाचे विभाजन करुन पौरस्त्य विद्यांचे अध्ययन पुण्यास व पाश्चात्य शिक्षण मुंबईस सुरु करण्याची त्याची योजना होती. एल्फिन्स्टनची या बाबतची भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने इ.स. 1813 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला पाठविलेल्या खालित्याकडे दृष्टिक्षेप केल्यास असे दिसून येते.

1) देशी शाळातून सध्या जी शिकविण्याची पद्धत आहे, ती सुधारावी आणि शाळांची संख्या वाढवावी.

2) त्यांना शालापयोगी पुस्तकांचा पुरवठा करावा.

3) या प्रमाणे शिक्षणाच्या ज्या सोयी करुन देण्यात येतील त्यांचा फायदा घेण्याची इच्छा खालच्या दर्जाच्या लोकांना व्हावी म्हणून त्यांना काहीतरी उत्तेजन देण्यात यावे.

4) पाश्चात्य विज्ञान शिकविण्यासाठी शाळा काढाव्यात आणि शिक्षणाच्या उच्चशाखात सुधारणा करावी.

5) देशी भाषातून पदार्थविज्ञान आणि नीतिशास्त्र यावर पुस्तके तयार करुन ती प्रकाशित करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

6) पाश्चात्य संशोधनाचे ज्ञान संपादन करण्याचे साधन आणि एक अभिजात भाषा म्हणून ज्यांची इंग्रजीचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ती असेल, त्यांच्यासाठी इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा काढाव्यात.

7) या ज्या ज्ञानाच्या शाखा शेवटी सांगितल्या, त्यांचा व्यासंग करण्याच्या कामी देशी लोकांना प्रोत्साहन द्यावे. [36]

शैक्षणिक क्षेत्रातील एकंदर उद्दिष्टे लक्षात घेता ती सिद्धीला जाण्याच्या मार्गात येथे अनंत अडचणी होत्या. ब्रिटिशपूर्व राजवटीत या प्रकारच्या शिक्षणाला अनुकूल अशी पार्श्वभूमी केव्हाच निर्माण झाली नव्हती. येथे नव्या पद्धतीच्या शैक्षणिक गरजा भागविण्यास योग्य असे ग्रंथ उपलब्ध नव्हते. सर्वसामान्य माणसात वाचनाची अभिरुची नव्हती, शिकण्याची हौस नव्हती. नवे ग्रंथ देशीभाषांतून तयार करण्यास असलेले ग्रंथकार नव्हते. ते छापण्यासाठी मुद्रणालये नव्हती. नवे पाश्चात्य ज्ञान देशी भाषातून अनुवादित करावयाचे तर त्याला योग्य अशी परिभाषा तयार नव्हती. यामुळे मराठी नवगद्याची निर्मिती करताना अगदी पायापासून राज्यकर्त्यांना तयारी करावी लागली.

विद्यादानाच्या बाबतीत अगर विद्याग्रहण करण्यासंबंधात भारतीय लोकांचा जर कोणाशी विशेष संबंध आला असेल तर तो मिशनरी लोकांशी. या लोकांनी बऱ्याच ठिकाणी शाळा उघडून युरोपखंडात च्या वेळी प्रचलित असलेली शिक्षणपद्धति येथे सुरु केली. या काळात तिकडील विद्वान लोकांच्या

परिश्रमामुळे नवी भौतिक शास्त्रे उदयाला येत होती व अस्तित्वात असलेली झपाट्याने वाढत होती. ज्योतिष आणि वैद्यक या दोन्ही शास्त्रात एतद्देशीय लोकांची प्रगति केलेली होती. रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गणितशास्त्र वगैरे शास्त्रात देखील ते पारंगत होते. या व इतर शास्त्रांवरील सगळे ग्रंथ संस्कृत भाषेत व तेहि पद्यरूपात असत. ही शास्त्रे तसेच युरोपीय शास्त्रे शाळातून सामान्य जनतेला थोड्या प्रमाणात का होईना शिकवावयाची म्हटल्यानंतर ती मराठीतून म्हणजे व्यवहारभाषेतूनच शिकविणे प्राप्त होते. व त्याकरिता पुस्तकांची जरूर भासू लागली होती. ही गरज भागविण्याकरता मराठी ग्रंथ तयार होऊ लागले. अशा रीतीने मराठी-शास्त्रीय वाङ्मयाचा उगम या शालेय पुस्तकातून झाला. सुरवातीला जे ग्रंथे निर्माण झाले ते सगळे इंग्रजीतील त्या त्या शास्त्रांवरील क्रमिक पुस्तकांची भाषांतरे होत. शास्त्रीय विषयांची गोडी लावण्याच्या कामी या किंवा अशा पुस्तकांचा, ती सुबोध असतील तर, निःसंशय उपयोग होतो.

मराठी भाषेत शास्त्रीय वाङ्मय निर्माण व्हावयाला मिशनरी लोकांनी सुरु केलेल्या शाळा कारणीभूत झाल्या. या शाळांमधून मराठी माध्यमातून शिकवले जात होते व ही स्थिति जोपर्यंत कायम होती तो पर्यंत भाषांतरित तसेच स्वतंत्र, पण मराठीत शास्त्रीय वाङ्मयाची निपज मोठ्या प्रमाणावर सुरु होती. कालांतराने ही स्थिति पालटली. शाळांमधील शिक्षणाचे माध्यम बदलून मराठीच्या जागी इंग्रजी भाषेचा शिरकाव होऊ लागला. काही वर्षांनी संस्कृत व भाषाविषय हे देखील इंग्रजीतून शिकण्याची पाळी आली. या बदललेल्या परिस्थितीचा परिणाम असा झाला की, मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषेकडेच लक्ष वेधले जाऊ लागले. शास्त्रीय वाङ्मयाची कमी होऊ लागली कराण इंग्रजी भाषेतून निनिराळ्या शास्त्रीय विषयांवर मुबलक ग्रंथसंपत्ती असल्यामुळे ती पुस्तके वाचण्याकडेच लोकांचा कल झुकू लागला. परंतु या कारणांमुळेच उत्पन्न झालेली ही उदासीनता फार वर्षे टिकली नाही. कोणताहि विषय आपल्या भाषेतून न शिकता परकीय भाषेतून शिकावा लागल्यामुळे वेळ आणि शक्ती यांचा व्यर्थ अपव्यय होतो, हे लोकांच्या लवकरच ध्यानात आले. एकंदर वाङ्मयाचीच पिछेहाट येथे झाली जेथे शास्त्रीय वाङ्मयासंबंधाने तर काही बोलावयासच नको. आपल्या वाङ्मयाचे पुनरुज्जीवन अवश्य केले पाहिजे, अशी लोकांची प्रवृत्ती होऊ लागली. परंतु एकदा बंद पडलेला वाङ्मयप्रवाह पुन्हा सुरु करावयास फार अडचणी येऊ लागल्या. शाळांमधून पुन्हा मराठीतून

शिक्षण द्यावयाची अडचण भासू लागली. आणि त्याचे कारण म्हणजे योग्य ग्रंथाचा अभाव. शास्त्रीय विषयांवरील ग्रंथनिर्मिती जरी या काळात थांबलेली होती तरी वर्तमानपत्रे, मासिके वगैरे मधून थोडेबहुत लिखाण येत असे. या लेखांमुळेच त्याचा टिकाव लागला होता. एखाद्या शास्त्रावरील ग्रंथ व नियतकालिकातील त्याविषयींचे लेख यात फार अंतर पडते. शास्त्रीय वाङ्मय त्याकाळी विशेष प्रस्तृत न होण्याचे आणखी एक कारण आहे. प्रत्यक्ष ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक आणि अशातऱ्हेच्या वाङ्मयाची आवड असणारे काही विद्वान लोक यांखेरीज बहुजनसमाज शास्त्रीय ज्ञानविषयी उत्सुक नव्हता. त्यामूळे पुस्तके लिहिण्याऱ्यांनी ती लिहून प्रसिद्ध केली तरी त्यांना गिऱ्हाईक फारच मर्यादीत असे. त्या वेळच्या स्थितीत आणि आज जरी थोडासा इष्ट असा फेरबदल झालेला असला तरी बहुजनसमाजाच्या एकंदर शास्त्रीय वाङ्मयविषयक मनःस्थितीत विशेषसा फरक पडलेला नाही.

आपल्या संस्थानात शिक्षणविषयक उपक्रम राबविताना श्री सयाजीराव महाराजांना आधुनिक शिक्षणामध्ये शास्त्रीय विषयांना योग्य ते स्थान देण्याची आवश्यकता भासू लागली. 'कालचक्राबरोबर जीवनक्रमातील प्रत्येक इतर बाबीप्रमाणे शिक्षणातहि प्रगति झालीच पाहिजे ' या अगदी सर्वसामान्य सिद्धांताला अनुसरून अत्यंत सदिच्छेने त्यांनी 'सायन्स इन्स्टिट्यूट' बांधण्याला परवानगी दिली. ह्या संबंधी त्यांचे विचार महत्वाचे आहेत. ते म्हणतात, ''हल्लीच्या पिढीच्या मते शिक्षणक्षेत्रातील शास्त्रांचे स्थान महत्त्वाचे आहे आणि निसर्ग शास्त्राच्या कोठल्याहि शाखेच्या अभ्यासाच्या योगाने नवीन नवीन सत्याचा बोध होतो हे खरेच आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजी, नॅचरल हिस्टरी - कोणतेही शास्त्र घ्या, त्याच्या अभ्यासकाला ज्ञानाचे क्षेत्र वाढविण्याची खास सुलभता असते. आणि यामुळे शास्त्रीय विषयांचा अभ्यास आकर्षक वाटतो. जगात निरंतर काय आहे आणि सत्य कोणते याचाच शोध महत्वाचा आहे. त्या दृष्टीने या देशातल्या लोकांना शास्त्राभ्यासाचे महत्व किती आहे याची अतिशयोक्ति करणे अशक्य आहे. आपल्या देशात पारलौकिक विषयावर शतकानुशतके दीर्घकाळ व्यासंग केला गेल्याने जनतेची एकंदर मनःप्रवृत्तिच सत्यान्वेषणाला सत्यशोधनाला सहजच पराङ्मुख आहे. अशाश्वत 'नेति नेति'च्या पाठीमागे ती सदा लागली आहे. ज्ञानाच्या खऱ्या शोधाला असली प्रवृत्ति अत्यंत हानिप्रद आहे हे मी सांगावयास पाहिजे असे नाही.

आपण वस्तुस्थितीला तोंड देणे अवश्य आहे. आणि तसे करण्यासाठी मनाची शास्त्रीय वृत्ति बनविली पाहिजे. केवळ शुद्धशास्त्रीय अभ्यासातच या वृत्तीचा उपयोग आहे असे नाही. पदार्थ-विज्ञान, रसायन, अशा भौतिक शास्त्रांप्रमाणेच इतिहास आणि तत्वज्ञान अशांसारख्या ज्ञानक्षेत्रांतहि ख़ऱ्याखुऱ्या गोष्टींवरच आपला अभ्यास आधारला पाहिजे. तेव्हा आपल्या सर्व सामर्थ्यांचा उपयोग करून आपण प्रथम निरर्थक अशी शिथिल चिंतनपृथक्करणादि मनांतली कोळिष्टके झाडून झटकून टाका आणि अखिल ज्ञानक्षेत्रांचे शास्त्रीय निरीक्षण आणि सुव्यवस्थापन करा, असेच मी आग्रहाने सांगेन.'' [37]

बहुजनसमाजाला शास्त्रीय विषयांची गोडी लागावी यासाठीच श्रीमंत महाराजांनी 'श्री सयाजी साहित्यमाले'तून अनेक शास्त्रीय विषयांची पुस्तके देशीभाषेतून तयार करवून घेतली. यातील काही पुस्तके ही इंग्रजी ग्रंथांचे भाषांतर आहे, तर काही पुस्तके स्वतंत्र आहेत. 'श्री सयाजी साहित्यमाले'तून - 'विज्ञान' गुच्छातून मराठीत एकंदर सात पुस्तके तयार झाली आहेत. त्यात अनुक्रमे संगीत, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, तत्त्वज्ञान, प्रजननशास्त्र, तसेच (वाङ्मय) या शास्त्रावर पुस्तके आहेत.

1) 'सनईवादन पाठमाला' पुस्तक तिसरे आणि 2) पुस्तक चवथे (पुष्प 84, 85) हे 'श्री सयाजी साहित्यमाले'तून प्रसिद्ध झाले आहे. श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या हुकुमावरुन 'सनईवादन पाठमाला' नामक चार क्रमिक पुस्तके श्री गणपत पिराजी पंडीत वसईकर यांनी तयार केली त्यापैकी पहिली दोन पुस्तके सरकारतर्फे छापविण्यात आली. पहिल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रस्तुत लेखकाने अत्यंत महत्वाचे विचार मांडले आहेत.

''आपल्या सर्व प्रजाजनांस विद्येची व निरनिराळ्या कलांची प्राप्ति व्हावी व तेणेकरुन त्यांचा अभ्युदय होत जावा, व त्याचप्रमाणे विद्या व कला यांचीही प्रगती होत जावी, या दिशेने प्रयत्न करणे हे आपले एक पवित्र कर्तव्य आहे, असे समजून ते पार पाडण्यास नेहमी मनापासून झटणारे, परम उदार, चतुर व बुद्धिमान श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव साहेब यांची स्तुति मी केली पाहीचे असे नाही. अशा त्या सद्गुणसंपन्न महाराजांची दृष्टी ईश्वरी संकेताने काही दिवसामागे आपल्या संस्थानातल्या 'सनई' वाजविणाऱ्या वर्गांच्या सद्यःस्थितीकडे गेली. वाजंत्रीवर्गाची वादनकला आज अव्यवस्थित व मागासलेल्या स्थितीत आहे असेही

त्यांना दिसून आले. त्यांच्या मनात लागलीच आले की, या वर्गाला आपल्या कलेची उन्नति करण्यास उत्तेजन देणे योग्य आहे. मनात आल्यावर मग तेथे कसला विलंब ! सनई वादनाचे नवीनपण शास्त्रीय रीतीने शिक्षण देण्याचा वर्ग सुरु करण्याचा तत्काळ हुकूम झाला व त्या नवीन वर्गाला सनईशिक्षण पद्धतशीर रीतीने देण्यास श्रीमंत सरकार महाराज साहेबांनी माझी नेमणूक केली. मी श्रीमंतांचे चरणांची आज बरीच वर्षे सेवा करीत आहे. या सनई वादनाचा माझा व्यासंग बऱ्याच वर्षांचा आहे व ईश्वरकृपेने मला या विषयाचे ज्ञान अनेक प्रसिद्ध गायकवादकांकडून झालेले आहे. माझ्या साऱ्या अनुभवाचा विनियोग उत्तम रीतीने होण्यास याहून दूसरी संधी ती कोणती असणार ?''* श्रीमंतांची आज्ञा शिरसावंद्य मानून सनई वादनाचा वर्ग चालविण्याचे कार्य प्रस्तुत लेखकाने स्विकारले. त्यांचे स्वतःचे शिक्षण जुन्या गुरुशिष्य परंपरेने झालेले होते व नवीन पद्धतीने म्हणजे पुस्तकादिकांच्या सहाय्याने अर्थात सशास्त्ररीतीने शिक्षण देण्याचा अनुभव त्यांना पूर्वी नव्हता. आपल्या दोन तीन वर्षांच्या अनुभवाने इतर साऱ्या विद्यांप्रमाणे ही संगीतविद्या देखील ग्रंथांच्या मदतीने फारच व्यवस्थित रीतीने शिकता शिकविता येईल अशी त्यांची खात्री पटली. आपल्या या पाठमालेस गायनाचार्य प्रो. रा. रा. विष्णु नारायण भातखंडे यांचे सहाय्य असल्याचा उल्लेख असून तो अतिशय महत्वाचा आहे. वे. शा. सं. रा. श्रीधरशास्त्री लक्ष्मणशास्त्री पदे यांनी या कामी मदत केली असल्याचा उल्लेख प्रस्तुत लेखकाने केला आहे. या पाठमालेत पुस्तक पहिले व पुस्तक दुसरे यात प्रो. मौलाबक्ष यांनी स्वीकारलेली नोटेशन पद्धती दिली आहे. सनई कशी वाजवावी हे ह्या ग्रंथातून शास्त्रीय रीतीने दाखविले आहे.

सनईवादन पाठमाला, पुस्तक तिसरे - पुस्तकाच्या अनुक्रमणिकेत 24 रागांची नावे दिलेली असून 7 अलंकारांची नावे आहेत. दोन पृष्ठे तक्त्याची असून अनुक्रमणिकेतील रागांचे कोमल, तीव्र, वर्जस्वर, वादी, संवादी, राग म्हणण्याच्या वेळा यांचा त्यात समावेश केलेला आहे. प्रत्येक रागाच्या आरोह अवरोह व विस्ताराच्या शेवटी तात्विक बोल आहेत. उदा. राम शंकराभरण (बिलावल) - दादरा - ता. बो. एकाग्रचित्तापासून असंख्य जीवांची उत्पत्ति होते. याप्रमाणे सर्व रागांचे तात्विक बोल शेवटी दिलेले आहेत.

सनईवादन पाठमाला, पुस्तक चवथे - या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेत एकंदर 30 रागांची नोंद असून

तिसऱ्या पुस्तकातील रागांचे विस्तार व इतर राग विस्तारासह दिले आहेत. प्रस्तावनेत विष्णु नारायण भातखंडे यांनी स्वीकारलेल्या नोटेशन पद्धतीनुसार नोटेशन केल्याचा उल्लेख आहे. तसेच सुरवातीला रागातील कोमल, तीव्र, वर्जस्वर, वादी, संवादी व राग म्हणण्याच्या वेळा वगैरे दर्शविणारे पत्रक असून प्रत्येक रागाच्या शेवटी तात्त्विक बोल दिलेले आहेत. वादनकलेविषयीचे शास्त्रीय स्वरुपाचे लेखनाचा प्रयत्न या दृष्टीने प्रस्तुत पुस्तक महत्त्वाचे आहे.

3) **'सजीव सृष्टीची उत्क्रांति'** - ले. सदाशिव नारायण दातार हे विज्ञानगुच्छातील 88 वे पुष्प आहे. उत्क्रांति अथवा विकासवाद या विषयावर आंग्लभाषेत ग्रंथसमृद्धी असली तरी, मराठीत यावर लिहिलेले एकही पुस्तक असू नये याचे लेखकाला आश्चर्य वाटल्याने प्रस्तुत ग्रंथ लिहिला गेला आहे.पाश्चात्य देशांमध्ये हा विषय महत्वाचा मानला गेला आहे. त्याची माहिती सामान्य वाचकवर्गाला सुलभतेने व्हावी हा मूळ उद्देश ठेवून पुस्तक तयार करण्यात आले. त्यामुळे वादग्रस्त व चर्चात्मक प्रश्न वगळून 'पारिभाषिक शब्द' फारसे न वापरता 'सामान्यपणे सर्वांना पटणाऱ्या' अशा गोष्टींचा विचार येथे केला आहे.

या पुस्तकात एकंदर बारा प्रकरणे आहेत. त्याशिवाय 39 चित्रे दिली असून त्यांचीही सूची दिली आहे. चित्रे ही काळ्या पांढऱ्या रंगात आहेत. सृष्टीमध्ये मनुष्यप्राण्याशिवाय इतरहि त्यासारखे अनेक प्राणी असून त्यांचेहि सृष्टिमध्ये काहीतरी कार्य आहे. मनुष्यप्राणी हा सृष्टिबाहेरील व अखिलसृष्टीवर हुकुमत चालविणारा असा प्राणी नसून तो सृष्टीतीलच एक आहे, बाकीच्या सृष्टीला जे नियम लागू आहेत तेच नियम मनुष्यालाहि लागू आहेत ही गोष्ट उत्क्रांतिवादाने सिद्ध केली. उत्क्रांतवादाचे पूर्वी मनुष्य हा एखाद्या बंडखोराप्रमाणे सृष्टीच्या बाहेर पडावयास पहात असे. परंतु उत्क्रांतिवादाने त्याची समजूत घालून त्याला परत सृष्टीमध्ये आणून सोडले.

ह्या ग्रंथात उत्क्रांतिबद्दलचे ऐतिहासिक विवेचन, नैसर्गिक संमति, निषदसंबंधी संमति, मानवजातीची उत्क्रांति, मनुष्यासारखे वानर, मनुष्य वानरांपासून उत्पन्न झाला आहे की काय ? पशूंचे मन व त्यांची बुद्धि, मनुष्यांची मानसिक उत्क्रांति इ. विषयांची चर्चा केली आहे.

उत्क्रांति संबंधी जे विवेचन या पुस्तकात केले आहे ते केवळ शास्त्रीयदृष्टीने केलेले आहे व त्यात उत्क्रांतिच्या तत्वज्ञानाचा विचार केलेला नाही. सदर पुस्तकात दिलेली माहिती बहुतेक स्वतंत्र नसून ती या विषयावरील इंग्रजी भाषेतील बऱ्याचश्या पुस्तकांच्या आधारे घेतली आहे.

पृथ्वीच्या पाठीवर प्राणी आणि वनस्पति यांचा कसकसा विकास होत गेला, हे या पुस्तकात फार चांगल्या रीतीने दिग्दर्शित केले आहे. बहुजन समाजात ज्ञानाचा प्रसार व्हावा याच हेतूने श्री सयाजी साहित्यमालेतून पुस्तके प्रसिद्ध होत असतात. हाच हेतू प्रस्तुत पुस्तकातून दिसून येतो. पुस्तकाची भाषा कोठेही कठिण वाटत नाही. एकंदर पुस्तक सामान्य वाचकाला मनोरंजक वाटेल असेच त्याचे स्वरुप आहे.

4) **यामिक प्रदिप** (1924) (प्रथम भाग) सखाराम विनायक आपटे यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतील विज्ञानगुच्छात पुष्प 91 म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

'स्थिति आणि गति यांच्या संबंधाचे नियम व्यवस्थित रीतीने सांगणारे जे शास्त्र ते यामिकशास्त्र'. या शास्त्रावरील हा लहानसा ग्रंथ ऊहापोहात्मक पद्धतीने लिहिला असल्यामुळे अगदीच नवशिक्यांकरिता नव्हे, थोड्याबहुत प्रौढ विद्यार्थ्यांकरिता आहे, आणि याच कारणाने त्याला 'प्रवेश' असे नाव न देता 'प्रदीप' असे नाव दिले आहे. असे लेखकाने म्हटले आहे. मुखपृष्ठावर 'महाविद्यालयातील नूतन विद्यार्थ्यांकरिता' असे म्हटले आहे.

चिकित्सक बुद्धि आणि शोधकपणा जागृत करण्यासाठी उहापोहात्मक पद्धतीने लिहिलेले भौतिक शास्त्रांवरील ग्रंथ विद्यार्थ्यांच्या हातात पडणे अत्यंत इष्ट आहे. आपल्या मराठी भाषेत भौतिक शास्त्रविषयक एकंदर लिखाणच फार थोडे असल्याचे लेखकाने म्हटले आहे. तसेच प्रस्तुत विषयातील इंग्रजी पाठ्यपुस्तकातील त्यांची मांडणी सदोष असून निगमनात्मक असते असे म्हटले आहे. त्याऐवजी ती भूयोदर्शन (Repeated observation), व्याप्तिग्रहण (Generalisation) आणि नंतर निगमन (Deduction) अशी असली पाहिजे आणि त्याच दृष्टीने सदर ग्रंथाची रचना करण्यात आली आहे.

उन्नयात्मक अथवा उहापोहात्मक पद्धतीचा अवलंब केंब्रिज फिजिकल सीरीजमधील कॉक्सकृत यामिकामध्ये थोडाबहुत केलेला असून त्याच ग्रंथकर्त्याने माखकृत यमिकशास्त्र वाचून आपल्याला ही योग्य पद्धती कळून आली असा आपला अभिप्राय प्रस्तावनेत लिहिला आहे. प्रस्तुत प्रदीपाच्या रचनेला वरील दोन्ही ग्रंथांचा आधार घेतला आहे. तसेच वास्तवशास्त्रासारख्या प्रौढ व उपयुक्त शास्त्रात तीन प्रकारचे ग्रंथ असणे इष्ट असते.

1. प्रदीप - ग्रंथ उहापोहात्मक, 2. शास्त्रग्रंथ निगमनात्मक, 3. प्रयोगग्रंथ प्रयोगाचे कामी मार्गदर्शक मराठी सारख्या अभियुक्त भाषेतही असे तिन्ही प्रकारचे ग्रंथ पाहिजेत अशी सदिच्छा लेखकाने प्रकट केली आहे.

सदर पुस्तकात विषयास अनुसरुन एकंदर 65 आवृत्त्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी पारिभाषिक शब्दकोश व श्री सयाजी साहित्यमालेतून तसेच श्री सयाजी बालज्ञानमालेतून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची सूची दिलेली आहे.

सदर पुस्तकात एकंदर 10 प्रकरणे आहेत. पुस्तकाची पद्धति उहापोहात्मक असल्या कारणाने नवीनच पारिभाषिक शब्द एकदम प्रकरणाच्या आरंभीच सहसा दिलेले नाही. प्रथम पूर्वज्ञानावरुनच सूचणारे प्रश्न, शंका, तर्क वगैरे काढून त्यांचे विवेचन होता होता नवीन कल्पना सुचवावी, पूर्वी अस्फुट असलेली कल्पना स्फुट करावी असा क्रम ठेवला आहे व अशा रीतीने स्फुटतेला येत चाललेली कल्पना सुटसुटीतपणे व्यक्त व्हावी म्हणून परिभाषेची जरुर भासू लागली म्हणजे संज्ञा पुढे आणली. शब्द जागच्या जागी संदर्भवशातच कळून यावेत अशी योजना केली आहे. हा दृष्टिकोन नवीन पारिभाषिक निर्मितीच्या संदर्भात अत्यंत, महत्वाचा आहे. उदा. पहिल्या प्रकरणातले 'तेजोस्तव' हा शब्द आणण्यापूर्वी त्याचे केलेले विवेचन, कोशात शब्दाची व्याख्या, इंग्रजी पर्याय व स्पष्टीकरण अशा क्रमाने आलेले आहे.

पुस्तकाच्या शेवटी पारिभाषिक शब्दकोश दिले आहेत (पृ. 201-213) तसेच विशेषनाम सूची 1 मध्ये, तसेच सूची 2 सामान्य दिली आहे.

उदा. नवीन वास्तव (New Physics)

विद्युत्कान्तीय (Electricity and Magnetism)

वर्चस्वी (वर्चसी) Possessing Potential Energy

आधारक - Supporting Force

अशर (राशि) - Scalar quantities Scalars

पदार्थविज्ञान शास्त्राविषयी मराठीमध्ये आज बरेच ग्रंथ आढळतात. ज्या पुस्तकांमधून निव्वळ या शास्त्राच्या मूलभूत कल्पनांचेच विवरण केलेले आहे ती कोणत्याहि काळात उपयोगी होऊ शकतात. परंतु पुष्कळ वेळा नवीन शोधांमुळे जुन्या कल्पना टाकून द्याव्या लागतात व ज्या पुस्तकांमधून ह्या कल्पना मांडलेल्या असतात त्यांना केवळ ऐतिहासिक महत्व उरते. प्रचलित शास्त्रीय सिद्धांतांचे विवरण ज्यात केलेले आहे अशी पुस्तके वारंवार तयार व्हावयास पाहिजेत व अशा पुस्तकांना प्रचलित शास्त्रीय वाङमयात अधिक महत्व असते. या दृष्टीने 'यमिक प्रदिप' या पुस्तकाचा प्रयत्न महत्वाचा ठरतो परंतु इंग्रजी भाषेतून ज्ञानसंपादनाची सवय असलेल्या विद्यार्थ्यांना या पुस्तकातील भाषा बोजड व क्लिष्ट वाटेल.

5) **तत्त्वज्ञानातील कूटप्रश्न** (1926) - रा. रा. दाजी नागेश आपटे यांनी लिहिलेले हे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'तील विज्ञान गुच्छातील 112 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे "Problems of Philosophy" नावाच्या इंग्रजी ग्रंथावरुन केलेला हा मराठी अनुवाद आहे. हिंदी तत्वज्ञान परिषदेच्या प्रास्ताविक भाषणात श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाडांनी आपले तत्त्वज्ञानासंबंधीचे महत्वाचे विचार मांडले. "तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताचे जर यथार्थ आकलन झाले तर आपल्या सामाजिक प्रगतीच्या व्यावहारिक बाजूला त्या सिद्धांताचा महत्वाचा उपभोग होईल. योग्यप्रकारे समजून घेतलेले तत्त्वज्ञान हा सामाजिक प्रगतीचा मूलभूत आणि प्राणभूत असा भागच आहे." तत्त्वज्ञानाचे साम्राज्य म्हणजे उपपत्तींचे साम्राज्य. सर्व विश्वाच्या आदिकारणाची, त्या आदिकारणापासून पुढे होणाऱ्या कार्यांची व ते कारण व ती कार्ये यांच्या

परस्परसंबंधाची चिकित्सा त्यात असते. अर्थात् या चिकित्सेचे सर्व विषय सूक्ष्म, कल्पनीय व अज्ञात असल्यामुळे कल्पकांच्या कल्पनाशक्तीला स्वैरविहार करण्याा या विषयात अमर्याद अवसर असतो व त्यामुळेच तत्वज्ञानाची चिकित्सा केवळ अनुमानानेच करावी लागते. ज्याच्या कल्पनाशक्तीची धाव जितकी जाऊ शकेल तशी तो उपपत्ती बसवितो. प्रत्यक्ष परिक्षण त्यात होणे शक्य नसते आणि म्हणूनच तत्त्वज्ञानातील बहुतेक प्रश्न शेवटी कूटप्रश्नच राहतात. याच अर्थाने या पुस्तकात तत्त्वज्ञानातील कूटप्रश्नांची चिकित्सा केली आहे.

तत्त्वज्ञान या शब्दानेच पुष्कळ वेळा साधा मनुष्य घाबरुन जातो. आपल्याला अपरिचित व आपल्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरील असे हे काहीतरी विलक्षण प्रकरण आहे अशी त्याची कल्पना होते. व्यवच्छेदक अणूर्ण संकल्पनात्मक अवाच्छीन्न, ब्रह्म, माया, इत्यादि दुर्बोध अशा शब्दसमूहानेच तत्त्वज्ञानाचा अभ्यास 'प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन' असा होऊन अभ्यासूंच्या पदरी 'नीचत्व' येते.

म्हणून साध्या नित्य व्यवहाराच्या भाषेत आपण बोलू लिहू लागलो तर तत्वज्ञान म्हणजे काही विलक्षण प्रकरण नसून, आपल्या नित्याच्या अनिश्चित व बेजवाबदार शब्दप्रयोगांना निश्चित अशा निष्कर्षाचे दिलेले रुप आहे असे दिसून येईल. यामुळे हीच पद्धति या ग्रंथात स्वीकारली आहे. व तिच्यामुळेच हा ग्रंथ वाचकांना अतिशय सुलभ झाला आहे. सोप्या शब्दयोजनेबरोबरच 'सोप्यापासून अवघड' अशी नैसर्गिक पद्धति येथे स्वीकारली आहे.

अगदी नित्य परिचयाच्या व निःसंदेह वाटणाऱ्या वस्तूविषयी विचार करण्यास सुरूवात केल्याबरोबर क्रमाक्रमाने तत्वज्ञानातील महत्वाचे प्रश्न कसे उद्‌भवतात व ते कसे सोडवावे हे प्रस्तुत पुस्तकात सांगितले आहे.

या पुस्तकातील विचारसरणी जरी मूळ नाव देत इंग्रजी पुस्तकावरून सुचली, तरी त्यातील विवेचन प्राच्य पद्धतीनेच केलेले आहे व ते स्वतंत्र आहे असेच आहे.

एकंदर 14 प्रकरणांमध्ये आभास व तत्वार्थ, प्रकृतीचे अस्तित्व व स्वरुप, कल्पनावाद, प्रत्यक्षज्ञान व परोक्षज्ञान, अनुमानजन्यज्ञान, काही मूलतत्वे, अनुभवपूर्ण ज्ञान, सामान्य व विशेष ज्ञान, सहजज्ञान

सत्य व असत्य, तत्वज्ञानाच्या मर्यादा व महत्व यांचे विवेचन सोप्या भाषेत केलेले आहे.

पाश्चात्य व पौरस्त्य अशा दोन्ही पद्धतींच्या तत्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्यास हा उत्तमग्रंथ आहे. यात नित्य व्यवहारातील दृष्टांतांचे द्वारे सर्व विषय सोप्यापासून अवघड रीतीने समजाविला असल्याने विद्यार्थ्यांस तो फार सुलभ व रसाळ झाला आहे.

''आपल्या लोकांनी पौर्वात्य प पाश्चिमात्य अशा दोन्ही प्रकारच्या तत्वज्ञानाचे व त्याचप्रमाणे विज्ञानशास्त्राचेही अध्ययन केले पाहिजे. इतकेच नव्हे तर, पाश्चिमात्यांच्या पद्धतींची माहिती करुन घेऊन त्यांचा उपयोग कसा करावा, तेहि समजून घेतले पाहिजे. अशा प्रकारच्या दुहेरी अभ्यासाने आपल्या तत्वज्ञानात पुष्कळच प्रगति होईल. वरील प्रकारचे शिक्षण घेऊन आपल्या विद्वानांनी तत्वज्ञानाचे प्रश्न नव्या दृष्टीने पुन्हा परीक्षून त्यांचे विवरण आधुनिक परिभाषेत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.''

6. ''**सुप्रजाजननशास्त्र**'' (1927) : अनुवादक गजानन नारायण मोडक यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'तील विज्ञानगुच्छात पुष्प 114 वें म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा 'सुप्रजाननशास्त्र' या विषयावर इंग्रजीत उत्तम निबंध लिहिलेल्या नर्मदाशंकर देवशंकर दवे यांच्या 1918 साली लंडन येथे बक्षीस मिळालेल्या लेखाचा अनुवाद आहे. ह्या शास्त्रांविषयी सामान्य जनतेत गाढ अज्ञान असल्याने त्यांचा परिचय मराठीत लहान लहान पुस्तके लिहून करुन द्यावा हा लेखकाचा हेतू आहे. ''परंतु सद्यस्थितीत असल्या वाङ्मयाला आश्रय मिळणे कठीण'' हा लेखकाचा अभिप्राय सूचक असून 'श्री सयाजी साहित्यमाला' सुरु केल्याने असल्या ग्रंथांना उत्तेजन मिळत आहे. बहुजन समाजावर हे त्यांचे अगणित उपकार असून ही एकच माला त्यांचे नाव अजरामर करण्यास पुरेशी आहे. यात श्री सयाजीराव महाराजांच्या योगदानाविषयी सुस्पष्ट कल्पना दिसून येते.

वनस्पति आणि प्रणिशास्त्राचा अभ्यास करताना 'सुप्रजाजनन'शास्त्र शिकावे लागते. मेंडल यांचे प्रयोग यासाठी क्रांतिकारक आहेत. सदर पुस्तकात या शास्त्राचे फक्त दिग्दर्शन केले आहे. या

शास्त्राच्या प्राचीन व अर्वाचीन सिद्धांतांविषयी कोणाचेहि द्विधा मत नाही. पश्चिमात्यांनी पुनर्जन्म व पूर्वसुकृत यांचा विचार केला नसल्याने त्याविषयी साधकबाधक चर्चा केलेली नाही तरी शारीरिक गुणधर्म अनुवांशिक आहेत असे त्यांनी सिद्ध केले आहे. पुनर्जन्म व पूर्वसुकृत मानणाऱ्यांना फार झाले तर एवढे म्हणता येईल की, कृतकर्माबद्दल मनुष्याला अमुक एक स्थितीत, अमुक एक गुणधर्माचा जन्म मिळत असल्याने तो त्या त्या ठिकाणीच जन्म घेतो. म्हमजे या शास्त्राच्या सिद्धांताशी काही विरोध येत नाही. उदा. क्षयरोग अनुवांशिक असल्याने वारसात उतरतो असे 'सुप्रजाजनन'शास्त्र म्हणते. कर्मवादी व पुनर्जन्मवादी म्हणणार की प्रजेच्या पूर्वकर्माने तिला त्या क्षयरोग्याचे पोटी जन्म झाल्याने तो रोग जडतो.

'सुप्रजाजनन' शास्त्राचे सिद्धांत अमलात आणण्याचा प्रश्न बिकट आहे. कारण वनस्पति व प्राणी यांच्यावर वाटेल तसे प्रयोग करून अमुक तऱ्हेची, अमुक गुणधर्माची प्रजा निर्माण करता येते, अशी खात्री पटलेली असली व मनुष्य प्राण्यालाहि तेच नियम लागू असल्याचे माहीत असले तरी त्याप्रमाणे कोण आचरण करणार? वरवधूंची निवड करताना छत्तीस गुण पत्रिकेवरून जमवले जातात. पण बाकीच्या गुणांकडे कोणीही लक्ष देत नाही.

मूळ चार वर्णांच्या शेकडो जाती निर्माण होऊन आकुंचित दृष्टीने आणि अंधपरंपरेने लग्नाचे क्षेत्र फारच मर्यादीत केले गेले आहे. एकाच वर्णातील सारख्या आचारविचारांच्या लोकांनी परस्पर बेटीव्यवहार सुरू केल्यानेही सुधारणा लवकर अमलात येईल. आधुनिक सुशिक्षितांनी ही गोष्ट ध्यानात ठेऊन असली लग्ने मुद्दाम घडवून आणण्यासाठी झटले पाहिजे. या शास्त्राचा चांगला अभ्यास करून त्यांतील सिद्धांताप्रमाणे स्वतःचे आणि कुटुंबातील माणसांचे आचरण राहील असे करावे. कुटुंब हाच देशाचा घटक असल्याने त्याची प्रगति तीच देशाची प्रगति होय. सदर ग्रंथात एकूण 9 प्रकरणे असून या शास्त्राच्या पाश्चिमात्य विचारंबरोबरच भारतीय तत्त्वज्ञान, जीवनपद्धती, धर्मकल्पना यांचा संदर्भही दिल्याने सुप्रजाजननशास्त्र याचा विचार अधिक महत्त्वाचा ठरला आहे.

'सुप्रजाजनन' शास्त्राबद्दल पश्चिमात्यांचे व प्राचीन आर्यांचे अभिप्राय काय आहेत, इतर शास्त्रांचा

त्यांच्यांशी संबंध कसा आहे, त्याचा प्रसार शास्त्रीय पद्धतीने कसा झाला पाहिजे व प्रत्यक्ष क्रियेत त्याचे सिद्धांत कसे आणता येतील याबद्दल प्रस्तुत पुस्तकात थोडक्यात दिग्दर्शन केले आहे. व एकंदरीत समाजामध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन कसा रूजला पाहिजे हा विचार प्रस्तुत पुस्तकाच्या निर्मितीमागे असल्याने त्याचे समाजलक्षित्व ध्यानात येते.

पाश्चिमात्य विज्ञानशास्त्राच्या संदर्भात काही शब्द तयार केलेले दिसतात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | Bioforce | - | जीवायु |
| | A Sexual | - | आलिंगी |
| | Invertibrates | - | अपृष्ठवंशी |
| | Vertibrates | - | पृष्ठवंशी |

तसेच अंडज, स्वेदज, उद्भिज्ज या सारखाच 'जरायुज' Pa. 7 हा शब्दही नवीन असावा असे वाटते.

### 7. संक्षिप्त अर्वाचीन मराठी वाङ्मय (1805-1927) - सं. गणेश रंगनाश दंडवते (1929)

''संक्षिप्त अर्वाचीन मराठी वाङ्मय'' - सं. गणेश रंगनाथ दंडवते, यांचे पुस्तक विज्ञानगुच्छात 155 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध झाले आहे. वाङ्मयाचा इतिहास हे सुद्धा एका अर्थाने शास्त्रच असते. त्यामुळे याचा विज्ञानगुच्छात समावेश करण्यात आला आहे.

वाङ्मयेतिहासात्मक ग्रंथ योग्य काल आल्यावरच तयार होतात. उदा. कै. वि. ल. भावे कृत 'महाराष्ट्र सारस्वत' हा मूल्यावान ग्रंथ प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास उपलब्ध होण्यास त्याच्या प्रारंभकाळापासून पाच-सहाशे वर्षांचा अवधी लागला. त्याचप्रमाणे अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या या संक्षिप्त इतिहासास त्याच्या जननकालापासून साधारणपणे 100 वर्षांचा अवधी लागला. मात्र हा ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वी या दिशेने कै. रा. भि. जोशी यांचे 'मराठी वाङ्मय विवेचन' व प्रो. द. वा. पोतदार कृत 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' ही याच धर्तीवरील दोन पुस्तके प्रकाशित झाली होती. त्यात व्याकरणविचार जरी अधिक झाला

असला तरी शेवटची माहिती उपयुक्त आहे. वरील प्रमाणेच कै. वि. मो. महाजनी, वि. का. राजवाडे, कै. ह. ना. आपटे इ. गत आणि चिं. वि. वैद्य, न. चिं. केळकर, ल. रा. पांगारकर, वा. ना. देशपांडे इ. त्यानंतरच्या काही विद्वानांनी अर्वाचीन मराठी वाङ्मयविषयक वेळोवेळी उत्कृष्ट चर्चा केली आहे. तथापि, मासिक पुस्तकांतून अथवा व्यासपीठावरुन केलेल्या चर्चेस मर्यादा असते आणि तीही पुस्तकरुपाने उपलब्ध असतेच असे नाही. म्हणूनच अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या गेल्या 100 वर्षांचा संक्षिप्त इतिहास अथवा त्याची साधने वाचकांपुढे ठेवता आल्यास विस्तृत इतिहास तयार होईपर्यंत 'दुधाची तहान ताकाने' या न्यायाने हा ग्रंथ महाराष्ट्रीयनांना उपयोगी पडावा या हेतूने या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.

ग्रंथकर्त्याने सोयीसाठी या पुस्तकाचे 1. संपादनखंड व 2. चरित्रखंड असे दोन विभाग केले आहेत. संपादनखंडामध्ये प्रथमकाल, मध्यकाल - पूर्वार्ध, मध्यकाल-उत्तरार्ध, उत्तरकाल व वर्तमानपत्रे असे एकूण 5 उपविभाग केले आहेत. त्यापैकी प्रथमकाल - सन 1805-1856, मध्यकाल - पूर्वार्ध 1857-1885, मध्यकाल उत्तरार्ध 1886-1917, उत्तरकाल - 1917-1927, या कालखंडातील वाङ्मयाचा इतिहास व देशी वर्तमानपत्रांचा आरंभ या विषयीचे विवेचन अगदी साध्या, सोप्या भाषेत केले आहे.

तर दुसऱ्या चरित्रखंड या विभागात स. का. छात्रेपासून वा. म. जोशींपर्यंतच्या ग्रंथकारांची चरित्र अगदी सुबोध भाषेत दिली आहेत. ग्रंथाच्या शेवटी अकारविल्ह्यानुसार मराठी चरित्रसूची दिली आहे.

श्री सयाजी साहित्यमालेतील शास्त्रीय वाङ्मयाचा विचार केल्यास, यापेक्षा कितीतरी पटीने अधिक वाङ्मय निर्माण व्हावयास पाहिजे होते. पण ते निर्माण होऊ शकले नाही. शास्त्रीय वाङ्मयाचे महत्त्व शिक्षित लोकांना पटून सुद्धा त्याची अभिवृद्धि का होत नाही, त्यांतील खरोखर अडचणी काय आहेत, याचा विचार मराठी साहित्यसंमेलनाच्या बडोदे येथे भरलेल्या 19 व्या अधिवेशनातील शास्त्रीय विभागाचे अध्यक्ष प्रो. गो. रा. परांजपे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केलेला आहे. ते म्हणतात,

''शास्त्रीय वाङ्मयाच्या प्रगतीतील पहिली अडचण जर कोणती असेल तर ती माध्यमाविषयी. शाळा व कॉलेजे यांमधून हल्ली सर्व विषय इंग्रजीतून शिकविले जातात. ही स्थिति बदलून शिक्षणाचे माध्यम मराठी करणे अतिशय आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ''विश्वविद्यालयात मराठीला बोधभाषेचा मान मिळाला

पाहिजे. तोपर्यंत शास्त्रीयविषयांतील प्रगतीच्या कल्पना नुसती मनोराज्ये ठरतील.'' मराठीतून शास्त्रीय वाङ्मयावर चांगली पुस्तके लिहिता येणे शक्य नाही, असा आरोप पुष्कळांकडून करण्यात येतो. परंतु आजपर्यंत मराठीत प्रसिद्ध झालेल्या शास्त्रीय वाङ्मयाचे निरीक्षण केल्यावर हा आरोप फोल ठरतो. मराठीत शालोपयोगी व क्रमिक पुस्तकांची वाण नाही. वाण जर कशाची असेल तर शास्त्रीय परिभाषेती लिहिलेल्या प्रमाण ग्रंथाची व सामान्य लोकांकरिता लिहिलेल्या सुबोध ग्रंथांची शास्त्रीय वाङ्मयाच्या प्रसाराला या सुबोध ग्रंथांची फार मदत होईल, जनतेमध्ये शास्त्रांबद्दल अभिरुचि वाढेल व त्या परिणाम जास्त वाङ्मय निर्मिती हा होईल. नियमकालिकांची संख्या देखील वाढली पाहिजे.

दुसरी अडचण आहे ती परिभाषेची. सुबोध ग्रंथ लिहिताना परिभाषेची आवश्यकता भासणार नाही. परंतु प्रमाणग्रंथाला तिची जरुरी आहे. त्याचप्रमाणे उत्तमोत्तम पाश्चात्य प्रमाणग्रंथ मराठीत आणावयाचे झाल्यास तिची आवश्यकता आहे. तेव्हा परिभाषा नक्की केली पाहिजे व त्यासाठी प्रयत्न चालले आहेतच, परंतु त्याकरिता अडून बसण्याचे कारण नाही.

तिसरी अडचण म्हणजे शास्त्रीय विषयांसंबंधी वाचकांचे औदासिन्य. एखाद्या अनुभवी व हौशी लेखकाने शास्त्रीय विषयांवर सुबोध पुस्तक लिहिले, पण त्याला वाचक वर्गच जर मिळाला नाही तर अशा लेखकाची हौस व उत्साह गारठल्याशिवाय राहणार नाही. मराठी ही बोधभाषा केल्याने ही अडचण दूर होण्यास मदत होईल असे वाटते. सामान्य जनतेला शास्त्रीय विषयांची गोडी लावण्याची जबाबदारी वृत्तपत्रांवर पडते. ती तत्कालीन फायद्याकडे नजर न देता पार पडण्याचा प्रयत्न होणे इष्ट आहे. तरुण पिढीची लेखन-वाचनाची सध्याची दिशा बदलली पाहिजे. तीत गंभीरपणा मुळीच राहिला नाही. तात्पुरत्या सुखाकरिता तरुण पिढी सर्व शास्त्रीय प्रगतीला हरताला फाशीत आहे. हा मार्ग सोडला तरच शास्त्रीय वाङ्मय वाढीला लागेल व देशाची खरी औद्योगिक आणि सांपत्तिक सुधारणा होईल. केवळ ललितकलात्मक एकांगी वाङ्मय या कामी खास उपयोगी पडणार नाही.'' [38]

सयाजी साहित्यमालेतील विज्ञानगुच्छामागे समाजाची बहुजनसमाजास ज्ञान देणे, शास्त्रीय प्रगती होणे, त्यासाठी एतद्देशीय भाषांचा माध्यम म्हणून उपयोग करणे, ती 'बोधभाषा' घडविण्यासाठी परिभाषांची

निर्मिती करणे, एकंदर समाजाची अभिरुची रंजनापेक्षा प्रबोधनपर करणे इ. हेतू स्पष्ट दिसतात, हे वरील अवतरणावरुनही लक्षात येते.

## ऊ) वार्ता गुच्छ

'वार्ता' हा शब्द गुजराती असून 'कथा' हा त्याचा अर्थ सदर गुच्छातून एकच पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

1. **सुबोध कथामाला-** ले. दाजी गोविंद चिपळोणकर (1927) यांचे पुस्तक वार्तागुच्छात 113वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तकात एकंदर 60 गोष्टी असून बहुतेक "टू हन्ड्रेड प्रेटीटेल्स" या इंग्रजी पुस्तकाच्या आधाराने लिहिलेल्या आहेत. यातील काही गोष्टी केवळ नव्या व काल्पनिक नसून त्या नेहमी व्यवहारात घडणाऱ्या व पदोपदी त्यांचा अनुभव येण्यासारख्या अशा आहेत. ह्यामुळे लहान मुलांच्या मनावर त्यातील नीतितत्वांचा चांगलाच परिणाम अल्प श्रमात घडण्यासारखा आहे. संस्कृत मधील पंचतंत्र, हितोपदेश व विदुरनीति इ. नीति शिक्षणाचे ग्रंथ आपल्याकडे आहेतच. पण या ग्रंथाचा उपयोग नीतिशिक्षण प्रत्यक्ष देण्यासाठी होईल अशी आशा लेखकाने व्यक्त केली आहे.

सदर पुस्तक वाचताना मुलांस कंटाळा न यावा व त्या वाचनापासून एखादे नीतिचे तत्व त्यांच्या हृदयात कायमचे रहावे हा हेतु मनात धरून हे पुस्तक लिहिले आहे. गोष्टींची नावे सोप्या शब्दांनी व्यक्त केली आहेत व त्यातील तात्पर्य शेवटी आणले आहे. गोष्टीतील खरे नीतितत्त्व कायमचे त्यांच्या स्मरणात रहावे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवि व साधुसंत यांच्या प्रशंसनीय ग्रंथातून गोष्टीस शोभतील असे काही उतारे घेऊन, ते गोष्ट पुरी होताच गोष्टीस जोडले आहेत. पुस्तकातील भाषा होईल तितकी साधी व सोपी वापरण्याचा प्रयत्न केला आहे.

या गोष्टींमध्ये फुलपाखर, कासव आणि विंचू, ससाणा पक्षी, कोंबडा, कृष्णसर्प, मासा इ. प्राणी जगताविषयी, तसेच नारळाची झाडे, वडाचे झाड, द्राक्षांच्या वेली, गुलाबाचे झाड. इ. झाडांविषयी, आणि गरीब कुणब्याचा पोर, म्हातारी व तिच्या दोन लेकी, मुलाची प्रार्थना, लहान मुलांचे शहाणपण, चतुर न्यायाधीश इ. माणसांविषयीच्या कथा आहेत.

सदर पुस्तक लेखकाने लिहिलेले होते, पण काही अडचणींमुळे ते प्रसिद्ध झाले नव्हते. 'श्री सयाजी साहित्यमालेत' ते नंतर छापले गेले. सदर पुस्तक हे लहानमुलांचे मनोरंजन करणारे तर आहेच, पण त्याचबरोबर त्यांना नीतिशिक्षण देणारे आहे.

प्रस्तुत पुस्तकाची प्रेरणा व आधार ''टू हन्ड्रेड प्रेटीटेल्स'' या इंग्रजी पुस्तकाचा असला तरी लेखकाने पंचतंत्रसारख्या आपल्या भारतीय कथापरंपरेशी त्याला जोडून घेतले आहे.

## ए) धर्मगुच्छ

धर्म हा मानवजातीचा प्रमुख विशेष आहे. मानवजातीच्या उपलब्ध असलेल्या इतिहासावरुन असे दिसते की, कोणत्या ना कोणात्यातरी स्वरुपात धार्मिक भावना प्रत्येक मानववंशात आढळते. मानवी इतिहासात धर्म ही एक अत्यंत प्रबल बाबत होऊन बसली आहे. मानवी जीविताची इतर अंगे काही कमी महत्त्वाची नाहीत, पण आजपर्यंतच्या मानवेतिहासात धर्माइतका सर्वतोपरी श्रेष्ठ विशेष दुसरा कोणताही आढळून आलेला नाही.

या जगातील एक अथवा अनेक अतिमानुष शक्तींच्या आधाराने माझा जीवनकलह यशस्वी होईल, असा दृढविश्वास वाटणे, ही गोष्ट धर्मापासून मनुष्यास मिळते, इतर कोणापासूनही मिळत नाही. प्रत्येक धर्म आपापल्या अनुयायांकरता तसेच समाजाकरताही अनेक चांगल्या गोष्टी करतो. उदा. व्यक्तीमध्ये अधिक शक्ती व अधिक समाधान उत्पन्न करण्यात धर्मच साहाय्य करतो. आयुष्यांतील अनेक हालअपेष्टा निमूटपणे सहन करण्यात धर्माचीच मदत होते. सुखदुःखाचे कोडेही धर्मच सोडवतो. उच्च मानवीजीवनात एक प्रकारचा उच्चपणा आणून देणाराही धर्मच. 'माझे मरणोत्तर जीवन हल्लीपेक्षाही सुखकर होईल' अशी आशा धर्मच उत्पन्न करतो. आदर्श समाजाचे रम्य चित्र डोळ्यापुढे ठेवणाराही धर्मच. मुक्तीचा मार्ग आखून देणाराही धर्मच.

नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, अथवा आदर्श सुसंस्कृत जीवनाविषयींची घडपड या सर्वांहून धर्म हा काही निराळाच आहे. त्याचे कार्यही या सर्वांहून निराळे आहे. ते हे की, धर्म हा मनुष्यप्राण्यांना एक प्रकारचे निरतिशय समाधान प्राप्त करून देतो. या जगात एक अथवा अनेक अतिमानुषशक्ति आहेत हे ओळखून

धर्माने त्या शक्तींचे व मानवी प्राण्यांचे जिव्हाळ्याचे नाते जोडून दिले आहे. मनुष्याला समाधान मिळते ते यामुळेच.

साध्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ''आपल्याला दैवी वाटत असलेल्या शक्तीशी कसले तरी नाते जोडताना मनुष्याला येणारे अनुभव, त्यांच्यात उत्पन्न होणाऱ्या भावना, त्याच्या मनात येणारे विचार त्याचे हातून घडणारे कर्म, या सर्वांचे मिश्र स्वरूप म्हणजे धर्म''[39] वर सांगितलेली दैवी शक्ति ही जगाचे नियमन करणारी एक अत्यंत महनीय देवता आहे, असे मनुष्याला वाटते.

मानसशास्त्राच्या दृष्टीने बोलावयाचे म्हणजे धर्म ही काहीशी बौद्धिक, काहीशी भावनात्मक व काहीशी इच्छाशक्ति संबंधक वस्तु आहे. तरी पण, धर्म ही केवळ आत्मानुभवाचीच एक बाब आहे असे नाही. धर्मात मनुष्याच्या श्रद्धेचा विषय जो देव त्याचाही समावेश होतो. अर्थात एक अथवा अनेक देवांचे विषयी श्रद्धा हा असा एक धर्माचा भाग आहे, तसाच त्या देवाविषयीचा अनुभव हाही एक धर्माचा भाग आहे. तेव्हा एका धर्माचा दुसऱ्या धर्माशी फरक पडतो तो भिन्न भिन्न देवतांविषयीची श्रद्धा आणि अर्थातच त्या श्रद्धेमुळे भिन्नभिन्न मनुष्यात उत्पन्न होणारा भिन्नभिन्न अनुभव यामुळेच.

**सयाजीराव महाराजांची धार्मिक मते :**

हिंदुसमाजातील बहुतेक चालीरीतींचा धर्माशी निकटचा संबंध असल्यामुळे व सर्व धर्मामध्ये धर्मभावना दृढमूल असल्यामुळे या बाबतीत महाराजांनी अतिशय सावकाश पण कृतनिश्चयाने पुढे पाऊल टाकले.

महाराजांनी आपल्या प्रजेस धार्मिक स्वातंत्र्य दिले. स्वतः हिंदु तेव्हा हिंदु धर्मीयांनाच काय ते उत्तेजन द्यावयाचे व परधर्मीयांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर व त्यानुसार मिळणाऱ्या हक्कांवर निर्बंध घालायचे असे संकुचित ध्येय त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेविले नाही. त्यांनी प्रत्येक धर्मातील धर्मपुस्तकांची मराठीत भाषांतरे करविली आहेत. 1904 साली धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून, त्यावर ग्रंथ लिहिण्यासाठी 500 रु मंजूर केले. धर्माचा तौलनिक अभ्यास तरुणांना करता यावा म्हणून त्यांनी बडोदा कॉलेजात 'तौलनिक धर्माचा तज्ञ प्राध्यापक' नेमला. इ.स. 1911 साली ख्रिश्चन, जैन, झोरास्ट्रियन, इस्लाम, बौद्ध, हिंदु वगैरे

धर्मातील तत्वे शिकविणारा एक क्लास काढावयाचे त्यांनी ठरविले होते. त्यांना सर्व धर्मियांबद्दल आदर होता. सर्वधर्म समानत्त्व हे तत्व विद्यार्थी व प्राध्यापकांच्या मनावर बिंबविण्यासाठी बडोदा कॉलेजच्या मुख्य घुमटाच्या खाली दर्शनी भागावर जगातील महत्वाच्या धर्मांची बोधचिन्हे कोरलेली आहेत. महाराजांची धार्मिक मते समानतेच्या तत्वावर आधारलेली होती. व्यर्थ शब्दावडंबर करून धार्मिक स्तोम माजविणे त्यांना बिलकूल पटत नसे. तसेच रूढीच्या नावावर जी कित्येक थोतांडे किंवा फसवा फसवीचे प्रकार करण्यात येतात ते त्यांना नको होते. धर्माच्या बाबतीत कोणी मध्यस्थ नको. कुलाचार पाळू नयेत असे त्यांचे मत नव्हते, पण अमूक माणसांनाच किंवा जातीलाच वेदोक्ताचा अधिकार आहे, इतरांना नाही, हे मत त्यांना पटत नसे. सर्वच ईश्वराची लेकरे आहेत म्हणून ई श्वराची प्रार्थना करण्याला सर्वांनाच सारखा अधिकार पोचतो. ब्राह्मणांस तेवढा वेदोक्ताचा अधिकार, परंतु क्षत्रियांस मात्र पुराणोक्त पद्धति ही विषमता त्यांना दुःसह वाटत असे. जाती-जाती मध्ये भेदभाव दुणावणारी व उच्चनिचपणा वाढविणारी 'पुराणोक्त' धर्मविधि चालविण्याची चाल महाराजांनी बंद करविली. महाराजांनी आपल्या कुटुंबातील सर्व मंडळीचे संस्कार वेदोक्त पद्धतीने केलेले आहेत. राजवाड्यात वेदोक्त रीतीने व सर्व विधींचा अर्थ सांगून धर्मविधि केले पाहिजेत असा निर्बंध केला. व जे ब्राह्मण या सुधारणेला कबुल नव्हते त्यांची वेतने काढून दुसऱ्याला दिली. तसेच धर्मगुरु म्हणविणाऱ्या उपाध्यायांचे अज्ञान घालविण्याकरिता व ते निव्वळ धर्मशास्त्राचा अर्थ न जाणणारे भारवाहक न राहता धर्मतत्व शिकवणारे समाजाचे खरेखुरे धर्मगुरु व्हावेत म्हणून उपाध्याय परिक्षा अस्तित्वात आणली, व उपाध्यायगिरीचा परवाना देण्याचा कायदा केला. मात्र परवानावाले उपाध्यायच सरसहा सर्व समाजाने धर्मसंबंधी कार्यात योजिले पाहिजेत अशी सक्ती केली नाही. तरी पण ''प्रत्येक उपाध्यायाने लग्नाचे वेळी विवाहमंत्राचा व विवाहविधीचा अर्थ मातृभाषेत वधुवरास समजून सांगितलाच पाहिजे असे कायद्यात कलम घातले.'' [40] (न्यायमंत्री 53/5, Dt. 11-2-1928) उपाध्यायाच्या परीक्षेस बसण्याचा हक्क सर्व जातीतील लोकांना दिला. व त्यायोगे जातीमधील उच्चनीत्त्वाच्या कल्पना पुष्कळ अंशाने कमजोर करण्याचा प्रयत्न केला.

आपल्या प्रजेमध्ये धार्मिक तसेच सामाजिक बाबतीत सुधारणा होण्यासंबंधी ''श्रेष्ठ धर्माचार'' नावाचे

एक खाते महाराजांनी उघडले होते. धर्म तसेच धर्मकृत्यां संबंधी ज्या खोट्या समजूती व अंधश्रद्धा प्रचलित आहेत त्या दूर करण्यासाठी लोकांत ख़रा तसाच संयुक्तिक विचारांचा प्रचार करण्यासाठी योजना तयार केल्या होत्या. असे धार्मिक खाते उघडण्यासाठी श्रीमंतांनी हुकुम दिला होता. [41] (H.K.K.D.D.H.O. No A75/11-7-17)

''आपण आपल्या धर्मवचनास अनुसरुन जी दाने देतो, एका राजाज्ञेत ते म्हणतात, ''ती विचारपूर्वक ग्राहकांच्या पात्रतेला साजतील अशी असावी. दानधर्माला संस्थेचे स्वरूप आले त्याचे कारण इतकेच की, अनेक अश्रित आपला निर्वाह दानधर्मावर करण्यासच सटकावले. दान देऊन रक्कम उरलीच तर भविष्यात त्या रक्कमेचा उपयोग उत्तम कामासाठी व्हावा.

महाराजांनी राजवाड्यातील अशा प्रकारचा दान धर्म सक्तीने बंद करविला. कारण ते म्हणत असत, ''अविचारी दानामुळे अतिशय अनर्थ होतो. धंदेवाईक भिकारी वाढतात व लोक कंगाल होतात.''

इ.स. 1887 साली महाराजांनी युरोपचा प्रवास केला. हिदुधर्मशास्त्राप्रमाणे परदेशगमन निषिद्ध समजले जात असे. परंतु विज्ञाननिष्ठ पुरोगामी विचाराच्या महाराजांनी आपला नवे जग पहाण्याचा आणि समजून घेण्याचा निश्चय पक्का केला होता. शंभर वर्षापूर्वी सागरप्रवास धोक्याचा होता आणि धर्माविरूद्ध वागल्यामुळे धोका होणारच असे इतर लोक समजत होते. शिवाय सनातनी लोकांच्या टिकेची आणि बहिष्काराची भिती होतीच. महाराजांनी तिकडे दुर्लभ केले. वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक महाराजांच्या बरोबर युरोपात जाऊन आल्यामुळे त्यांची दृष्टी विशाल झाली होती व परस्पर समभाव निर्माण झाला होता.

स्त्रियांना शिक्षण देणे महाराजांच्या काळी धर्मबाह्य समजले जात असे. या मूर्ख समजूतीवर महाराजांनी हल्ला चढविला आणि आपल्या राज्यात मुलींच्या शिक्षणाची उत्तम सोय केली. महाराणी चिमणाबाईंना विवाहानंतर शिक्षण देवून इतरांना आदर्श घालून दिला होता.

अस्पृश्यतेचा धर्माशी मुळीच संबंध नव्हता. काही हितसंबंधी लोकांनी निर्माण केलेली ती बाब होती. ती समाजाच्या प्रगतीला आणि स्वातंत्र्यप्राप्तीला कशी घातक आहे हे त्यांनी दाखवून दिले आणि अस्पृश्यता नाहिशी करण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न केले.

प्लेग, कॉलरा असे साथीचे रोग किंवा दुष्काळासारखे संकट म्हणजे कुणातरी देवतेचा कोप आहे, असा सामान्य, अज्ञानी लोकांचा समज असे. बडोदे संस्थानात प्लेगची साथ सुरु झाली. महाराजांनी आधुनिक पद्धतीने उपाय योजण्याचे आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम दिले.त्यांनी या रोगाचा नायनाट करण्यासाठी योजलेले सर्व इलाज प्रजेला अप्रिय व त्यांच्या धार्मिक समजुतींना धक्का देणारे असेच होते. तथापि मोठ्या संयमाने आणि कौशल्याने आवश्यक त्या आधुनिक गोष्टी त्यांनी लोकांना करावयास भाग पाडले.

1902 साली धर्म स्वातंत्र्य आणि हिंदू विधवा पुनर्विवाह यास उत्तेजन देणारे दोन कायदे पास करून महाराजांनी धर्म सुधारणेत क्रांतिकारक पाऊल टाकले.

ही पार्श्वभूमि लक्षात घेता श्री सयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध होणाऱ्या धर्मगुच्छातून काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

1) **दिघनिकाय** (मराठी भाषांतर) भाग पहिला - प्रो. चिंतामण वैजनाथ राजवाडे, (1918) ह्यांचा प्रस्तुत ग्रंथ धर्मगुच्छात 23वे पुष्प म्हणून प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तुत ग्रंथ पालीभाषेतील दीघनिकायचे भाषांतर आहे.

भगवान बुद्ध आणि त्यांचा बौद्ध धर्म याबद्दल श्रीमंत सयाजीराव महाराराजांना आस्था/आत्मियता होती. आपल्या अनेक भाषणात त्यांनी भगवान बुद्ध आणि त्यांच्या उपदेशाबद्दल चर्चा केली आहे.

बौद्धधर्माचा मूळ ग्रंथ म्हणजे त्रिपिटक (तिपिटिक) आहे. याचे सुत्तपिटक, विनयपिटक व अभिधम्मपिटक असे तीन भेद आसून त्यापैकी सुत्तपिटकात भगवान बुद्धाने वेळोवेळी केलेल्या उपदेशांचा संग्रह आहे. त्याचे पाच भाग आहेत, त्यापैकी दीघनिकाय हा एक भाग आहे. त्यात मोठ्या सूत्रांचा संग्रह आहे.

सदर ग्रंथात भाषांतरकाराने आपली भूमिका दोन पाने मांडली आहे व उपोद्घातमध्ये ग्रंथातील सूत्रे व त्यांचे विशेष दिलेले आहेत. अनुक्रमणिका दिलेली असून ग्रंथाची विभगणी 13 भागात केलेली आहे. प्रत्येक भागात विस्तृत तळटीपा दिलेल्या आहेत. 'आधुनिक चिकित्सक' पद्धतीस अनुसरुन तळटीपा

दिलेल्या आहेत. प्रत्येक सूत्रांतील विवरण वाचकांचे नीट लक्षात यावे म्हणून प्रत्येक भागास परिशिष्ट असून भाग 7 वगळता त्यात मुख्य मुख्य मुद्यांचा विचार मांडला आहे.

भाषांतरकर्त्याने वाचकांच्या सोयीकरिता भाषांतर शक्यतो शब्दशः करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पालीग्रंथाचे भाषांतर असल्यामुळे पाली शब्दास शक्य तेथे संस्कृत प्रतिशब्द दिले आहेत. महायान पंथाच्या संस्कृत ग्रंथातून अश्या शब्दांचा उपयोग केलेला असल्यामुळे ते शब्द तसेच ठेविले आहेत. विशिष्ट शब्द व विशेष नामे मात्र पाली भाषेतच ठेविली आहेत. अनेक ठिकाणी समुद्राख्यायिका, चवरी (वाष्ठविजनी), चित्रोपाहन (चित्रविचित्र पादत्राणे) पूर्वान्तकल्पिक, पूर्वान्तानुदृष्टिक अशी परिभाषा निर्मिती केलेली दिसते.

एकंदरीत या सूत्रात आपणास इसवीसनापूर्वीच्या पाचव्या व सहाव्या शतकातील उत्तर हिंदुस्थानातील लोकांच्या जीवनाचे चित्र पहावयास मिळते. यातील बहुतेक ऐतिहासिक दृष्ट्या सत्याचेच अविष्करण करणारी आहेत. नुसत्या धार्मिक गोष्टीच नव्हेत तर साध्या व्यवहारातील प्रसंगही त्यात वर्णिलेले आहेत. निरनिराळ्या धर्मपंथातील भांडणे, त्यांची वेगवेगळी मते, एकमेकांशी झालेले वादविवाद, सामान्य लोकांची मते, कामधंदे, देशाची राजकीय व सामाजिक स्थिति इ. गोष्टींचे यथायोग्य चित्र येथल्या इतके दुसऱ्या कोठेही दृष्टीस पडत नाही. इतके या सूत्रांचे ऐतिहासिक दृष्ट्या महत्व आहे.

बौद्धधर्माचे अध्ययन करणाऱ्यांस व विशेषतः पाली-भाषेच्या विद्यार्थ्यांस हे भाषांतर अतिशय उपयुक्त असे झाले आहे. मूळ पालीभाषेतील भगवान बुद्धांचे उपदेश मराठी वाचकांच्या पुढे फारसे आलेले नाहीत ते या ग्रंथाच्या योगाने वाचकांसमोर आले आहेत.

2) **दीघनिकाय भाग दुसरा** (1931)हा मूळ ग्रंथाचे भाग 2 व 3 एकत्र करून 'धर्मगुच्छात' अंक 196 म्हणून प्रसिद्ध केला आहे.

छपाईच्या सोयीसाठी हा एकच भाग असला तरी त्यात दीघनिकायचे दुसरा व तिसरा असे दोन भाग आहेत. प्रस्तावना लेखक चिं. वि. जोशी म्हणतात, "प्लेटोच्या संवादोप्रमाणे यातील संवादमय सूत्रे 'चमत्कृतीजनक' वाटतील व बुद्धाच्या खऱ्या तत्वज्ञानाची मराठी वाचकास ओळख पटेल" भाषांतराचा

उद्देश मराठी वाचकास ओळख टाकण्याचा नसून मूळ ग्रंथाची पक्की व बिनचूक ओळख मराठी वाचकास करून देण्याचा असतो... टिपा व परिशिष्टे इतकी विद्वत्त्वपूर्ण आहेत की, दीघनिकायाचे अध्ययन करणाऱ्यांनी पाश्चात्य इंग्रजी भाषांतरा ऐवजी हे मराठी भाषांतरच अभ्यासिले पाहिजे."

मूळ पाली भाषेतील शब्दांचे भाषांतर करताना दु:ख स्कंध, दौर्मनस्य, उपायास, आयतने, संजाति, अवक्रांति इ. शब्दांची घडण केलेली दिसते.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे ग्रंथनिर्मितीमागे भाषाभिवृद्धीचा अत्यंत महत्वाचा विचार असलेला दिसतो. "अशी अभ्यसकीय पुस्तके मराठीत झाली पाहिजेत की एखाद्या विषयाचे सांगोपांग अध्ययन करणाऱ्यास मराठीचे ज्ञान अनिवार्य वाटावे अशी आपल्या चुलत्याची कळकळीची इच्छा प्रस्तावना कै. राजवाड्यांनी (ग्रंथकर्त्याने) पूर्ण केली आहे." पृ-9.

या पुस्तकात एकंदर 34 प्रकरणे असून क्रमांक 34 वगळता सर्व प्रकरणांना परिशिष्टे आहेत. प्रकरण 19 ला 'देश व राज्ये' नावाचे परिशिष्ट असून सुत्तात अलेल्या देश व राज्ये यांचे स्पष्टीकरण त्यात दिलेले आहे. ते प्राचीन साहित्याच्या अभ्यासकांना महत्त्वपूर्ण ठरू शकेल असेच आहे. उदा. 'चेती'-(चेदी) बुंदेलखंडाचा दक्षिण प्रदेश व जबलपूर रेवाचा उत्तर प्रदेश.

बौद्धधर्मातील श्रेष्ठ तत्वे प्रतिपादन करणारा पाली भाषेतील हा श्रेष्ठ ग्रंथ, मुंबईतील प्रसिद्ध नागरिक व बुद्धधर्माचे आस्थेवाईक पुरस्कर्ते बुद्धसोसायटीचे अध्यक्ष डॉ. आनंदराव एल. नायर, मेसर्स एन्. पॉवेल कंपनीचे मालक, यांस प्रेमपूर्वक सादर करण्यात आला आहे. पुस्तकात दोन चित्रे (Photographs) आहेत. प्रथम पृष्ठावर श्री. सयाजीराव गायकवाडांचे असून पृ. 4 वर बुद्धधर्माचे पुरस्कर्ते श्री. डॉ. आनंदराव एल. नायर यांचा फोटो आहे.

भाषांतरकर्त्यांच्या शोचनीय अकाली निधनामुळे ग्रंथकर्ता स्वत: आपल्या श्रमांचे फळ पहाण्यास विद्यमान नाही म्हणून प्रस्तावनाकाराने खेद व्यक्त केला आहे.

या व्यतिरिक्त सदर साहित्यमालेतून धर्म: उद्गम आणि विकास, जगातील विद्यमान धर्म, जगातील

काही धर्मप्रवर्तक इ. धर्माशी संबंधीत पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत परंतु ती धर्म गुच्छात प्रसिद्ध झालेली नाहीत. अन्य गुच्छात प्रसिद्ध झाली आहेत.

## ऐ) प्रकीर्ण गुच्छ :

'श्री सयाजी साहित्यमाले'तून प्रसिद्ध झालेल्या प्रकीर्ण गुच्छातून एकंदर 12 पुस्तके मराठी भाषेत झाली आहेत त्यापैकी 5 पुस्तके अनुवादित आहेत आणि 7 पुस्तके स्वतंत्र आहे.

या गुच्छातून प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे आढळून येते की सदर गुच्छातून संस्कृतीशास्त्र, जवाबदार राज्यपद्धती कशी असावी ? त्याचप्रमाणे नागरिकांची कर्तव्ये, मुंबई इलाख्यातील जाती तसेच कादंबरीची गोष्ट, विविध वाङ्मयविषयक लेखांचा संग्रह, जातकातील गोष्टी आणि नाट्यवाङ्मयाचा (मराठी) इतिहास प्रसिद्ध झालेला आहे.

1) **सुधारणा आणि प्रगती** : अनुवादकर्ता - रा. रा. दाजी नागेश आपटे (1918), हे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 15 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक जे. बी. क्रोझियरकृत 'सिव्हिलायझेशन अँड प्रोग्रेस' या ग्रंथाचा अनुवाद आहे. सदर ग्रंथाचे चार भाग आहेत. प्रमाणचिकित्सा, साध्यमीमांसा, विषयविवेचन आणि उपसंहार ह्या चार परिच्छेदातून इतिहास, सुधारणेचा मार्ग, परिस्थितीचे समीकरण, समाजरचना, जनताधर्म, धर्मसाधन, राजकीय अनुशासन वगैरे विषयांचे उत्कृष्ट विवेचन या ग्रंथात केलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा संस्कृतीशास्त्रावरील अत्यंत महत्त्वाच्या असा ग्रंथ आहे. प्रस्तावनेतच भाषांतर कर्त्याने हे भाषांतर नसून रुपांतर आहे असे स्पष्ट म्हटले आहे. स्पष्ट म्हटले आहे. "भाषांतरात मूळचे भाषाप्रयोग, उदाहरणे, दृष्टांत, कल्पना, परिभाषा वगैरे बिलकूल उतरु शकत नाहीत व तसा प्रयत्न केल्यास तो अगदीच बोजड व उपहासास्पद होतो. मूळची विषयाची रुपरेषा व मांडणी कायम ठेऊन उपमा, दृष्टांत, उदाहरणे व प्रश्नांविषयी काही कल्पना या अनुवादात मी नवीन प्रवेशविल्या आहेत." तसेच इतक्या गहन व सर्वव्यापी विषयाचे काही निश्चित तत्वांच्या धोरणाने आकलन विवेचन करण्याचा प्रयत्न अजून मराठीत झाला नाही. या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथ महत्त्वाचा आहे. पुस्तकात सुरवातीस संक्षिप्त अनुक्रमणिका असून त्याचप्रमाणे विस्तृत अनुक्रमणिका ही दिलेली आहे. प्रत्येक

परिच्छेदातील (भाग या अर्थाने हा शब्द योजलेला दिसतो) एकंदर प्रकरणांचा, त्यातील मुद्यांचा संक्षिप्त परिचयही यात आलेला आहे.

इंग्रज ग्रंथकार 'बकल' (Buckle) याने, व्यक्तीच्या सुखमूलक हेतूच्या कृतीला सुधारणा अथवा संस्कृती म्हटले आहे. परंतु मनुष्य हा समाजशील प्राणी असल्याने सर्व व्यक्तींच्या अशा कृतींचा मेळ कसा घालावयाचा, सर्वांच्या कृतींचे एक सामान्यहितमूलक ऐक्य कसे ठरवावे व अनेक व्यक्ती मिळून झालेल्या त्या समाजाला अंतिम सुखस्थितीला पोहोचण्यासाठी त्याच्या कृतीचे धोरण कसे निश्चित करावे, हा प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या केलेल्या भिन्न भिन्न प्रयत्नांनाच 'संस्कृतीच्या उपपत्ती' म्हणतात व या प्रश्नांचा सशास्त्र अभ्यास म्हणजेच संस्कृतीशास्त्राचा अभ्यास होय.

प्रस्तुत ग्रंथ हा या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून त्याचे पुनर्मुद्रण होणे आवश्यक आहे. सदर ग्रंथात काही ठिकाणी 'परविकार्य' यासारखे पारिभाषिक शब्द घडविलेले आहेत.

ग्रंथ अत्यंत उपयोगी व लोकप्रिय झाला व त्याचे गुजराती व हिंदी या भाषांतून भाषांतर सुद्धा झाले आहे. हा ग्रंथ मुंबई विद्यापिठाच्या अभ्यासक्रमात लावला होता.

2) **शिस्त** : लेखक कर्नल नानासाहेब गणपतराव शिंदे आणि मेजर केशवराव नारायणराव सावंत (1918) यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 21वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या आज्ञेवरुन व त्यांच्याच प्रोत्साहनाने लष्करी पेशतील कर्नल शिंदे व मेजर सावंत यांनी सर्वांस व सर्व व्यवहारांमध्ये उपयोगी पडेल असे 'शिस्ती'च्या वर्णनाचे हे पुस्तक लिहिले. शिस्तीचे फार मोठे भोक्ते व एक आदर्श नमुना असलेल्या राजर्षी महाराजांच्या निकट सहवासामुळे व त्यांच्या आग्रहावरुन सदर विषयावर देशी भाषेत लेखक लिहू शकले.

या ग्रंथात एकंदर 7 प्रकरणांमध्ये शिस्तीची व्याख्या व लष्करीदृष्ट्या विवेचन, गृहशिक्षणामध्ये शिस्तीची आवश्यकता, शाळेतील शिक्षणामध्ये शिस्तीचे महत्त्व, खेळ व व्यवहार यांमध्ये शिस्तीची उपयुक्तता, वरिष्ट-कनिष्टांमधील शिस्त, नैतिक व धार्मिकरीत्या शिस्तीचे निरुपण, ऐतिहासिक दृष्ट्या शिस्तीबद्दल काही विचार असे सर्व अंगांची, सर्व क्षेत्रातील शिस्तीचा खोलवर विचार प्रथमतःच केलेला आहे व शेवटी उपसंहारामध्ये शिस्तीचा महिमा फार मोठा असून जगातील

कोणत्याही स्थितीत, व्यवसायात, व्यवहारात, उलाढालीत शिस्त नसेल तर कसे घोटाळे होतात हे सांगून ती जन्मापासूनच अंगी बाणवली तरच भाग्योदय होईल. आशा-आकांक्षा फलद्रूप होतील. ती नसल्यामुळे आजवर तिची हेळसांड झाल्यामुळे अनेक वाईट परिणाम भोगावे लागले तेव्हा आता तरी ती अंगी बाणवून चांगला नागरिक व समाजाचा एक सन्माननीय घटक बनण्यास सांगितले आहे. तरच व्यक्ति, कुटुंब, समाज व पर्यायाने राष्ट्र यांचा विकास होईल हा इशाराही दिला आहे. त्यासाठी महाभारताच्या युद्धाचे उदाहरणही दिले आहे. 'जेथे शिस्त तेथी विजयश्री' तेव्हा तिच्या शिवाय तरणोपाय नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. सदर ग्रंथ अत्यंत सोप्या, सरळ व सुबोध भाषेत लिहिला आहे.

3) **हिंदुस्थानचा लष्करी इतिहास आणि दोस्त राष्ट्रांच्या फौजा** (1921) : लेखक कर्नल नानासाहेब गणपतराव शिंदे, कॅव्हलरी ब्रिगेडीयर, बडोदा आर्मी यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 39वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

''सार्वभौम इंग्रज सरकारच्या सत्तेखाली व आश्रयाखाली हिंदुस्थानास स्वराज्य मिळण्याची सुचिन्हे क्षितिजावर दिसू लागली आहेत, अशावेळी हिंदुस्थानच्या लष्करी इतिहासाची प्रत्येकास माहिती असणे जरुर आहे. हिंदुस्थानच्या लष्करी पद्धतीमध्ये पूर्वी काय काय चुका झाल्या व हल्लीच्या नवीन मनुप्रमाणे त्यात काय काय सुधारणा करणे जरुर आहे याचीही सर्वांस अटकळ बांधता यावी म्हणून हा ग्रंथ लिहिण्यात आला आहे.'' असे प्रस्तावनेत लेखकाने म्हटले आहे.

सदर ग्रंथ लिहिताना लष्करी इतिहास व लष्करी ध्येय डोळ्यापुढे ठेवून मान्यवंत अशा इंग्रजी व मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या आधारावरच या ग्रंथाची रचना केली आहे.

सदर ग्रंथाच्या अनुक्रमणिकेत एकंदर 16 प्रकरणात विषयाची मांडणी केली आहे. त्यात अनुक्रमे 1) वैदिक काळ, 2) भारतीय युद्ध, 3) बौद्ध व पौराणिक काळ, 4) हिंदु व रजपूत राजे व शीख ह्यांचा काळ, 5) मोगल बादशहाशिवाय इतर मुसलमान राजांचा काळ, 6) मोगल रियासतीचा काळ, 7) श्री छ. शिवाजी महाराजांचा काळ, 8) पेशवाईच्या अमदानीचा काळ, 9) देशी संस्थानांची फौज, 10) इंग्रज सरकारची हिंदी फौज, 11) ग्रेटब्रिटनची फौज, 12) फ्रेंच फौज, 13) रशियन

फौज, 14) इटलीची फौज, 15) अमेरिकन फौज, 16) जर्मन फौज इ..... असून 17वे प्रकरण उपसंहाराचे आहे.

अकरा प्रकरणात हिंदुस्थानचा लष्करी इतिहास देऊन, महायुद्धात (1921च्या सुमारास पूर्ण झालेल्या) दोस्त राष्ट्रांनी व जर्मनीने जे पराक्रम गाजविले, त्यांच्या फौजांची थोडी तरी माहिती मराठी वाचकांस मिळावी म्हणून सदर ग्रंथात दिली आहे. हिंदुस्थानच्या लष्करी इतिहासाबरोबर तुलना करण्यासाठी ह्या माहितीचा उपयोग होऊ शकतो.

सदर ग्रंथात अनुक्रमणिकेनंतर आधारभूत घेतलेल्या ग्रंथांची यादी दिली आहे.

युरोपमधील राष्ट्रांच्या लष्करी इतिहासावर स्वतंत्र ग्रंथ आहेत, त्या नमुन्यावर हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

4) **जबाबदार राज्य-पद्धती :-** ले. महादेव रामचंद्र भिडे (इ.स. 1921) यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात पुष्प 73 वे म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर पुस्तकाची प्रस्तावना श्री. महादेव सखाराम मोडक यांनी लिहिली आहे. लेखकाच्या आकस्मिक मृत्यु मुळे ते प्रस्तावना लिहू शकले नाहीत.

प्रस्तुत ग्रंथ काही एक हेतूने, प्रयोजनाने लिहिला आहे. "लोकशाहीच्या काळात कोणत्याही देशाची राज्यघटना लोकतंत्रानुसारच रचावी लागणार. हिंदुस्थान देशही या नियमास अपवाद होऊ शकणार नाही व वरील प्रमाणे राज्यपद्धती अमलात आणण्यास, पाश्चिमात्य देशात चालू असलेल्या जवाबदार राज्यपद्धतीची मूलतत्त्वे आपणास शिकावी लागणारच !" ही ह्या पुस्तकाची उपयुक्तता प्रस्तावना लेखकाने सांगितली असून 19 व्या शतकात लोकशाही प्रक्रियेच्या शिक्षणाचा विचार त्यात दिसून येतो.

एकंदर 9 विभागात पुस्तक विभागले असून त्यात 1. लोकशाही आणि मतदार, 2. निवडणूक, 3. प्रतिनिधि, 4. पक्षभेद, 5. प्रतिनिधिसभा, 6. कायदा सभा व अंमलबजावणी, 7. कायदा व न्याय, 8. एकावयवी राज्यघटना व संयुक्त राज्यघटना, 9. हिंदुस्थान इ. विषय आहेत.

सदर पुस्तकात अतिशय सोप्या पद्धतीने राज्य-पद्धतिचे विवेचन केले आहे. हा स्वतंत्र ग्रंथ असून लोक आणि लोकमत, प्रतिनिधि आणि प्रतिनिधि सभा, कायदे घडणारी मंडळी, हुकुमांची अंमल बजावणी, राज्य बंधारण, वगैरे विषयांच्या संबंधाने उपयुक्त माहिती दिली आहे.

भाषा विशेष - **'राज्य बंधारण'** हा शब्द.

5) **इंग्रजी शिष्टाचार :-** रा.रा.चिं.वि. जोशी (1923) यांचा हा ग्रंथ वेबकृत इंग्रजी पुस्तकाच्या आधारे तयार केला आहे. प्रस्तुत पुस्तक डब्ल्यू. टी. बेब यांच्या - English Etiquette for Indian Gentelmen यावर आधारलेले आहे. प्रकीर्ण गुच्छात पुष्प 79 वे म्हणून प्रसिद्ध आहे.

'शिष्टाचार' या शब्दाचा अर्थ 'शिष्ट' (शिष्-वेगळे असणे) अथवा समाजात दर्जा तरी वरचा आहे अशा लोकांनी परस्परांशी व्यवहार करताना पाळण्याच्या रीतीभाती असा आहे. समाज सुसंघटित झाल्याशिवाय त्यात शिष्टाचार उत्पन्न होत नाही, व तो जसजसा सुधारत जातो तसतशी शिष्टाचाराची बंधने अधिकाधिक दृढ होत जातात. या चालीरीतींचा उगम दुसऱ्याच्या मनास दुःख न होईल अशा तऱ्हेने वागण्यात व नम्रतेत आहे. शिष्टाचार कमी असला तर इतरांस अपमान सोसावा लागतो किंवा संकोच होतो. पुष्कळ लोक वरिष्ठांशी तेवढे शिष्टाचार पाळतात परंतु नोकर व कनिष्ठ दर्जाच्या लोकांशी तुसडेपणाने वागतात.

प्रस्तुत पुस्तकात एकंदर 11 विषयांची चर्चा केलेली आहे. यात शिष्टाचाराचे सामान्य नियम-भेट घेणे, व्हिझिटिंग कार्डे, उपवन संमेलन, भोजन समारंभ, वाटेत भेटण्याच्या प्रसंगाचे शिष्टाचार, दरबार, विवाह समारंभ, प्रवास, सार्वजनिक ठिकाणे, गृहशोभा, सेवकांचा शिष्टाचार, त्यांचे काम इतक्या विषयांचे विवेचन केले आहे.

प्रस्तावनेत शिष्टाचार पाळण्याची कारणे, त्याचे स्वरुप वेगवेगळ्या समाजातील वेगवेगळ्या शिष्टाचारांची उदाहरणे, दिलेली आहेत. ''नम्रता हा शिष्टाचाराचा पाया आहे, व अपवाद वर्ज्य करुन सर्व देशातील सभ्य चाली आपल्याकडे कमीपणा घेऊन दुसऱ्यास मोठेपणा देतात. असे असताही दोन भिन्न संस्कृतीचे समाज काळाच्या इच्छेनुरुप एकत्र आले असता, एकमेकांच्या चालीरीतीस,

समजुतीस, रुढींस व आचारास गैरसमजुतीने असंस्कृत, ग्राम्य, रानवट अशी नावे देऊ लागतात..... आज पूर्व व पश्चिम यांचा तसा संबंध आला आहे, म्हणून या दोनही समाजांनी परस्परांशी वागताना एकमेकांच्या चालीरीती समजाऊन घेऊन वागले पाहिजे.'' म्हणजे वारंवार येणारे रागाचे, गैरसमजाचे व प्रसंगी शरमेचे प्रसंगही टाळता येतील.

अशा तऱ्हेचे प्रसंग टळावे म्हणून इंग्रजी तऱ्हेच्या समाजात वागण्याची ज्यावर पाळी येते त्यांच्या उपयोगासाठी हे पुस्तक तयार केले आहे. त्याचबरोबर पाश्चात्य व पौर्वात्य समाजिक चालीरीतीत ठळक दिसून येणारे भेद कोणते आहेत याचे दिग्दर्शन प्रस्तावनेतच केले आहे. उदा. 'स्त्रीदाक्षिण्य हा मोठा गुण आपण पाश्चात्यांकडून घेतला पाहिजे. आपल्यात स्त्रियांस अर्धवट नोकरांप्रमाणे वागवितो'.....इ. पृष्ठ 8 वरील विचार हे शिष्टाचाराच्या निमित्ताने सामाजिक सुधारणा विषयक विचार दर्शविणारे आहेत.

शिष्टाचाराच्या संदर्भात हिंदी माणसांनी युरोपियनांना त्रास होऊ नये असे वागण्याचे नियम आहेत. मूळ पुस्तक हे इंग्रजी गृहस्थाने लिहिले असल्यामुळे असे नियम सांगितले जातात. उदा. ''युरोपियन प्रवासी व त्यातल्या त्यात स्त्रिया तुमच्याच डब्यात असतील तर उघडे होऊन बसू नका, ''धोतर नेसले असल्यास ते शक्य तितके करुन खाली पायापर्यंत पोहोचवावे व मांड्या उघड्या टाकू नयेत.''.....(pa. 79)

शब्दकोशात अगदी साध्या, नित्योपयोगी इंग्रजी शब्दांना पर्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. अभिवादन - bow, नृत्यसमारंभ - ball dance, पाहुणा - caller, guest, visitor, शागीर्द - waiter, लेव्ही - levee, सायंकाळची मेजंवानी - dinner party.

Levee लेव्ही म्हणजे राजा किंवा तत्समान मोठ्या पदांवर असणाऱ्या राजपुरुषाची त्याच्या घरी जाऊन ओझरती भेट घेणे. ''देशी राजांच्या अधिपतिंच्या लेव्ही चे नियम प्रत्येक राज्याचे वेगळे असतात. बडोदे राज्यात लेव्हीस नावाची कार्डे घेऊन जावे लागत नाही''(pa. 70)........ इ......

प्रस्तुत पुस्तक हे हिंदुस्तानात ज्या हिंदी लोकांना युरोपियन लोकांमध्ये वागावे लागते, त्यांच्या उपयोगाकरिता आहे. भाषा अतिशय साधी, सोपी, सुबोध आहे.

6. **नागरिकांची कर्तव्ये** (1923) :- भाषांतरकार - रा. रा. कृष्णाजी गंगाधर गोगटे, यांचे पुस्तक प्रकीर्णगुच्छात 86 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक गुजराती 'नागरिकना धर्म' या पुस्तकाचे भाषांतर आहे.

कित्येक वेळा उच्च मनोवृत्तीचे काही लोक अंगी परोपकार, कर्तव्यदक्षता असूनही कर्तव्यक्षेत्र व कर्तव्य दिशा यांचे यथायोग्य ज्ञान नसल्याने समाजात मागासलेले राहतात व त्यांचे हसे होते. अशा गुणी लोकांना स्वकर्तव्य उत्तम बजवण्याच्या मार्गांचे ज्ञान करुन देण्याच्या उद्देशाने प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या आठ प्रकरणांमध्ये अनुक्रमे कुटुंब, शाळा, समाज, राज्य, ब्रिटिश राज्य, बडोदा राज्यातील स्थानिक स्वराज्य, ग्राम पंचायत, तालुका पंचायत व प्रांत पंचायत असे निरनिराळे विभाग करुन त्या प्रत्येका संबंधीच्या आपल्या कर्तव्यांविषयी सविस्तर विवेचन केले आहे. मानवी कर्तव्याच्या अनुक्रमात कुटुंबाच्या पालन पोषणास अग्रस्थान दिलेले आहे. कुटुंबासंबंधीचे व स्वतः संबंधीची कर्तव्ये यांनाही त्यामुळे महत्त्वाचे स्थान आहे. त्यानंतर शाळेमध्ये सहाध्यायी, शिक्षक व इतरांशी विद्यार्थ्याने कसे वागावे, समाजाचा एक घटक म्हणून समाजातीलच इतर घटकांशी वागताना त्याचे कर्तव्य कोणते, राज्यव्यवस्थेवरच समाजाच्या इतर व्यवस्था अवलंबून असतात व त्या प्रसंगी पार पाडावयाची नागरिकांची व सरकारची कर्तव्ये कोणती त्यांचे परस्पर संबंध यांचे दिग्दर्शन केलेले आहे. बडोदे राज्याच्या कृपाछत्राखाली जेथे आपण सुव्यवस्थित राज्यपद्धतीमुळे अनेक प्रकारच्या सुधारणा व सुखे क्षणोक्षणी अनुभवतो आहोत त्या राज्य घटनेसंबंधाने व राज्य पद्धतीसंबंधी मौलिक माहिती सदर पुस्तकात दिली आहे.

आपण हिंदुस्थाचे नागरिक असल्याने येथील प्रजेचे व्यवहार, हिंदुस्थानावर ज्या ब्रिटिशांनी राज्य केले त्यांची राज्यकारभाराची पद्धत यांचेही विवेचन करुन बडोदे राज्यातील स्थानिक स्वराज्य ही संस्था व तिची कार्यपद्धती कशी होती याची सोप्या भाषेत माहिती दिली आहे.

उपसंहारात शिक्षणविषयक योजनांचा एक हेतू म्हणजे नागरिकत्त्वाला अवश्य असे जे सद्‌गुण त्यांचा विकास करणे या मुद्यांवर भर दिला आहे. कारण त्या सद्‌गुणांचा विकास झाला तरच ती पुढील आयुष्यात आपली कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडून आत्मविकास व राष्ट्रविकास साधू शकतील. समाजहित हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून अखिल हिंदुस्थान देशाचे वैभव वाढवू शकतील हे अतिशय सुबोधपणे मांडले आहे.

7. **बडोद्याचे मराठी साहित्य** :- रा. रा. गणेश रंगनाथ दंडवते (इ.स. 1925) यांचे हे स्वतंत्र पुस्तक असून प्रकीर्ण गुच्छात 94 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

'सहविचार' त्रैमासिकाच्या ऑगस्ट 1923 च्या अंकात ग्वाल्हेरचे श्रीयुत भास्कर रामचंद्र भालेराव यांनी काढलेला 'उत्तर हिंदुस्थानातील मराठी साहित्य व साहित्यभक्त' यांचा उत्कृष्ट आढावा अवलोकन केल्यावर मराठी साहित्याचा अशा तऱ्हेचा खास बडोद्यापुरता आढावा काढण्याचे मनात येऊन प्रस्तुत लेखकाने त्या दिशेने केलेला प्रयत्न म्हणजेच 'बडोद्याचे मराठी साहित्य' हा प्रस्तावनेतच उल्लेख आहे. बडोद्यावर महाराठ्यांची छाप कधी पडली इथपासून सुरुवात करुन गायकवाडांच्या आगमनापर्यंतचा इतिहास सांगताना, 'बडोद्याचे राज्यकर्ते' व 'श्री थोरले सयाजीराव महाराज यांचे चरित्र' या दोन ग्रंथांचा आधार घेतला आहे. येथील वाङ्मय निष्पत्तीस कोणत्या कालविभागात आरंभ झाला असावा याचे उत्तर देताना लेखकाने म्हटले आहे की, ''खास गुजराथकाठेवाडचे - मराठ्यांचा या देशाशी परिचय होण्यापूर्वीचे असे प्राचीन मराठी वाङ्मय नाहीच असे म्हटले असता चालेल. आणि असेल तरी ते काळाच्या उदरात गडप झाले असले पाहिजे. त्यामुळे आमची सारी भिस्त बडोद्यात झालेल्या अर्वाचीन मराठी वाङ्मय निष्पत्तीवरच आहे आणि ही वाङ्मय निष्पत्ती फार तर पाऊणशे वर्षापलीकडे फारशी जात नाही. इतकेच नव्हे तर येथील खऱ्या वाङ्मय निष्पत्तीच्या वाट्यास अवघी तीसच वर्षे आली आहेत.'' ही वस्तुस्थिती सांगितली आहे.

कोणत्याही वाङ्मयाची सुरुवात पद्यापासून होते या तत्त्वाप्रमाणे बडोद्याचे मराठी साहित्य विनायक महादेव नातू, अनंतसुत विठ्ठल व ललितानंद या तीन कवींपासून सुरु झाले. ललितानंदचे ''सौंदर्यलहरी'' हे काव्य ''महाराष्ट्र काव्य ग्रंथमाला'' मध्ये प्रसिद्ध झाले.

भाट व चारण हे वाङ्मयाचे आद्यप्रणेते असतात असे मानून फत्तेसिंह गायकवाड यांचा पोवाडा, वटपुरीवर्णन (बडोदावर्णन) यांच्यातील काही भाग उद्‌घृत केला आहे. होनाजी बाळ व सगनभाऊ यांनी बडोद्यातील वास्तव्यावर केलेल्या लावण्याही दिल्या आहेत.

इ.स. 1875 पासूनचा पुढील काळ बडोदे राज्याच्या पूर्ण भरभराटीचा काल समजला जातो. कारण याच वर्षी श्रीमंत सयाजी महाराजांचे दत्तक विधान होऊन ह्यानंतर वाङ्मयाची भरभराट झालेली दिसते. त्याच वर्षी गोविंद बाबाजी जोशी यांनी श्रीमंत मल्हारराव महाराजांवर कर्नल फेअर याला विषप्रयोग केल्याचे संबंधाने जे कमीशन नेमले होते, त्या कमीशनच्या हकीकतीची माहिती देण्यासाठी एक खाजगी बातमीपत्र काढले पण ते चारच दिवस चालले, तरी हे पहिले वर्तमानपत्र दैनिक पत्र होते, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. यानंतर सन 1884 साली 'बडोदा वत्सल' हे निमसरकारी व मराठी गुजराती वृत्तपत्र बराच काळ चालले. जागृति, सयाजीविजय ही प्रतिष्ठित व 35 वर्षेपर्यंत चालणारी वत्तपत्रे 1894-95 मध्ये निघाली.

सन् 1886 मध्ये राज्यसूत्रे हाती घेताना आपल्या प्रजेस दिलेल्या सनदेतील दुसऱ्या कलमात, ''आमची प्रजा सुखी रहावी व दिवसेदिवस तिच्या कल्याणाची वृद्धि व्हावी अशी अंतःकरणापासून इच्छा आहे'' तसेच ''साहित्याभिवृद्धीसाठी राजकीय प्रयत्न'' करण्याचे आश्वासन देऊन राष्ट्रकथामाला, महाराष्ट्र ग्रंथमाला, विविध विषय ग्रंथमाला, क्रीडामाला, सयाजी साहित्यमाला व सयाजी ज्ञानमंजूषा इ. मराठी भाषेतील माला सुरु करुन ते आश्वासन पाळले व अनेक ग्रंथ लिहवून घेतले. या मालांबद्दल 'विविध ज्ञानविस्तार' मधील अभिप्रायाची नोंद केली आहे.

1890 मध्ये 'सहविचारिणी' सभा स्थापन झाली. 1897 मध्ये 'ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळी' स्थापन झाली व दोघांनी ग्रंथ प्रसिद्ध केले. सहविचारिणी सभा पत्रिकेचे नंतर (साधारण 1921 पासून) 'सहविचार' या त्रैमासिकात रुपांतर झाले.

वैयक्तिक प्रयत्नांमध्ये गाजलेले म्हणजे चंद्रशेखर, गो. स. सरदेसाई, दा. ना. आपटे, मंगश कमलाकर नाडकर्णी, काशीबाई हेर्लेकर इ. नावे आहेत.

बडोदे येथील साहित्य संवर्धनात ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बुहमोल मदत केली आहे त्यांची माहिती देऊन सर्वात शेवटी परिशिष्ट 2 मध्ये लेखकाने बडोद्यातून प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची विषयवार सूची देऊन त्यात धर्म, नीती, समाजशास्त्र, गद्य, काव्य, नाटके, भूगोल इ. नावे आहेत. परिशिष्ट 1 मध्ये या सर्व विषयांच्या ग्रंथांची सूची विषयवार केलेली आहे.

8. **कादंबरीची गोष्ट :-** लेखक व प्रकाशक - गणेश रंगनाथ दंडवते (इ.स. 1927) यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 120 पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

'उपोद्घात' मध्ये प्रस्तुत लेखकाने आपले विचार मांडले आहेत. बडोदे येथील सेंट्रल लायब्ररीतील नोकरी व मराठी वाङ्मयाचा 'अल्प' व्यासंग यांच्या संयोगानेच हे लेखन केले आहे असे त्यांनी नमूद केले आहे. सदर पुस्तकाला दाजी नागेश आपटे यांची प्रस्तावना लाभली आहे. मराठी गद्य वाङ्मयाचा खरा प्रारंभ इंग्रजीशाहीनंतरचाच आहे. तत्पूर्वी बखरी व पत्रे अशा स्वरुपातच गद्य होते असे त्यांनी म्हटले आहे. कादंबरी कशी असावी तिच्या कथावस्तूचा परिपोष कसा असावा, संविधानकाची जुळणी कशी असावी, तिच्यातील पात्रांचे स्वभाव कसे सांगावे वगैरे बद्दलच्या तत्त्वांची चर्चा करुन त्या शास्त्रीय दृष्टीने मराठी कादंबऱ्यांची वाढ कसकशी होत गेली व दरेक प्रमुख कादंबरीकाराचे वैशिष्ट्य काय आहे हे थोडक्यात सांगून मुख्य कादंबऱ्यांचे विषयदिग्दर्शन करविणे इतकाच त्यांचा हेतू आहे असे मत दिले आहे.

प्रस्तुत पुस्तकात 11 प्रकरणे असून त्यात. 1. विषय प्रवेश, 2. प्रतिष्ठान ते पुणे, 3. कथावाङ्मयाचा अभ्युदय, 4. गोष्टीची कांदबरी, 5. एक पाऊल पुढे, 6, मनोज्ञ मन्वंतराचा पाया, 7. पायाचे दृढीकरण, 8, नंतरची मशागत, 9. स्त्री आणि बालवाङ्मय, 10. काही लोकप्रिय कादंबऱ्या व त्यांची कथानके, 11. उपसंहार इ. प्रकरणात ग्रंथाचा विषय विभागला आहे.

विषय प्रवेशात कथाश्रवण हे मनोरंजनाचे साधन होते असे सांगून त्यातूनच कादंबरी वाङ्मयाची निर्मिती झाली असे सूत्र सांगितले आहे. भारतीय वाङ्मयातील कथावाङ्मयाला बौद्ध व जैन धर्मियांनी हातभार लावून महत्त्वाचे स्थान मिळवून दिले अशी नोंद केली आहे. भारतीय महाकाव्ये किंवा

नाट्य यापेक्षा कथावाङ्मयाचे वेगळेपण म्हणजे त्यात 'एकस्वरुपी पात्रे' नाहीत. महाकाव्यात जसे सुंदर राजकन्या व धीरोदात्त राजे असतात, तसे भारतीय कथावाङ्मयात नाहीत. त्यात शेतकरी, कारागीर, व्यापारी, जुगारी, जादूगार, ठक, तसेच आत्मज्ञानी ब्राह्मण, ढोंगी, बैरागी, वैश्या आणि वारांगना इ. समाजातील इतर दर्जाचे लोक आढळतात. कोणत्याही भारतीय काव्याच्या शाखेने बाह्यवाङ्मयावर याच्याइतका परिणाम केला नाही किंवा दुसरी कोणतीही शाखा जागतिक वाङ्मयाला याच्या इतकी महत्वाची वाटली नाही असे मौलिक निरीक्षण लेखकाने नोंदविलेले आहे. याचा विचार करताना महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग 10 पृ. 265 चा संदर्भ दिला आहे.

मराठी कथावाङ्मयातील पंचतंत्र (भाषांतरित) हा पहिला ग्रंथ आहे कारण गद्यग्रंथांमध्ये 13 व्या शतकाच्या आरंभीचा हा ग्रंथ आहे अशी नोंद केली आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, बापूसाहेब छत्रे, यांच्या लेखनानंतर कथावाङ्मयाला सुरुवात झाली. 'जागती ज्योत' ही रा. अ. तुगल यांची गोष्ट 1838 मध्ये प्रसिद्ध झाली. म्हणून ती कथावाङ्मयात पहिली समजली आहे. सन 1856च्या सुमारास रे. बाब पदमनजी यांची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी, 'गोष्टीची कादंबरी' झाली व तीच पहिली कादंबरी आहे असे म्हटले आहे. काही कादंबऱ्यांमधील भाग मराठीभाषेचा तत्कालीन नमुना म्हणून दिलेला आहे.

1885 नंतर महाराष्ट्राला लोकस्थिती व देशस्थिती विषयी जाग येऊन, अंधश्रद्धांचा त्याग करुन 'मनोज्ञ' मन्वंतराचा पाया घातला गेला असे निरिक्षण नोंदवले आहे. हरि नारायण आपटे यांनी करमणूक या पत्राची निर्मिती करताना 'आपल्या हातून नियमित लेखन व्यवसाय व्हावा' ह्या हेतूने त्यांनी करमणूकपत्र सुरु केले. त्यातून त्यांचे कादंबरी लेखन झाले. या पायाचे दृढीकरण बडोदे शहरातील लेखकांनी केले असून 25 पुस्तकांची नावे दिली आहेत. उदा. धनुर्धारी यांची 'वाईकर भटजी', मांडेकृत 'माधवी कंकण', शंकर विष्णु पुराणिक कृत 'देवी सत्यभामा', शिवराम गोविंद फाळके कृत 'दुर्गेशनंदिनी'..... याप्रमाणे पुढे स्त्रियांच्या वाङ्मयाची नोंद केली आहे. दहाव्या प्रकरणामध्ये कादंबऱ्यांची नावे व कथानके दिली आहेत.

उपसंहारामध्ये इंग्रजी, हिंदी, बंगाली, गुजराथी इ. भाषांमधून भाषांतरे (मराठीमध्ये) होत असल्याची माहिती देऊन त्यामुळे मराठी भाषेला समृद्धी येते असे म्हटले आहे.

कादंबरीची गोष्ट प्रसिद्ध करुन रा. दंडवते यांनी मराठी भाषेत एका उपयुक्त ग्रंथाची भर टाकली आहे. कालानुक्रमाने गोष्टी, कथानके, कादंबऱ्या कशा लिहिल्या गेल्या त्या दर्शवून व एका स्वतंत्र प्रकरणात मराठीतील प्रमुख कादंबऱ्याच्या संविधानकांचा सारांश देऊन त्यांनी कथावाङ्मयाचा एक चित्रफलकच वाचकांपुढे उभा केला आहे. असा रा. दा. ना. आपटे यांचा अभिप्राय योग्यच आहे.

9. **मुंबई इलाख्यातील जाती :-** लेखक व प्रकाशक गोविंद मंगेश कालेलकर (इ.स. 1928) यांचे पुस्तक प्रकीर्णगुच्छात 138वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक मे. आर. इ. एन्थोवेन, ई.आय.सी.एस. यांच्या "Tribes and Castes of Bombay" या ग्रंथाच्या आधारे तयार करण्यात आले आहे. एन्थोवेन साहेब हे मुंबई इलाख्याच्या लौकिक पाहणी खात्याचे (Eothnographical Survey) सुपरिटेंडेंट होते व प्रस्तुत लेखक त्यांचा आसिस्टंट. मूळ इंग्रजी ग्रंथांतील बहुतेक जातींची वर्णने, गोळा केलेल्या माहितीवरुन प्रस्तुत लेखकानेच तयार केली होती. हे काम करीत असतानाच, ह्या विषयावर मराठीत एक विस्तृतग्रंथ लिहावा असे मनात आले. एवढ्या विस्तृत ग्रंथास मराठीत ग्राहक मिळणार नाहीत, ''आपण जर तो ग्रंथ साररुपाने मराठीत तयार केल्यास, तो श्री सयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करु'' असे विद्याधिकारी, बडोदे यांनी सांगितल्यावरुन हा ग्रंथ तयार करण्यात आला आहे.

सदर पुस्तकात मुंबई इलाख्यात आढळणाऱ्या सर्व जातींची माहिती त्रोटक रुपाने दिली आहे. वरील पुस्तकात उपलब्ध झालेल्या नवीन माहितीची भर घालून हे पुस्तक सिद्ध केले आहे. वर्णन केलेल्या सर्व जाती एकाच खानेसुमारीच्या वेळी गणल्या गेलेल्या नाहीत. त्यांची गणना दोन तीन खानेसुमारीत मिळून झालेली आहे.

'उपोद्धात' मध्ये जातींच्या उत्पत्तीच्या 6 कारणांची चर्चा केलेली असून ती चातुर्वर्ण्य संस्था, प्रादेशिक भेद, धंध्यामुळे झालेले भेद, भाषेमुळे झालेले भेद, राजसत्ता भिन्नत्वामुळे झालेले भेद, धर्मपंथामुळे झालेले भेद या प्रकारात केली आहे. तसेच अस्पृश्यजाती, पोटभेद, गोत्रे, कुळे, बळी व देवके,

विवाह, सोडचिठ्ठी, धर्म, आहार, जातिभेदाची अनिष्टता, जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न इ. अंगाने विचार केला आहे. सुरुवातीसच जातींच्या नावाची सूची (308) दिलेली असून सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासासाठी ती अत्यंत महत्वाची आहे. ती 'आकार विल्हे'नुसार असून पुढील जातीवर्णनाचा क्रमही याच पद्धतीचा आहे.

जातींना असलेली इतर नावे, वेगवेगळ्या प्रदेशात त्यांचे वेगवेगळे नाव, जातींनी व्यापलेला प्रदेश प्रस्तुत पुस्तकात दिला आहे.

अनेक जातींच्या उत्पत्तीच्या आख्यायिका दिल्या आहेत. उदा. चित्पावन जाती संबंधातील चर्चा.

प्रत्येक जातीतील विवाह, मृत्यू, संपत्ती, देवधर्मकुळाचार, आहार, याजविषयक चर्चा प्रस्तुत पुस्तकात केली आहे.

प्रस्तुत पुस्तकात महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या पोटजातीसंबंधीची माहिती श्री महादेव शास्त्री दिवेकर यांच्या 'ब्राह्मणातील पोटजातीचे एकीकरण' ह्या पुस्तकातून घेतली आहे.

जातिभेद नष्ट करण्यासंबंधातील महत्त्वाचा विचार सदर पुस्तकात दिसून येतो.

''कोणतीही सामाजिक अनिष्ट चाल अथवा संस्था जर मोडावयाची असेल, तर ज्या क्रमाने ती अस्तित्वात आली त्याच्या उलटक्रमाने हळू हळू ती मोडीत गेले पाहिजे. या दृष्टीने पाहिल्यास, जातिभेद नष्ट करावाचा असेल तर जातिभेद कसा उत्पन्न झाला त्याचे सूक्ष्म निरीक्षण करणे आवश्यक आहे असे दिसून येईल.''

ह्या पुस्तकास 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' व ग्वाल्हेर दरबार येथील शाळा खात्यांनी दुय्यम प्रतीच्या शाळांतील लायब्ऱ्यांकरिता हे पुस्तक मंजूर केले आहे. (pa. 10)

सदर पुस्तक समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त माहितीने भरलेले असून जातींच्या संबंधाने सर्व माहिती त्यांच्यातून मिळू शकते.

10. **इंद्रधनुष्य** (विविध लेख संग्रह) - दाजी नागेश आपटे, (इ.स. 1929) यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 160वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा काव्य, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राज्यशासन, इतिहास, फलज्योतिष, शिल्पशास्त्र इ. विषयांवरील प्रदीर्घ व सखोल विचारांच्या लेखांचा संग्रह आहे. यातील अनुक्रमणिकेत असलेल्या लेखांची नावे जरी पाहिली तरी ग्रंथकर्त्याच्या ज्ञानकक्षेची कल्पना वाचकास सहज येते. या संग्रहातील लेख पूर्वी निरनिराळ्या नियकालिकांतून व वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत.

या पुस्तकात रा. आपटे यांच्या दहा लेखांचा संग्रह आहे. यात अनुक्रमे 1. उपमा कालिदासस्य, 2. आत्मसंशोधनाचे अर्वाचीन प्रयत्न, 3. श्रीमद्भागवताचा काल, 4. फलज्योतिष, 5. सप्तांगनीति अथवा प्राचीन राज्यशासन, 6. आनंदगीत-समीक्षण, 7. भारतीय तत्त्वज्ञानात सांख्यशास्त्राची भर, 8. शिवछत्रपतींचा जन्मकाल, 9. समाजशास्त्र, 10. प्राचीन भारतीय शिल्पकलेची रुपरेषा इ. विषय आहेत.

निवेदनात लेखकाने म्हटले आहे की, ''कोणत्याही मनुष्याच्या संपादित ज्ञानसंचयावर विचारतेजाचे परावर्तन होण्याने त्याचे ज्ञान भिन्न भिन्न विषयांच्या रुपाने स्पष्ट होते व त्याचे वर्गीकरणहि अनेकविध होते.'' हा लेखकाचा विचार आंतरशाखीय ज्ञानात्मक आदान प्रदानाच्या दृष्टिने मौलिक स्वरुपाचा आहे. प्रस्तुत पुस्तकातील लेख या दृष्टिने अभ्यसनीय आहेत.

रा. रा. दा. ना. आपटे यांच्या विचारात स्पष्टता आहे आणि लिहिण्याच सुबोधता आहे. या पुस्तकासंबंधी श्री. ना. गो. चापेकर म्हणतात, ''रा. आपटे हे जबरदस्त व्यासंगी असून त्यांची बुद्धि अष्टपैलू आहे. अनेक विषयात अवगाहन करून तळाची माती त्यास वर आणता येते. असले ग्रंथ म्हणजे छोटेसे ज्ञानकोशच होत. ज्ञानाची जबरदस्त हौस असल्याशिवाय इतक्या विषयांचे अध्ययन कोणी करणार नाही.'' [42]

'आत्मसंशोधनाचे अर्वाचीन प्रयत्न' हा लेख म्हणजे आज ज्याला 'मरणोत्तर स्थिती विज्ञान' (Escotology) म्हणतात त्या विषयावरील आद्य लेख म्हणता येईल असा आहे.

'आनंदगीत समीक्षण' मधील विधाने चिंतन करण्याजोगी असून अभ्यासकांना महत्वाची ठरतील अशी आहेत.

(अ) व्यक्तीप्रमाणेच राष्ट्रालाही प्रसंगविशेषाने काव्यावस्था येत आसते. - (Pa. 221)

(ब) टेकाडे यांना इंग्रजी येत नसल्याने 'शुद्ध स्थितीतील' मराठी कविता मात्र त्यामुळे उपलब्ध झाली आहे. हे निश्चित ! इंग्रजी मराठी मिश्रित धेडगुजरी शब्द व कल्पना त्यात मुळीच आलेल्या नाहीत. भाषा संशोधकांना, इंग्रजीमुळे मराठीवर सांप्रतच्या काळात किती परिणाम झाला आहे; हे अजमावण्याला इंग्रजी वळणच्या कवितेशी तुलना करण्यास, टेकाड्यांची कविता हे एक चांगले साधन आहे.- (Pa. 245)

प्रस्तुत ग्रंथातून प्रबोधनकाळातील व्यक्तित्त्वाचे, त्यामागे असणाऱ्या विविध ज्ञानशाखेतील प्रेरणेचे आपणांस दर्शन होते.

11. **जातकांतील निवडक गोष्टी** (प्रथमार्ध) - भाषांतरकार व प्रकाशक - चिंतामण विनायक जोशी (इ.स. 1930) यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 186वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ पालीभाषेतील प्रसिद्ध जातक कथातील निवडक गोष्टींचे भाषांतर आहे.

प्रस्तावने मध्ये पुनर्जन्म, जातक, जातकाचा काळ, त्यातील कथांचा काळ, पंचतंत्र, कथासरित् सागर इ. विचार केला आहे. जातकातील महायानग्रंथ आणि युरोपीय वाङ्मय यांच्याशीही तूलना केली आहे. जातकाची ऐतिहासिकता सांगून त्यातील शिकवण व अंतरंगाची माहिती दिली आहे.

प्रस्तुत भाषांतर करताना इंग्रजी भाषांतरांचा उपयोग झाल्याचे लेखकाने नमूद केले आहे.

जातक ही कथांची खाण आहे. जातकातील निदानकथा व पहिल्या 40 गोष्टींचे भाषांतर टी.डब्ल्यू. ऱ्हिस्त डेव्हिडस् यांनी इंग्रजीत सन् 1880 त केले. सन् 1907 मध्ये सर्व गोष्टींचे सहा भागात लॉर्ड चामर्सप्रभृति यांनी भाषांतर केले. तसेच मराठीत प्रो. धर्मानंद कोसंबी यांनी मुलांकरिता निवडक जातकांचे एक भाषांतर केले. यांचा उल्लेख आहे. कोसंबी यांचे पुस्तकात संकोचविस्तार आहे व मुलांकरिता ते लिहिले असल्यामुळे त्यांनी स्वत:च्या भाषेत लिहिले आहे. प्रस्तुत पुस्तक हे मुलांकरिता नाही, प्रौढांकरिता आहे असे लेखकाने म्हटले आहे.जातककथांनंतर लेखकाने टीपा दिलेल्या आहेत.

प्रस्तुत भाषांतरात मूळ जातकाचे म्हणजे गाथांचे भाषांतर पद्यमय केले असून ते काळ्या पायका ठशांनी छापिले आहे. असा उल्लेख आहे.

मूळ गाथा (कविता) संक्षिप्त असल्यामुळे त्यांचा अर्थ कळणे कठीण गेल्याने 'अर्थकथा' पालीत तयार झाली व तिचे सिंहली भाषांतर झाले. हे भाषांतर तसेच आहे, पण पालीतील 'अट्ठकथा' मात्र नष्ट झाली असा उल्लेख केला आहे. इ.स. 430 मध्ये पालीचा टीकाकार बुद्धघोष याने अर्थकथेचे पाली गद्यमय भाषांतर केले आहे.

'जातक कथा' या ग्रंथास गद्यपद्यमय प्रस्तावना असून त्यात काल्पनिक बुद्ध व शेवटच्या बुद्धाला संबोधि प्राप्त होईपर्यंतची चरित्रे आहेत. हा जातकाचा भाग नसून अट्ठकथेचा (टीकेचा) असल्याने नीरस आहे; म्हणून त्याने भाषांतर दिले नसल्याची लेखकाची नोंद आहे.

प्रस्तुत पुस्तकात लोकाख्यायिकाच्या व पाली भाषेच्या अभ्यासकाच्या व सामान्य वाचकाच्या दृष्टिने महत्त्वाच्या कथांची निवड केल्याची नोंदही लेखकाने केली आहे. मूळातल्यापेक्षा प्रौढ वा सोपी भाषा वापरली नसल्याचा उल्लेखही केला आहे. भाषांतराच्या सरळपणाकडे लक्ष दिल्याचे सांगितले आहे. पद्याचे भाषांतरही पद्यातच केलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथात अनेक ठिकाणी पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण केलेले आढळते. उदा. जातक कथा - या अनेक जन्मातील कथा भगवंताने (बुद्धाने) स्वत: धर्मोपदेश करीत असता भिक्षूस सांगितल्या. त्यांचे गाथा (कविता) रुपाचे सारांश हेच मूळचे 'जातकम्'- (Pa. 6)

दहा पारमिता - दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांति, सत्य, अधिष्ठान, मैत्रा, उपेक्षा या दहा गुणांच्या आचरणाने बोधिसत्व पुढे कालांतराने बुद्ध झाला. यांस पारमिता म्हणतात.- (Pa. 110)

प्रस्तुत ग्रंथ भारतीय साहित्यातील कथावाङ्‌मयाच्या अपार धनाचे आपणास दर्शन घडवितो.

12. **महाराष्ट्र नाट्यकला व नाट्यवाङ्‌मय** (पूर्वार्ध) - (इ.स. 1841-1930)(1931) ले.प्र. गणेश रंगनाथ दंडवते - यांचे पुस्तक प्रकीर्ण गुच्छात 193वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केले असून पूर्वार्ध 1841-1895 मानला आहे. उत्तरार्ध 1895-1930 मानून त्या संबंधी विवेचन केले आहे. उपोद्घातामध्ये लेखकाने या विषयीचे मर्यादित ज्ञान असण्याची कबुली देऊन क्षमा मागितली आहे. पण असे करताना या विषयी मदत करण्याची जाहीर विनंती करूनही प्रतिसाद न मिळाल्याची खंतही व्यक्त केली आहे. तसेच हा ग्रंथ कोणत्याही प्रकारे स्पर्धेने प्रेरित होऊन केला नाही व तसेच बेळगावच्या साहित्य संमेलना पासून या विषयास जी चालना मिळाली तीही आमच्या प्रयत्नास कारणीभूत झालेली नाही. केवळ कित्येक वर्षांपासून अर्वाचीन मराठीवाङ्मयाचे अध्ययन चालू असल्यामुळे प्रस्तुत ग्रंथनिर्मिती झाली असल्याचे म्हटले आहे. ग्रंथातील मते निर्णायक नाहीत तर फक्त सूचना आहे. महाराष्ट्र रंगभूमीस आजचे उन्नत स्वरूप प्राप्त होण्यास शंभर वर्षांचीच परंपरा असली तरी नाट्यरूपाने मनोरंजन करण्याची माणसांची वृत्ती प्राचीन आहे, हे नमूद केले आहे.

1842 पासून महाराष्ट्रात नाट्यसृष्टीची पहिली पावलं उमटली त्या आधी लळिते, दशावतार, तमाशा, सोंगे इ. होती. 19व्या शतकाच्या आरंभातील दादोपंत हा लळिते करणारा पहिला गृहस्थ होता व लळितेहीच मराठी रंगभूमीची पहिली अवस्था मानली आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये सोलापूर गावातील राम जोशी व त्यांच्या तमाशातील लावण्या या मनोरंजनाच्या पहिल्या बाबी मानल्या आहेत. विष्णुदास भावे यांना महाराष्ट्राचा भरतमुनी मानले आहे. त्यांच्या पौराणिक नाटकातील काही भाग पुस्तकात दिला आहे. शिक्षण प्रसारामुळे नट, नाट्य, नेपथ्य, रंगभूमी इ. विषयी दृष्टिकोण बदलल्यामुळे भाव्यांच्या नाटकांची लोकप्रियता ओसरू लागली असे लेखकाने सुचवले आहे. त्यातून वि. ज. कीर्तने यांचे नाटक 'माधवराव पेशवे' हे पहिले गद्यनाटक जन्मले. पुढे कीर्तन्यांच्या 'माधवराव पेशवे' व 'जयपाल' या नाटकातील काही भाग दिला आहे. 'शांकुतल' नाटकानंतर अण्णासाहेब किर्लोस्करांना विश्वकर्मा असे संबोधून सौभद्रादि नाटकांचा परामर्श घेतला आहे. 7व्या प्रकरणमध्ये किर्लोस्करांची जागा भरून काढणाऱ्या गो. ब. देवल यांच्या नाटकांचा विचार केला आहे.

1895-1930 हा नाट्यकलेचा उत्तरार्ध मानलेला आहे. त्यामध्ये पुणे नाईट क्लब शाहूनगरवासी

नाटकमंडळी यांचा परामर्श घेतला आहे. कोल्हटकरांच्या नाटकांचाही आढावा घेतला आहे. पुढे खाडिलकरांच्या गद्य व पद्य नाटकांचा विचार केला आहे. त्यात त्यांच्या उपमा, अलंकारांनी क्लिष्ट बनलेल्या रचनांची व कठीण पदरचनांची दखल घेतली आहे व ती पदे शब्दार्थापेक्षा त्यांच्या चालीमुळे लोकप्रिय झाली आहेत असे सांगितले आहे. मानापमान या नाटकामुळे बालगंधर्वांसारखा नट लाभला हे ही सांगितले आहे. कारण त्यांची छाप या नाटकामुळे पडली असे लेखकाने म्हटले आहे. पुढे राम गणेश गडकरी यांचे 'वेड्यांचा बाजार', 'प्रेमसंन्यास', इ. नाटकांचा उल्लेख आहे. 'प्रेमसंन्यास' ने गडकऱ्यांना पुढील नाट्यरचनेचा मार्ग दाखवला हे मत नोंदवले आहे.

त्यानंतर वि. सी. गुर्जर, शि. म. परांजपे, कृ. ह. दीक्षित इ. च्या नाटकांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. वरेरकरांचा फक्त उल्लेख व नाटकांची नावे आहेत. शेवटी उपसंहार दिला आहे. उदा. 'मधली स्थिती' मध्ये आपटे यांनी आपल्या नाट्यजीवनाचे नाटकमंडळीचे वर्णन केले आहे. - (Pa. 220)

सदर पुस्तकात पुण्याच्या श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांचा अभिप्राय दिला आहे. त्यांनी सदर लेखकाचे कौतुकच केले आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, "नाट्यसृष्टी बाहेरच्या वाङ्मयसेवकांनी नाट्यकलेचा इतिहास लिहिण्याचा आजपर्यंत प्रयत्न केला नाहीच, परंतु प्रत्यक्ष नाट्यकलेची सेवा करणाऱ्याच्या हातूनही असा प्रयत्न आजपर्यंत झाला नाही." इतिहास लिहिताना नाटककारांविषयी टिकात्मक पण समतोल अशी दृष्टि ठेवली आहे..............इ.

## ओ) केवळ 'पुष्प' सदरात प्रसिद्ध झालेली पुस्तके

या सदरात अनेक विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. म्हणजे त्यात चरित्रे, युद्धचर्चा, इतिहास, वाङ्मय, धर्म, बुद्धातील जातककथा, समाजशास्त्र यासारख्या अनेक विषयांवरील पुस्तके आली असून कदाचित आयोजनाच्या अथवा आर्थिक तरतुदीविषयक प्रश्नांमुळे त्यांचा त्या त्या गुच्छात समावेश केला गेला नसावा.

1. **बौद्धधर्म अर्थात् धम्मचिकित्सा** - ले. राजाराम नारायण पाटकर (इ.स. 1932) यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'त 202वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथ हा मिसेस व्हिज डेविस यांच्या 'Buddhism' या ग्रंथाच्या आधारे श्री राजाराम नारायण पाटकर यांनी लिहिला आहे.

सदर ग्रंथात अनुक्रमणिका असून 10 प्रकरणात विषयाची मांडणी केली आहे. त्यात अनुक्रमे 1. पाली वाङ्मयाची परंपरा, 2. धम्म आणि अभिधम्म, 3. धम्म आणि अनात्मवाद, 4. धम्म आणि कार्यकारणभाव, 5. धम्म आणि नीतिबंधन, 6. धम्म आणि ध्येयकल्पना, 7. धम्म आणि ध्येयकल्पना, 8. ध्येयाचे संशोधन, 9. धम्मशब्दाची अर्थकक्षा, 10. उपसंहार आहे. 11 वे प्रकरण परिशिष्टाचे आहे त्यात अ, ब, क, असून परिशिष्ट (अ) मध्ये ठळक पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण म्हणजे पारिभाषिक शब्द घडविणे व त्यांचा अर्थ देणे या दोन्ही प्रक्रिया यात दिसतात.

उदा. अविद्या - भ्रांतज्ञान.

षडायतन - षडिंद्रिये - रुपरसादि ज्ञानसंग्रहाच्या शक्तीला हे नाव आहे, केवळ शरीराच्या अवयवाला नाही.

वेदना - बाह्यजगताची अनुभूति

तृष्णा - बाह्यजगताशी अंतर्जगताचा संबंध कायम ठेवण्याची इच्छा, Will, Desire किंवा Appetite इ....

"प्रस्तुत पुस्तकात माझा उद्देश वाद घालावयाचा नसून पालीधर्मशास्त्रात ज्या नैतिक दृष्टीचा व पद्धतीचा पुरस्कार केला आहे, त्याच्याशी संलग्न असलेल्या काही ठळक तात्त्विक मुद्यांचे उद्‌घाटन करणे हा आहे." असे लेखकाने म्हटले आहे. (Pa.21) तसेच उपसंहारात लेखकानेच म्हटल्याप्रमाणे "या लहानशा पुस्तकात जे काही धम्माचे त्रोटक विवरण केले आहे, त्यात लेखिकेने आपला स्वतःचा कोणताही पूर्वग्रह आगंतुकासारखा आड येऊ दिलेला नाही. एखादी भूमिका यथावत्

उठवून देताना जी तदाकारवृत्ती लागते तशा वृत्तीने व अंतर्मुख विचारदृष्टीने विषयांचे दिग्दर्शन केलेले आहे. तथापि येथे हे कबूल केले पाहिजे की, प्रस्तुत धम्मचिकित्सा करीत असतानाही लेखिकेला मनातून अशी पूर्ण खात्री वाटत आहे की, ज्याप्रमाणे अरण्यात प्रथमच पुढचा मार्ग आखायचा असला म्हणजे त्याच दिशेला असलेल्या मागच्या टेकड्यांकडे नजर टाकून पुढचे धोरण बांधावे लागते, त्याप्रमाणे आज संक्रमणावस्थेत असलेली बौद्धजनता व सर्वसाधारण विद्वद्वर्ग या दोघांनीही बौद्ध तत्त्वज्ञानाच्या उगमाशी असलेल्या विचारसरणीचे चिकित्सापूर्वक संशोधन केले तर त्याच्या योगाने आधुनिक विकासवादाला चालना मिळून त्यात जिवंतपणाचा जोम आल्यावाचून रहाणार नाही''. (Pa. 208)

2. **सुलभ नीतिशास्त्र** - ले. दाजी नागेश आपटे (इ.स. 1933) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्य मालेतील 211वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आज्ञेनुरूप लिहिले आहे असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे.

व्यवहारातील आचरणाला मग ते आचरण वैयक्तिक असो वा सामाजिक असो - नीतिचे भक्कम अधिष्ठान असले पाहिजे, विशेषत: हल्लीच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, इ. मतमतांच्या गलबल्यात कोणते मत स्वीकारावे, याचाहि निर्णय करण्यास नीतिशास्त्रच मार्गदर्शी ठरू शकेल. या उद्देशाने या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे हे श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या 71व्या वाढदिवसाच्या सुप्रसंगी प्रसिद्ध करण्यात आले आहे.

एकंदर सहा प्रकरणामध्ये नीतिकल्पना व नीतिशास्त्र यातील फरक, नीतिशास्त्रातील तीन महत्त्वाचे प्रश्न व त्या संबंधीची भिन्न भिन्न मते, चांगले व वाईट यांच्या कल्पना व निरनिराळ्या उपपत्ती, नैतिक मानसशास्त्र, ग्रीक लोकांचे व्यावहारिक नीतिशास्त्र, ॲरिस्टॉटलच्या मते नैतिक सद्गुण कोणते, तात्त्विक सहजबुद्धिवाद, यांचे विवेचन सोप्या भाषेत आलेले आहे. प्रकरण 6 मध्ये नीतिशास्त्र व राज्यशासनशास्त्र या दोहोंनी मानवी व्यवहाराचे सर्व क्षेत्र कसे आक्रमिले आहे, या दोन शास्त्रांच्या कक्षा व परस्परसंबंध यांवरही प्रकाश टाकला आहे.

अखेरच्या तिसऱ्या भागात पाश्चात्य विचार निदर्शक ख्रिस्ती नीतिशास्त्र, व प्राच्यविचार निदर्शक हिंदू नीतिशास्त्र मानून त्या दोहोंचे तुलनात्मक परिक्षण केले आहे.

भारतीय वाङ्मयात नेहमी ग्रंथकर्त्यापेक्षा त्याच्या लेखनालाच अधिक महत्व दिलेले असल्यामुळे निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांचा कुठे बहुमान्य काळ जिथे शक्य तिथे निश्चित काळ दिला आहे. प्रस्तुत ग्रंथात पारिभाषिक शब्द देण्याचा प्रयत्न केलेला आहे.- (Pa. 91-96)

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | अन्तःस्फूर्तिवाद अथवा सहजबुद्धिवाद | - | Intuitionism |
| | तात्त्विक अंतःस्फूर्तिवाद | - | Philosophical Intuitionism |
| | उत्क्रांतिवादी नीतिशास्त्र | - | Evolutional Ethics |
| | एपिक्युअर पंथ | - | Epicurianism |
| | प्रधान सद्गुण | - | Cardinal Virtues |
| | सुखवाद | - | Hedonism |
| | हेतु | - | Motive |

सदर ग्रंथात एकंदरीत 15 पारिभाषिक शब्दांचा कोश देऊन त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरणही दिले आहे.

3. **नीतिशास्त्रप्रबोध** - ले. श्री. दाजी नागेश आपटे, यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'तील 212वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आज्ञेवरुन प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे.

प्रस्तुत ग्रंथात सुरुवातीलाच नीतिशास्त्रातील तीन प्रमेये कोणती याचे थोडक्यात विवेचन आहे. तीन प्रमेये (प्रश्न) - 1. 'किं कर्म किमकर्मेति' - म्हणजेच उचित, योग्य, चांगले अथवा नैतिक कर्म कोणते, हे ठरविताना मनुष्य त्याकडे अनेक दृष्टींनी पाहील. यानंतर नीतिशास्त्रातील दुसरे महत्त्वाचे प्रमेय म्हणजे, 2. कोणतेहि कृत्य उचित आहे असे निश्चित केले, तरी कर्त्याने ते का करावे, या

प्रश्नाचा विचार हे होय आणि अखेरचा प्रश्न म्हणजे, 3. सर्व नैतिक कृत्यांचे पर्यवसन कोणते, एका माणसाचे सुख, की पुष्कळांचे पुष्कळ सुख की अखिल मानवसमाजाचे सुख, अथवा सर्व प्राणिमात्रांचे सुख ?

अशा प्रकारे नीतिशास्त्राचा विषय अत्यंत व्यापक व विशाल आहे व त्याचे विवेचन अत्यंत अवश्य आहे. म्हणून प्राच्य व पाश्चात्य अशा उभय समाजात अत्यंत प्राचीन कालापासून नीतिशास्त्रीय तत्वांचा विकास कसकसा होत आला आहे याचे क्रमशः विवेचन करुन त्यांचे तुलनात्मक परिक्षण करण्याचा प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे.

सदर पुस्तकाचे तीन मुख्य विभाग पाडले आहेत. त्यापैकी पहिल्या विभागात भारतीय नीतिशास्त्राचा ऋग्वेद काळापासून सांप्रतकालापर्यंतचा विकास बारा निरनिराळ्या प्रकरणातून प्रतिपादिला आहे. (हिंदु नीतिशास्त्राचे उगमस्थान, ब्राह्मणकाल, उपनिषदे, भगवद्गीता, स्मृतिकाल, बौद्धधर्म, जैनधर्म, रामायण व महाभारत, दर्शने-षडदर्शने, भर्तृहरि व इतर नीतिवाङ्मय, भागवतसंप्रदाय, अर्वाचीन काल). दुसऱ्या विभागात अशाच प्रकारे पाश्चात्य नीतिशास्त्राचा विकास सॉक्रेटिस पूर्वकालापासून आजतागायतची पाश्चात्य विचारप्रणाली मुख्य उपपत्तींसह वर्णिलेली आहे. (ग्रीक नीतिशास्त्र, रोमन नीतिशास्त्र, ख्रिस्ती धर्माचा उत्कर्ष, ख्रिस्ती नीतिशास्त्र) अखेरच्या तिसऱ्या भागात पाश्चात्य विचारनिदर्शक ख्रिस्ती नीतिशास्त्र व प्राच्यविचारनिदर्शक हिंदु नीतिशास्त्र मानून त्या दोघांचे तुलनात्मक परिक्षण केले आहे.

भारतीय वाङ्मयात नेहमी ग्रंथकर्त्यापेक्षा त्याच्या लेखनालाच अधिक महत्त्व दिलेले असल्यामुळे, निरनिराळ्या ग्रंथकर्त्यांचा निश्चित कालनिर्णय देणे. किंबहुना ग्रंथकर्त्याची ओळख पटविणे हेहि फार दुष्कर असते. म्हणून प्रथम विभागात निरनिराळ्या वाङ्मयखंडांचा बहुमान्य काल तेवढा दिलेला आहे. याच्या उलट पाश्चात्यांत आरंभापासून इतिहासाची जाणीव तीव्र असल्यामुळे,त्यांच्यातील ग्रंथकर्त्यांचा काळ निश्चितपणे उपलब्ध होऊ शकते, म्हणून या ग्रंथात उल्लेखिलेल्या पाश्चात्य लेखकांच्या नावाची सूची आद्याक्षरांच्या अनुक्रमाने एका स्वतंत्र परिशिष्टात दिली आहे.

प्रस्तुत लेखकाचे मत असे आहे की, पाश्चात्य नीतिशास्त्रातील परिभाषा पुष्कळच परिणत झालेली आहे, त्यामुळे तिला मराठी प्रतिशब्द बनविणे अत्यंत अवश्य होते, त्यासाठी मूळ इंग्रजी शब्द व त्याला योजिलेले मराठी प्रतिशब्द, यांचा खुलाशासह परिभाषिक शब्दकोश एका स्वतंत्र परिशिष्टात दिला आहे. (Pa. 384-400)

| | | |
|---|---|---|
| उदा. अतिभौतिकवाद | - | (Transcendentalism) |
| उत्क्रांतिवाद अथवा विकासवाद | - | Evolution theory |
| स्वर्थी | - | Egoistic |
| सहसंवेदी | - | Sympathetic |
| जनताधर्म | - | Positive Philosophy |
| महापातके | - | Deadly Sins |
| शुद्धबुद्धिवाद | - | Purism इ.... |

प्रस्तुत पुस्तकात ज्या ज्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे, अथवा त्यातून अवतरणे घेतली आहेत, त्यांची यादीहि एका परिशिष्टात दिली आहे.

'नीतिशास्त्र' विषयक हा अत्यंत मौलिक ग्रंथ असून लेखकाने हा ग्रंथ ऐतिहासिक पद्धतिने लिहिला आहे, हा यातील विशेष असून त्यात पाश्चात्य व पौर्वात्य नीतिशास्त्राचा तुलनात्मक पद्धतीने विचार केलेला आहे.

4. **विद्युत** - प्रो नारायण काशीनाथ आपटे, (1933), ह्यांचा ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेत 215वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक हे बरमिंगहॅम विद्यापीठातील विद्युत्स्थापत्याचे अध्यापक 'गिझबेर्ट काप' ह्यांनी लिहिलेल्या 'इलेक्ट्रिसिटी' या पुस्तकाचे भाषांतर आहे.

भौतिक शास्त्रासारखे ज्ञान सर्वांना इंग्रजी भाषेतून घेणे शक्य नाही तेव्हा मराठी भाषेत त्याचे भाषांतर

केल्यास उपयुक्त अशी माहिती सर्वांनाच होऊ शकेल. 'भौतिक शास्त्रासारखे सर्वांना अवश्य असणारे ज्ञान परभाषेतून घेणे जरूर पडल्यामुळे, फार थोडया लोकांना त्याची प्राप्ती होऊ शकते, त्यातील गहन भागाचे पूर्णपणे आकलन होण्यास बराच त्रास पडतो. पारिभाषिक शब्दांची आणि वाक्यरचनांची घोकंपट्टी करून परीक्षांच्या चरकातून सुटून जाण्याची प्रवृत्ती होते. स्वतंत्र विचारांचे व विषय ग्रहणाचे सामर्थ पार लयाला जाते' अशी अनर्थ परंपरा कोसळते म्हणून दुय्यम शाळातील व महाविद्यालयांच्या, निदान खालच्या वर्गातील तरी सर्व विषय मातृभाषेतून शिकवले जावे, अशी सर्वत्र इच्छा उत्पन्न झाली आणि याच उद्देश्यांने मुंबई विद्यापिठाने या दिशेने प्रयत्न सुरु केले.

सदर पुस्तकात एकंदर 11 प्रकरणांमध्ये विषयांची मांडणी केलेली आहे यात अनुक्रमे 1. प्रस्तावना, 2. उपोद्घात असून प्रकरण 1. अवकाशांतील ऊर्जक्रिया, 2. घर्षविद्युत आणि स्पर्शविद्युत, 3. सामर्थ्य, 4. यांत्रिक साहाय्याने विद्युतसंचारण, 5.विद्युत्प्रवाह, 6.विद्युत्प्रवाह गतिविचार, 7. गतिजन्य विद्युत्प्रवाहोत्पादन, 8. विपर्यायी प्रवाह, 9. विद्युतचा पुरवठा, 10. पारिभाषिक शब्दांचा कोश, 11. संकेतार्थ वर्ण परिशिष्ट-2 असे विभाग आहेत.

पुस्तकातील विषयाचे विभाग आणि विषयाची मांडणी मूळ पुस्तकाबरहूकुम आहे. त्यात भाषांतरकाराने काहीही फरक केलेला नाही. फक्त हिंदु समाजाला न पटणारे, एका ठिकाणचे नाचाचे उदाहरण काढून टाकून, तीच गोष्ट भारतीय परिचयाच्या मुलींच्या फुगड्यांचे उदाहरण देऊन विशद केली आहे.

सदर ग्रंथ मुंबईतील श्रेष्ठ नागरिक व प्रसिद्ध बिल्डिंग कॉन्ट्राक्टर श्रीमान् रावबहादूर मानाजी राजूजी कालेवार, जे.पी. यांस अर्पण केला आहे.

सदर ग्रंथात उपोद्घात स्वतंत्रपणे लिहिलेला असून, पुस्तक समजण्यास जरूर तितकी माहिती त्यात दिलेली आहे. पुस्तकात वापरलेले पारिभाषिक शब्द तद्वाचक इंग्रजी शब्दांसह परिशिष्ट 1 मध्ये दिले आहेत. तसेच संकेतार्थक वर्ण परिशिष्ट 2 मध्ये दिलेले आहेत. ''पुस्तकातील पहिले प्रकरण पुष्कळ वाचकांना फार क्लिष्ट वाटण्याचा संभव आहे, म्हणून दुसऱ्या प्रकरणापासून आरंभ करून

दोन तीन प्रकरणे झाल्यावर पहिले प्रकरण वाचावे'' अशी सूचना भाषांतरकाराने दिली आहे.

सदर ग्रंथात वापरलेले बहुतेक सर्व पारिभाषिक शब्द बडोदे येथील महाराष्ट्र वाङ्मय मंडळ या संस्थेकडून मुक्रर करून घेतले असून नवे शब्द व पुष्कळ शब्दांना गोंडस व सुटसुटीत स्वरुप दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| उदा, अकारण | - | Passive |
| आवृत्तिकाल | - | Period |
| उपन्यास | - | Hypothesis |
| केंद्र | - | Focus |
| घन | - | Cubic. |
| बोंड | - | Knob. |
| प्रभा | - | Halo .......इ. |

इलेक्ट्रीकचा अभ्यास करणाऱ्या मराठी अभ्यासकास तसेच सर्वसाधारण वाचकास विजेच्या कार्यकरण भावाचे सहजज्ञान होईल अशा प्रकारे सुलभ भाषेत या विषयाचे विवेचन केलेले आहे. शास्त्रीय विषयावरील हा ग्रंथ वाचकास आदरणीय होईल.

5. **नरसिंह मेहेता** (1933)- ले. श्री. दाजी नागेश आपटे, यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमालेत' 217 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. (अंक 217)

हिंदुस्तानातल्या निरनिराळ्या भागात वैष्णव भक्तांचा जो संप्रदाय प्रचलित झाला, त्या सर्वांचे अंतरंग व प्रणालिका एकच आहे. त्यामुळे मराठी वाचकांना परभाषीय साधुसंतांची चरित्रे मनोरंजक वाटतील व त्यातील रहस्य त्यांना पटूहि शकेल, या उद्देशानेच महाराष्ट्रीय वाचकांसाठी हे चरित्र लिहिले आहे. नरसिंह मेहेता हे गुजराती भाषेचे आद्यकवि म्हणून प्रसिद्ध आहेत.

''वैष्णवजन तो तेने कहिये । जे परपीडा जाणे रे ॥'' हे जगप्रसिद्ध पद रचणारे व त्यात दिलेल्या

वैष्णवजनांच्या वर्णनपरहुकूम ज्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले, त्या संतकविचे चरित्र प्रस्तुत दिले आहे. यात त्यांचे जन्म व बाल्यावस्था, मेहेताजींचा गृहस्थाश्रम, भक्तिपरीक्षेची उदाहरणे, हारमालाचे ज्ञान, 'हारमाला' हे काव्य संवत 1462 चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाची सप्तमी तिथीला व सोमवारी नरसिंह भक्ताच्या हातून पार पडले. सुराष्ट्राचे भूपति राजे मंडलिकाच्या राजसभेत मेहेताजीच्या प्रतिपक्षाने त्यांच्याशी वाद केला होता आणि त्या ठिकाणी त्यांच्या भक्तिची परिक्षा झाली होती. काव्याचे गुणदोष, हारमालेचा ऐतिहासिक उपयोग, हारमाला आणि गुर्जर साहित्य, हारमाला कोणी लिहिली, त्यांच्या कवितेबद्दल सामान्य विचार, गुर्जर साहित्यावर त्यांची छाप, काव्यकलेविषयी त्यांचे ज्ञान, रागरागिणी व गायनकला, मेहेताजींचे धार्मिक विचार, यांचा समावेश करण्यात आला आहे.

उपसंहारात भक्तकवि नरसिंह मेहेताजींच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्यांचा आढावा थोडक्यात घेतला आहे.

या चरित्रात चरित्र वर्णना बरोबरच त्या काळची भाषा, परिस्थिति आचारविचार, लोकरिवाज, धर्म स्थिति वगैरे गोष्टिंचे ज्ञानहि मिळते.

उदा. मेहेताजींच्या वेळी कृष्णभक्ति फारशी प्रिय नसावी असे अनुमान त्यांच्या झालेल्या अपमानावरून व निंदेवरून निघू शकते. त्यावेळचे लोकांचे आचार विचार कसे असतील या विषयावर त्यांच्या हारमालेत वर्णन मिळते. उदा. त्या काळात जनसमाज साधारणपणे चमत्काराला मानीत नसावे. राजाच्या मनात श्रद्धेचा अभाव होता, व लोकांची स्थिती पण तशीच होती. ह्या हारमाला काव्यात कित्येक ऐतिहासिक माहिती उपलब्ध होते. त्या काळी जातीव्यवस्था संपूर्ण रितीने संभाळण्याकरिता काय काय करण्यात येत असे, ते मेहेताजींनी आचारविचाराबद्दल केलेल्या विवेचनावरून सहज समजून येते. जातिव्यवस्थेचे पालन करण्यासाठी अथवा त्या जातिबंधूंच्या तिरस्कारास पात्र झालेल्या त्या भक्तराजाच्या मतांचे खंडण करण्यासाठी राजसत्तेचा उपयोग करण्यात नागर समाजातील लोक मागेपुढे पहात नसत, हे पण त्यांच्या काव्याच्या वाचनाने समजून येते. - (Pa. 47-48)

सर्व भगवद्भक्तांप्रमाणे ह्या संतकविने सुद्धा ''निंदा जगी त्रास । अपमान उपहास ।। अर्थी विपर्यास।।'' हे भोगावे लागले. तथापि, त्यांनी आपली कृष्णभक्ति यत्किंचित्‌हि विचलित होऊ दिली नाही. ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, तुलसीदास, मीराबाई या सर्वांच्या चरित्रात या दृष्टिने सारखेपणा आढळतो. या सर्वांप्रमाणेच त्यांनी लोकोपवादाची पर्वा बाळगिली नाही व आपले ध्येय सतत दृष्टीसमोर ठेवून आपला मार्ग आक्रमण केला.

या दृष्टीने प्रस्तुत पुस्तक मराठी वाचकांना इतर भाषिक संताच्या जीवनकार्याची ओळख देणारे असून त्यामध्ये नरसिंह महेतांच्या न. मे. काव्यरचनेविषयी मात्र पुरेसा विचार केलेला नाही.

6. **तंजावरचे मराठे राजे** (1933)- ले/अनुवादक श्री. विनायक सदाशिव वाकसकर- यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 223वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेतच लेखकाने हे मूळ इंग्रजी पुस्तक मद्रासचे विद्वान इतिहास लेखक श्रीयुत सुब्रहमण्यम यांनी संशोधनपूर्वक लिहिले असल्याचे आणि श्रीयुत अयंगार या प्रख्यात इतिहासज्ञांनी त्याला प्रस्तावना दिली असल्याचे म्हटले आहे. अशा या मूळ इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे. परंतु ग्रंथाच्या शीर्षकामध्ये हे भाषांतरित पुस्तक असल्याचा उल्लेख नाही. मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद करीत असताना अवश्य त्या विशेष माहितीची भर ठिकठिकाणी घातली आहे असे लेखकाने म्हटले आहे.

परिशिष्टामध्ये तंजावरच्या अस्सल मराठी शिलालेखाचा सारांश कलमे पाडून दिला आहे. त्या शिलालेखाचे भाषांतर श्री सुब्रहमण्य यांना मिळालेले नव्हते. तो दुर्मिळ शिलालेख मोठ्या प्रयत्नाने मिळवून येथे दिला आहे.

एकंदर 15 प्रकरणांमध्ये तंजावरातील मराठी राज्याची स्थापना कशी झाली, संस्थापक, राज्यकर्ते, राज्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती व प्राचीनता असे विभाग करून माहिती दिली आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये विजयनगरच्या सामाज्यापासून दक्षिणेची स्थिती, मुसलमानी आक्रमणे, शहाजी,

शिवाजी यांची मुत्सद्दी व लढाऊ नीती, मराठ्यांचा पराक्रम, इ.. चे स्थूल निरीक्षण करून नंतर तंजावरामध्ये मराठी राज्य कसे स्थापले याची चर्चा केली आहे. यामध्ये कावेरी तीरावरील या प्रदेशाची स्थिती वर्णन केली आहे. 1646 मध्ये श्रीरंग हा विजयानगरचा राजा पळून गेला व तेव्हा या राज्याचा इतिहास बंद झाला. सन् 1646 मध्ये विजयानगरचा राजा श्रीरंग हा बेदनूर येथे पळून गेला, त्याबरोबरच विजयानगरचा इतिहासहि या वेळेपासून बंद झाला. (Pa. 14) पुढे शहाजी राजाचा मुलगा वेंकोजीने राज्य कसे मिळवले याची माहिती दिली आहे. पहिली 15 प्रकरणे विषयाबद्दल आहेत. त्यात 10 व्या प्रकरणानंतर आधारभूत ग्रंथांची सुब्रह्मणयांनी दिलेली यादी आहे.

पुस्तकाच्या उपसंहारामध्ये इंग्रजांनी हे संस्थान कसे हस्तहत केले ते सांगितले असून त्यामध्ये येथील राजांचा शांततप्रिय स्वभाव व साम्राज्य विस्ताराबद्दलची उदासीनता व त्यानंतर त्यांनी राजधर्माचा केलेला त्याग ही कारणे दिली आहेत.

परिशिष्टामध्ये चौलराजे जानेश्वर, नामदेवांच्या काळातील उतारे (तामील भाषेतील) तसेच मराठी शिलालेखांचे तात्पर्य दिले आहे. भोसले वंश चरित्र श्री बृहदीश्वरालयातील (तंजावरच्या) शिलालिखित चरित्राचा भाग दिला आहे.

परिशिष्टांमध्ये तंजावरचा शिलालेख, व्यंकोजीला शिवाजीचे पत्र, तहाजी कलमे, दानधर्माची यादी, देणगीची पत्रे दिली आहेत. महाराजा सयाजीराव गायकवाड, राजा प्रतापसिंह, दुसरा राजा शहाजी व महाराणी कामाक्षी यांची चित्रे आहेत.

मराठी राज्याच्या विकासाच्या भौगोलिक कक्षा भारतात सर्वदूर अशा पोहचलया होत्या, त्यांच्या इतिहास लेखनाच्या संदर्भात प्रस्तुत पुस्तक महत्त्वाचे आहे.

7. **लौकिक दंतकथा** (1934) - भाषांतरकार गोविंद मंगेश कालेलकर यांचे हे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमालेत' 227वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तक मि. आर. ई. एन्थोबेन, सी.आय.ई.आय.सी. एस् यांच्या 'The Folklore of Bombay' नावाच्या पुस्तकावरून तयार करण्यात आले आहे.

'लौकिक दंतकथा' या विषयावरील मराठीतील हे पहिलेच भाषांतरित पुस्तक आहे.

'लौकिक दंतकथा' या नावात मनुष्यसमाजाच्या समजुती आणि चालीरिति यांचा समावेश होतो.

''साधारणपणे जनसमूहाचे पूर्वकालीन आचारविचार, चालीरीति, कल्पना, समजुती, दंतकथा, अंधश्रद्धा आणि विपरीत ग्रह ह्यांचा त्यात समावेश होतो, अशा प्राचीन विद्या आणि प्राचीन वस्तुसंशोधन शास्त्र, ह्यांच्या शाखेस 'लौकिक दंतकथा' म्हणावे.'' अशी व्याख्या उपोद्घातामध्ये दिलेली आहे.

सृष्टिदैवते आणि पूर्वजपूजन असे दोन भाग करून त्यामध्ये 12 पोटविभाग करून विषयाचे प्रतिपादन केले आहे. सृष्टीदेवतांमध्ये सूर्य, चंद्र, ग्रहणे, पूजाविधी, व्रते, ग्रहफळे, पाऊस, धरणी, नद्या, पाणी, ढग, वीज, सर्प, झाडे, अग्नी, यांचा समावेश आहे. तर पूर्वजपूजनामध्ये पूर्वज, साधुसंत,भूते,मृतात्मे, अकाली मृतांच्या इच्छा व गती, व्रते व पूजा यांचा विचार आहे. गुजरात, काठेवाड, कोकण, महाराष्ट्र व कर्नाटक अशा प्रांताप्रमाणे काही विधींचा व व्रतांचा उल्लेख आहे. तसेच देवके आणि प्राणिपूजा, दृष्ट, स्वप्ने व स्वप्नफल, शकुन-अपशकुन, स्त्रियांची व्रते, व शेतीविषयक विधींची माहिती दिली आहे.

सदर पुस्तकात जी माहिती दिली आहे तिचे परीक्षण केले असता, ज्या समजुती पूर्वकाळी आपल्या समाजात रूढ होत्या, त्यांचा पगडा अजूनही बहुजन समाजावर आहे, ही गोष्ट लक्षात येते. आपल्या बहुतेक धर्मविधीतही ह्या समजुतीचे अवशेष सापडतात.

उदा-धूमकेतूचा उदय झाला असता मोठी लढाई, मोठा दुष्काळ, भयंकर रोगाची साथ, इ. आपत्ति ओढवतात.

कोकणात पूर्व दिशेस इंद्रधनुष्य दिसले तर पाऊस पडणार, व पश्चिमेत दिसले तर थांबणार अशी समजूत आहे.

फळझाडांस दृष्ट लागू नये म्हणून त्यास खापऱ्या, जुन्या केरसुण्या आणि जुने जोडे बांधतात.

घरातून बाहेर पडल्याबरोबर पाण्याने भरलेली घागर डोकीवर घेतलेली सुवासिनी अथवा कुमारिका जर भेटली, तर मनात योजलेला बेत सिद्धीस जाण्याचे ते सूचक आहे असे समजतात.

कर्नाटकात पिंपळ्याच्या लाकडाची मूर्ति करून दृष्ट लागलेल्या इसमासमोर ओवाळतात व जाळून टाकतात.

गुजरातेतील कित्येक लोक चंद्रावरील डाग हे शमी वृक्ष आहेत असे म्हणतात.......ई

प्रस्तुत पुस्तकात दिलेली माहिती अत्यंत परिश्रमाने व काळजीपूर्वक गोळा करण्यात आलेली आहे. मानवसमाजाच्या प्रथमावस्थेत ज्या कल्पना व आचार रुढ झाले, ते अजूनही समाजाच्या बऱ्याच मोठ्या भागात चालत असलेले दिसून येतात. त्यांचे शास्त्रदृष्ट्या पृथक्करण करुन त्यातून धर्मकल्पनेचा विकास कसकसा होत गेला, या विषयाचा विचार मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या दृष्टीनेही महत्वाचा आहे.

8. **प्राचीन युद्धविद्या** : ले. कै. रा. सा. कृष्णाजी विनायक वझे (1934) यांचा हा ग्रंथ 'श्री सयाजी साहित्यमाले'त 228वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ कृ. वि. वझे यांनी प्रकाशनाआधी 4 ते 5 वर्षे आधी लिहिला होता असा उल्लेख असून मग नंतर तो सयाजी साहित्यमालेत स्थान मिळून प्रकाशित झाला. सदर ग्रंथाची अर्पणपत्रिका औंध संस्थानाधिपति श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव उर्फ बाळासाहेब पंडित, प्रतिनिधी यांच्या नावे असण्यात मोठेच औचित्य आहे.

प्रस्तुत पुस्तक व पुस्तकाची प्रस्तावना महत्वाची असून युद्धामागील मानवी मनोवृत्तीचा सूचक उल्लेख चिंतनीय आहे. ''आपला विजय व्हावा निदान दुसऱ्यांनी आपला पाडाव करु नये यासाठी काय करावे व कसे करावे हे सांगणारे जे शास्त्र त्याला 'धनुर्वेद' म्हणतात.'' हा विचार महत्त्वाचा आहे. भारतीय परंपरेतील धनुर्वेद किती, त्यातील उत्क्रांती प्रकार, त्यांचे निर्माते या सर्वांचा सखोल अभ्यास थोडक्यात दिलेला आहे.

पाश्चात्य ग्रंथकारांनी सुद्धा हिंदुलोकांच्या धनुर्विद्येतील विशेष कौशल्यावद्दल कौतुक केले आहे, ते असे,

1.) "The Archery of the Hindoos has something very mysterious about it. The archers had the quivers always full owing to the return of their arrows. This was considered absurd until the discovery of the Boomrang in the hands of the Australians. (Wilson's Essays Vol. II Page 191, 192)

2.) The Hindoo skill in archery was very wonderful. Part of the archery practice consists in shooting a number of arrows (Four to nine) at once. (Elphinstone's History of India. Pa. 198)

सदर ग्रंथाला अनुक्रमणिका असून एकंदर 16 प्रकरणात प्राचीन युद्धविद्येची माहिती दिली आहे. त्यात अनुक्रमे 1. प्रस्तावना, 2. युद्धांचे प्रकार, 3. तंत्रयुद्ध, 4. शस्त्रयुद्ध, 5. अस्त्रयुद्ध, 6. यंत्रमुक्त, 7. कोटी, 8. गुण, 9. इषु, 10. स्थान, 11. संधान, 12. आकर्षण. 13. विकर्तन, 14. कौशल्य, 15. समरसंभार, 16. मंत्रयुद्ध इ. आहेत. पुस्तकाच्या सुरुवातीस श्री सयाजी महाराजांचा फोटो दिलेला आहे.

युद्धशास्त्रासंबंधीचे पारिभाषिक शब्द मूळ संस्कृतातील असून ते तसेच्या तसेच ठेवण्यात आले आहेत. उदा. समस्तपाश - अनंत साखळी, संधारित - उजवे घालणारावर फार टाकणे, विकर्तन, स्फोटन, स्थिरलक्ष्य, चललक्ष्य, कांबीट कोटी, कांडदोष, छिद्रा (किड्यांनी भोके पाडलेला बांबू) इ.

लेखकाने आधी ग्रंथ लिहिला व मग तो मालेत समाविष्ट करण्यात आला, असा प्रकार झाल्याचे सदर ग्रंथातून कळते. युद्धशास्त्रात संरक्षक पद्धतीचा अवलंब अनिवार्य असतो. यातील सुधारणा म्हणजे उशनसाची 'संजीवनी विद्या' होय. ही संजीवनी विद्या म्हणजे एक प्रकारची व्यूहरचना होय व त्यात अनुक्रमवार सैनिकांची मांडणी ही होय. एक सैनिक मेला की, त्याचे स्थान दुसऱ्या खालच्याने

स्वीकारावे व याप्रमाणे सारखी परंपरा चालवावी. ही संजीवनी विद्या शुक्राचार्यांनी आपल्या औशनस धनुर्वेदात सांगितली आहे. येथे असे लक्षात येते की संजीवनीविद्या हा एखादा मंत्र नसून ती एक व्युहरचना पद्धती आहे. कचाने ती असुरांकडून सुरांकडे आणली पण तेथे ती फार काळ टिकली नाही. कौटिल्यापासून पानिपत ते मराठी राज्या बुडेपर्यंत हिंदु लष्कराने या संजीवनी विद्येचा उपयोग केला नाही. येथे प्रस्तुत लेखकाचे चिंतन महत्त्वाचे आहे की संस्थातून ही अशी प्रणालिका दिसत नाही. आयत्या वेळेला प्रसंग आल्यावर जे घडेल ते घडेल ही संजीवनी विद्या नव्हे.

'प्राचीन भारतीय विद्या', 'Indialogy' या साठी सदर ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यात अस्त्रे, शस्त्रे, अग्नी, धातू, मंत्र या सर्वांचे सूक्ष्मविवरण आलेले आहे. सदर ग्रंथात काही इंग्रजी उतारे दिले आहेत. हे उतारे इंग्रजी शिक्षणाने ज्यांची बुद्धि कलुषित झाली आहे, व ज्यांना हिंदु लोकांच्या प्राचीन विद्यांबद्दल संशय वाटतो, त्यांच्या करिता आहेत. जुना ग्रंथ कोठे सापडला की, 'हा बनवाट आहे' येथून त्यांची सुरुवात होते. पाश्चात्यांचे हत्तीइतके खोटे असले तरी ते मान्य करतील, परंतु हिंदु लोकांच्या प्रत्येक अक्षराबद्दल संशय घेतील. हा लेखकाचा विचार महत्त्वाचा आहे.

9. **भगवान बुद्ध (चरित्र व धर्मसारसंग्रह) :** लेखक - रामराव मार्तंड भांबुरकर (1934) याचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'त 233वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथाला प्रो. चिंतामण विनायक जोशी यांची प्रस्तावना लाभली आहे. धार्मिक प्रगतीच्या दृष्टीने धर्मप्रसार हे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. त्यासाठी संघटनांची आवश्यकता आहे. आपला सनातन धर्म अनादिसिद्ध असल्याने त्याचा शक्य तेवढ्या लोकांकडून स्वीकार होणे आवश्यक आहे. असे न झाल्यास आपल्या धर्मानुयायी लोकांची संख्या उत्तरोत्तर कमी होत जाऊन अखेर आपला सनातन धर्म नामशेष होण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत बौद्धधर्माचे सूक्ष्म निरीक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे आणि हाच उद्देश डोळ्यांपुढे ठेवून प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, असे मत प्रस्तावनाकाराने मांडले आहे.

धार्मिक प्रगतीत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. 1) उच्च सनातन धर्मतत्वांचे निष्ठावंत आचरण आणि 2) अशा धर्मतत्वांचा सार्वत्रिक प्रसार.

प्रस्तुत पुस्तक या विषयांवरील अनेक उपयुक्त पुस्तकांच्या आधाराने लिहिले आहे. स्वतंत्र अभ्यासक अशी ग्रंथकाराची भूमिका नसल्यामुळे पुष्कळशा टीपा वगैरे त्यात नसल्याचा उल्लेख प्रस्तावनेत केला आहे. त्याप्रमाणे धर्मग्रंथांचे विशेष विवेचन न करता त्याची फक्त संक्षिप्त माहिती दिली आहे.

प्रस्तुत पुस्तकाची चार भागात (24 प्रकरणात) रचना आहे. प्रास्ताविकामध्ये बुद्धाच्या जन्मकथा, बोधिसत्वाविषयीचे भविष्य, दैनिक चमत्कार इ. भाग दिला असून पुढे बुद्धाच्या योगसाधना, धर्मोपदेश, दीक्षा, राजगृहामध्ये त्याचे पुनरागमन स्त्रियांना धम्मदीक्षा इ. प्रकरणांचा विचार केला आहे. शेवटी तथागताचे देहावसान अशा प्रकरणाने शेवट केला आहे. प्रत्येक प्रकरणामध्ये येणाऱ्या मजकुराची संक्षिप्त ओळख अनुक्रमणिकेमध्ये दिलेली आहे. पहिल्या भागामध्ये बुद्ध चरित्रातील अनेक घटना व स्थळे यांचा भाग आहे. त्यात आख्यायिका व दंतकथाही आहेत. काही ठिकाणी तळटीपा दिल्या आहेत. उदा. मगध देशाची राजधानी 'राजगृह' या शहराविषयी जनरल कनिंगहामकृत 'प्राचीन हिंदुस्तानचा भूगोल' या पुस्तकात जी माहिती आहे तिचा तळटीपेत उल्लेख केला आहे. दुसऱ्या भागामध्ये बौद्धधर्मीय तत्त्वज्ञानाचा सविस्तर विचार केला आहे. उदा. जीवतत्त्वे, कर्म व मोक्षमार्ग, निर्वाणाची साधने, विश्वाची रचना इ.चा विचार केला आहे. त्यामध्ये अशी 11-15 प्रकरणे आहेत.

तिसऱ्या भागामध्ये बुद्धाची मठस्थापना, त्यातील अन्नवस्त्राविषयी, नियम व खाण्यापिण्याच्या व्यवस्था तसेच मठाधिपतींचे अधिकार याविषयी माहिती आहे. चौथ्या भागामध्ये धार्मिक इतिहासाचे सिंहावलोकन केले आहे. राजा अशोक व बौद्धधर्म, सिलोनपर्यंत त्याने केलेला धर्मप्रसार व अशोकानंतरची बौद्धधर्माची स्थिती यांचा विचार आहे. तसेच महावस्तु, विनयपिटक, सुत्तपिटक, अभिधम्मपिटक इ. ग्रंथांची माहिती आहे. बौद्धधर्म व जैनधर्म यांची तुलना व त्यांच्यातील साम्य

आणि फरक सांगितला आहे. कुमारिल भट्ट व शंकराचार्य यांच्या कार्यामुळे हिंदुधर्माची पुनर्स्थापना कशी झाली ते याच प्रकरणामध्ये सांगितले आहे. बौद्धांच्या हिंदुधर्मावरील परिणामांची चर्चा केली आहे. उदा. यज्ञविधी बंद होऊन अहिंसेचे तत्त्व बाणवले गेले. बुद्ध, धर्म, संघ या त्रयीप्रमाणे ब्रह्मा, विष्णु व महेश हे देवतात्रय झाले इ. यातील प्रकरण 20 मध्ये चोरी, हिंसा करणे, व्यभिचार, असत्य बोलणे, वाईट संगत, जुगार..... इ. दशविधपातकांची माहिती दिली आहे. बुद्धाची नीतिविषयक सूत्रे देऊन त्याच्या विधानांची माहिती दिली आहे. शेवटच्या 24 व्या प्रकरणामध्ये बौद्धधर्माची मूळतत्त्वे दिली आहे.

सर्वसामान्य वाचकांसाठी ग्रंथ मनोरंजक, बोधपर व उपयुक्त व्हावा असा प्रयत्न करण्यात आला आहे. तत्कालिन स्थळांची बरीचशी माहिती, समकालीन विचारकान्तीचे दिग्दर्शन इ. गोष्टींनी ग्रंथाच्या उपयुक्ततेत भर पडली आहे. ग्रंथाची एकंदर भाषा अतिशय सरळ, सुबोध आहे. भारतातील प्राचीन परंपरेच्या अभ्यासासाठी उपयुक्त असा संदर्भग्रंथ म्हणून या ग्रंथांचा विचार करता येतो.

10. **एका शिपायाचे आत्मवृत्त अथवा लेफ्टनंटपासून जनरल पर्यंत** - (इ.स. 1935), लेखक - जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे. यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 239वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

बडोदा फौजेमधील जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे यांनी त्यांच्या या आत्मवृत्तामध्ये घराण्याच्या पूर्वेतिहासापासून आरंभ करुन सेवानिवृत्तीपर्यंतच्या टप्प्याचे एकंदर तीस प्रकरणांमध्ये विभाजन केले आहे. 'आपल्या खासगी दोन शब्द' या मध्ये नानासाहेबांनी म्हटले आहे की, ''मी लेफ्टनंटपासून जनरल झालो होतो तरी, मी काही मोठमोठ्या लढाया मारल्या नाहीत, मोठमोठ्या पदव्या अगर चांद कमविले नाहीत, किंवा परराज्यातील मुलुख जिंकून श्रीमंत गायकवाड सरकारच्या राज्यास जोडला नाही.'' 'व्यक्तीचा इतिहास हा समाजाचाच इतिहास असतो' ही संकल्पना येथे मांडली आहे. एखादा क्षुल्लक मनुष्यही महत्वाकांक्षा जर उच्च असेल तर प्रामाणिकपणे व इमानेइतबारे सरकारची नोकरी करुन स्वतःच्या हिंमतीवर व कर्तबगारीवर भरवसा ठेवून कोणाच्याही

शिफारसीशिवाय जगात पुढे येऊ शकतो. हे बडोदा फौजेतील 41 वर्षांच्या सेवेद्वारे दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे साधारणपणे 100 वर्षांपूर्वीची बडोद्याची स्थिती तसेच 'बडोदा आर्मी'ची झालेली सुधारणा व वाढ यांचेही प्रभावी दर्शन या आत्मवृत्तातून होते.

प्रस्तुत पुस्तकात नरसिंगराव घोरपडे यांचे हृद्गत, स्वतः लेखकाच्या हस्ताक्षराचा नमुना, लेखकाचे खासगी दोन शब्द, प्रो. वि. पा. दांडेकर यांचा अभिप्राय, डॉ. भा. चिं. लेले यांचा अभिप्राय, प्रकाशक दा. सा. यंदे यांचे ग्रंथाविषयीचे उद्गार व माधवानुज यांचे पद्यरुप उद्गार, तसेच पंचवीस फोटो यांचाही समावेश करण्यात आला आहे.

प्रस्तुत आत्मवृत्तामध्ये नुसत्या नोकरीचीच हकीकत दिली नसून, लेखकाच्या घरगुतीबाबती व कुटुंबातील कलहाचे व मतभेदाचेही वर्णन आहे. याचे मुख्य कारण साधारण मनुष्याच्या संसाराचे दृश्यही वाचकास दिसावे व संसार सुखमय करण्यास काय केले पाहिजे याची जाणीवही त्यांस व्हावी.

या आत्मवृत्तामध्ये स्वःस्तुती बरोबर खरा जीवनवृत्तांत व दोषही दाखविले आहेत. प्रामाणिकपणा, शील, निर्व्यसन, स्वावलंबन, आत्मसंयमन, चिकाटी व योग्य महत्त्वाकांक्षा यांच्या जोरावर मनुष्यास वरच्या पायरीवर जाता येते हे दाखविण्यात आले आहे.

पुस्तकाची भाषा अत्यंत साधी व सरळ आहे. प्रत्येक प्रकरणाबरोबर वाचकाची जिज्ञासा अधिक तीव्र होत जाते. एक शिपाई आपले चरित्र इतक्या गोड भाषेत मांडू शकेल, अशी कल्पनाहि होणार नाही. प्रो. वि. पां. दांडेकरांचा अभिप्राय बघण्यासारखा आहे. ''मनुष्याने प्रयत्न केला असता अगदी सामान्य स्थितीतूनहि वरच्या दर्जापर्यंत त्याला कसे जाता येते, हे जनरल साहेबांच्या आत्मचरित्रापासून कळते. सत्य हे कल्पनेपेक्षाहि अद्भुत असते, असे नेहमी म्हणण्यात येते. त्याचे प्रत्यंतर कोठे पहावयाचे असल्यास या ग्रंथाकडे मी बोट दाखवीन. आत्मचरित्र हे साध्या चरित्रापेक्षा नेहमीच गोड असते. परंतु या आत्मचरित्राची गोडी फार ओर आहे. याचे पाननूपान इतके स्फूर्तिदायक व मनोहर आहे की एकदा पुस्तक हाती घेतल्यावर ते खाली ठेववत नाही. प्रत्येक विद्यार्थ्याने हे आत्मवृत्त अवश्य वाचावे, अशी माझी शिफारस आहे.'' (Pa. 25)

ग्रंथाच्या शेवटी ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळीचे विक्रीस तयार असलेले 18 ग्रंथ 'सुबोध ग्रंथमाला' या शीर्षकाखाली दिलेले आहेत. तसेच श्री सयाजी साहित्यमालेतून प्रसिद्ध झालेल्या धर्म, नीतितत्व व तत्त्वज्ञान या विषयांवरील 37 ग्रंथांची सूचीही दिलेली आहे.

11. **जगातील विद्यमान धर्म (ऐतिहासिक व तौलनिक समीक्षा)** : अनुवादक - रा. ब. आठवले (इ.स. 1935) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतील 240वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा 'The World's Living Religions' या पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे. ग्रंथाच्या सुरुवातीसच भाषांतरकाराची प्रस्तावना असून, मूळ ग्रंथकाराची चौदाव्या मुद्रणाची प्रस्तावनाही त्याला जोडलेली आहे. दोन्हीतही धर्माच्या व्याख्या 'ईश्वराशी संबंध ठेवून तद्वारा मानवी जीवनातील तत्त्वांशी तुलना करण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच धर्म' - (Pa. 19)

तौलनीक धर्माभ्यासाच्या योगाने अभ्यासकाला अनेक स्पृहणीय लाभ होत असल्याने अशा तऱ्हेचा अभ्यास देशी भाषांतील साहित्याचे द्वारा सुरु व्हावा ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे. तथापि अभ्यासकाला साहाय्य करणारे असे, धर्मांचे तौलनिक ज्ञान करुन देणारे, ग्रंथ देशी भाषांतून विशेषतः मराठीत फारसे निर्माण झाले नाहीत. तेव्हा मराठीत ह्या विषयावरील स्वतंत्र व प्रामाणिक ग्रंथाचे अभावी इंग्रजी सारख्या समृद्ध साहित्यातून अभिजात ग्रंथ घेऊन त्याचा अनुवाद वाचकांना सादर करणे अगत्याचे आहे. हीच दृष्टी ठेवून श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड बडोदानरेश यांनी प्रस्तुत सुंदर ग्रंथाचा देशीभाषेत अनुवाद व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली. केवळ त्यांच्या या उत्कट इच्छेमुळेच हा अनुवाद झाला आहे.

सुरूवातीस अनुक्रमणिका असून त्यात एकंदर 13 प्रकरणात, 1) प्रास्ताविक प्रकरण (धर्म व त्याची विविध स्वरुपे), 2) दक्षिण आशियात जन्मलेले धर्म (हिंदुस्तान) या सदराखाली 2) हिंदूधर्म, 3) जैनधर्म, 4) बौद्धधर्म, 5) शीखधर्म, 3) पूर्व अशियात जन्मलेले धर्म (चीन व जपान) या सदराखाली 6. कानफ्यूशियन धर्म, 7. टाओ धर्म, 8. शिंटो धर्म, 4) पश्चिम अशियात जन्मलेले धर्म (पॅलेस्टाईन, इराण, अरबस्तान) या सदराखाली 9) युहुदीधर्म, 10) झोरास्ट्रियन उर्फ पारशी धर्म, 11) इस्लाम

अथवा मुसलमान धर्म, 12) ख्रिस्ती धर्म, 13) विद्यमान धर्मांची संक्षिप्त तुलना....इ प्रकरणात धर्मविषयक चर्चा आलेली आहे. शेवटी तीन परिशिष्टे असून त्यात धर्मातील वैशिष्ट्याचे कोष्टक असून उपयुक्त संदर्भग्रंथांची नावे व उपयुक्त प्रश्नांचा संग्रह असून ही परिशिष्टे अत्यंत मौलिक आहेत.

प्रस्तुत ग्रंथात एक विद्यमान धर्म घेऊन ग्रंथकाराने प्रथम त्याचे इतर धर्मांशी तुलना करुन काल व संख्या या दृष्टीने स्थान निश्चित केले आहे. त्यानंतर त्या धर्मातील प्रमाण ग्रंथाविषयी त्याने थोडक्यात माहिती दिली आहे. त्यापुढे त्या त्या धर्मांतील विविध अंगांचे थोडक्यात विवरण आले आहे. मग त्या धर्मातील तत्त्वज्ञान व त्याचे इतर धर्मांहून वैशिष्ट्य याविषयी ग्रंथकाराने मननीय विवेचन केले आहे. इतके झाल्यावर, त्या त्या धर्मातील विशिष्ट आचारांचे त्याने वर्णन केले आहे व त्या धर्माचे प्रचलित स्वरुप काय आहे याचा थोडक्यात निर्देश केला आहे. आणि शेवटी त्या धर्मातील ठळक गुण व अवगुण यांचा त्याने क्रमशः उल्लेख केला आहे. या गुणावगुणांची यादी देत असता ग्रंथकाराचे स्वतःचे त्या धर्माविषयींचे मत आले आहे.

संपूर्ण विवेचनात वस्तुनिष्ठ चिकित्सा व धर्माभ्यासाला असलेले समाजकल्याणलक्षी हेतूरुप जाणवत राहते. उदा. ''सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्याला प्रथम लाभ हा होतो की त्याला समतोलपणाची वृत्ती प्राप्त होते. आमचाच धर्म काय ते श्रेष्ठ व इतर सर्व धर्म गचाळ व दोषांनी भरलेले ही संकुचित व वृथाभिमानाची दृष्टी धर्माच्या अभ्यासकाला कधीही बाधू शकत नाही'', ''तसेच धर्म एकाच स्वरुपाचे आहेत, नव्हे एकच आहेत. मात्र तो एकच धर्म परिस्थितीवशात निराळा भासतो'' हे निष्कर्ष साधार, पुराव्यासहित मांडलेले आहेत.

तौलनिक अभ्यासात उपयुक्त (धर्माच्या संदर्भात असली तरी) अशी अनेक तत्त्वे प्रस्तुत ग्रंथात असून आद्य तुलनात्मक अभ्यास म्हणून त्याकडे पाहता येते.

''अशा तऱ्हेचा अभ्यास देशी भाषांतील साहित्याचे द्वारा सुरु व्हावा (म्हणजे तौलनिक धर्माभ्यास) ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे'' (P. 15) यातूनही देशीभाषातून अनेक प्रगत अध्ययन शाखा निर्माण व्हाव्यात हा महाराजांचा हेतू लक्षात येतो.

हा ग्रंथ विद्यमान धर्मांविषयीच्या अनेकविध माहितीचे एक भांडागारच आहे. सामान्य वाचकांना या गोष्टीचा प्रत्यय हा ग्रंथ वाचताना पदोपदी येतोच, पण तुलनात्मक धर्मशास्त्राच्या अभ्यासकाला यातील माहिती अपूर्व वाटण्यासारखी आहे.

12. **जगातील काही धर्मप्रवर्तक**- ले. डॉ. भालचंद्र चिंतामण लेले, (इ.स. 1936) यांचे 'श्री सयाजी साहित्यमालेतून' 244 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर पुस्तकातील निवेदनावरून 1932 साली C.F. Potter यांच्या 'The Story of Religion' या पुस्तकाचा अनुवाद प्रत्यक्ष श्रीमंत महाराज सयाजीराव यांच्या आज्ञेवरून करण्यात आल्याचे सांगितले आहे.

''तुलनात्मक धर्मशास्त्र हा विषय श्रीमंत महाराजसाहेबांच्या आवडीचा आहे. विशेषतः निरनिराळ्या धर्मातील मूलभूत तत्वें काय आहेत याची माहिती सर्वांस असावी अशी त्यांची तीव्र इच्छा आहे. कारण त्याशिवाय इतर धर्मांबद्दल आदर व संहिष्णुता असणे शक्य नाही.'' आणि यासाठी असे ग्रंथ हवे असे राजाला वाटल्यामुळे हे भाषांतर करवून घेतल्याची माहिती लेखकाने दिली आहे.

ग्रंथात लेखकाने म्हटल्याप्रमाणे मूळ ग्रंथाचे शब्दशः भाषांतर करण्याचा प्रयत्न सर्वत्र प्रयत्न केलेला नाही. तसेच सामान्य वाचक वर्गास उपयुक्त होणार नाहीत असे काही किरकोळ भाग गाळले आहेत. आधुनिक काळातील इंग्लंड व अमेरिकेतील काही धर्मोपदेशक यांच्याबद्दलची मूळ पुस्तकातील माहिती त्रोटक असून धर्माच्या इतिहासाला फारशी महत्त्वाची नसल्यामुळे या अनुवादात ते प्रकरण गाळले आहेत.

प्रस्तुत ग्रंथात 18 प्रकरणे आहेत त्यात अनुक्रमे ख्रि.पू. 1388 मधील 1. आखेन आटेन पासून 2. मोझेस, 3. झरतुष्ट्र, 4. जेरेमिआ, 5. बुद्ध, 6. कॉनफ्यूशिअस्, 7. जीझस् क्राइस्ट, 8. पॉल, 9. ऑगस्टाईन, 10. पॅट्रिक, 11. महंमद, 12. ॲक्विनास, 13. नानक, 14. ल्युथर, 15. काही धर्मसुधारक, 16. निकन या इ.स. 1605 मधील धर्म संस्थापक व धर्मसुधारकांची माहिती दिली आहे. 16 व्या प्रकरणापुढे संस्थापक नसलेल्या काही धर्मांची माहिती दिली आहे.

सदर पुस्तकात आखेन आटेन या ख्रिस्तपूर्वी अंदाजे 2000 वर्षे आधी जन्मलेल्या या इजिप्तमधील धर्मप्रवर्तकाला लेखकाने एक आश्चर्य मानले आहे. उत्क्रांतिच्या क्रमामध्ये त्याचा जन्म धरता येत नाही, कारण त्याचे विचार त्याचा काळाच्या जवळजवळ हजार वर्षे पुढे होते. तो जगातील पहिला एकेश्वरवादी, पहिला शांततावादी, पहिला सत्यवादी होता. पण सोक्रेटिस प्रमाणे बुद्धिमत्ता असणाऱ्या या राजाला प्लेटोसारखा अनुयायी मिळाला नाही, म्हणून त्याचे कार्य अज्ञात राहिले. असे लेखक म्हणतो. कॉन्फ्यूशिअस या चिनी तत्त्ववेत्याचे नाव 'कॅग-फ-झी' से असून पाश्चात्यांनी त्याला कॉन्फ्यूशिअस असे रोमन नावाशी साधर्म्य असणारे नाव दिले. 'कॅग' याचा अर्थ शिक्षक आहे असे लेखक म्हणतो.

प्रत्येक महात्मा दैवी प्रकाशाचा उल्लेख करतो हे सांगताना पॉल, मोझेस, बुद्ध व जीझस यांची उदाहरणे घेतली आहेत.

सदर पुस्तकतील 17व्या प्रकरणामध्ये शास्त्रीय युगामध्ये धर्माचे भवितव्य काय असेल याची चर्चा केली आहे. रसायनशास्त्र यांच्यातील अद्‌भुताचा भाग संपल्यानंतर त्यांची प्रगती झाली, त्याप्रमाणे धर्मशास्त्रातील हा भाग गेला, तरच त्याची प्रगती होईल असे म्हटले आहे.

शेवटच्या 18व्या प्रकरणामध्ये ग्रीक, हिंदु, बॅबिलोनियन, ॲसिरियन, इजिप्शियन इ. संस्थापक नसणाऱ्या धर्मांची थोडक्यात ओळख दिली आहे.

धर्मप्रवर्तक शब्दाचा अर्थ लेखकाने पहिल्या प्रकरणातच तळटिपेत दिला आहे.

''एखाद्या मनुष्याला धर्मविषयक बाबतीत प्राप्त झालेला अनुभव जेव्हा तो इतरास समजावून सांगतो व तोच अनुभव त्यास प्राप्त करून देतो, तेव्हा एखाद्या धर्माची सुरुवात होते. प्रत्येक धर्माचा उगम अशाच रीतीने झालेला आहे.

जगातील धर्मप्रणेत्यांची चरित्रे सांगून त्यांनी प्रस्थापित केलेल्या धर्ममतात त्यांचा संगतिपर अथवा विरोधपर आत्मानुभव कसा प्रतिबिंबित झाला आहे हे दाखवणे, हा धर्माचा इतिहास सांगण्याचा उत्कृष्ट मार्ग आहे.'' (Pa. 1)

तुलनात्मक धर्मशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असा हा ग्रंथ आहे.

13. **बुद्धकालीन भारतीय समाज**- अनुवादक श्री. नारायण गोविंद कालेलकर (1936) यांचा हा ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेत 246 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा रिचर्ड फिक या जर्मन प्राच्यविद्यापंडिताने लिहिलेल्या Die Sociale Gliederung im Nordostlichen Indien Zu Buddhas Zeit या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या डॉ. शिशिरकुमार मैत्र यांनी केलेल्या इंग्रजी भाषांतराचा मराठी अनुवाद आहे. जातकग्रंथांच्या सूक्ष्म तत्कालीन समाज परिस्थितीचे जे काही ज्ञान उपलब्ध होते, त्यावर हा ग्रंथ लिहिण्यात आलेला आहे. तसेच ज्या भारतीय समाजाविषयी जातकातून माहिती उपलब्ध होते त्या समाजाच्या भौगोलिक मर्यादा मगध व त्याच्या आसपासचा काही प्रदेश एवढ्या पुरत्याच घ्यावयास हव्या, म्हणजे उत्तर हिंदुस्तानाच्या पूर्वेकडील प्रदेश अशी व्याप्तीची कक्षाही आखून घेण्यात आली आहे.

प्रस्तावनेत जातक कथांविषयी स्पष्टीकरण, वर्णिलेले विषय, जातककथांच्या कालाविषयी चर्चा आलेली आहे. या ग्रंथातील मुख्य विवेचनाचा भर सामाजिक परिस्थिती व जातिसंस्था या दोन मुद्दांवर असून विषयांतराचा प्रसंग क्वचितच आलेला आहे.

प्रस्तुत ग्रंथाला अनुक्रमणिका असून एकंदर 12 प्रकरणातून विषयाची मांडणी केली आहे. त्यात 1. विषयप्रवेश, 2. जातीविषयी सामान्य विचार, 3. परिव्राजक, 4. खत्तिय वर्ग, 5. राजन, 6. राजाचे अधिकारी, 7. राजपुरोहित, 8. ब्राह्मण, 9. प्रतिष्ठित मध्यमवर्ग, 10. व्यापारी व कारागीर यांचे संघ, 11. सार्वजनिक धंदे, 12. तिरस्कृत जाती इ. असून शेवटी पालि-मराठी शब्दकोश दिलेला असून तो अत्यंत उपयुक्त आहे.

भारतवर्षाच्या प्राचीन परिस्थितीचे यथार्थज्ञान केवळ हिंदु ग्रंथ वाचूनच होणे शक्य आहे, ही भ्रामक कल्पना नष्ट होत आहे. त्यासाठी बौद्ध, जैन अथवा परराष्ट्रीय वाङ्मयातून माहिती संकलित करणे आवश्यक. कारण हिंदु धर्मग्रंथातून वस्तूस्थितीचे यथार्थ वर्णन फारसे नाही. पृ. 2 वरील विवेचन

महत्त्वाचे आहे. वाङ्मय ब्राह्मणविरोधी बौद्धधर्माचे जेथे वर्चस्व आहे. त्या प्रदेशात या तत्त्वाला प्रतिकार म्हणून खत्तियांना सर्वश्रेष्ठ ठरविण्यासाठी निर्माण झाले असावे असा तर्क केला आहे. खत्तियांचे पूर्वभारतातील हे वर्चस्व आणि तदुनुरोधाने तेथे दिसून येणारी ब्राह्मणांच्या तत्वांची अवनतावस्था पालिवाङ्मयाच्या प्रत्येक अभ्यासकास दृष्टीत्पत्तीस येते. हा महत्वाचा निष्कर्ष आढळतो. (पृ. 67)

प्रस्तुत ग्रंथातील प्रकरण 12वे 'तिरस्कृत जाती' हे सर्वात महत्त्वाचे प्रकरण आहे. भारतातील जातिविषयक संशोधन करणाऱ्यास यात अत्यंत महत्वाचे पुरावे मिळू शकतात. वंश भिन्नता, अनार्य यांना हीन जातित ढकलण्याची प्रक्रिया कशातऱ्हेने घडली याची प्रक्रिया वर्णन केली आहे. उदा. ''हस्त कौशल्याच्या धंद्यांचा त्याग करून आर्यांनी त्यावर हीनत्वाचा शिक्का मारला.'' (Pa. 268) ''बौद्धधर्माने जातिभेदाचा नाश तर केला नाहीच पण जातिभेदाच्या प्रसृत होणाऱ्या तत्त्वांना आळा घालण्याचा प्रयत्न देखील त्याने केला नाही.''(Pa. 276, 277) हे निष्कर्ष बौद्धधर्मीय अभ्यासकांसाठी विवादस्पद स्वरूपाचे ठरू शकतात.

पालि वाङ्मयाचा अभ्यास करण्याची उत्सुकता वाचकांना होईल, तसेच भारतातील जातिविषयक संशोधन करणाऱ्यांस सदर ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे.

14. **भारतीय समाजस्थिति** - (वात्स्यायनकालीन)- अनुवादक- प्रो. वि. पां. दांडेकर, यांचा हा ग्रंथ 'श्री सयाजी साहित्यमालेत पुष्प 248वे म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथ हा 'सोशल हिस्टरी इन एन्शंट इंडिया, स्टडीज इन वात्स्यायनाझ कामसूत्राझ'. या सर्वच भागाचे विवेचन आलेले नसून तत्कालीन समाज कशा स्वरूपाचा होता, याचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे.

वात्स्यायन हा तिसऱ्या शतकाच्या मध्यात केव्हातरी होऊन गेला. त्याने ज्यावेळी आपल्या कामसूत्रांची रचना केली त्याकाळी आभीर राजांचा सर्वत्र उत्कर्ष होत होता. याच काळात भारतीयांचा एकीकडे रोमन साम्राज्य व दुसरीकडे चीन देश अशा दोघांशी जलमार्गाने तसेच जमिनमार्गाने पुष्कळच व्यापार चालत असे. या आर्थिक भरभराटीच्या काळात वात्स्यायनाने आपला ग्रंथ लिहिल्यामुळे त्यात सर्वत्र ऐश्वर्य, सुबत्ता, विलास, क्रीडा यांचे वातावरण पसरलेले आहे.

सदर ग्रंथात अनुक्रमणिका असून एकंदरित पाच प्रकरणांतून प्रस्तुत विषयाचे वर्णन केले आहे. त्यात प्रथम लेखकाची प्रस्तावना, प्रकरण 1. कामसूत्र रचनाकाल, 2. वात्स्यायनाचा भूगोल, 3. हिंदुस्थानची सामाजिक परिस्थिती- 1. जाती व धंदे, 4. हिंदुस्थानची परिस्थिती 2. विवाह आणि अनुनय, 5. हिंदुस्थानची सामाजिक परिस्थिती- 3. नागरिकाचे जीवन, तसेच उपसंहार आहे.

'वात्स्यायनाचा भूगोल' या प्रकरणात वात्स्यायनाच्या काळी हिंदुस्तानची भौगोलिक मर्यादा कोठपर्यंत होती त्याचे वर्णन आलेले आहे.

तिसऱ्या प्रकरणात वात्स्यायनकालीन जाती व धंदे या संबंधी माहिती दिलेली आहे. धर्मशास्त्र आणि इतर धार्मिक वाङ्मयाप्रमाणे वात्स्यायनच्या ग्रंथातहि हिंदुसमाजाची विभागणी चार वर्ण किंवा जाती यात आणि व्यक्तिच्या आयुष्याची विभागणी, चार आश्रमात केलेली आढळते. वात्स्यायन हा वर्णाश्रमधर्माचा पुरस्कर्ता व जातीसंस्था टिकावी या मताचा होता. विवाह हा शक्यतोवर सजातीय वधूशी किंवा वराशी करावा, या मताचा हा मोठा पुरस्कर्ता होता.

'विवाह आणि अनुनय' ह्या चौथ्या प्रकरणात विवाह केव्हा करावा, कोणाशी करावा वधू कशी असावी, वर कसा असावा वगैरे गोष्टींचा विचार केला आहे.

'नागरिकाचे जीवन' ह्या प्रकरणात नागरक किंवा नागरिक याची दिनचर्या दिलेली आहे. त्यावरून तो सुखासीन चैनी, विलासी, कलाप्रिय, संवादकुशल, असा असावा असे वाटते. उदा. त्याच्या घरात जिकडे तिकडे स्वच्छता सौदर्य आढळे. अत्तरांचा घमघमाट व फुलांचा सुवास त्याच्या घरात पसरलेला असे. अशा त्या काव्यमय वातावरण नागरक एखादा काव्यग्रंथ वाचण्यात किंवा वीणेच्या तारा छेडण्यात आपला काळ घालवी.

वात्सायनकालीन समाज हा अशा रीतीने संपूर्णजीवन (Fulness of life) जगत असल्याचा दाखला कामसूत्रावरून मिळतो.

कामशास्त्रासारख्या महत्त्वाच्या शास्त्राचा काळजीपूर्वक अभ्यास अलीकडे होऊ लागला आहे. पण प्राचीन काळीही सूक्ष्म तार्किका प्रमाणे या शास्त्राकडे पाहणारा वात्स्यायनच होय. त्याच्या

ग्रंथाविषयीचे हे विवेचन प्रत्येक विषयाला शास्त्रीयता आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या विचाराने प्रस्तुत पुस्तकाचे भाषांतर केले आहे. रतिशास्त्रावरील प्राचीन ग्रंथांचा उल्लेख तसेच धर्म-मनू, अर्थ-बृहस्पति, काम-महादेव-सेवक नंदी. नंदीकृत कामशास्त्राचा सारांश उद्दालपुत्र श्वेतकेतु याने काढला तर पाचांलदेशातील श्वेतकेतुच्या ग्रंथाचा सारांश ब्राभ्रव्याने सात खंडाच्या दीडशे प्रकरणावरून काढला. यातील प्रत्येक खंडावर स्वतंत्रपणे लेखन होत असलेले पाहून वात्स्यायनाने संबंध शास्त्राची एकेच ठिकाणी माहिती देण्याचा विचार केला. कामसूत्र-बनारस आ. पृ. 381 यावरील संदर्भ बाभ्रव्याची जेथे भरभराट झाली त्या पांचाल देशात रतिशास्त्राचा खास अभ्यास होत असावा. पांचाली द्रौपदीच्या बाबतीत दिसून येणारे बहुपत्नीत्त्व हे पांचाल देशात चालू असणाऱ्या प्राचीन विवाह संस्थेचे द्योतकच होय. स्वतः पांडव हे समजातीय म्हणजे कुरुपांचाल असल्यामुळे त्यांना पांचाल देशातील ही विवाह पद्धति माहित होती, याबाबतीत वात्स्यायनाचे एक म्हणणे महत्त्वपूर्ण आहे. तो म्हणतो की पांचाल देशस्थ बाभ्रव्यानुयांच्या मताप्रमाणे एखाद्या स्त्रीला तिच्या पतिव्यतिरिक्त दुसरे पाच प्रियकर असले तर तिचे शील ठीक नाही असे मानण्यात येई. वात्स्यायनच्या सांगण्याचा भावार्थ असा की, एखाद्या स्त्रीच्या शीलाच्या बाबतीत पाच प्रियकर ही कमालीची मर्यादा त्यावेळी समजली जाई. पाच प्रियकरांच्या बाबतीत पांचाल देशस्थांनी दाखविलेला हा उदारपणा सूचक आहे.

मनुस्मृतीला आलेले आजचे स्वरूप वात्स्यायनकालीन असल्याचे म्हटले आहे.

भौतिक समृद्धिच्या काळातील शहरातील व्यक्तिचे आयुष्य वात्स्यायनाच्या नागरकाच्या दिनचर्येतून दिसते. त्याच्याशी आजच्या माणसाची तुलना उपसंहारात केली आहे.

वास्यायनाने जो आदर्श लोकांसमोर ठेवला आहे त्यात धर्म, अर्थ आणि काम यांचे सुंदर मिश्रण आलेले आहे. सम्यक् ज्ञानी मनुष्याने नेहमी आपले आचरण असे ठेवावे की, त्या आचरणापासून सुख मिळावे, अर्थप्राप्ती व्हावी आणि इतके होऊनही धर्माविरूद्ध ते नसावे. ज्या कामना धर्माविरूद्ध नसतात त्यांच्या ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व असते असे भगवद्गीतेत जे सांगितले आहे, तसेच वात्स्यायनाचे देखिल मत होते. मनुष्याचे त्रिविध हेतू धर्म, अर्थ आणि काम हे परस्परांना उपकारक

होऊन सिद्ध व्हावेत आणि शेवटी मनुष्याला मोक्ष मिळून त्याच्या आत्म्याची उन्नति व्हावी हेच वात्स्यायनाच्या ग्रंथाचे सार होय. कामशास्त्रासंबंधीचा हा ग्रंथ मानवी अस्तित्वाशी निगडित असा कामक्रिया व्यापारांकडे एकाचवेळी, सौंदर्यात्मक अन् भारतीय जीवन मूल्यांच्या संदर्भात पाहात मनुष्यजीवनाच्या परिपूर्णतेचा विचार करू पाहतो.

15. **पुनर्जन्म विरूद्ध पुनर्जनन** - (Rebirth vs Reproduction) (1937) (पूर्वखण्ड) ले. भारद्वाज यांचा हा ग्रंथ 'श्री सयाजी साहित्यमालेत' 250 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

ग्रंथनाम असलेल्या पृष्ठावरच 'सातत्य हे पुनर्जन्म द्वारा असिद्ध, पण पुनर्जनन द्वारा संभाव्य असल्याचे प्रतिपादन करणारा ग्रंथ अशी व्याख्या केली आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्ये पूर्वजन्माच्या कल्पनेचा इतिहास, भूगोल, त्याची सार्वत्रिकता, त्याच्या संबंधीचे नचिकेत-यम, अर्जुन-कृष्ण वगैरेमधील संवाद, पुनर्जन्माची प्रसिद्ध उदाहरणे, पुनर्जन्म-वाङ्मय आणि व्यावहारिक जीवित यांचे परस्पर संबंध यांचे सामान्य विवरण उपोद्घातात आले आहे. पुढे क्रमाक्रमाने विषयप्रवेश करण्याच्या हेतूने ज्या आत्म्याच्या पुनर्जन्माचा विचार करावयाचा त्याच्या स्वरूपाविषयीच्या महत्वाच्या कल्पनांचा निर्देश, पूर्वजन्म व पुनर्जन्म यांच्या दरम्यानची महत्वाची अवस्था असलेल्या मृत्यूचा विचार, पुर्नजन्म-प्रक्रियेचा तपशील, व्याख्या, महती, निरनिराळे विवाद यांचे विवेचन येते. तर दुसऱ्या भागात तीन अध्यायांमध्ये भूमिका-संशोधनामध्ये जीवितविचार, ईथर, जगाचे उद्गम स्थान शोधण्याचे उपनिषदामधील प्रयत्न, ब्रह्म, उत्क्रांतिवाद यांबरोबरच जनन-जीवन-संयोग-मीमांसा केलेली आहे. 'अनुहरणशास्त्रा'चा (Genetics or Science of Heredity) विचार येथे प्रथमच ओझरता का होईना मांडला आहे. पुर्नउत्पत्ती घडवून आणणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे हा विचार 'पुनर्जनना'च्या मूळाशी असल्याचे म्हटले आहे. येथवर मानवी जीविताच्या जड भागाचा सामान्य विचार केल्यावर नंतर मानसशास्त्राचे खंडित दर्शन घडविले आहे.

सदर ग्रंथात पारिभाषिक शब्द देणे अपरिहार्य असल्याने मूळ इंग्रजी शब्द व त्याला योजिलेले मराठी प्रतिशब्द, यांचा खुलासा दिला आहे. (Pa. 603...)

| | | |
|---|---|---|
| उदा. अणुभार | - | Molecular weight |
| अनभिभवनीयता | - | Immunity |
| गर्भाद्य-कल | - | Zygote |
| कोशावस्था | - | Pupal Stage |
| मज्जामार्ग | - | Narve-track-path |
| रजःकल | - | Egg Cell |
| रजांग | - | Chromosome इ....... |

अनेक प्रासंगिक व अप्रासंगिक मुद्यांचा विचार करुन सदर ग्रंथ लिहिला आहे. पुनर्जन्म नसल्यास 'व्यक्ति मेली की तिची कथा संपते' पण पुनर्जनन असल्यास व ते आहे असे सिद्धांतरुपाने सदर ग्रंथात प्रतिपादिले आहे. म्हणूनच ''प्रजासंवर्धन ही मुख्य गोष्ट''असे ग्रंथकारास वाटते.

सदर ग्रंथाला प्रस्तावना नसून ग्रंथकर्त्याचे निवेदनच सविस्तर दिले आहे. त्याशिवाय प्रो. चिंतामण गंगाधर भानू यांचा आर्शिवादही समाविष्ट करण्यात आलेला आहे.

पारंपारिक, विज्ञाननिष्ठ व शास्त्रीय दृष्टिकोनातून स्वीकार्य अशा तत्त्वज्ञानपर जुन्या संकल्पना ऐवजी विज्ञाननिष्ठ संकल्पनांचा विचार मांडून समाजाला वैज्ञानिकतेकडे वळविण्यासाठी सदर ग्रंथ महत्त्वाचा आहे.

16. **प्राच्य आणि पाश्चात्य नीतिध्येये** (1937): भाषांतरकार - श्री चिंतामण गणेश कर्वे, यांचा हा ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेत 252वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत भाषांतर डॉ. के. सॉन्डर्स यांच्या 'The Ideals of East and West' या ग्रंथाचे आहे. ''बडोद्याचे महाराज हिज हायनेस सयाजीराव गायवाड यांच्या सूचनेवरुन हे पुस्तक लिहिण्यास घेतले व याचा उद्देश, ज्या या संक्रमणकाळात इतर प्रत्येक परंपरागत गोष्टीप्रमाणे नैतिक ध्येयेहि कसोटीला लावली जात आहेत, त्या काळाला हे उपयोगी पडावे हा आहे'', ''ज्या योगाने आचरण उच्च होण्याचा संभव आहे ते सतत चालू ठेवावे असे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात मो-त्से नावाच्या

थोर चिनी लोकहितवादीने म्हटले आहे.''

अशी ग्रंथकर्त्याची प्रस्तावना सदर पुस्तकात दिली आहे. ''श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांना, अशा पुस्तकांतील शिकवण आपल्या देशातील जनतेस मिळून तिच्यात उच्च नैतिक प्रवृत्ति आणि ऐक्यभाव ही वाढावीत अशी सारखी तळमळ लागून राहिलेली असते'' असे भाषांतरकाराचे निवेदन अत्यंत महत्वाचे आहे.

हिंदुस्थान, चीन, जपान, ग्रीस आणि जुडिया या प्राचीन राष्ट्रातील नीतिधर्माचा विकास कसा झाला व त्यांच्या उच्च विचारात पुढे पुढे कसे साम्य येऊ लागले, तरीहि प्रत्येकाचे वैशिष्ट्य कसे कायमच राहिले, यासंबंधी सुबोध माहिती, सोदाहरण, ग्रंथकाराने दिली आहे. तसेच नैतिक आणि धार्मिक विचारातील शेवटचा पल्ला येशू ख्रिस्ताने कसा गाठला व त्याचा सेवाधर्म आज जगात कसा प्रभावी ठरत आहे, त्याचे सुंदर विवेचनहि त्यांनी केले आहे. आपल्या विधानांच्या पुष्टीसाठी आणि धर्म-नीतिविकासाच्या सर्व पायऱ्या वाचकांस स्पष्ट सापडाव्यात यासाठीहि, प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्यांनी प्रत्येक राष्ट्राच्या अभिजात वाङ्मयातील उतारे दिले आहेत.

इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर शक्य तितके जसेच्या तसे केले आहे त्याबरोबरच सुबोध करण्याचा प्रस्तुत लेखकाने प्रयत्न केला आहे. काही थोडे उतारेच फक्त संक्षेपाने भाषांतरित केले आहेत. संस्कृत वाङ्मयातील उताऱ्यांचे भाषांतर ग्रंथातील इंग्रजीवरुन प्रत्यक्ष न करता मूळ संस्कृतावरुन केल्याचे भाषांतरकाराने नमूद केले आहे. बायबलमधील उतारे मूळ उत्कृष्ठ भाषांतरीत बायबलवरुन घेतले आहेत.

अनुक्रमणिकेत 6 प्रकरणे असून त्यात भाषांतरकाराचे निवेदन, ग्रंथकर्त्याची प्रस्तावना, असून सदर ग्रंथाची रचना करताना एफेसस नगरातील एका संध्याकाळी एका ज्यू व्यापाऱ्याच्या घरी चिनी, हिंदू, ग्रीक मित्र जमून या नीतिशास्त्राच्या ध्येयांची चर्चा करतात अशी कल्पना करुन प्रवेशक असे नाव दिले आहे. पुढे 6 प्रकरणांमध्ये, 1. भरतखंडाचे नीतिशास्त्र, 2. चिनी लोकांचे नीतिशास्त्र, 3. जपानी लोकांचे नीतिशास्त्र, 4. ग्रीक लोकांचे नीतिशास्त्र, 5. हिंदू लोकांचे नीतिशास्त्र, 6. ख्रिस्ती

नीतिशास्त्र इ. मध्ये विषयाची विभागणी केली आहे.

उपसंहारात चंग अन् येथील बैठक याचे विवेचन आहे. मूळ ग्रंथकाराची मते काही ठिकाणी चुकीची वाटल्यास ती खोडून न काढता तसेच भाषांतर केले आहे.

शेवटी ग्रंथसूची व ग्रंथातील संज्ञाचे इंग्लिश शब्द (मूळ) दिले आहेत.

17. **धर्म : उद्गम आणि विकास** - अनुवादक - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी (इ.स. 1937) - यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतील 255वे पुष्प प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदर ग्रंथ हा प्रो. जी. एफ. मूर यांच्या 'The Birth & Growth of Religion' ह्या ग्रंथाचे भाषांतर आहे. सदर ग्रंथाचे भाषांतर करण्याची आज्ञा 'आम्हास बडोदे सरकारकडून झाली' असल्याचे अनुवादकर्त्यांने सांगितले आहे. अनुवादकाने आपली भूमिका मांडलेली असून ती अनुवाद कामाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. ''वेदान्त, धर्म व नीति ह्या तिन्ही संबंधीचा हा विषय असल्यामुळे मूळ ग्रंथाचे भाषांतर शब्दशः करणे बरेच कष्टाचे झाले. पाश्चात्य परिस्थितीला योग्य अशी उदाहरणे मुळात होती. अनुवाद करताना मूळ ग्रंथकाराची भूमिका न सोडता आपल्या इकडील परिस्थितीस पटतील अशा प्रकारची उदाहरणे'' देण्याचा लेखकाचा प्रयत्न मौलिक आहे.

प्रस्तुत ग्रंथात मूळ ग्रंथकाराची प्रस्तवनाही भाषांतर करुन दिली आहे. प्रस्तुत विषय वेदान्तशास्त्रदृष्ट्या जसा उपयुक्त तसाच तो मानवशास्त्रदृष्ट्याही मौलिक असल्याचा निर्देश आहे.

आरंभीचे विषय व त्यानंतर 9 प्रकरणात हा विषय विभागलेला आहे. त्यात 1. धर्मपूर्व अवस्था आणि धर्माची प्राथमिक तत्त्वे, 2. आत्मा व जीवनत्त्व, 3. देवदेवतांची उत्पत्ति, 4. नीति आणि धर्म, 5. उच्च संस्कृतीचे धर्म, 6. मरणोत्तर अवस्था, 7. मोक्षमार्ग, 8. मोक्ष, धर्म आणि वेदान्त आणि शेवटचे 9वे प्रकरण सूचीचे आहे.

अनुवादाच्या दृष्टीने आपल्याकडील परिस्थितीस पटतील अशी उदाहरणे देण्याचा प्रयत्न अनुवादकर्त्याच्या व अनुवादकामाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. उदा. होमहवनात होणारे बळी,

त्यासंबंधी सामान्य कल्पना अशी की ती देवादिकांना दिलेली दाने-देणग्याच होत. ज्यांनी आपल्या उत्पन्नात वाढावा दिला त्या देवांना जमिनीतील पहिल्या उत्पंनाचा-पिकाचा अंशभाग अर्पण करणे किंवा ज्याच्या कृपाप्रसादामुळे आपला वंशवेल वाढला त्या देवाला आपले पहिले मूल बळी देणे.... (Pa. 64)

तसेच ज्या इंग्रजी शब्दांचे संकेत मराठीत उत्पन्न झाले नाहीत तेच शब्द, मराठी प्रतिशब्दांच्या पुढे कंसात दिले आहेत. असे शब्द दोन-तीनच आहेत. उदा. आत्मा - (Logos) (Pa. 203)

धर्माच्या उत्क्रांतिसंबंधी बनलेली लेखकाची मते संक्षेपाने मांडण्याचा प्रयत्न सदर ग्रंथात केला आहे.

18. **शीघ्र साहित्यादर्श** : ले. वासुदेव कृष्ण भावे (इ.स. 1939) यांचे हे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेतून 263वे पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदर पुस्तकाच्या सुरुवातीलाच काही संदर्भ ग्रंथांची नावे दिली आहेत.

'ग्रंथाविषयी' या आपल्या प्रस्तावनापर लेखनात प्रस्तुत ग्रंथाच्या आधीचे प्रयत्न कोणते होते त्यांची नावे दिली आहेत. उदा. श्री. रा. टिकेकर यांनी 'बातमीदार' हे पुस्तक लिहिले. पण त्याचा मर्यादितपणा नावावरुनच कळतो असे लेखकाचे मत आहे. तसेच रा. रामचंद्र गोविंद कानडे यांचा 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' हा ग्रंथ इतिहास असून नियतकालिकावरील विवरणात्मक ग्रंथ नव्हे हे मत नोंदवले आहे.

प्रस्तुत लेखकाने वृत्तपत्र व्यवसायामध्ये 20 वर्षे घालविली आहेत. 'लोकसंग्रह', 'केसरी', 'सह्याद्री' अशा नियतकालिक व वृत्तपत्रांमध्ये काम केल्यामुळे नवीन तरुणांना आपल्या अनुभवाचा लाभ मिळावा हा हेतू प्रस्तुत पुस्तक निर्मितीच्या मागे आहे.

'जरनॅलिझम' या इंग्रजी शब्दाला (1939 पर्यंत) मराठीत प्रतिशब्द नसल्याने लेखकाने 'शीघ्र साहित्य' हा शब्द योजला आहे. वास्तविक या प्रकारच्या वाङ्मयाला कालमर्यादा असते. (वृत्तपत्रे,

नियतकालिके, जुजबी पुस्तके यांच्या मधील वाङ्मयाला) ग्रंथलेखनासारखे हे लेखन सावकाश करता येत नाही. हाताशी असेल त्या सामुग्रीवर हे लेखन उरकावे लागते. म्हणून हा शब्द योग्य असून तो घडवला आहे. 'जरनॉलिस्ट' ला 'शीघ्र साहित्यिक' म्हणावे असे सूचवले आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहिताना अनेक इंग्रजी ग्रंथांचे सहाय्य घेतले आहे, पण त्या बरोबरच स्वानुभवावर अधिक भर दिला आहे. यामध्ये न.चिं. केळकर हे गुरुस्थानी मानून त्यांचा सल्ला घेतल्याचे नमूद केले आहे. तांत्रिकतेपासून ग्रंथ वाचावा यासाठी युरोप, अमेरिका व भारत आणि महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचाही समावेश केला आहे.

या ग्रंथात छपाईसंबंधीचे प्रकरण लोकसंग्रह कराखान्याचे व्यवस्थापक रा. शंकर रामचंद्र दाते यांनी लिहून दिले असल्याचा उल्लेख केला आहे.

पहिल्या प्रकरणात वर्तमानपत्र म्हणजे काय याची व्याख्या देऊन पाश्चात्य वृत्तपत्रे व हिंदुस्थानातील वृत्तपत्रे आणि त्यांचा विकास सांगून निबंधमाला, सुधारक, केसरी, नवाकाळ, ज्ञानप्रकाश इ. वृत्तपत्रांविषयी माहिती दिली आहे.

'वर्तमानपत्र' म्हणजे वर्तमान सांगणारे पत्र पृ. (1) "दैनिक, साप्ताहिक व पाक्षिक वाङ्मयास वर्तमानपत्र ही संज्ञा प्रचलित आहे. त्याहून अधिक मुदतीच्या वाङ्मयास नियतकालिक म्हणतात." (पृ. 300).

अशा तऱ्हेने पुस्तक उपयुक्त आहे.

19. **साहित्यप्रकाश** - (लेख व भाषणे यांचा संग्रह) (इ.स. 1941), लेखक - दाजी नागेश आपटे यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 272वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सन् 1929 साली प्रस्तुत लेखकाच्या लेखांचा व भाषणांचा एक संग्रह 'इंद्रधनुष्य' या नावाने प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर एक तपाने म्हणजे इ.स. 1941 साली सदर ग्रंथ प्रकाशित झाला आहे. यात प्रसिद्ध झालेले लेख सन् 1920 ते 1937 पर्यंतच्या कालावधीतील आहेत. फक्त पहिला लेख

'महाराराष्ट्र धर्म' हा इ.स. 1905 साली पुण्यास श्री शिवराज्याभिषेकाच्या उत्सवाच्या प्रसंगी विद्यार्थ्यीदशेत असताना केलेले भाषण आहे.

या संग्रहात साहित्याच्या - विशेषतः मराठी साहित्याच्या व त्यातील कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यात आला आहे. मराठी वाङ्मय त्याकाळी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत असे, परंतु त्या प्रमाणात त्यावरील विवेचनात्मक व विमर्शात्मक वाङ्मय प्रकाशित होत असलेले दिसत नसे. असे विवेचनात्मक व विमर्शात्मक वाङ्मय वाचकांना व अभ्यासूंना उपयुक्त वाटावे यासाठी हा लेखप्रपंच करण्यात आला आहे.

सदर संग्रहात एकंदर 7 लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. 1. महाराष्ट्र धर्म, 2. काव्यप्रमोद, 3. 'संस्कृत वाङ्मयाचा इतिहास' - परिक्षण, 4. प्रसन्न वाङ्मय, 5. दुखान्त वाङ्मयापून आनंद का होतो ? 6. वाङ्मयाचा पंचकोश, 7. 'प्राचीन महाराष्ट्र' परिक्षण इ. लेख म्हणजे मध्यभारतीय तृतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रसंगीचे लेखकाचे अध्यक्षीय भाषण आहे व 'वाङ्मयाचा पंचकोश' हे मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या अडतिसाव्या वार्षिक समारंभाच्या वेळचे अध्यक्षीय भाषण होय. बाकीचे लेख हे वेळोवेळी निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

सदर ग्रंथाची भाषा अगदी सोपी व सुबोध आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांकरिता हा ग्रंथ उपयुक्त आहे.

20. **मराठी नाट्यसृष्टि** - खंड 1ला - पौराणिक नाटके, (1941) लेखक - विश्वनाथ पांडुरंग दांडेकर, यांचा ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेत 274वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

ॲलरडाईस निकोल यांनी लिहिलेला, 'ब्रिटिश ड्रामा' हा ग्रंथ इ.स. 1927 साली लेखकाच्या वाचण्यात आला. मराठी नाटकांसंबंधी आपण असा काही प्रयत्न करावा, असे वाटल्यावरुन सदर ग्रंथाची रचना झाली आहे. या ग्रंथाचे दोन भाग असून पहिल्या भागात मराठी नाट्यसृष्टीचा संकलनात्मक इतिहास दिला असून उत्तरार्धात मराठीतील उपलब्ध छापील नाटाकांची त्रोटक परीक्षणे दिली आहेत. अशा प्रकारे 400 पानांचा हा ग्रंथ आहे.

''प्रस्तुत ग्रंथात लेखकाने पौराणिक नाटकांची सर्वांगीण चर्चा केली असून ती अत्यंत उदबोधक व मार्मिक आहे. लळिते, तमाशे, कळसूत्री बाहुल्या, दशावतारी खेळ इत्यादिकांची या ग्रंथात आलेली माहिती साधार व सोपपत्तिक असून तिने पौराणिक नाटकांवर नवीन प्रकाश टाकला आहे.'' असे प्रकाशकांनी पुस्तकाच्या मलपृष्ठावर आश्वासन दिले आहे. तर परिचयात लेखकाने म्हटल्याप्रमाणे, ''प्रस्तुत ग्रंथात जी प्रमेये मांडली आहेत, ती मांडीत असताना अस्सल साधनांचा (या बाबतीत नाटके, लळिते, तमाशे, कळसूत्री बाहुल्या यांचा) उपयोग केला गेलेला वाचकांना स्पष्ट दिसेल.'' असे आश्वासन दिले आहे.

सदर ग्रंथाला अनुक्रमणिका असून एकंदर 10 प्रकरणांमधून सदर विषयाची मांडणी केलेली आहे. यात 1. प्रास्ताविक, 2. श्री लक्ष्मीनारायण कल्याण नाटक, 3. मराठी नाटकांचे मूळ, 4. विष्णुदास भावे, 5. किर्लोस्करांच्या पूर्वीची पौराणिक नाटके, 6. अण्णासाहेब किर्लोस्कर, 7. उपसंहार इ. असून 10. उत्तरार्ध (परिक्षणात्मक) (पृ. 177-371) आहे. शेवटी 11. शब्दसूची दिलेली आहे.

आपल्या प्रास्ताविकात मराठी रंगभूमी अस्सल देशी असून कळसूत्री बाहुल्यांमध्ये तिचा उगम असल्याचे लेखकाने म्हटले आहे. कळसूत्री बाहुल्यांचे विनोदक व सूत्रधार पुढे विदूषक व सूत्रधारांच्या रुपाने मराठी नाटकांमध्ये आले. हा संस्कृत नाटकांचा प्रभाव नाही असे लेखक म्हणतो.

नाट्यकलेचे प्राचीनत्व सांगताना ज्ञानेश्वरीतील नाट्यविषयक उल्लेख देऊन दारुयंत्र, साईखेडी म्हणजे लाकडी बाहुल्यांचे नाच, नट, नटी, नाटकी व सूत्रधार यांच्या संबंधीचे अनेक ठिकाणी उल्लेख केले आहेत. 1690 च्या लक्ष्मीनारायण कल्याण नाटकाची पोथी यावरून ज्ञानेश्वरांच्या काळापासून महाराष्ट्रात नाटके लिहिली जात होती असे राजवाड्यांनी अनुमान केल्याचे लेखकाने म्हटले आहे.

इ. स. 1960 च्या सुमारास लिहिले गेलेल्या 'लक्ष्मीनारायण कल्याण' आणि 1843 मध्ये विष्णुदास भावे यांनी लिहिलेल्या 'सीतास्वयंवर' ह्या नाटकांत सुमारे 150 वर्षांचा कालावधि आहे. ह्या कालावधीत काही नाटके कदाचित लिहिली गेली असतील पण पुरावा नाही, असे मत लेखकाने मांडले आहे.

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाटकांच्यापूर्वी के. वि. गोडबोले, परशुरामपंत तात्या गोडबोले, यांची शांकुतलची भाषांतरे, सी. बा. गुर्जर यांनी केलेली भाषांतरे, बाणभट्टाच्या कादंबरीवरुन शि. म. परांजपे यांनी रचलेले नाटक, भासाच्या नाटकांची किरात (कृ. ल. सोमण) इ. संस्कृत नाटकांची भाषांतरे मराठीमध्ये होती. या आदर्शामुळे इतर देशी रंगभूमीच्या तुलनेत मराठी नाट्यसंसाराची सुरुवात व दर्जा उच्चप्रतीचा होता असा निष्कर्ष सदर ग्रंथात काढला आहे. किर्लोस्करांच्या यशाचे रहस्य सागंताना शास्त्रीय व मधुर संगीताचा साज नाटकांवर चढवला. पूर्वी सूत्रधारालाच सर्व पद्याचा भाग सांभाळावा लागे पण किर्लोस्करांनी निरनिराळ्या पात्रांसाठी गाण्याची योजना केली. (त्याआधी सोकर बापूजी त्रिलोकेकर व बजाबा नेने यांनीही ही योजना केली होती पण नाटके चालली नाहीत) किर्लोस्करांनी केलेल्या सुधारणा, त्यांना मिळालेले यश याची चिकित्सा येथे केली आहे.

'किर्लोस्करांचा संप्रदाय' हा भाग विस्तृपणे सांगितला असून त्यामध्ये शामराव भेंडे, गोपाळ केळकर, धुंडिराज शेंबेकर, दत्तात्रय जोगळेकर इ. नाटककारांची नाटके विचारात घेतली आहेत. यामध्ये अनुकरणाची प्रवृत्ती प्रमुख होती हे सूत्र सांगून काही उदाहरणे व काही संदर्भ (नाटकाच्या प्रारंभीच्या भूमिकांचे) दिले आहेत. या सर्वांपेक्षा देवलांचे वेगळेपण लेखकाने सांगितले आहे. कृ. प. खाडिलकर यांच्या पौराणिक नाटकांची स्वतंत्र परिक्षणे दिली आहेत. (कीचकवध, बायकांचे बंड, संगीत द्रौपदी, संगीत मेनका, संगीत स्वयंवर, विद्याहरण इ.) व पौराणिक कथाभागावर आधुनिक विचार पद्धतीने लिहिण्याच्या त्यांच्या तंत्राची स्तुती केली आहे. यानंतर मामा वरेरकर, न. चि. केळकर, ह. ना. आपटे, य. ना. टिपणीस इ. नाटककाराच्या नाटकांचा परामर्श घेतला आहे. नवव्या प्रकरणामध्ये-उपसंहारात या सर्वांचा एकत्रित विचार करुन पूर्वीच्या नाटकांपेक्षा नंतरच्या काळात झालेली सुधारणा दाखविली आहे.

उत्तरार्धामध्ये सुमारे दोनशे नाटकांची परीक्षणे केली आहेत. ही परीक्षणे पूर्वार्धात केलेल्या विवेचनाला आधारभूत असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव या ग्रंथात केला असे लेखकाने नमूद केले आहे. त्यात नलनाटक, वालिवध, श्री भिल्लीणी, रुक्मिणीहरण इ.. नाटकांचे परीक्षण थोडक्यात केले आहे.

त्यांची संख्या एकूण 193 आहे. त्यातच किर्लोस्करांच्या शांकर दिग्विजय, केळकरांच्या कृष्णार्जुनयुद्ध इ. नाटकांचा समावेश आहे.

इ. स. 1690 च्या सुमारास लिहिलेल्या लक्ष्मीनारायण नाटकापासून ते 1940 पर्यंतच्या अडीचशे वर्षांच्या काळात तयार झालेल्या सुमारे दोनशे नाटकांवर छोटी-मोठी परीक्षणे या ग्रंथात असल्याने संदर्भग्रंथ म्हणून अतिशय उपयुक्त असा सदर ग्रंथ आहे. मराठी वाङ्मयात अशा प्रकारचा हा पहिलाच ग्रंथ असल्याने आपल्या पुस्तकालयात तो असणे अगत्याचे आहे.

21. **संतशिरोमणि श्री नामदेव आणि त्यांचे समकालीन संत :** दुसरी आवृत्ति (1941) लेखक - महाराष्ट्र भाषा भूषण, जगन्नाथ रघुनाथ आजगावकर यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 275वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथाची 3000 प्रतींची पहिली आवृत्ति 1927 साली छापली होती. ती 13 वर्षात संपून गेल्यामुळे नवीन फेरफारांसह ही आवृत्ती केल्याचे लेखकाने नमूद केले आहे. या नवीन माहितीमध्ये नामदेवाच्या मूळ ठिकाणाविषयीचे वाद, तसेच नामदेवाची हिंदी कविता, वंशावळ इ. माहितीचा वापरही केला असल्याची नोंद केली आहे.

जगातील बहुतेक धर्मसंस्थापक व साधुसंत यांच्या चरित्रात जशा अलौकिक चमत्काराच्या कथा सापडतात तशा त्या नामदेव चरित्रातही सापडतात. ह्या सर्व कथा प्रस्तुत ग्रंथात विस्तारशः वर्णिल्या आहेत. साधुसंतांच्या चमत्काराविषयी मराठी व इंग्रजी ग्रंथांची माहिती प्रस्तावनेत दिली आहे.

प्रस्तुत नामदेव चरित्र लिहिताना ज्या अनेक नव्या जुन्या ग्रंथांचा व लेखांचा उपयोग करण्यात आला आहे त्याची यादी सदर ग्रंथात दिली आहे. त्यातल्या त्यात नामदेवी गाथ्यात छापलेली नामदेवचरित्र विषयक अभंगबद्ध प्रकरणे, तीर्थावळी, ज्ञानदेवादि चार भावंडांच्या समाधीचे अभंग वगैरे जुन्या वाङ्मयाचाच प्रस्तुत ग्रंथास मुख्य आधार असून त्याच्या खालोखाल महीपतिकृत भक्तविजय संतलीलामृत या दोन ग्रंथांचा उपयोग केला आहे. उपरिनिर्दिष्ट अभंगात्मक प्रकरणे खुद्द नामदेवमहाराजांनीच लिहिली आहेत असा लोकांचा पूर्वापार समज आहे, परंतु या सर्व अभंगांचा

सूक्ष्मदृष्टीने विचार केल्यास हे अभंग जरी पुष्कळच प्राचीन असले तरी ते खुद्द नामदेवांनी लिहिलेले नसून त्यांच्याच हयातीत त्यांनी सांगितलेल्या तोंडी माहीतीच्या आधाराने, पण स्वतःची बरीचशी भर घालून त्यांच्या एखाद्या शिष्याने बहुतकरुन परिसा भागवत यांनी रचले असले पाहिजेत असा अंदाज व्यक्त केला आहे.

दुसऱ्या आवृत्तीमध्ये नामदेव शिंपी ज्ञातीतील एक संशोधक व साक्षेपी लेखक, श्री महादेव गोविंद बारटक्के यांच्या 'विजयी नामदेव' मासिकांतील लेखांचा उपयोग झाल्याचे नमूद केले आहे. प्रमाणग्रंथांच्या यादीनंतर मोरोपंताच्या नामदेवस्तवनाच्या 15 ओव्या दिल्या आहेत.

उपोदघातामध्ये नामदेवाविषयीचे वाद, नामदेव किती झाले, त्यांच्या संख्येचा वाद, विष्णुदासनामा व नामदेव एक की दोन इ. वादांचा उल्लेख केला आहे. नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगांची रचना त्याच्या घरातील सर्वांसह झाली आहे या मताला लेखकाने विरोध दर्शविला आहे. बाबाजी ब्राह्मणाने केलेल्या भविष्यानुसार शंभरकोटी अभंग हा लिहील ही प्रतिज्ञा देवाने त्याच्या जिव्हेवर लिहिली. हा भाग चुकीचा वाटतो, तसेच अभंगांची संख्याही असंभवनीय आहे असे लेखक म्हणतो. त्यामुळे नामदेवाच्या आत्मचरित्रपर अभंगांची रचना दुसऱ्याने केली असेल हा अंदाज व्यक्त केला आहे.

नामदेवाच्या विषयीच्या निवृत्तीनाथ, नरसी मेहता यांच्या अभंगांचाही उपयोग करुन नामदेवांचा जन्मकाळ ठरवला आहे.

नामदेवा व्यतिरिक्त विष्णुदासनामा, नाभा पाठक, महानुभावपंथी नामदेव आणि नामा शिंपी अशा चार पाच नावाच्या साधु व कवी यांच्याविषयीची माहिति प्रस्तुत पुस्तकात दिली आहे. 1 ते 11 प्रकरणांमध्ये नामदेव चरित्र, लोककथा, पंजाबमधील वास्तव्य, त्यांची कविता अशी मांडणी केली आहे. 12व्या प्रकरणामध्ये समकालीन संतांची माहिती देताना त्यांचे काही प्रसिद्ध अभंग दिले आहेत.

सदर ग्रंथ म्हणजे जुन्या व नव्या ग्रंथकारांनी व लेखकांनी इतस्ततः नमूद करुन ठेवलेली माहिति संकलित करुन तिच्या आधाराने नामदेवमहाराजांचे एक सुसंगत चरित्र लिहिण्याचा प्रयत्न आहे. ग्रंथांची भाषा साधी, सोपी, सुबोध आहे.

22. **बडोद्याचा राज्यकारभार** : लेखक - विष्णु पांडुरंग नेने (इ.स. 1942) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 277वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

बडोदे संस्थानाचा राज्यकारभार कसा चालतो या विषयी शाळाखात्याच्या सूचनेवरुन हे लघुपुस्तक तयार केले आहे असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे.

सदर ग्रंथात एकंदर 21 प्रकरणांमध्ये या राज्यकारभाराची सविस्तर माहिती दिली आहे. यात अनुक्रमे 1. सामान्य माहिती, 2. हुजूर कचेरी, 3. हुजूर मध्यवर्ति कचेरी, 4. हुजूर पोलिटिकल कचेरी, 5. न्यायमंत्री व राजदफ्तरदार, 6. धारासभा, 7. न्यायालये, 8. मुलकी कारभार, 9. मुलकीशी संलग्न खाती, 10. स्थानिक स्वराज्य, 11. पोलीस खाते, 12. फौज खाते, 13. राज्यकोषाधिकारी, 14. जमाखर्चाचे अंदाजपत्रक, 15. जमीन महसुल, 16. शाळा खाते, 17. प्रगति खाती, 18. दवा व आरोग्य, 19. बांधकाम खाते, 20. लोहमार्ग खाते, 21. खानगी खाते इ. मधून विषयाची आखणी केली आहे. ग्रंथाच्या शेवटी 22. परिशिष्ट 1 मध्ये बडोदे संस्थानास खंडणी देणाऱ्यांची यादी व 23. परिशिष्ट 2 मध्ये तहनाम्यांचा सारांश दिला आहे.

बडोदा राज्यशासन निबंधामुळे बडोद्याच्या राज्यपद्धतीत झालेले फरक विस्ताराने पुस्तकात मांडले आहेत. 'या निबंधाने जातीयवादास कायमची मूठमाती दिली आहे. येथील राज्यपद्धतीचे ते एक मोठे वैशिष्ट्य आहे' असे लेखकाने म्हटले आहे.

23. **नाट्य-निबंध** : लेखक श्री वासुदेव विनायक जोशी, (इ.स. 1942) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 280वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. निवेदनामध्ये लेखकाने सांगितल्याप्रमाणे हे लेख पूर्वी लिहिलेले होते.

15-20 वर्षांपूर्वीचे हे लेखन 1942 मध्ये पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाले. त्यावेळी मराठी रंगभूमि ही मनोरंजन करणारी आणि उत्कृष्ट वाङ्मय निर्माण करणारी अशी आकर्षक संस्था होती. पूर्वीची परिस्थिती बदललेली असल्याने चालू काळात हे लेख टीकालेख म्हणून उपयोगी पडतील का अशी शंका लेखकाने व्यक्त केली आहे. कारण 1942 मध्ये मराठी नाट्यसंस्था मोडकळीला आली होती.

या लेखांपैकी नाटकातील संगीत ह्या लेखातून काही नियम मांडले होते. नवीन मुद्यांवर बराच ऊहापोह होईल आणि काही तरी निश्चीत असे नियम ठरविण्यांत येतील अशी आशा, लेख प्रथम लिहिताना वाटली होती. पण 20 वर्षानंतरही याला पूरक काही प्रसिद्ध झाले नसल्याने हाच लेख पहिला व शेवटचा आहे असा दावा लेखकाने मांडला आहे. तसेच रस आणि राग यांचा कसकसा आणि कोणता संबंध असावा व आहे याविषयी उपस्थित केलेले मुद्दे सर्वथैव नवीन असल्याचा दावा ही लेखकाने आपल्या निवेदनात केला आहे. हे लेख चर्चा सुरु करण्याकरता लिहिले असून यात विद्वानांनी मते द्यावी आणि हे शास्त्र सिद्धांत न समजता वैयक्तिक मते आहेत हेही समजून घ्यावे अशी विनंती केली आहे.

सदर ग्रंथाला अनुक्रमणिका असून 1. नाटकातील संगीत ह्या शिर्षकाखाली 1. संगीत कोठे असावे ?, 2. संगीत कसे असावे ? संगीत कसे म्हणावे ? साथीला असणाऱ्या तंबोरा, तबला इ. वाद्यांचा वापर कसा करावा आणि गायनाचे आविर्भाव कसे असावे याची माहिती दिली आहे. याचा शेवटी उपसंहार केला आहे. यात इतर भाषांपेक्षा मराठीतील नाट्यशाखा प्रगत असल्याचा आनंद व्यक्त केला आहे. पण बोलपटांच्या वेडामुळे नाटके आज अधोगतीला गेल्याचे दुःखही व्यक्त केले आहे.

पुढे वरील भागातील तात्त्विक चर्चेनंतर शाकुंतल नाटक धीवरप्रवेश योजना, खाडिलकरांची नाटके व संगीत द्रौपदी नाटकाचे परीक्षण असे लेख आहेत.

नाटकातील संगीत हा विषय इतका व्यापक आणि तपशीलाचा आहे आणि हा विषय तज्ज्ञ लोकांनी संशोधन करण्यासारखा आहे. मराठी वाङ्मयात प्रस्तुत पुस्तकाने एक महत्त्वाचा विषय मांडला आहे.

24. **पिता- पुत्र संबंध (1943):** लेखक - यशवंत रामकृष्ण दाते, यांचा ग्रंथ श्री सयाजी साहित्यमालेत 282वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीमंत सयाजीराव गायवाड यांच्या इच्छेवरुन सदर पुस्तक लिहिण्यात आले आहे. (पिता-पुत्र संबंधावर एखादे पुस्तक लिहिले जावे)

जग हे एक मोठे कुटुंब आहे असे मानण्यात येते व परमेश्वरास सर्व विश्वाचा जनक अथवा पिता असे संबोधण्यात येते. परंतु या विश्वकुटुंबातील प्रत्येक व्यक्ती विश्वबंधुत्वाच्या नात्याने परस्परांशी निगडित

असावी हे मानण्याचे ध्येय मानण्यात येते. या विश्वबंधुत्त्वाच्या कल्पनेच्या मुळाशीही एका कुटुंबातील व्यक्तीमध्ये ज्या प्रेमरज्जूंनी एका कुटुंबातील व्यक्ती परस्परांशी निगडित होऊन एकमेकांची अभिवृद्धी व उन्नती होण्यास साहाय्य करतात तीच कल्पना असते, असे या ग्रंथात सांगितले आहे. अशा कुटुंबात पिता व पुत्र या अत्यंत महत्त्वाच्या अशा व्यक्ती असून त्यामध्ये मानवजातीचा दोन पिढ्यातील संबंध निगडित झालेला असून या सृष्टीचे कार्य मागील अनुभवादिक ज्ञान घेऊन ते संवर्धित करुन पुढील पिढीस द्यावयाचे व अशा रीतीने मानवसमाजाचा दिवसेदिवस उत्कर्ष घडवून आणावयाचा हे असते. याच परंपरेने मनुष्यस्वभाव दिवसेंदिवस अधिकाधिक सुखी कसा होत जाईल व परमेश्वराने ज्या सृष्टीत त्याला उत्पन्न केले आहे त्या सृष्टीतील अनेक सुखांचा आस्वाद त्याला अधिकाधिक कसा घेता येईल, सृष्टीतील निरनिराळ्या शक्तींचा उपयोग मानवसमाजाच्या कल्याणाकडे कसा करुन घेता येईल, परमेश्वराने मनुष्याच्या ठिकाणी स्थापन केलेल्या बुद्धिमत्तेच्या देणगीचा पूर्ण उपयोग करुन तिचा अधिकाधिक विकास करता येईल आणि अनेक भिन्नभिन्न समाजात प्रेम व सलोखा कसा निर्माण करता येईल व याप्रमाणे सर्व मानवसमाजाचे अंतिम कल्याण कसे करता येईल इ. चे सविस्तर विवेचन प्रस्तुत ग्रंथात केले आहे.

पितापुत्रसंबंध या विषयाचे मुख्यतः पाच विभाग पाडण्यात आले असून त्यांचा क्रमशः विचार करण्यात आला आहे.

1) आपल्या समाजात कुटुंब हा मुख्य घटक असल्यामुळे प्रथम कुटुंबपद्धतीचा इतिहास देऊन त्यात पितापुत्राचा संबंध कसकसा बदलत जातो याचे वर्णन असून नंतर एकत्र व विभक्त कुटुंबपद्धती बद्दलहि विचार केला आहे. त्यानंतर भारतीय व पाश्चात्य समाजात पितापुत्रांचे कुटुंबातील स्थान कसे असते याचा विचार केला आहे. त्याबरोबरच कुटुंबपद्धतिचा जवळजवळ त्याग केलेला आजचा समाजवादी रशिया यातील पिता व मुले यांचे संबंध काय असतात व येथील मुलांची जोपासना कशी होते याचे वर्णन केले आहे. 2) याच विषयाच्या अनुषंगाने पितरांच्या बद्दल वसत असलेला आदर व पितृपूजा यांच्या संबंधी माहिती देऊन पुत्रमहत्त्वाचे वर्णन करून तद्‌भावी घेतलेल्या दत्तक

पुत्राबद्दलहि माहिती दिली आहे व आजच्या प्रचलित कायद्याप्रमाणे पितापुत्रांचे व पाल्य-पालकांचे काय संबंध असतात ते सांगितले आहे. 3) या उलट मुलांस अथवा वृद्धांस टाकून देण्याची प्रवृत्ति वगैरे काही प्राथमिक किंवा अडाणी समाजात कशी असते याचेहि थोडक्यात दिग्दर्शन केले आहे. 4) यानंतर मुलांच्या स्वाभाविक प्रवृत्तिचे वर्णन करून मुलांवर घरातील व घराबाहेरील परिस्थितीचे होणारे परिणाम दिग्दर्शित केले आहेत. त्यानंतर मुलांचे शीलसंवर्धन व धार्मिक शिक्षण या विषयाचा ऊहापोह करून मुलांतील अनिष्ट प्रवृत्ति व दुर्वृत्त मुले व त्यांची सुधारणा यासंबंधी योजावयाच्या उपायांचे विवेचन करण्यात आले आहे. मुलांचे बाल्यापासून निरनिराळ्या तऱ्हेचे शिक्षण, त्यांचे पोषाख, वाङ्मय, खेळ व आरोग्य वगैरे विषयांचा तदनुषंगाने ऊहापोह करून अखेरीस 5) माता व पिता यांची अपत्य संगोपना संबंधी जबाबदारी व त्यांस योग्य शिक्षण मिळण्याची आवश्यकता या गोष्टींचे दिग्दर्शन करण्यात आले आहे. लैंगिक शिक्षण देणे आवश्यक असा प्रगत विचारही त्यात आहे.

सदर ग्रंथामध्ये विशेषत: मातापिता व लहान मुलांचे पालक यांच्यावर आपल्या स्वाधीन केलेल्या बालकस्वरुपी देणगीचा आपण कसा उपयोग करून घ्यावयाचा व आपल्या देशाचे भावी नागरिक त्यातून कसे तयार करावयाचे, आपल्या राष्ट्राचा उद्धार आपल्या व आपल्या भावी पिढीच्या हाती असून तो करण्यास समर्थ होतील असे राष्ट्राचे आधारस्तंभ व ज्यांच्यामध्ये राष्ट्राच्या आकांक्षा केंद्रीभूत होतात असे प्रजाजन निर्माण करण्याची जवाबदारी आईबापांवर व मुलांच्या पालकांवर व शिक्षकांवर असते ती त्यांनी कशी पार पाडावी यासंबंधी दिग्दर्शन 34 प्रकरणांमध्ये अतिशय सुरेखपणे करण्यात आलेले आहे.

ग्रंथाच्या सुरुवातीसच संदर्भ-ग्रंथसूचि दिलेली आहे. 'पिता-पुत्र संबंध' हा विचार सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आणि किती व्यापक आहे याची कल्पना सदर पुस्तकावरून येते.

25. **ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास-खंड 2रा** : श्री यशवंत नरसिंह केळकर (1944) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 288 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथाचा पहिला भाग 1928 साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 15 वर्षानंतर प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध झालेला आहे.

सद ग्रंथाचा पहिल्या भागात लेखकाने आपली विस्तृत प्रस्तावना दिली आहे ती वाचली असता त्यांनी वाङ्मयेतिहासाची फार नावाजण्यासारखी कामगिरी केली आहे, असे दत्तो वामन पोतदार यांनी म्हटले आहे.

या ग्रंथात एकंदर 26 पोवाडे दिलेले असून अनुक्रमे 1. दत्ताची जाधवाचा पोवाडा, 2. दत्ताजी जाधवाचा पोवाडा (दुसरा), 3. सेखोजी आंग्र्याचा पोवाडा, 4. सेखोजी आंग्र्याचा पोवाडा (दुसरा), 5. टिपूवरील स्वारीचा पोवाडा, 6. नागपूरकर चिमणाबापू भोसल्याचा पोवाडा, 7. नाना फडणविसांचा पोवाडा, 8. अकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा, 9. महादजी शिंद्यांचा पोवाडा, 10. महादजी शिंद्यांचा पोवाडा (दुसरा), 11. सोलापूरच्या लढाईचा पोवाडा, 12. रूपराम चौधरी याचा पोवाडा, 13. पेशवांच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा, 14. पेशवाईचा पोवाडा, 15. आप्पा देसाई निपाणकराचा पोवाडा, 16. डामाजी नाईकाचा पोवाडा, 17. सखूबाई शिंदीचा पोवाडा, 18. अहिल्याबाई होळकर यांचा पोवाडा, 19. हरबाजीराव धुळपांचा पोवाडा, 20. सवाई जानराव धुळपांचा पोवाडा, 21. फत्तेसिंग गायकवाडांचा पोवाडा, 22. थोरले सयाजीरावांचा पोवाडा, 23. दुसरे सयाजीरावांचा पोवाडा, 24. मलकोजीबुवाचा पोवाडा, 25. पेशवे-भोसले भेटीचा पोवाडा, 26. तिसऱ्या रघूजी भोसल्याचा पोवाडा, यांची ऐतिहासिक माहिती अगदी सोप्या भाषेत दिली आहे.

या ग्रंथात जुने ऐतिहासिक पोवाडे निवडून त्यांच्या पाठांची मोठ्या परिश्रमाने आणि कौशल्याने चिकित्सा करून, अर्थबोधक व अवांतर टीपा जोडून अनेक रीतीनी ग्रंथ होईल तेवढा उपयुक्त करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

हा ग्रंथ वाङ्मय व इतिहास यांच्या अभ्यासकांना अतिशय उपयुक्त आहे. त्याच बरोबरील मराठी काव्यपरंपरेतील पोवाडा या प्रकाराचा ऐतिहासिक ठेवा संकलित करण्याचे मौलिक कामही या ग्रंथामुळे साध्य झाले आहे.

26. **मराठी नाट्यसृष्टि-खंड 2 रा (सामाजिक नाटके)** : ले. विश्वनाथ पांडुरंग दांडेकर, (1945)- यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमालेत' 290 वें पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर ग्रंथाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशी दोन भागात विभागणी करून पूर्वार्धात प्रमुख सामाजिक नाटककार आणि त्यांची नाटके यांच्या विषयी विवेचन करून उत्तरार्धात कलादृष्ट्या कमी महत्त्वाच्या नाटकांची परीक्षणे व परामर्श दिला आहे.

एकंदर 6 उपविभागात ग्रंथाची रचना केली आहे. प्रथम प्रास्ताविक देऊन सामाजिक नाटकांचे मूळ शोधताना कळसूत्री बाहूल्या, लळिते, तमाशे, फार्स(प्रहसने) इ. ची चर्चा करून, पुढे सामाजिक आंदोलने व चळवळींशी नाटकाचा संबंध कसा दिसतो ते सांगितले आहे. 1920 पर्यंत पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक नाटकांचा काळ होता. पुढे 1920 नंतर महायुद्धानंतर पौराणिक व ऐतिहासिक नाटके कमी होऊन कुटुंब व समाजामधील नव्या प्रश्नांना सामोरी जाणारी, नव्या विचारांची नाटके निर्माण झाली. त्यापूर्वींच्या नाटकांमध्ये समाजाचे प्रतिबिंब उमटवणारी कळसूत्री बाहुल्या, लळिते, दशावतारी खेळ, फार्स इ. नाटके होती. व त्यातून कमी अधिक प्रमाणात समाजाचे दर्शन घडे. त्याच्या पुष्ट्यर्थ उदा. म्हणून विष्णूदास भावे यांच्या 'ढोंगी महंत' या कळसूत्री बाहल्यांच्या खेळाचे, तसेच 'लळितसंग्रहातील' ब्राह्मणपाटील यांच्या संवादाचे काही भाग दिले आहेत.

यानंतर पुढे सुधारणावादी युग, समन्वयवादी युग, नवयुग असे तीन महत्त्वाचे कालखंड कल्पिलेले आहेत. राजकीय, सामाजिक, सुधारणेविषयी ज्या जळवळी चालत त्यांचा परिणाम नाटकांवर पडल्यामुळे स्वदेश, स्वराज्य, स्वइतिहास याचा विचार करून महाराष्ट्रीयांच्या स्वत्व जागृतीच्या वेळी सामाजिक नाटके निर्माण झाली असे निवेदन लेखकाने केले आहे. सुधारणावादी युगामध्ये स्त्रीशिक्षण, संमतिवयाचा कायदा, जरठ-बालविवाह निषेध, इ. चळवळीमधून 'शारदा' सारखे नाटक निर्माण झाले. कल्पनारम्य सामाजिक प्रश्न किंवा चळवळीचा विचार नसून समाजात वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांची, त्यांच्या मनोविकारांची चित्रे आहेत. उदा. वि. ज. कीर्तने यांचे 'जयपाल', श्री. कृ.

कोल्हटकर यांचे 'मूकनायक', व 'वीरतनय',. कृ. प्र. खाडिलकर यांचे 'कांचनगडची मोहना 'इ. हा सुधारणावादीकाळ 1859 ते 1900 असा मानला आहे. समन्वयवादी काळ 1901-1920 असा मानला असून त्यावेळी राजकारणामध्ये भारतीय लोकांचा समावेश होऊन भारतीय संस्कृति व इंग्रजी सुधारणा यांचा समन्वय भारतीय लोकांना आवश्यक वाटू लागला होता. या काळातील आंदोलनांचा विचार आधी केला आहे. यातील वंगभंग चळवळ सर्वात महत्त्वाची होती. त्यानंतर 1907 मधील मद्यपाननिषेधाची चळवळ, वेदोक्त प्रकरण, क्षत्रिय ब्राह्मणवाद, टिळकांवरील खटला असे या चळवळीतील मुख्य धागे होते. त्यामध्ये श्री. कृ. कोल्हटकर यांची 'सहचारिणी', प्रेमशोधन', 'वधूपरीक्षा' इ. नाटके महत्त्वाची आहेत. तर गडकऱ्यांची 'प्रेमसंन्यास', पुण्यप्रभाव', 'एकच प्याला', 'भावबंधन'अशी नाटके महत्त्वाची आहेत.

यानंतर 1921-1944 हा नवयुगाचा काळ मानून त्यातील प्रमुख आंदोलने यांची महायुद्धे, रशियन क्रांति, तसेच भारतीय राजकारणातील गांधीजीचा उदय, हिंदुमुस्लिम ऐक्याची चळवळ, अस्पृश्योद्धाराचा प्रश्न इ. अशा बदलत्या परिस्थितींचा प्रभाव नाटकांवर पडला. स्त्री वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार वाढून विवाहित, अविवाहित, स्त्रियांच्या प्रश्नांकडे, हक्कांकडे, आणि न्यायालयीन अधिकारांकडे पाहिले गेले त्याचाही प्रभाव लेखकावर पडल्याचे सांगितले आहे.

नवमतवादाच्या प्रसाराचा हाच काळ मानला आहे. व्यक्ति विकासाच्या आड येणाऱ्या अर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक बंधनांच्या पलीकडे जायला हवे ही निकड निर्माण झाली. या काळात 'सत्तेचे गुलाम', 'संन्याशाचा संसार', 'तुरूंगाच्या दारात' अशी वरेरकरांची नाटके गांधीजींच्या अस्पृश्योद्धाराच्या तत्त्वाविषयी होती. स्त्री विषयक नाटकामध्ये रॉय किणीकर यांचे 'मंगळसूत्र' हे नाटक तसेच कूलवधू, उद्याचा संसार, लग्नाची बेडी, अशी नाटके लिहिली गेली. पुढे मामा वरेरकर, माधवराव जोशी, अनंत हरी गद्रे, प्र. के. अत्रे, मो. ग. रांगणेकर, यांच्या नाटकांचे परिक्षण करून त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले आहे. उत्तरार्धात अनेक उपलब्ध पण कमी महत्त्वाच्या नाटकांचा परामर्श घेतला आहे.

27. **बँका व त्यांचे कारभार**- लेखक : चिं. वि. जोग (1946) यांचे पुस्तक श्री सयाजी साहित्य मालेत 292 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

सदर पुस्तकात आधुनिक कल्पनेप्रमाणे सुरू झालेल्या बँकिंगच्या व्यवसायाची सविस्तर माहिती दिली आहे. याची सुरुवात प्रथमत: पाश्चिमात्य देशात झाली असली तरी हिंदुस्तानात सावकारीचा व्यवसाय चालत होताच अशा माहिती बरोबरच इंग्लंडमधील आधुनिक तऱ्हेच्या बँकेला कशी सुरुवात झाली याची माहिती देऊन पुढे नोटांची कल्पना व चेकची सुरुवात, सामुदायिक भांडवलाच्या बँकेची स्थापना इ. विषयांची माहिती दिलेली आहे.

हिंदुस्थानात इ.स. 1900 नंतरच्या काळात बँकांची फार झपाट्याने वाढ झाली. स्वदेशी बँकांची स्थापना झाली. इ.स. 1924 नंतरच्या काळात प्रामुख्याने 'रिझर्व बँक ऑफ इंडियाची' स्थापना झाली.

सदर पुस्तकाच्या दोन भागात - 1. आधुनिक बँकाची सुरुवात, 2. हिंदी बँकांचा इतिहास, 3. हिंदुस्थानातील बँकाची सद्य:स्थिति तसेच, 4. बँकांचे कारभार, 5. चालू खाते, 6. चेक, 7. ठेवींचे इतर प्रकार, 8. बिल शाखा-बँकांचा सेवाधर्म, 9. बँकेत मिळणाऱ्या इतर सवलती, 10. बँकेत व खातेदार यांच्यामधील परस्पर संबंधाची वैशिष्टये, 11. कर्ज खाते, 12. बँकेचा ताळेबंद इ. विषयांची माहिती दिलेली आहे. शेवटी सूची दिलेली आहे.

''सदर पुस्तक 1943 च्या सुमारास लिहून तयार झाले होते, त्यामुळे 1941-1942 पर्यंतची आकडेवारी त्यात देता आली. त्यानंतर बँकिंग जगतात बऱ्याच घडामोडी झाल्या, परंतु त्यांचा समावेश यात करता आलेला नाही.'' असे लेखकाने म्हटले आहे.

28. **सुधारणा, सुख व सदाचार** : श्री. नरसिंह चिंतामण केळकर, (1945) हा ग्रंथ 'श्री सयाजी साहित्य मालेत' 293 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

संसाराच्या नेहमीच्या रगाड्यात सुधारणा, सुख व सदाचार या गोष्टींची चिकित्सा मनुष्याला सुचत नाही. पण स्वस्थतेचे क्षण त्याला लाभतात तेव्हा ही चिकित्सा त्याला सुचल्यावाचून राहात नाही.

जग म्हणजे, मनुष्यसमाज दिवसे दिवसे सुधारतो आहे की बिघडतो आहे ? भौतिक विज्ञानाने त्याचे सुख वाढत आहे की कमी होत आहे ? तो अधिकाधिक चिंतामुक्त होत आहे की वाढ होत असली तरी, त्याचे सद्गुण व त्याची माणुसकी मूलभूत आहेत आणि त्यांची समर्पक निखालस अशी उत्तरे कोणाला देता न आली तरी, त्यांची नुसती चर्चाहि, स्वत:शी किंवा इतरांशी, त्याने केल्यास ती त्याला बोधप्रद झाल्यावाचून राहणार नाही.

प्रस्तुत ग्रंथ ही दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेला आहे. सुधारणा, सुख व सदाचार, सुधारणा व संस्कृती यांच्यातील संकल्पना भेद यांचा विचार यात करण्यात आला आहे. अनुक्रमणिकेत एकंदर 48 विषयांची चर्चा केलेली आहे. Civilization & Culture यासाठी सुधारणा व संस्कृती हे पर्यायी शब्द योजून त्यांच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न ग्रंथात केला आहे. पृ. 17 वर पूर्वी आणि आता प्रयत्न ग्रंथात केला आहे.

विज्ञानाची महती गाऊन, त्याची प्रशंसा करून, त्याच्या प्रगतीमुळे जगाची भौतिक सुधारणा किती झाली, मनुष्यजातीचे सुख किती वाढले आणि त्याचा सदाचार कसा, किती वाढला किंवा घटला, याची माहिती देऊन चिकित्सा करण्याचा प्रयत्न सदर ग्रंथात केला आहे.

'केसरी'कर न. चि. केळकरांनीही सदर मालेतून लेखन केले, हे या साहित्यमालेसाठी महत्त्वाची गोष्ट आहे.

29. **मुसलमानपूर्व महाराष्ट (खंड 1ला)** : राजकीय इतिहास (इ.स. पूर्व 200 ते इ.स. 1318), ले. वासुदेव कृष्ण भावे, (1946) यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'त 298वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

महाराष्ट्राच्या अज्ञात अशा प्राचीन इतिहासाविषयी माहिती मिळविण्याच्या प्रबळ उत्सुकतेतून अनेक ग्रंथ निर्माण झाले त्यापैकी प्रस्तुत ग्रंथ हा एक होय. महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासासंबंधी विवेचन करीत असताना पूर्वसुरींनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा, प्रास्ताविकात घेतला आहे. डॉ. रामकृष्ण

गोपाळ भांडारकर यांचा 'अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन' हा ग्रंथ 1896त इंग्रजीत प्रसिद्ध झाला. कै. चिंतामण विनायक वैद्य यांनी 1920 मध्ये 'मध्ययुगीन भारत' प्रकाशित केला. तो ग्रंथ एकट्या महाराष्ट्राकरिता नसून अखिल भारतासाठी आहे. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'प्राचीन महाराष्ट्र' हा ऐतिहासिक ग्रंथ लिहिण्याचे कार्य हाती घेतले त्याचा एक खंडहि प्रकाशित झाला. परंतु त्यांच्या अकाली निधनामुळे ग्रंथ पूर्ण होऊ शकला नाही. याशिवाय अखिल महाराष्ट्राच्या सर्व घराण्यांचा मिळून इतिहास लिहिण्याऐवजी राजघराण्यांचे इतिहास इंग्रजीत लिहिण्यात आले. त्यापैकी बनारस युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक डॉ. अनंत सदाशिव आळतेकर यांनी 'राष्ट्रकूट घराण्याचा इतिहास, तसेच शिलाहार घराण्याचा इतिहास लिहून कोकणपट्टीचा इतिहास उजेडात आणला. डॉ. मॉरेस यांनी कुटुंब कुलावर ग्रंथ रचून गोवेप्रांताचा मध्ययुगीन इतिहास लिहिला. या सर्वांचा व विविध ऐतिहासिक साधनांचा परामर्श घेऊन महाराष्ट्राचा यादव अखेरपर्यंतचा सुमारे दीडसहस्त्र वर्षांचा इतिहास (बॉम्बे गॅझीटियरसह) लिहिण्याची कल्पना मनात येऊन व त्याप्रमाणे व्यासंग करुन सदर ग्रंथ लिहिला आहे. 'महाराष्ट्राचा अखंड इतिहास मराठी वाचकांना उपलब्ध व्हावा' हा हेतूच सदर ग्रंथामागे आहे.

या विषयाचा अभ्यास करताना नुसत्या राजकीय अंगावर भिस्त न ठेवता, धर्म-पंथ, समाज, नीति, कला, कौशल्य, वाङ्मय यांचाहि अभ्यास करुन त्यापैकी राजकीय अंगाचा तेवढा इतिहास या खंडात घेतला आहे.

सदर ग्रंथात एकंदर 17 प्रकरणे असून त्यात अनुक्रमे 1. महाराष्ट्राचे प्राचीनत्त्व, 2. शातवाहन घराणे, 3. महाराष्ट्रांतील समाजस्थिति (शातवाहन काल), 4. वाकाटक घराणे, 5. बदामीचे चालुक्य घराणे, 6. राष्टकूट घराणे, 7. कल्याणचे चालुक्य घराणे, 8. कलचुरी घराणे, 9. यादव घराणे, 10. शिलाहार घराणे (दक्षिण कोकण), 11. शिलाहार घराणे (उत्तर कोकण), 12. शिलाहार घराणे (कोल्हापूर), 13. गोव्याचे कदंब घराणे, 14. महाराष्ट्राबाहेरची राज्ये, 15. भारतीय राजनीति, 16. महाराष्ट्रातील राज्यपद्धति, 17. सहा राजधान्या इ. मधून विषयाची मांडणी केली आहे.

महाराष्ट्राच्या प्राचीन काळाची यथार्थ कल्पना सर्वसामान्य लोकांना या ग्रंथावरुन निश्चितच येऊ शकते.

30. **मुद्रणकला :** ले. गणेश पांडुरंग विजापुरे (इ.स. 1947), यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमाले'त पुष्प 299वे म्हणून प्रसिद्धआहे.

प्रस्तुत पुस्तक हे मुद्रणकलेवरील पुस्तक असून त्यात अनुक्रमणिकेत 17 प्रकरणांची नोंद केलेली आहे. यात प्रास्ताविकानंतर 1. टाअिप आणि तो कसा तयार होतो, 2. टाअिपाची हातजुळणी, 3. यांत्रिक जुळणी, 4. मांडणी किंवा आराखडा, 5. ब्लॉक्स कसे तयार करतात, 6. स्टिरिओ टाअिप, 7. वुड अेन्ग्रेव्हिंग, 8. अिलेक्ट्रो टाईप, 9. अिंपोझिशन, 10. छपाअीचे रुळ, 11. छपाअीची शाअी, 12. कागद, 13. छपाअीची यंत्रे, 14. अद्यावत गतिमान यंत्रे, 15. लिहिण्याची यंत्रे, 16. लिथो, ऑफसेट व फोटोग्रेव्हर, 17. छपाअीची बिले इ. भागातून विषयाची मांडणी केली आहे.

प्रास्ताविकात लेखकाने अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक उल्लेख दिले आहेत. त्यात हिंदुस्थानात पहिले पुस्तक 1560 साली छापले गेले. ते गोव्याच्या आर्चबिशप बास्पर डी लीओ ह्याने लिहिलेले "दि स्पिरीच्युअल कॉंपेडियम ऑफ दि ख्रिश्चन लाईफ' हे होय. इ.स. 1655 पर्यंत गोव्यास फक्त आणखी 13 पुस्तके छापून निघाली होती. त्यापैकी एक विशेष महत्त्वाचे म्हणजे 'मराठी भाषेतील सेंट पीटरचे चरित्र' हे अेस्टेव्हाओ दा कूझचे पुस्तक होय. हिंदुस्थानच्या देश्य भाषेत युरोपियनाने लिहिलेले हे पहिलेच पुस्तक होय. 1577 साली व 1598 मध्ये दोन तामिळ पुस्तके मलबार किनाऱ्यावरील अंबलकर येथे जेसुअिट लोकांनी छापली होती. असा उल्लेख दिला आहे.

बहुतेक वेळा इंग्रजी शब्दांना पर्याय न देता ते तसेच ठेवण्याची पद्धत पुस्तकात अवलंबिलेली आहे. उदा. अिंपोझिशन, ऑफसेट, कास्टिंग बॉक्स, टाअिपोग्राफ, कंपोझिंग मशीन इ..... (अर्थात् ही यंत्रेच ज्या संस्कृतीतून आपल्याकडे आली त्याच भाषेतील नावे त्यांना देण्यात आली आहे. तरी क्वचित ठिकाणी टाअिपाच्या मागील भागास देठ (जेट) असे शब्द घडविलेले दिसतात. (Pa. 9)

सदर पुस्तकात विषय स्पष्टीकरणासाठी एकंदर 95 आकृत्या व मशिन्सच्या निरनिराळ्या भागांचे व निरनिराळ्या प्रकारच्या मशिन्सचे एकंदर 16 फोटो दिले आहेत.

प्रस्तु पुस्तकासंबंधी महाराष्ट्र साहित्यपत्रिकेत परीक्षण आले होते. बापूराव नाईक त्याबद्दल म्हणतात, 'किर्लोस्कर मुद्रणालयाचे अनुभवी व्यवस्थापक श्री गणपतराव विजापुरे यांनी मराठीतील

मुद्रणकलेवरील वाङ्मयात वरील पुस्तक लिहून मोलाची भर घातली आहे. समग्र छपाईवर मराठीत नाव घेण्याजोगे पुस्तक नव्हते. श्री विजापुरे यांना पृष्ठसंख्या मर्यादेमुळे प्रत्येक विभागाचा विस्तृत परामर्श घेता आलेला नाही. परंतु अद्ययावत मुद्रणप्रकारांची त्यात योजल्या जाणाऱ्या सामग्रीची आणि यंत्रांची त्यांनी त्रोटक माहिती दिली आहे. विपुल चित्रे दिल्यामुळे विषय समजावयास सोपा झाला आहे. स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट परिक्षेकरता मुद्रणकला हा विषय ठेवण्याची योजना तूर्त चालू आहे, अशा वेळी या पुस्तकाचा फारच उपयोग होईल.

31. **महाराष्ट्र**- ले. विश्वनाथ पांडुरंग दांडेकर (1947) यांचे पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमालेत' 302 रे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पुस्तकात महाराष्ट्र देशाची व्याप्ति जैन रविकीर्तिच्या काळापासून म्हणजे इ.स. 634 पासून जी मानण्यात येते तीच घेतली आहे. नव्याण्णव हजार गावाच्या व तीन भागांच्या महाराष्ट्राचे वर्णन रविकीर्तिने आपल्या शिलालेखात केले आहे. नागपूर चांद्यापासून ते खाली कारवारपर्यंत जो त्रिकोण होतो व ज्यात मराठी भाषा बोलणारे शेकडा, 85 ते 90 लोक राहतात, तो भाग महाराष्ट्र म्हणून प्रस्तुत लेखकांने नजरेसमोर ठेवला आहे. यात पुणे ठाणे कुलाब्यापासून ते चांदा, भंडारा गोव्यापर्यंतच्या चोवीस जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र एकीकरणाऱ्या नव्या कल्पनेत ज्या प्रदेशांना एकत्र आणण्यात आले आहेत तेच येथेहि आणण्यात आलेले आढळतात. कॉंग्रेसच्या धोरणानुसार भाषावार प्रांतरचना होऊन जे चित्र महाराष्ट्राचे दिसले तेच प्रस्तुत पुस्तकात काढण्यात आले आहे.

पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात महाराष्ट्राचा पूर्वेतिहास देऊन पुढे राजकीय स्थित्यंतर वेळोवेळी कशी होत गेली ती दाखविली आहेत. रट्ट आर्यांनी यशस्वी वसाहतकर्म करून दंडकारण्याचे महारठ्ठ किंवा महाराष्ट्र कसे बनविले आणि त्यातच पुढे दुसरा पुलकेशी, कृष्णराज राष्ट्रकूट, दुसरा विक्रमादित्य, भिल्लम, सिंघण, पहिल्या बाजीरावासारखे एकाहून एक सरस असे वीरपुरूष निर्माण होऊन त्यांनी महाराष्ट्राचे वैभव कसे वाढविले, हा इतिहास दिला आहे. त्यापुढे मराठी भाषेची उत्पत्ति कशी झाली

ती सांगून, मराठी साहित्याचे स्वरूप मुकुंदराजाच्या काळापासून 19व्या शतकापर्यंत कसकसे बदलत गेले, कोणकोणत्या प्रमुख ग्रंथकारांनी मराठी वाङ्मयक्षेत्रात भर घातली याचे अगदी थोडक्यात वर्णन केले आहे. उदा. 19व्या शतकापासून मराठी वाङ्मयाला काही निराळेच स्वरूप प्राप्त झालेले दिसते ते प्रकृति आणि पोषाख या दोन्ही अंगांनी लघुकथा व लघुवाङ्मय हे वाङ्मय प्रकार पाश्चिमात्य वाङ्मयाच्या परिणामरूपाने मराठीत आले; याच काळात विनोदी वाङ्मयही जवळजवळ नव्यानेच सुरू झाले. वाङ्मयविषयक ग्रंथाबरोबर समाजशास्त्र-धर्मशास्त्र-ज्योतिष-भाषाशास्त्र-काव्यशास्त्र इ. विविध विषयांवर रचलेले ग्रंथ पाहता मराठी साहित्याचा वृक्ष किती शाखोपशाखांनी पल्लवित होऊन फोफावला आहे, किती रमणीय दिसत आहे, संसारातील प्रवाशांना त्याची संस्कृतीरुपी शीतल छाया किती उपकारक व स्फूर्तिदायी ठरत आहे हे सहज समजते - (Pa. 20-34)

तिभंगलेला महाराष्ट्र एकरुप झाल्यावर तो स्वयंपूर्ण बनेल किंवा नाही, याचा विचार 'कोठे काय होते ?' या प्रकरणात केला आहे. महाराष्ट्रातील पर्वत, नद्या, जिल्हे, धार्मिकग्रंथ, प्राचीन स्थळे, संस्थाने या सर्वांचाच विचार या प्रकरणात समाविष्ट आहे.

महाराष्ट्र हा डोंगराळ मुलुख असल्यामुळे येथील लोक राकट, कलाहीन व असंस्कृत असल्या बद्दलचा आरोप काही लोकांनी केला आहे. हा आरोप कसा निराधार आहे याचे सप्रमाण विवेचन महाराष्ट्रतील शिल्पकला व महाराष्ट्राची कलोपासना या दोन प्रकरणात करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक पंथाचा विचार 10 व्या प्रकरणात करण्यात आला असून वारकरी, रामदासी, नाथ, महानुभाव, दत्त, गोसावी व वीरशैव असा सात पंथांची थोडक्यात माहिती त्यात देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध स्थळांचे वर्णन 'महाराष्ट्रातील प्राचीन स्थळे' या प्रकरणात देऊन अमरावती ते हरेश्वरापर्यंतची प्रमुख स्थळे दिली आहेत.

'महाराष्ट्रीय संस्थाने' ही महाराष्ट्राच्या पराक्रमाची, परंपरेची व वैभवाची स्मारके असल्याने बडोदे ग्वाल्हेरादि सुमारे वीस संस्थानांची माहिती 12 व्या प्रकरणात दिली आहे.

शेवटी महाराष्ट्र भाषा व महाराष्ट्र देश यांच्या स्तुतिपर काही काव्ये देऊन, अडीच कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्राचे स्तोत्र किंवा चित्र पुरे केले आहे.

लेखकाच्या समजुतीप्रमाणे अशा प्रकारचे हे पहिलेच पुस्तक आहे. महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या एका महाराष्ट्रीयाने तयार केलेले हे पुस्तक महाराष्ट्रीयांना आवडेल व संग्राह्य वाटेल अशी लेखकाची आशा आहे.

सदर पुस्तकाची प्रस्तावना लिहित असताना (15 ऑगस्ट 1947) हिंदुस्थानचे वातावरण स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदाने भरून गेले होते. पुस्तकाचे हस्तलिखित जेव्हा छापखान्यात दिले तेव्हा आपल्या देशावर ब्रिटिशांचे राज्य होते व संस्थानिकांवर रेसीडेंटांची नजर असे. ''आता देशाच्या स्वातंत्र्याबरोबर संस्थानिकहि स्वतंत्र झाले असून, पूर्वीचे रेसीडेंट नाहीसे झाले आहेत. तेव्हा पुस्तकातील एतद्विषयक मजकूर वाचताना ही सुधारणा लक्षात घेऊन तो वाचावा अशी इच्छा लेखकाने प्रस्तावनेत दर्शविली आहे.

प्रस्तुत पुस्तक तयार करताना ज्या ग्रंथकारांचे साहाय्य घेतले अशा सर्वांच्या ग्रंथांची नावे प्रस्तावनेतच दिली आहेत.

सदर ग्रंथाची भाषा अत्यंत सुबोध अशी आहे. सर्वसामान्य वाचकास सुद्धा 'महाराष्ट्राची' माहिती करून द्यावयाची असेल तर हे पुस्तक उपयुक्त आहे.

32. **पावित्र्य विडंबनाचा वाद**- लेखक: ग. वा. कवीश्वर (1948) यांचे सदर पुस्तक 'श्री सयाजी साहित्यमालेत' 307 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा पावित्र्य-विडंबन, अश्लीलता यातील भेदावर प्रकाश टाकणारा, त्याच्या विविध अंगोपांगावर चर्चा करणारा असल्याने महत्त्वाचा आहे.

''महाराष्ट्राच्या साहित्यक्षेत्रात गेल्या काही वर्षापासून ज्या अनेक वादग्रस्त विषयांनी आपले अस्तित्व चांगलेच भासविले आहे, त्यात पावित्र्य विडंबनासंबंधीच्या वादाचा इतिहास बराच ताजा असून अनेक कारणांमुळे या प्रश्नास इतर कित्येक विषयांपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. एकंदरीत

पाहता हा प्रश्न अधिक व्यापक व जिव्हाळ्याचा असून, गेल्या काही वर्षांपासून मराठी वाङ्मयाच्या नानाविध क्षेत्रात काही विशिष्ट लेखकांच्या ठायी विशेषकरून, दिसून येणारी पवित्र्य-विडंबक प्रवृत्ति पाहून कित्येकांना खेद होत आहे. कादंबऱ्या, नाटके, चलच्चित्रपट, लघुकथा, इ. अनेक साहित्यप्रकारात ही प्रवृत्ति आपला अनिष्ट प्रभाव दाखवू लागली आहे. त्यातही विशेष खेदाची गोष्ट अशी की, महाराष्ट्र साहित्यात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या काही व्यक्तींनींही अलीकडे या पावित्र्य विडंबनकारांचे कसेबसे समर्थन करण्यासाठी स्वतःच्या लेखणी वाणीला शीण देण्याचा प्रयत्न चालविला असून, वैचारिक गोंधळात भर टाकणारा सूरही मधूनमधून त्यांच्या शब्दांतून निघत आहे. या उलट एखाद्या अज्ञानमूलक अनिष्ट रूढीवर केलेल्या सब्देतुक मूलक योग्य टीकेवर पावित्र्यविडंबनाचा खोटाच आरोप केला गेल्याची उदाहरणेही कोठे कोठे दृष्टोत्पत्तीस येत आहेत. अशा परिस्थितीत या प्रश्नावर वाद करणाऱ्या पक्षांपैकी कोणाच्या बाजूला कितपत सत्य आहे याची नीट छाननी करणे क्रमप्राप्त व आवश्यक झाले आहे.'' आणि याच लेखकाच्या मतानुसार सदर ग्रंथांची निर्मिती झाली असावी.

सदर ग्रंथाच्या अनुक्रमणिकेत एकंदर सात मुद्दे आले आहेत. त्यात 'पावित्र्य' या शब्दाचे स्पष्टीकरण, विडंबनाची व्याख्या, विडंबनाचे विविध प्रकार यांची चर्चा आलेली आहे. नालस्ती, उपहास, टवाळी, यांचा हेतू विटंबना असते. तर सद्हेतुमूलक विडंबनात सुधारणेचा हेतू असतो. तर विडंबनाचा चौथा प्रकार स्वमत मंडनासाठी, परमत खंडनासाठी उदात्त हेतूने वापरला जातो. या सर्व प्रकारच्या विडंबनाची लेखकाने ठिकठिकाणी उदाहरणांसहित चर्चा केली आहे. वि.सी. सरवटेंच्या लेखनातील दोष दिग्दर्शन, आचार्य अत्र्यांच्या मतातील उणीवा, घोटाळे , वैचारिक संदिग्धतेचीही चर्चा केलेली आहे. त्यावरून प्रस्तुत विषयाचा संदर्भात या पुस्तकाचे महत्त्व कळते.

सदर पुस्तकात लेखकाने कोणतीहि एकांगी भूमिका टाळली असून, वादाचे क्षेत्र महत्त्वाच्या मुद्यापुरतेच मर्यादित करण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, हा वाद वाढविण्याऐंवजी मिटविण्याच्या प्रयत्न केला आहे. विडंबकांच्या व भर्त्सनकांच्या आकर्षक, उत्तेजक पण उथळ विधानांनी स्वतःची हानिकारक दिशाभूल करून घेण्याच्या संभव असणाऱ्या वाचक प्रेक्षकांना पावित्र्य

विडंबना विषयी अनावड व स्वधर्म संस्कृतीबद्दल योग्य सशक्त आत्मविश्वास निर्माण होईल असे या ग्रंथाचे स्वरूप आहे.

33. **राज्याभिषेक - चंद्रिका**- ले. विद्यावाचस्पति, ज्योतिषाचार्य, दाजी नागेश आपटे (1950) यांचा हा ग्रंथ 'श्री सयाजी साहित्यमालेत' 313 वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

इ.स. 1939 एप्रिल महिन्यात श्री. प्रतापसिंह गायकवाड यांचा राज्याभिषेक समारंभ कै. श्री सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या नंतर बडोद्याच्या राज्यसिंहासनावर मोठ्या ऐश्वर्याने व उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यानंतर लौकरच त्या समारंभाच्या हकीकतींचा एक वर्णनात्मक ग्रंथ सरकारी रीतीने इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करण्यात आला. त्यात राज्याभिषेकाची योजना निश्चित झाल्यापासून तो राज्याभिषेक समारंभ व तदनंतरचे तत्संबंधी सर्व कार्यक्रम पुरे होईपर्यंतची सर्व हकीकत दिली आहे. त्यानंतर काही कालाने त्या वेळचे बडोदे राज्याचे दिवाण सर व्हि.टी. कृष्णमाचार्य यांनी अशी एक योजना निश्चित केली की बडोदे राज्यात चालू असणाऱ्या मराठी व गुजराती या दोन्ही भाषातून या समारंभाची हकीकत प्रजेच्या माहितीसाठी ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यात यावी; पण या नवीन दोन्ही ग्रंथांचे स्वरूप मात्र पहिल्या इंग्रजी ग्रंथाहून पुष्कळ भिन्न असावे असे ठरविण्यात आले.

या नवीन योजनेप्रमाणे सदर ग्रंथाचे चार भागात वर्गिकरण करण्यात आले आहे. त्या पैकीच्या पहिल्या भागात आर्य राज्यसंस्थेचे स्वरूप व तिच्यात राज्याभिषेक-विधीचे स्थान आणि महत्त्व पटविण्यात आले आहे. दुसऱ्या भागात राज्याभिषेकाच्या धार्मिक व लौकिक विधींचे स्वरूप व त्याचा तपशील, तिसऱ्या भागात पौराणिक व ऐतिहासिक कालात झालेल्या राज्याभिषेकांचे उपलब्ध होणारे साधार वृत्तांत व चौथ्या अखेरच्या भागात श्री प्रतापसिंह गायकवाड यांच्या राज्याभिषेक समारंभाची हकीकत वर्णन करण्यात आली आहे.

''पण ज्या सुप्रसंगाचे वर्णन करण्यासाठी हा ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम केला तो प्रसंग व त्याच्या वर्णनपर ग्रंथांचे सांप्रतचे प्रकाशन या दोहोत कालाने इतके विलक्षण परिवर्तन घडवून आणले की ते कोणास खरे सुद्धा वाटू नये'' लेखकाने आपल्या प्रस्तावनेत असे विधान केले आहे. लेखक पुढे

म्हणतो, ''या मध्यंतरीच्या काळात येथील सार्वभौम सत्तेचे उच्चाटन झाले, तिच्या जागी प्रथम वसाहतीच्या स्वरूपाचे स्वराज्य लोकांना मिळाले व अखेर त्याचे रुपांतर लोकराज्यात्मक गणतंत्रात झाले. या सपाट्यात हिंदुस्थानातील सर्व देशी राज्ये साफ नाहीशी झाली, त्यातील काही प्रमुख राज्ये निदान एकाकी स्वरुपाने अथवा सामुदायिक स्वरुपाने तरी राहिली पण बडोदे राज्य मात्र अजिबात नामशेष करण्यात आले. त्यामुळे कै. श्री सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीचे अवलोकन करणाऱ्या व तिचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या लोकांना भर्तृहरि कवीच्या श्लोकाप्रमाणे

**सा रम्या नगरी महान् स नृपतिः सांमतचक्रं च तत् ।**
**सर्व यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥**

असे म्हणावेसे वाटेल.

ग्रंथाच्या शेवटी पुरवणी दिली आहे त्यात 1. आणखी काही राज्याभिषेकांची हकीकत (उदा. विमलवाहच्या पुत्राचा राज्याभिषेक, सगर राजाचा अभिषेक, राजा भोज, कुमारपाल, पृथ्वीराज चौहाण.... इ. राज्याभिषेकांची थोडक्यात माहिती दिली आहे. (धार्मिक विधींचे), पुरवणी 2. मध्ये राज्याभिषेक प्रयोग (संक्षिप्त) दिले आहेत.

सदर ग्रंथातील माहिती अत्यंत उपयुक्त आहे. राज्याभिषेक होणाऱ्या राजांच्या अमदानातील प्रजेची धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व मानसिक परिस्थिति व गणतंत्रात्मक देशातील त्याच प्रकारची परिस्थिति, यांचे तौलनिक ज्ञान करवून देऊन त्यातील इष्टानिष्टता ठरविण्याला या ग्रंथाच्या द्वारे वाचकांना साधन मिळेल.

34. **मराठी साहित्याची रुपरेषा :** (इ.स. 983 ते इ.स. 1950) लेखक - डॉ. वि. पां. दांडेकर यांचे हे पुस्तक श्री सयाजी साहित्यमालेत 316वे पुष्प म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत ग्रंथात शिलालेखांच्या काळापासून ते इ.स. 1950 पर्यंतच्या काळातील मराठी साहित्याचा परामर्श घेण्यात आला आहे. हा परामर्श मर्यादित स्वरुपाचा, रुपरेषेच्या स्वरुपाचा आहे. मराठी साहित्याचे संपूर्ण, सविस्तर, सूक्ष्म विवेचन यात नाही. परंतु मराठी साहित्याचे प्रमुख मानकरी आणि त्यांचे कार्य या विषयींचे यथार्थ ज्ञान प्रस्तुत ग्रंथावरुन होईल अशी त्यांची रचना आहे.

सामाजिक-राजकीय-भौगोलिक परिस्थितीचा परिणाम साहित्यावर होतो. प्रस्तुत ग्रंथात कोणत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीत विशिष्ट ग्रंथकारांनी विशिष्ट प्रकारचेच ग्रंथ निर्माण केले, त्याचे सुरुवातीच्या काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विवेचन केले आहे. ग्रंथकारांच्या चरित्रांसंबंधी भाबडेपणाने किंवा भाविकपणाने पाल्हाळ करीत न बसता, चरित्रवजा माहिती अगदी थोडक्यात व तळटीपात दिली आहे. ग्रंथकाराचे कार्य व ग्रंथातील मर्म ह सांगण्यावरच मुख्य भर देण्यात आला आहे. बी.ए. व एम.ए. करिता मारठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्याच्या सर्वांगीण व साधार अभ्यासाकरिता अनेक ग्रंथ अभ्यासावे लागत. प्रस्तुत ग्रंथाने त्यांची दगदग वाचेल असे लेखकास वाटते.

प्रस्तुतची 'रुपरेषा' तयार करीत असताना ज्या ज्या ग्रंथकारांच्या ग्रंथाचा उपयोग करण्यात आला, त्या सर्व ग्रंथकारांचे उल्लेख लेखकाने आपल्या हृद्गतात केले आहे.

सदर पुस्तकाच्या मलपृष्ठावर वि. स. खांडेकर यांचा अभिप्राय दिलेला आहे. ते म्हणतात, ''मराठीच्या विकासाची व तिच्यातल्या विशिष्ट वैशिष्ट्यांची सर्वसामान्य वाचकाला कल्पना आणून देण्याचे सामर्थ्य या ग्रंथात निःसंशय आहे. प्राचीन व अर्वाचीन मराठी साहित्याचा ऐतिहासिक दृष्टीने पारमर्श घेण्यात आणि प्रमुख साहित्यिक व साहित्यकार यांचा परियच देण्यात श्री दांडेकरांचे संकलन कौशल्य व रसग्रहणशक्ति हे दोन्ही गुण चांगल्या रीतीने प्रगट झाले आहेत.'' तसेच डॉ. वि. भि. कोलते या पुस्तकाबद्दल म्हणतात - ''मराठी साहित्याची इतकी सुसूत्र, सुसंगत व सुबोध रुपरेषा देणारा आपला हा पहिलाच ग्रंथ असल्यामुळे तो पुढील लेखकांना मार्गदर्शक होईल. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांनाहि तो उपयुक्त वाटेल यात शंका नाही.'' तसेच डॉ. शं. गो. तुळपुळे या ग्रंथाबद्दल म्हणतात, ''मराठी वाङ्मयाचा धावता परिचय करुन घेऊ इच्छिणाऱ्या सर्वसामान्य वाचकांसाठी प्रस्तुत ग्रंथ उपयुक्त वाटेल. तपशिलात न शिरता व चर्चेचा पाल्हाळ न लावता थोडक्यात सर्व काही आणण्याची डॉ. दांडेकर यांची हातोटी प्रशंसनीय आहे.''

वाङ्मयेतिहासाच्या दृष्टिने सदर ग्रंथ उपयुक्त आहे.

✪✪✪✪✪

# संदर्भ टीपा (प्रकरण-4)


1. ग. रं. दंडवते, बडोद्याचे मराठी साहित्य, 1925, पृ.क्र. 4.
2. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार, 2001, पृ क्र. 17-18.
3. सं. गणेश अग्निहोत्री, दत्तात्रेय पुंडे, सयाजी नगरीतील साहित्यविचार, 2001, पृ क्र. 21-22.
4. सं. व प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ. क्र. 14-15.
5. सं. व प्र. य. गो. जोशी, श्री मन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ. क्र. 46.
6. G. C. Bhate, History of Modern Marathi Literature (1800-1938), 1939, Pa. 404.
7. सं. दत्तात्रेय पुंडे, वाङ्मयेतिहासाची संकल्पना, 1986, पृ.क्र. 2
8. सं. दत्तात्रेय पुंडे, वाङ्मयेतिहासाची संकल्पना, 1986, पृ.क्र. 2,3
9. सं. प्रभा गणेशकर, वसंत आ. डहाके, वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, 2001, पृ.क्र. 120
10. गो. स. सरदेसाई, माझी संसारयात्रा, 1956, पृ.क्र. 138
11. गो. स. सरदेसाई, माझी संसारयात्रा, 1956, पृ.क्र. 148
12. गो. स. सरदेसाई, माझी संसारयात्रा, 1956, पृ.क्र. 149
13. गो. स. सरदेसाई, माझी संसारयात्रा, 1956, पृ.क्र. 150-152
14. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (द्वि.खं) 1937, पृ.क्र. 24,25
15. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (द्वि.खं) 1937, पृ.क्र. 236

16. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (द्वि.खं) 1937, पृ.क्र. 22

17. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (द्वि.खं) 1937, पृ.क्र. 273

18. स. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (द्वि.खं) 1937, पृ.क्र. 126

19. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ.क्र. 129

20. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ.क्र. 12,13

21. निंबाजी पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, 1986, पृ.क्र. 48

22. सं. व प्र. वाढदिवस मंडळ, श्री सयाजी गौरवग्रंथ, 1933, पृ.क्र. 150

23. निंबाजी पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, 1986, पृ.क्र. 52-53

24. हुजूर हुकूमातील सामान्य धोरणांचे अपूर्ण व अनन्तिम टाचण, खंड 2, July 1917-1923, शाळा खाते B/8, 28-10-18

25. Government of His Highness The Maharaja Gaekwar of Baroda Rules under the Vernacular Education Act XXXVII of 1931

26. Huzur order No. 33, dated 27-3-1907 passed on Vernacular Education Department Tippan No. 217, dt. 3rd March 1927

27. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्रीमन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (प्र.खं) 1936, पृ.क्र. 91-122

28. निंबाजी पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, 1986, पृ.क्र. 47

29. सं. व प्र. वाढदिवस मंडळ, श्री सयाजी गौरवग्रंथ, 1933, पृ.क्र. 210

30. सं. व प्र. य. गो. जोशी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ.क्र. 68-75

31. के. मं. रांगणेकर, बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांचे संक्षिप्त चरित्र, 1931, पृ.क्र. 1

32. वा. भा. पाठक, टीका आणि टीकाकार, 1979, (ति.आ), पृ.क्र. 387

33. अ. म. जोशी, चरित्र-आत्मचरित्र (तंत्र आणि इतिहास), 1965, पृ.क्र. 88

34. द. न. गोखले, एका चरित्राचे चरित्र, 1985, पृ.क्र. 56

35. सं. व प्र. दामोदर सांवळाराम आणि कंपनी, श्री मन्महाराज सयाजीराव यांची भाषणे (प्र.खं) 1936, पृ.क्र. 172

36. गो. म. कुलकर्णी, आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, 1944, पृ.क्र. 42

37. सं. व प्र. य. गो. जोशी, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे (तृ.खं) 1939, पृ.क्र. 71-72

38. सं. व प्र. वि. पा. नेने, अर्वाचीन मराठी साहित्य (1875-1935), पृ.क्र. 513-514

39. अनु. रा. ब. आठवले, जगातील विद्यमान धर्म, 1935, पृ.क्र. 4

40. न्यायमंत्री 53/5, Dt. 11-2-1928 (हुजूर हुकूम)

41. H. K. K. D.D. H.O. No A-75, dt. 11-1-17

42. ना. गो. चापेकर, साहित्य समीक्षण, श. 1857, पृ.क्र. 271